# परशुरामीय

सुवर्णांक : डिसेंबर १९६६



स्वर्गीय **विष्णुशास्त्री चिपळोणकर** यांची स्मृती
अमर करावी म्हणून दि. १ जानेवारी १८८३ या पुण्यदिनी
चार प्राथमिक शिक्षकांनी नूतन मराठी विद्यालय स्थापन केले.
या बीजातून पुढे फोफावलेल्या महान वटवृक्षाची —
शिक्षण प्रसारक मंडळीची — एक प्रौढ शाखा
' न्यू पूना कॉलेज ' ( स्थापना : १४–६–१९१६ )
म्हणजेच ' सर परशुरामभाऊ महाविद्यालय '.

सुवर्णमहोत्सव-समारंभाचे माननीय अध्यक्ष
**डॉ. चिंतामण द्वारकानाथ देशमुख**
दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू



**सुश्रुतश्चार्थसारज्ञः स्निग्धः सारस्वतः शुचिः ।**
**तुष्टश्चिन्तामणिर्येषां ध्रुवा तेषां कृतार्थता ॥**



ज्यांच्या पुण्यस्मरणार्थ जमखंडी संस्थानचे अधिपती
श्रीमंत शंकरराव ऊर्फ अप्पासाहेब पटवर्धन
यांनी ' न्यू पूना कॉलेज 'ला दोन लक्ष रुपयांची उदार देणगी देऊन
त्याचे आज प्रचलित असलेले नवे नाव त्याला दिले ( दि. २६–९–१९२८),
ते त्यांचे पुण्यश्लोक पिताजी
स्वर्गीय **सर परशुरामभाऊ पटवर्धन**

# परशुरामीय

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे नियतकालिक

**सुवर्णांक : वर्ष ५१ : डिसेंबर १९६६**

**संपादक मंडळ**

**अध्यक्ष**
प्राचार्य रा. रा. मालेगावकर

**उपाध्यक्ष**
उपप्राचार्य रं. ना. गायधनी
उपप्राचार्य डॉ. रा. वि. घाटे

**संपादक**
डॉ. श्री. र. कावळे

**कार्यकारी संपादक**
प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर

**सहायक संपादक**
प्रा. चंद्रशेखर बर्वे

**सदस्य**
डॉ. अनुराधा पोतदार
प्रा. भीमराव कुलकर्णी
प्रा. स. रा. केणी
प्रा. वि. भा. देव
प्रा. भ. ना. कुलकर्णी
प्रा. रा. म. गोखले
प्रा. य. बा. राजे
प्रा. वि. द. सरलष्कर
डॉ. व. के. मांडके

**विद्यार्थी प्रतिनिधी**
वसंत शिंदे, तृ. व. साहित्य
जयश्री नरगुंदकर, तृ. व. साहित्य
वसंत शेंबेकर, तृ. व. शास्त्र

## या अंकात

| | |
|---|---|
| सुवर्णांकाच्या निमित्ताने | दोन |
| प्रा. ना. ग. नारळकर | चार |
| पन्नास वर्षांची वाटचाल | १ |
| मराठी विभाग | १७ |
| हिंदी विभाग | ४९ |
| संस्कृत विभाग | ६२ |
| इंग्रजी विभाग | ७५ |
| सामाजिक विषय विभाग | ८३ |
| विज्ञान विभाग | ९२ |
| परशुरामीय वार्ता | १०५ |

# सुवर्णांकाच्या निमित्ताने

१४ जून १९६६ रोजी आपल्या महाविद्यालयाने पन्नास वर्षांची वाटचाल पूर्ण केली. हे शैक्षणिक वर्ष सुवर्णमहोत्सवसंवत्सर म्हणून साजरे होत आहे. त्यासाठी 'परशुरामीय'च्या या वर्षीच्या अंकाला 'सुवर्णांक' हे अभिधान आम्ही दिले आहे. हा 'सुवर्णांक' डिसेंबर १९६६ मध्ये परशुरामीयांना सादर करण्याची योजना आम्ही आखलेली होती. परंतु काही अपरिहार्य अडचणींमुळे आता जानेवारी १९६७ मध्ये आम्ही तो सर्व परशुरामीय आणि महाविद्यालयाचे स्नेही – हितचिंतक यांना मोठ्या स्नेहाने नम्रतापूर्वक सादर करीत आहोत.

सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने थोडे मागे वळून पाहावे, आपण आज कुठे आहोत याचे भान वाढवावे आणि उद्यासाठी आपण करीत असलेले संकल्प – आपल्या योजना यांची दिशा सूचित करावी – आणि या प्रयत्नातून महाविद्यालयाच्या जीवनाची पार्श्वभूमी, प्रेरणा, विकासप्रक्रिया यांचे धावते चित्र परशुरामीयांना सादर करावे असे आम्ही योजले. 'परशुरामीय'चे कार्यकारी संपादक प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांनी परिश्रम घेऊन, उपलब्ध साधने जुळवून, कसोशीने तपासून, विशेष प्रसंगी महाविद्यालयाशी घनिष्ठ संबंध आलेल्या व्यक्तींच्या मुलाखती घेऊन मोठ्या साक्षेपाने "पन्नास वर्षांची वाटचाल" हा उद्‌बोधक आणि ललितरम्य ऐतिहासिक निबंध सिद्ध केला आहे. सर्वांना तो आपल्या महाविद्यालयाच्या गतिविज्ञानाचा भावपूर्ण परिचय करून देईल अशी आशा आहे.

आपले महाविद्यालय स्थापण्याच्या आणि वाढवण्याच्या कामी ज्यांनी ज्यांनी कार्य केले त्यांचे आम्ही आज कृतज्ञतापूर्वक स्मरण करीत आहोत. 'परशुरामीय' – पूर्वीचे 'न्यू पूना कॉलेज मॅगेझिन,' 'एस्. पी. कॉलेज मॅगेझिन,' 'परशुरामियन्' – ह्या नियतकालिकांचे गेल्या पन्नास वर्षांत ज्यांनी संपादन केले, नवोदित लेखकांना उत्तेजन देऊन त्यांना सारस्वतसेवेस ज्यांनी उद्युक्त केले आणि विद्यार्थ्यांच्या साहित्यगुणांच्या अभिव्यक्तीसाठी क्षेत्र निर्माण करून दिले त्या सर्व संपादकांबद्दल आम्ही कृतज्ञता प्रकट करीत आहोत.

या वर्षीच्या 'परशुरामीय' निबंधस्पर्धेतील निबंधांचे परीक्षण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याबद्दलची आमची विनंती श्री. शांताराम आठवले यांनी मान्य केली व निबंधस्पर्धा-पारितोषिक-वितरणप्रसंगी 'आजचे जीवन : आजचे चित्रपट' या महत्त्वाच्या विषयावरील आपल्या बहुमोल विचारांचा लाभ आम्हांस घडवून दिला याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोत. यशस्वी स्पर्धकांपैकी पहिल्या क्रमांकाचा श्री. पटवर्धन यांचा निबंध या अंकात समाविष्ट केला आहे. तो वाचकांनी अवश्य वाचावा अशी आमची शिफारस आहे. यशस्वी स्पर्धक श्री. पटवर्धन आणि सौ. गाडगीळ यांचे हार्दिक अभिनंदन!

या अंकाच्या उभारणीत अनेकांचे सहकार्य आम्हांस लाभले. प्रकृतीचे अस्वास्थ्य असताही प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर व प्रा. चंद्रशेखर बर्वे यांनी संपादनाचे काम खंड पडू न देता निरलसपणे पूर्ण केले, याचा आवर्जून स्नेहपूर्वक उल्लेख करावासा वाटतो. संपादक-मंडळावरील सर्व सदस्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद! प्राचार्य मालेगावकर यांनी वेळोवेळी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल संपादक-मंडळ त्यांचे फार ऋणी आहे.

अंकासाठी जाहिराती देऊन ज्यांनी महाविद्यालयावरील आपला लोभ प्रकट केला त्या जाहिरातदार मंडळींचे व जाहिराती मिळवून आणण्यासाठी ज्यांनी काम केले त्या विद्यार्थीमित्रांचे आम्ही आभारी आहोत. कै. प्राचार्य ना. ग. नारळकर यांच्या रेखाचित्रासाठी त्यांचे चिरंजीव श्री. आ. ना. नारळकर यांनी सहकार्य केले. कै. प्राचार्य नारळकर व श्री. अनंतराव पाटील यांचे ब्लॉक्स 'साधने' ने दिले. डॉ. बा. द. टिळक यांचा ब्लॉक 'केसरी' ने दिला. आम्ही त्यांचे फार ऋणी आहोत.

सुवर्णांकाचे मुखपृष्ठ प्रसिद्ध चित्रकार श्री. अनंत सालकर यांनी अल्पावधीत करून दिले. आतील रेखाचित्रे श्री. बुरांडे यांनी थोड्या वेळात तयार केली. आपले माजी विद्यार्थी चित्रकार श्री. सुधाकर खाजगीवाले यांचीही बरीच मदत झाली. अंकाच्या आतील सजावटीसाठी विद्यार्थी–चित्रकार श्री. दि. शा. कट्टू व कु. जयश्री नरगुंदकर यांनी सहकार्य केले. संपादनाच्या कामात विद्यार्थी-प्रतिनिधी श्री. वसंत शिंदे, श्री. वसंत शेंबेकर आणि कु. जयश्री नरगुंदकर यांनी हौसेने भाग घेऊन अंकाच्या उभारणीमधला आपला वाटा तत्परतेने उचलला. मुद्रणाचे काम 'आनंद'चे श्री. यशवन्त गो. जोशी यांनी नेहमीप्रमाणे सुबक रीतीने केले. सर्वांना धन्यवाद.

श्री. र. कावळे

'परशुरामीय'चा हा सुवर्णांक

आपल्या महाविद्यालयाचे व शिक्षण प्रसारक मंडळीचे

एक थोर सेवक

कै. प्राचार्य नारायण गणेश ऊर्फ नानासाहेब नारळकर

यांच्या पुण्यस्मृतीस सादर समर्पण

# कै. प्राचार्य नारायण गणेश नारळकर

प्राचार्य नारायण गणेश नारळकर यांचं १६ ऑक्टोबर १९६६ रोजी देहावसान झालं. नू. म. वि. हायस्कूल, सर परशुरामभाऊ कॉलेज, शिक्षण प्रसारक मंडळी आणि महाराष्ट्रातील–भारतातील प्राचार्य नारळकरांचे असंख्य चाहते आणि विद्यार्थी हे सारे एका अर्थानं पोरके झाले. त्यांच्या मृत्यूनं सारा सुबुद्ध महाराष्ट्र हळहळला, त्यांच्याबद्दलच्या कृतज्ञतेच्या भावनेनं विनम्र झाला.

२८ ऑक्टोबर १८९२ रोजी प्राचार्य नारळकरांचा जन्म झाला. मृत्युसमयी ते च्याहात्तर वर्षांचे होते. गेली आठ-नऊ वर्षे ते आजारीच होते, अंथरुणाला खिळून होते, दुर्धर रोगाशी झगडा देत होते. अंतःकरण व्यथित करून टाकील अशा स्थितीत ते दुर्दैवानं होते. हिमालयाएवढं उत्तुंग कर्तृत्व करून कृतार्थ झालेल्या एका भव्यदिव्य जीवनातलं अखेरचं पर्व मात्र निर्घृण नियतीनं क्लेशमय करून टाकलेलं होतं.

तत्त्वज्ञान विषय घेऊन प्रा. नारळकरांनी १९१६ साली एम्. ए. पदवी मिळवली. मध्यप्रांतातील सरकारी शिक्षणखात्यात त्यांनी नंतर प्रवेश केला. एल्. टी. ही प्रशिक्षणातील पदवी प्रथम श्रेणीत संपादिली. १९१९ च्या सुमारास शिक्षण प्रसारक मंडळीनं महाविद्यालयीन शिक्षणाच्या क्षेत्रात जिद्दीनं पाऊल टाकून समर्थपणे वाटचाल सुरू केली होती. नूतन मराठी विद्यालयाचा संसार वाढत जाऊन १९१६ साली कै. प्रा. द. रा. धारपुरे आणि त्यांचे सहकारी यांच्या परिश्रमानं 'न्यू पूना कॉलेज' – आजचं सर परशुरामभाऊ महाविद्यालय उभं राहिलं होतं. सुरुवातीच्या काळात गरज होती निष्ठावंत सेवकांची! कै. धारपुरे यांनी पाचारण केलं नि सरकारी नोकरी सोडून कै. नारळकर १९१९ साली पुण्यास आले. २७ मार्च १९२० रोजी शिक्षण प्रसारक मंडळीचे आजीव सभासद झाले. १६ नोव्हेंबर १९४३ मध्ये सेवा-निवृत्त होईपर्यंत त्यांनी विविध नात्यांनी संस्थेची सेवा केली. जे हाती घेतलं ते तडीस नेलं. जे हाती घेतलं त्याचं सोनं केलं! अशी योग्यता, असा अधिकार, अशी दृष्टी असलेला हा थोर माणूस शि. प्र. मंडळीस लाभला हे तिचं–आपणा सर्वांचंच–मोठं भाग्य!!



**कै. प्राचार्य ना. ग. नारळकर**

प्रदीपस्तव कार्यस्य प्रचोदयतु नः सदा !



**‘ परशुरामीय ’ संपादक मंडळ, १९६६**

**बसलेले :** ( डावीकडून ) प्रा. भ. ना. कुलकर्णी, प्रा. रा. म. गोखले, डॉ. श्री. र. कावळे, प्रा. रं. ना. गायधनी, प्राचार्य रा. रा. मालेगावकर, प्रा. य. बा. राजे, प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर, प्रा. स. रा. केणी, डॉ. अनुराधा पोतदार

**उभे :** ( डावीकडून ) कु. जयश्री नरगुंदकर, प्रा. वि. द. सरलष्कर, प्रा. वि. भा. देव, डॉ. व. के. मांडके, प्रा. चंद्रशेखर बर्वे, प्रा. भीमराव कुलकर्णी, श्री. वसंत शेंबेकर, श्री. वसंत शिंदे.



**डॉ. प्र. रा. भुपटकर**
पीएच्. डी. पदवी प्राप्त



**डॉ. दि. मु. वाघ**
पीएच्. डी. पदवी प्राप्त



**प्रा. श. गो. लागू**
‘ थिऑरोटिकल फिजिक्स ’ मध्ये
पीएच्. डी. प्राप्त करण्यासाठी
कॅनडास प्रयाण

प्राचार्य नारळकर ध्येयनिष्ठेमुळेच शिक्षक होण्यास तयार झाले. कै. प्रा. महादेव मल्हार जोशी यांची प्रेरणा फलदायी ठरली. स्वदेश, स्वराज्य, स्वभाषा यांच्याबद्दलचा अभिमान त्यांच्या गतिशील व्यक्तित्वातून अखंड संचरत होता. त्याला योग्य असं कार्यक्षेत्र मिळालं. १९२० ते १९३६ ही सोळा वर्षे प्रा. नारळकरांनी आपल्या महाविद्यालयात अध्यापनाचं काम केलं. त्यांचे विषय होते–तर्कशास्त्र, मानसशास्त्र नि इंग्रजी. एखादा दुसरा अपवाद सोडल्यास नारळकरांशी तुलना करता येईल असा तर्कशास्त्र-मानसशास्त्राचा कुशल अध्यापक उभ्या महाराष्ट्रात नाही. त्यांचं ज्ञान जीवनाच्या गाभ्यात जाऊन, सर्जनशील होऊन विद्यार्थ्यांवर संस्कार करी. ते पुस्तकी, पढिक, शुष्क असं कधीच राहू शकत नसे. अध्यापक म्हणून नारळकरांचं जे मोठेपण आहे ते या जीवनरसस्पर्शात सामावलेलं आहे.

शिक्षणप्रक्रियेच्या व्यापक नि सर्वस्पर्शी स्वरूपाची प्रा. नारळकरांना खोल जाणीव होती. स्वदेशीचा आग्रहानं पुरस्कार करणारे ते एक निष्ठावंत देशभक्त होते. लोकमान्य आणि महात्माजी यांच्या विचारधारांनी त्यांचं कार्यक्षेत्र प्रफुल्लित झालं होतं. १९१९- मध्ये त्यांच्या प्रेरणेनं नू. म. वि. भांडाराची शाळेत स्थापना झाली. आजही भांडाराची वास्तू नारळकरांची पावन स्मृती जागती ठेवण्यासाठी सहर्ष उभी आहे. स्वदेशीचा पुरस्कार त्या वेळी आवश्यक होताच. नारळकर आज असते तर म्हणाले असते, ‘ मित्रांनो, आजही तो तितकाच आवश्यक आहे. ’

१९२६ ते १९३० ही चार वर्षे ‘ न्यू पूना कॉलेज मॅगेझिन ’ या त्रैमासिकाचं प्राचार्य नारळकर संपादन करीत होते. महाविद्यालयीन कालिकाचं शैक्षणिक-सामाजिक कार्य किती महत्त्वाचं आहे हे प्रा. नारळकरांनी ओळखलं होतं. ‘ ओल्ड बॉईज् कॉर्नर, ’ ‘ अवर इन्फर्मेशन ब्यूरो ’ ‘ एस्. पी. मंडळी अँड हर इन्स्टिट्यूशन्स ’ अशी विविध सदरं त्यांनी सुरू केली. उदयोन्मुख लेखकांना उत्तेजन देण्यासाठी नियतकालिकाचा आकार बदलला, पृष्ठसंख्या वाढवली, स्पर्धा सुरू केल्या. विद्यार्थी-संपादकांना ग्रंथपरीक्षणासारखी कामं सांगून कार्यप्रवृत्त केलं. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झालेले डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, श्री. वि. वि. बोकील इ. अनेक विद्यार्थी-लेखक मराठी सारस्वताची आज सन्मानानं सेवा करीत आहेत.

१९३० ते १९३६ ही सहा वर्षे प्राचार्य नारळकरांनी शिक्षण प्रसारक मंडळीचे चिटणीस म्हणून काम केलं. हा काळ संस्थेच्या दृष्टीनं धामधुमीचा होता. नू. म. वि. हाय स्कूलचा सुवर्णमहोत्सव याच काळात साजरा झाला. बांधकामाच्या बऱ्याच योजना संस्थेनं त्या वेळी हाती घेतलेल्या होत्या. त्या पूर्ण करण्यासाठी नारळकरांनी अपार कष्ट उपसले. संस्थेसाठी मदत मिळवण्याचा उद्योग चालू ठेवला. मुंबईच्या सरदारगृहाचे मालक श्री. साळवेकर यांच्याकडून एक मोठी देणगी त्यांनी मिळवली. तिच्यामुळं ‘ साळवेकर तत्त्वज्ञान-निबंध-स्पर्धा ’ महाविद्यालयात सुरू झाली.

१९३६ साली प्राचार्य नारळकरांची नू. म. वि. हाय स्कूलचे मुख्याध्यापक म्हणून बदली झाली. सहा वर्षे त्यांनी मुख्याध्यापक म्हणून काम केलं. नू. म. वि. -त

नारळकरांच्या कर्तृत्वाला बहर आला, नवे उन्मेष आले. नू. म. वि. - ची कार्यशक्ती सर्व बाजूंनी वाढवण्यासाठी त्यांनी जिवाचं रान केलं; नाना कल्पना, नाना योजना समर्थपणे प्रत्यक्षात आणल्या. नू. म. वि. चा 'कायाकल्प' झाला. जीवनविकासाचं सर्वांगीण शिक्षण देणारी एक आदर्श शाळा म्हणून नू. म. वि. ख्यातनाम झाली. विद्यार्थी नव्या जगात जाण्यापूर्वीच त्या जगाचं रूप नाना नारळकरांनी आपल्या प्रज्ञेनं – प्रतिभेनं जाणलं होतं, त्या बदलत्या जगाचा परिचय घडवण्यासाठी नाना नारळकर मुलांशी 'संवाद' करीत होते! नानांचा उत्साह ओसंडून धावत होता, प्रचंड कार्यशक्ती निर्माण करीत होता!! सैनिकी शिक्षण, लांबचे प्रवास, व्यापार, जाहिरात, विक्रयकला, फोटोग्राफी - नानांना कशाचं वेड नव्हतं? साऱ्या जीवनाला कवेत घेण्याची जिद्द बाळगून हा क्रान्तदर्शी महापुरुष पृथ्वीवर उभा होता; नवमानव नि नवसमाज यांची स्वप्नचित्रं रेखाटण्यात धुंद झाला होता. सत्यनिष्ठा, सौंदर्यपूजा नि मानवप्रेम यांचं मधुर रूप नानांच्या व्यक्तित्वात साकार झालं होतं.

एक वर्षभर नारळकरांनी मुंबईच्या पोदार कॉमर्स कॉलेजचं प्राचार्यपद भूषवलं नि १६ नोव्हेंबर १९४३ साली ते सेवानिवृत्त झाले. दोन तपांच्या निरलस सेवेनंतर, प्रभावी कर्तृत्वानंतर!! तरीही त्यांच्या चिरतरुण मनानं थांबायचं नाही असं ठरवलं. विमाव्यवसायात कर्तृत्वाचं एक नवं क्षेत्र त्यांना मिळालं. वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या मुंबई-शाखेचे ते बारा-तेरा वर्षे प्रमुख होते. तेवढ्या काळात त्यांनी विमाव्यवसायात नव चैतन्य आणलं; नि वेस्टर्न इंडिया कंपनीची भरभराट झाली.

आपल्या कॉलेजातल्या प्राध्यापक-निवासामधल्या टुमदार देवघरापासून तो नू. म. वि. -मधल्या आरसेमहालापर्यंत प्राचार्य नारळकरांच्या चोखंदळ, रसिक, उदार, नम्र, ऐश्वर्योपासक व्यक्तित्वाचे आविष्कार त्यांची स्मृती जागती ठेवीत आहेत. नानांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचं संपूर्ण आकलन होण्यासाठी आपल्याला त्यांच्याइतकं मोठं व्हायला हवं! 'चारी दिशा' शोधत राहणाऱ्या त्यांच्या कल्पक दृष्टीला गवसलेलं सत्य आत्मसात करण्यासाठी प्रयत्नशील रहायला हवं. शास्त्र आणि व्यवहार यांची सांगड घालून समृद्ध, संपन्न जीवन निर्माण करण्यासाठी नाना एकाकी मनानं शोधत होते, त्यांच्या मनाला 'रुखरुख' लागली होती ती वर्तमान अन भविष्य यांना सांधणारा पूल कसा टाकता येईल याबद्दलची. साऱ्या शिक्षणप्रक्रियेची दिशा नानांनी आपल्या विचारांनी अन कृतींनी दाखविली. त्याबद्दल कृतज्ञतेशिवाय दुसरा कोठलाच भाव मनात येणं शक्य नाही. नानांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर नानांना सद्गती देवो.

# पन्नास वर्षांची वाटचाल

क. श्री अर्जुनवाडकर

## ‘आधी बीज एकलें’

एक जानेवारी, अठराशे ऱ्यायंशी. कोणी एक डोंगरे, कोणी एक देव, कोणी एक उकिडवे, कोणी एक करंबेळकर असे चौघे तरुण बुधवार पेठेतल्या मोरोबादादा फडणिसांच्या वाड्यात जमले होते. स्वदेश, स्वराज्य, स्वभाषा – या स्वतत्त्वाची ज्योत ज्याने आपल्या मनांत पाजळली, त्या आपल्या अचिरदिवंगत गुरूची, ‘ मराठी भाषेच्या शिवाजी ’ची, ‘ निबंधमाला ’कार स्व. विष्णुशास्त्री चिपळोणकर यांची, स्मृती अमर करावी, या हेतूने ते जमले होते. काय करावे? असे काही केले पाहिजे, की ज्यायोगाने चिरकालपर्यंत या नव्या ‘ शिवराजाचें आठवावें रूप। शिवराजाचा आठवावा प्रताप। शिवराजाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं ॥ ’ असे व्हावे; आणि त्याने पाजळलेली दिव्य ज्योत अगणित मनोमंदिरांत उत्तरोत्तर वर्धिष्णू आणि चरिष्णू होऊन तिच्या प्रकाशांत देश उजळून निघावा. त्यांना गुरूचे शब्द आठवले : ‘ तर देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय. ही संपन्नता सिद्ध करण्याचीं दोन मोठीं साधनें म्हटलीं म्हणजे रसना व लेखणी हीं होत. पहिल्या सदराखालीं शाळा,— ’... हां, बरोबर! आपण हेच करणार. त्या चौघांचा निश्चय झाला. या दिशेने खुद्द गुरूनेच टाकलेले पाऊल ‘ न्यू इंग्लिश स्कूल ’च्या रूपाने त्यांना समोर दिसतच होते. ती उक्ती आणि ही कृती यांनी त्यांचा मार्ग ठरून गेला. त्यांनी ‘ हरिः ॐ ’ म्हणून एका नव्या शाळेचे पुण्याहवाचन केले; आणि ज्या वास्तूत गुरूच्या अध्वर्युत्वाने ‘ न्यू इंग्लिश स्कूल ’ची स्थापना १८८० साली झाली होती, त्याच वास्तूत शिष्यांच्या पुढाकाराने ‘ नूतन मराठी विद्यालय ’ अस्तित्वात आले.

नूतन मराठी विद्यालयाने ८० मुलांनिशी कार्याचा श्रीगणेशा केला; आणि वर्षअखेरपर्यंत चारशेच्या, आणि दुसऱ्या वर्षाअखेर सहाशेच्या घरांत प्रवेश केला. मासिक फी चार आणे; फीचे मासिक उत्पन्न १७५ ते २०० रुपये; म्युनिसिपालिटीकडून दरमहा २० रुपये मदत. खर्चाच्या बाजूला शाळाभाडे २७॥ रुपये; शिक्षकांचा आणि शिपायाचा पगार ( काही शिक्षक दरमहा केवळ २॥ रुपये पगार घेत असत! या काळात शाळेच्या शिपायालाही दरमहा ६ रुपये पगार असे ) मिळून खर्च दरमहा १३५ ते १५० रुपये; – या आकड्यांत शाळेचा प्रपंच चालू झाला. तीन वर्षांच्या शेवटी प्रसिद्ध केलेल्या ‘ रिपोर्ट ’त शाळेचे ‘ व्यवस्थापक ’ श्री. रामचंद्र भिकाजी कुलकर्णी यांनी शाळेची प्रगती, स्थिती आणि गरजा यांचा आढावा घेऊन लोकांना अशी विनंती केली आहे की, ‘ श्रीमान् सरकार आपल्या सरकारी शाळांच्या गरजा पुरविण्याला समर्थ आहे. परंतु आमच्या या खासगी शाळेच्या गरजा पुरविण्याला आमच्या परोपकारी लोकांवांचून कोण समर्थ आहे? श्रीमान् व कनवाळू गृहस्थ ही अडचण मनांत आणून तिच्यापासून या शाळेला सोडविण्याविषयीं यथाशक्ति यत्न करतील अशी आम्ही संस्थापक आशा करितो. ’ ‘ आम्हीं हातीं धरलेलें काम कशा जबाबदारीचें आहे व आम्हांस योग्य प्रोत्साहन मिळालें असतां आम्ही आपल्या कामांत किती सुधारणा करूं, हें पुढें अनुभवांतीं समजेल. संस्थानिक, जहागिरदार व थोर गृहस्थ यांनीं आमची खरी स्थिति मनांत आणून द्रव्यजलानें या शाळावृक्षाची जोगवण करावी, अशी आमची त्यांस सविनय प्रार्थना आहे. ’ ही प्रार्थना करितांना चालकांनी आपल्या कर्तव्यनिष्ठ दृष्टीचाही प्रत्यय आणून दिला आहे : ‘ हा धंदा

सोडून देऊन सरकारी नोकरी पतकरून आम्ही राहिलों असतों, तर आमची द्रव्यासंबंधींची स्थिति आतां आहे, यापेक्षां आजला चांगली असती, वगैरे गोष्टी खऱ्या आहेत. परंतु स्वावलंबन करून लोकांना आवडेल असें फायद्याचें शिक्षण मुलांना देऊन देशसेवेचा एक अल्पसा भार यथाशक्ति व फार हाव न धरितां मस्तकीं वाहण्याचा जो आमच्या मंडळीचा मूळ हेतु तो, सरकारी नोकरी धरून खेडेगांवांत पडून राहण्यानें, खचित तडीस गेला नसता. '

अशा अडचणींतून चालकांनी शाळा जगविली. त्या काळी पुण्यात सालोसाल प्लेगची साथ येई. प्लेग आला, की शाळा बंद पडे. शाळा बंद म्हणजे फी बंद; आणि फी बंद म्हणजे शिक्षकांचे पगारही बंद. अशा कठीण दिवसांत शाळेतील एक-दोघां जुन्या शिक्षकांनी थोडे दिवस प्रत्यक्ष मधुकरीही मागितली होती. अशा अडचणी आल्या, तरी संस्था चालविण्याचा निर्धार चालकांनी कधीही सोडला नाही. 'जर उपक्रम केलातच, तर यावज्जीव तो सोडूं नका,' असा जो शाळेच्या स्थापने-पूर्वी विष्णुशास्त्र्यांनी चालकांपैकी काहींना समक्ष भेटीत निक्षून उपदेश केला होता, त्याची आठवण त्यांनी कधीही बुजू दिली नाही. या काळात शाळेला आर्थिक अडचणीतून तारून नेण्यासाठी 'डेक्कन कॉलेजा'-तील विद्यार्थ्यांनी प्रतिवर्षी शे-दोनशे रुपये देण्याचे योजिले असल्याचे वृत्त देऊन 'केसरी'ने या विद्यार्थ्यांना असे आवाहन केले की, '... विद्यार्थी मजकुरांनीं हा उपक्रम कांहीं वर्षे चालविला तर तो त्यांस भूषणावह होणार आहे. ... वास्तविक पाहिलें तर एवढ्या विद्यार्थि-समूहास ही दर महिना हजामत दोन हजामतीची बाब आहे व सारखा दिल लागल्यास ती सहज तडीस नेतां येण्याजोगी आहे.' पण अखेर ही 'हजामत दोन हजामतीची बाब' प्रत्यक्षात उतरली नाही; आणि शिक्षकांना मधुकरी मागण्याचा प्रसंग यावयाचा टळला नाही.

## 'बीज अंकुरलें, रोप वाढलें'

अशी पाच वर्षे गेली. या काळात 'स्वभाषेच्या द्वारें शास्त्रीय विषयांचें तसेंच धर्मविषयक व नीतिविषयक शिक्षण' या आपल्या उद्दिष्टाच्या दिशेने नूतन मराठी विद्यालय वाटचाल करीत राहिले. ५ फेब्रुवारी, १८८८ या दिवशी शाळेच्या व्यवस्थापकांनी आणि हित-चिंतकांनी 'नूतन मराठी विद्यालयाच्या दिवाणखान्यांत शहरांतील थोर, विद्वान् संभावित गृहस्थांची सभा भरविली' आणि तीत 'मराठी शिक्षण प्रसारक मंडळी' या नावाची एक मंडळी स्थापन करून (हिच्या नावाचे पुढे १९१४-मध्ये 'शिक्षण प्रसारक मंडळी' असे रूपांतर करण्यात आले) शाळा तिच्या ताब्यात दिली. या मंडळीच्या अधिष्ठायक मंडळीचे (म्हणजे आजच्या 'नियामक मंडळा'चे) पहिले अध्यक्ष, दिगंत कीर्तीचे प्राच्यविद्यापंडित डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे होते; आणि ते १९२५-मध्ये दिवंगत होईपर्यंत सदतीस वर्षे अध्यक्षपद भूषवून मंडळीला मार्गदर्शन करीत राहिले. प्रतिवर्षी एका इयत्तेची भर अशा क्रमाने वाढ होत शाळेच्या हाय स्कूलमधील पहिली ११ विद्या-र्थ्यांची तुकडी १८९६ साली मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेला बसली. शंभर टक्के निर्णय; आणि श्री. (पुढे डॉ.) वि. स. घाटे हे सबंध इलाख्यात पहिले आणि पहिल्या जगन्नाथ शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्तीचे मानकरी; असे भरघोस यश मिळाले! कर्तृत्वाची रोख पावती मिळाली. क्षितिजे रुंदावू लागली.

१९१५-मध्ये शाळा स्वतःच्या इमारतीत भरू लागली. पुढल्याच वर्षी (१९१६) त्याच आवारात नवी इमारत उभी राहून तीत 'न्यू पूना कॉलेज' (हल्लीचे 'सर परशुरामभाऊ महाविद्यालय') नांदावयास आले. एकाच आवारात प्राथमिक शाळा, प्रशाला आणि महाविद्यालयसुद्धा! आज एकदम कोणाला खरेही वाट-णार नाही. आणखी तीन वर्षांनी (१९१९) 'राउंड' मैदानावर (अप्पा बळवंत चौकातली आजची जागा) नवी इमारत उभी राहिली; आणि मराठी शाळेने तीत प्रवेश केला. 'न्यू पूना कॉलेज'ने आपल्या स्वतंत्र घरात १९२६-मध्ये प्रवेश केला. मूळ वास्तूत प्रशाला राहिली. मध्यंतरी १९१८-मध्ये सोलापुरात 'हरिभाई देवकरण हायस्कूल' स्थापन झाले; १९२४-मध्ये पुण्यात 'मीमांसा विद्यालय'; १९३३-मध्ये पुण्यात 'इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स' (ही संस्था १९४९-पर्यंत चालवून पुढे बंद करण्यात आली) आणि १९३६-मध्ये 'स्कूल ऑफ रेडिओ फिजिक्स' (ही संस्था १९५४-पर्यंत चालवून पुढे बंद करण्यात आली); १९३७-मध्ये मुंबईत 'राम-नारायण रुइया महाविद्यालय' आणि पुढे १९४१-मध्ये तेथेच 'पोदार कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स'; १९४१-मध्ये पुण्यात 'टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन'; १९४९-मध्ये 'शारीरिक शिक्षण विद्यालय' आणि 'एस. टी. सी. इन्स्टिटयूट'; १९५३-मध्ये 'विनय-

कुमार रुइया मूकबधिर विद्यालय'; १९५६-मध्ये 'नूतन मराठी विद्यालय – शिशुशाला'; १९६०-मध्ये मुलींची 'नूतन मराठी विद्यालय प्रशाला'; – असा शि. प्र. मंडळीचा व्याप उत्तरोत्तर वाढत गेला.

आज मंडळीने चालविलेल्या सर्व संस्थांत मिळून सुमारे ६५० अध्यापक आणि अन्य सेवक; आणि सुमारे १५००० विद्यार्थी असून वार्षिक खर्च सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. ब्यांयशी वर्षांपूर्वी आठ-दहा शिक्षक, सुरवातीला सत्तर-ऐंशी आणि पुढे चार-पाचशेच्या घरात विद्यार्थी, वार्षिक आर्थिक उलाढाल सुमारे दोन हजार रुपये, – अशी स्थिती होती! चार सामान्य प्राथमिक शिक्षकांनी आरंभिलेल्या लहानशा कार्याला आज केवढे असामान्य, मोठे स्वरूप आले आहे! छांदोग्योपनिषदात श्वेतकेतूला आरुणीने उगाच नाही सांगितले, 'यं वै सोम्य! एतमणिमानं न निभालयसे, एतस्य वै सोम्य! एषोऽणिम्नः एवं महान् न्यग्रोधस्तिष्ठति; श्रद्धत्स्व सोम्य!' 'त्या बीजाचा वटवृक्ष आतां तरारून गेलेला दिसत असून त्याच्या शाखांच्या एका बाहूची पारंबी उत्तर टोंकाला मुंबईत, तर दुसऱ्या बाहूची दुसरी पारंबी दक्षिण टोंकाला सोलापुरांत, अशा पारंब्या फोंफावलेल्या आहेत. या सर्व शाखांवर बसून आपलीं पोटें ज्ञानानें भरलेले पक्षी नित्य उडून जातात. हजारों नवे येतात. असा हा या वटवृक्षाचा गजबजलेला संसार आज पाऊणशें वर्षें झालीं तरी तारुण्याच्या टवटवीनें रसरसलेला दिसत आहे. याला अद्यापि नवीन पारंब्यांचे धुमारे फुटत राहतील असा विश्वास आहे.' शिक्षण प्रसारक मंडळीच्या अमृतमहोत्सव-प्रसंगी (१९५८) नियामक मंडळाचे अध्यक्ष महामहोपाध्याय पोतदार यांनी काढलेले हे उद्गार किती समर्पक आहेत!

## 'न्यू पूना कॉलेज' : थोडा पूर्वेतिहास

शिक्षण प्रसारक मंडळीच्या या विस्तारापैकी 'न्यू पूना कॉलेज'वर आता दृष्टी केंद्रित करावयाची आहे. या कॉलेजची स्थापना झाली, त्या वेळी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात 'एल्फिन्स्टन कॉलेज, डेक्कन कॉलेज, विल्सन कॉलेज, सेंट झेवियर कॉलेज' आणि 'राजाराम कॉलेज' अशी पाच सरकारी आणि 'फर्गसन कॉलेज' हे एकटेच खासगी अशी सहा कॉलेजे मुंबई युनिव्हर्सिटीच्या कक्षेत कार्य करीत होती. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रतिवर्षी झपाट्याने वाढत होती; इतकी की, १९१४ साली फर्गसन कॉलेजमधली विद्यार्थिसंख्या जवळजवळ १२००-च्या घरात जाऊन सुमारे पन्नास-साठ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला. इतर कॉलेजांतूनही प्रायः असेच घडले; आणि उच्चशिक्षणेच्छु विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येची काही तरतूद करणे अपरिहार्य ठरले. या पार्श्वभूमीवर प्रा. दत्तात्रय रामचंद्र धारपुरे यांच्या दूरदृष्टीने आणि पुढाकाराने शिक्षण प्रसारक मंडळीने नवे कॉलेज स्थापन करण्याच्या हालचालींना प्रारंभ केला. १९१४-च्या डिसेंबरमध्ये डॉ. सर भांडारकरांच्या सहीने मुंबई युनिव्हर्सिटीच्या रजिस्ट्रारला अर्ज गेला; आणि त्यात नवे कॉलेज सुरू करण्याची परवानगी मागण्यात आली. ती अपुऱ्या साधनसामग्रीचे कारण सांगून युनिव्हर्सिटीने नाकारली. १९०४-च्या युनिव्हर्सिटीज ॲक्टमध्ये कॉलेज सुरू करण्यासाठी आवश्यक म्हणून फार काटेकोर बंधने घातलेली होती; ती मंडळीकडून तंतोतंत पूर्ण होत नव्हती. 'ती पूर्ण करा; म्हणजे संमती आपोआप मिळेल,' असे आश्वासन युनिव्हर्सिटीचे कुलगुरू सर फेरोजशहा मेहता यांच्याकडून मिळताच मंडळी पुन्हा कसून कामाला लागली.

मध्यंतरी नागपूर-वऱ्हाडचे एक प्रख्यात वकील श्री. गणपतराव गोखले यांनी कॉलेजच्या उभारणीसाठी शि. प्र. मंडळीला अल्प व्याजाने २५,००० रुपये दिले. त्यांतून कॉलेजसाठी आवश्यक असे बांधकाम मंडळीने झपाट्याने पूर्ण केले. श्री. गोखले यांनी ही निकडीची गरज तातडीने पूर्ण करून शि. प्र. मंडळीला अतिशय उपकृत केले.

१९१६-च्या फेब्रुवारीपर्यंत सर्व तयारी झाली. इमारत, ग्रंथालय, फर्निचर, अध्यापकवर्ग, – थोडक्यात म्हणजे, विद्यार्थ्यांव्यतिरिक्त सर्व काही तयार होते! पुन्हा युनिव्हर्सिटीची चौकशी-समिती आली. पाहणी झाली. एका वर्षाच्या अवधीत मंडळीने केलेली तयारी पाहून डॉ. मॅकिकननी आश्चर्य व्यक्त केले. त्यांनी जणू सत्त्वपरीक्षा पाहण्यासाठी शेवटी विचारले, 'समजा, तुम्हांला आम्ही परवानगी दिली नाही, तर या सर्व तयारीचे काय कराल?' प्रा. धारपुऱ्यांनी तत्काळ सर फेरोजशहांच्या आश्वासनाचा निर्देश केला; आणि म्हटले, 'कोणतीही चांगली गोष्ट कधीही वाया जात नाही.' कॉलेजचे भवितव्य निश्चित होऊन गेले. एप्रिलमध्ये परवानगी हाती आली; आणि १४ जून, १९१६ या दिवशी मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्या हस्ते 'न्यू पूना कॉलेज'चे उद्घाटन

झाले. फर्ग्युसन कॉलेजच्या स्थापनेनंतर ( १८८५ ) तीस वर्षांत प्रथमच पुण्यात दुसरे खासगी कॉलेज सुरू झाले. २० जूनला डॉ. भांडारकरांचे उद्घाटनाचे भाषण – 'अभिभाषण' ( ॲड्रेस ) – होऊन कॉलेजचे वर्ग सुरू झाले. सुमारे वर्षापूर्वीच नू. म. वि.-च्या इमारतीच्या एका नव्या भागाचे उद्घाटन करिताना लॉर्ड विलिंग्डननी मंडळीच्या चालकांची धडाडी आणि चिकाटीचे प्रयत्न यांबद्दल गौरवोद्गार काढून म्हटले होते की, 'तुम्ही हाच बाणा चालवून पुढे जात रहाल, आणि लवकरच ही शाळा कॉलेजही बनून या प्रांतातल्या अत्यंत कार्यक्षम अशा कॉलेजांपैकी एक ठरेल, असा मला विश्वास वाटतो.' हे शब्द केवळ एका वर्षाच्या अवधीत मूर्तरूप झाल्याचे त्यांना पहावयास मिळाले. हा बाणा मंडळीने कॉलेजच्या उद्घाटनाच्या निमित्ताने सांप्रतच्या ब्रीदवाक्याच्या रूपाने लेखांकित केला, – 'निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु', अर्थात 'हातीं घ्याल, तें तडीस न्या!'

## कॉलेजची पुढची प्रगती

कॉलेज सुरू झाले. पहिल्या वर्षी 'फर्स्ट इयर' आणि 'इंटर' हे दोन वर्ग चालविण्यास परवानगी मिळाली. पुढील चार-पाच वर्षांत कॉलेजची बी. ए.-पर्यंत वाढ होत होत १९२१ साली त्याला कायमची मंजुरी मिळाली. १९२७ - पासून कॉलेजात विज्ञानशाखा सुरू झाली. त्या काळी कॉलेजच्या पहिल्या वर्षी – 'प्रीव्हियस' - मध्ये – साहित्य आणि शास्त्र असा विभाग नव्हता. ( तो पुढे १९३७ साली प्रथम अस्तित्वात आला. ) विद्यार्थ्यांची संख्या पहिल्या वर्षी २१३ होती; ती वाढत वाढत १९३५ साली प्रथमच हजारावर गेली; आणि आज ती तीन हजारांवर गेली आहे. कॉलेज प्रथम आजच्या नू. म. वि. प्रशालेच्या आवारात भरत होते; विद्यार्थ्यांना कॉलेज म्हणजे शाळेचाच पुढचा वर्ग वाटे. १९१८-मध्ये श्रीमंत जगन्नाथमहाराज पंडित यांनी आपल्या 'भाऊमहाराज बागे'तली २५ एकर जागा मंडळीला दीर्घ मुदतीच्या कराराने उदारपणे दिली. या जागेवर पुढे १९२४-साली इमारतीचे बांधकाम श्री. धोंडूमामा साठे यांच्या व्यवस्थेखाली सुरू झाले. तिची कोणशिला मुंबईचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांच्या हस्ते बसविण्यात आली. सुमारे दोन वर्षांत हे काम पूर्ण होऊन १९२६-च्या २० जूनपासून न्यू पूना कॉलेज सध्याच्या आपल्या स्वतंत्र इमारतीत भरू लागले. या मुख्य इमारतीच्या भरीला इतर पूरक इमारती उभ्या करण्याचे काम क्रमशः चालू होऊन मुलांचे वसतिगृह ( १९२६; यापूर्वी वसतिगृह गावात भाड्याने घेतलेल्या मेहेंदळ्यांच्या वाड्यात आणि पुढे वाडेकरांच्या चाळीत होते ), प्राचार्यांचा बंगला ( १९२७ ), सभागृह ( १९३२ ), मुलींचे वसतिगृह, ग्रंथालय आणि स्टूडंट्स हॉल ( १९३४-३५ ), प्राध्यापकांसाठी बंगले ( १९३५ ), पोस्ट ऑफिस ( १९३६ ), केमिस्ट्री लॅबोरेटरी ( १९४१ ) अशी बांधकामे पुढच्या पंधरा-सोळा वर्षांत झाली. १९५६-मध्ये ५० × १२ मीटर्स मापाचा, आधुनिक सोयींनी युक्त असा पोहण्याचा तलाव बांधून झाला, आणि १९५७-मध्ये फिजिक्स लॅबोरेटरी. या काळात मंडळीच्या अन्यही काही संस्थांच्या इमारती भाऊमहाराज बागेच्या वास्तूवर उभ्या राहिल्या; आणि कॉलेजच्या प्रशस्त क्रीडांगणाला जवळजवळ सर्व बाजूंनी इमारतींची एक किनारच तयार झाली.

या इमारतींपैकी काहींना देणगीदारांच्या इच्छेनुसार विशिष्ट व्यक्तींची नावे देण्यात आली. मुळात 'न्यू पूना कॉलेज'लाच 'सर परशुरामभाऊ कॉलेज' असे नवे नाव मिळाले. ( २६·९·१९२८. ) जमखंडी संस्थानाचे अधिपती श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन यांनी आपले पुण्यश्लोक वडील श्रीमंत सर परशुरामभाऊ यांच्या स्मरणार्थ कॉलेजला दोन लाख रुपयांची उदार देणगी दिली; तदनुसार कॉलेजला हे नाव मिळाले. या देणगीच्या तरतुदीप्रमाणे जमखंडी संस्थानातल्या पन्नास विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रतिवर्षी विनामूल्य शिक्षण मिळू शकते. सभागृहाच्या इमारतीसाठी जमखंडीच्या राणीसाहेब लेडी रमाबाई पटवर्धन यांनी १२,५०० रुपये देणगी दिली; त्यांचे नाव सभागृहाला देण्यात येऊन तो 'लेडी रमाबाई हॉल' झाला. ग्रंथालयाच्या इमारतीसाठी सर शापुरजी ब्रोचा, नाइट, यांनी २० हजार रुपयांची देणगी दिली; त्यांचे नाव ग्रंथालयाला देण्यात आले.

## महाविद्यालयामधून एक फेरफटका

महाविद्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार टिळक रस्त्यावर उघडणारे आहे पण मूळ योजनेप्रमाणे महाविद्यालयाच्या इमारतीची पाठ टिळक रस्त्याकडे आहे, हे आज फारच थोड्यांना माहीत असेल. याचे कारण हे की, इमारत बांधली, त्या वेळी टिळक रस्ता अस्तित्वात नव्हता; आणि तो नगरपालिकेच्या मूळ योजनेनुसार महाविद्यालयाच्या दक्षिणेकडून – मैदानाच्या बाजूने – स्वार गेटाकडे जावयाचा होता. पुढे इमारत बांधून झाल्यावर ही

योजना बदलली; आणि टिळक रस्ता दक्षिणेकडून जाण्या-ऐवजी उत्तरेकडून स्वार गेटाकडे गेला. अर्थात आता बांधलेली इमारत फिरवून रस्त्याला अभिमुख करणे शक्य नसल्यामुळे तिच्या उत्तर बाजूला पोर्च इत्यादी बांधकाम जोडून नवे तोंड पाडण्यात आले. कॉलेजने जणू बदलत्या युगाचे आपण होऊन स्वागत केले.

## लोकमान्य टिळक

आज महाविद्यालयामध्ये प्रवेश केल्याबरोबर प्रथम समोर उंचावर देवी सरस्वतीची मूर्ती दृष्टीला पडते. तेथून दृष्टी खाली येते, ती पोर्चपुढील उद्यानात मेघडंबरीखाली बसविलेल्या लोकमान्यांच्या संगमरवरी प्रतिमेवर (१९४१ : खर्च रु. ४,४००) विसावते. नूतन मराठी विद्यालय, न्यू पूना कॉलेज आणि शिक्षण प्रसारक मंडळी या त्रयीवर लोकमान्य टिळकांचे फार प्रेम होते. शाळा सुरू झाली, त्या काळात वार्षिक परीक्षा घेण्याचे 'काम विद्याखात्यांतील सरकारी, व खाजगी अनुभवशीर गृहस्थ' करीत. अशा गृहस्थांच्या नामावलीत १८८५ आणि १८८६ या वर्षी इंग्रजी तिसऱ्या इयत्तेच्या गणित विषयाचे परीक्षक म्हणून 'रा. रा. बाळ गंगाधर टिळक, बी. ए., एलएल्. बी.' यांचे नाव असून त्यांचा पुढील शेराही नमूद आहे : 'एकंदरीनें निकाल चांगला झाला; गणिताचें शिक्षण चांगलें आहे. गणिताची उपपत्ति थोडीशी शिकवावी अशी मी सूचना करितों.' पुढे मंडळीचे 'न्यू पूना कॉलेज' सुरू झाल्यावर त्याच्या वाढीसाठी जागेची गरज उत्पन्न झाली, तेव्हा मदत करण्यासाठी लोकमान्यच पुढे आले; आणि त्यांनी आपली पुण्याई खर्ची घालून भाऊमहाराज बागेतली आजची प्रशस्त जागा मंडळीला मिळवून दिली.

या जागेसाठी खटपट १९१६ सालापासून चालू होती; तिला फळ येऊन जागा मंडळीच्या ताब्यात येईपर्यंत दोन वर्षे जावी लागली. 'लो. टिळकांच्या आठवणीं'त ही हकिगत देताना प्रा. दत्तो वामन पोतदार लिहितात : 'अखेर हजार विघ्नें आलीं. मोठमोठ्यांनीं मोडता घातला. पण श्री. जगन्नाथ महाराजांनीं "दादांच्या बाहेर मी नाहीं" हा शब्द कायम ठेविला. टिळक विलायतेला जावयाला निघाले. कामांची गर्दी झाली. आमचा कागद कांहीं होईना. आमची चिंता क्षणोक्षणीं वाढली. त्या रात्रीं टिळकांना नुसता नमस्कार करावयाला सुद्धां फुरसत नव्हती...अखेर मुंबई गांठली. तेथें तोच प्रकार. ही लोकांची दाटी !...तरी एवढ्या गर्दींत सरदारगृहाचे माडीवर...दार लावून तसेच उभ्या उभ्या बोलणें केलें. अखेर टिळकांनीं सांगितलें कीं "...मी म्हणतों म्हणून जागा द्या" म्हणून तोंडीच करार केला. आणि त्यांनीं गाडींत पाय टाकला. पुढें ते कोलंबोहून परतच आले. तरी सारखी आठवण ठेवून हा करार पुरा करून जागा त्यांनीं मंडळीस मिळवून दिली. शब्द दिला तो पुरा केला.'

१९१९-मध्ये महाविद्यालयाच्या संमेलनाच्या प्रसंगी अध्यक्ष श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याबरोबर लोकमान्य महाविद्यालयात आले होते. त्या वेळची आठवण स्व. साने गुरुजींनी अशी शब्दांकित केली आहे : 'सायंकाळची वेळ होती. लोकमान्य बोलत होते. त्यांनीं आपली कांठी टेबलावर आडवी ठेविली होती. शेवटीं ते म्हणाले, "माझी म्हाताऱ्याची कांठी तुमच्या हातीं देऊन मी आतां जाणार. तुम्हीच पुढें देशाचें काम करणारे. अपुरें कार्य पुरें करणारे." त्या वेळेस लोकमान्यांचा धीरगंभीर आवाजहि जरा भावनांनीं ओथंबल्यासारखा वाटला व मी सद्गदित झालों होतों. यानंतर लोकमान्य सहा महिनेच होते.' आपण ज्यांच्या हाती आपली काठी दिली, ते आपले अपुरे कार्य कसे पुरे करीत आहेत ते अनिमेष दृष्टीने अहोरात्र पाहत आज लोकमान्य कॉलेजच्या दारातच मेघडंबरीखाली निश्चल उभे आहेत. लोकमान्यांनी संस्थेवर जे अपरंपार प्रेम आणि उपकार केले, त्यांविषयीची आपली कृतज्ञता संस्थेने या मूर्तीच्या रूपाने मूर्त करून या मूर्तीला अग्रपूजेच्या स्थानी स्थापिले आहे. याबरोबरच लोकमान्यांच्या लोककारणाची गोडी नव्या पिढीला लागावी आणि ती जोपासावी म्हणून 'लोकमान्य टिळक स्मारक ग्रंथालय' नावाचे एक स्वतंत्र ग्रंथालय स्थापन केले आहे (१९२१). या ग्रंथालयातर्फे प्रतिवर्षी टिळकांच्या कार्याचा अभ्यास असलेल्या थोर लोकांची व्याख्याने घडवून आणून टिळक-पुण्यतिथी साजरी केली जाते. ग्रंथालयातर्फे प्रति-वर्षी निबंधस्पर्धाही योजिली जाऊन सर्वोत्कृष्ट निबंधाला पारितोषिक देण्यात येते. हे ग्रंथालय म्हणजे कॉलेज-मधले लोकमान्यांचे दुसरे औचित्यपूर्ण स्मारक होय.

## प्राचार्य विनायकरावजी आपटे

लोकमान्यांच्या मूर्तीपुढे उभे राहून समोरच्या पोर्च-मधून आणि प्रशस्त दारातून आरपार दृष्टी टाकली, की कॉलेजच्या दुसऱ्या बाजूच्या उद्यानात उभी केलेली अशीच दुसरी एक मूर्ती – ऊर्ध्वांग-प्रतिमा – दिसते (१९४७). हे प्राचार्य विनायक गणेश आपटे : न्यू पूना

कॉलेजचे पहिले प्राचार्य. विनायकरावजी आपटे हे १८९५-मध्ये मंडळीचे आजीव सदस्य झाले; आणि लगोलग नू. म. वि.-चे प्रमुख म्हणून त्यांची योजना झाली. पुढल्याच वर्षी नू. म. वि.-मधील पहिली ११ विद्यार्थ्यांची सबंध तुकडी मॅट्रिक परीक्षेत उत्तीर्ण होऊन श्री. वि. स. घाटे हे युनिव्हर्सिटीत पहिले आले; आणि त्यांनी पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्तीही मिळविली. विनायकरावजींनी शाळेचा कारभार इतक्या दक्षतेने आणि निष्ठेने सांभाळला, की 'न्यू पूना कॉलेज' सुरू करावयाचे ठरल्यावर त्याची जबाबदारी कोण सांभाळणार असा प्रश्नच मंडळीला पडला नाही. याचे कारण असे की, विनायकरावजी मंडळीच्या कार्याशी जणू एकरूप होऊन गेले होते; 'मंडळी ≡ विनायकराव' असे जणू समीकरणच झाले होते. या समीकरणाचे मूळ त्यांच्या जाज्वल्य कर्तव्य-निष्ठेतच शोधावे लागेल. ते आजारी असले, तरी औषध घेऊन शाळेत येत, आणि नित्याप्रमाणे तासन्तास शिकवीत. कुटुंबावर केवढीही आपत्ती कोसळलेली असली तरी विनायकराव आपले दुःख गिळून कर्तव्याकडे धाव घेत. या आपल्या असामान्य कर्तव्यनिष्ठेनेच ते विद्यार्थ्यां-मध्ये आणि लोकांमध्ये स्वतःविषयी भक्ती आणि आदर निर्माण करू शकले. 'निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु' अर्थात 'हातीं घ्याल तें तडीस न्या' हे ब्रीदवाक्य कॉलेजच्या स्थापनेच्या वेळी त्यांनीच मंडळीला दिले आणि स्वतःच्या वर्तनाने त्याला यथार्थता आणून दिली. त्यांची राहणी अत्यंत साधी, वृत्ती शिस्तीची पण प्रेमळ आणि सहानुभूतीची, वेष जुन्या वळणाचा,–पायांत पुणेरी जोडा, धोतर, बंद गळ्याचा लांब कोट, गळ्या-भोवती उपरणे, डोक्याला रुमाल, कपाळावर आडवे गंध, आणि मुद्रेवर पावित्र्याचे तेज, असे की त्यांच्या समोर कुणाच्या मनाला अपवित्र विचारही शिवणार नाही! परमेश्वरावर त्यांची निःसीम श्रद्धा. वर्गातल्या नित्याच्या व्याख्यानाआधीही ते कोणातरी विद्यार्थ्याला 'कल्याणानां त्वमसि महसां भाजनं विश्वमूर्ते' यासारखी एखादी ईशप्रार्थना म्हणायला सांगत; आणि ती झाल्या-वर बोलण्यास आरंभ करीत.

साने गुरुजींनी लिहिले आहे: 'एके दिवशींची गोष्ट. कॉलेजची घंटा अद्याप झाली नव्हती. नूतन मराठी विद्यालयां-तील मुलें जात येत होती. एक लहान मुलगा दुसऱ्या एका मुलाला आपल्या चड्डीच्या पाठीमागचे बंद बांधायला सांगत होता. परंतु तो बांधीना. इतक्यांत आमचे प्रिन्सिपाल विनायकरावजी तिकडून येत होते, त्यांनीं तें पाहिलें. ते त्या लहान मुलाजवळ गेले व म्हणाले, "ये, मी बांधतों." असें म्हणून त्यांनीं त्याचे ते पाठीमागचे बंद बांधले.' असे होते विनायकरावजी आपटे. कॉलेजचे खरोखर पालकच! साने गुरुजींनी त्यांची एक हृदयस्पर्शी आठवण लिहिली आहे: 'विनायकरावजी आतां सेवानिवृत्त झाले आहेत. परंतु मी एकदां पुण्यास गेलों असतां काय दृश्य पाहिलें आहे माहीत? मंगल, पवित्र दृश्य! विनायकरावजी पर्वतीला नियमित फिरायला जातात. सकाळीं आठच्या सुमारास ते पर्वतीहून परत येत होते. परशुरामभाऊ कॉलेजच्या प्रासादतुल्य इमारतीसमोर रस्त्यांत ते थांबले. इमारतीकडे पाहून त्यांनीं डोळे मिटून दोन्ही हातांनीं प्रणाम केला. "माझी संस्था चिरंजीव होवो, देशाला उत्कृष्ट सेवक देवो, उत्कृष्ट नागरिक येथून तयार होवोत, संस्था ध्येयापासून च्युत न होवो," असें का प्रभूला ते मूकपणें प्रार्थीत होते?...विनायक-रावजींची अशी ही मुकी प्रार्थना या कॉलेजला, या संस्थेला आंतून किती ओलावा देत असेल तें कोण सांगू शकेल?'

आज विनायकरावजी या पार्थिव जगात नाहीत. पण त्यांची प्रतिमा आजही कॉलेजच्या दक्षिणेकडच्या उद्यानात कॉलेजचा दैनंदिन विकास आणि कार्य अविरत पाहत उभी आहे; आणि त्यांना अत्यंत प्रिय अशा देववाणीत जणू असे मंगल आशीर्वचन जपत आहे की,–

'अस्याः संस्थायाः समुज्जृम्भमाणं सुधाधवलं यशः-पटलं प्रसर्पतु दिगङ्गनाङ्गणेषु यावचन्द्रदिवाकरौ च चकास्त्वेषा संस्था। एतत्संस्थायां च भूतो भवन् भावी च विद्यार्थि-समुदायः "युवा स्यात् साधुयुवाऽध्यायकः। आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठः।" भूयात्। तथा च –

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात्॥'

### देवी रमाबाई सभागृह

लोकमान्यांच्या मूर्तीकडे तोंड केले, की डाव्या बाजूला 'देवी रमाबाई सभागृह' येते. (१९३३ : खर्च रु. ३६,०००.) सभागृहात प्रशस्त रंगमंच असून त्याच्या मागच्या भिंतीवर लेडी रमाबाई पटवर्धन यांचे तैलचित्र लावलेले आहे. सभागृहात सात-आठशे श्रोत्यांची बसण्याची सोय असून त्यांच्या दृष्टीसमोर रंगमंचाच्या शिरोभागी शिक्षण प्रसारक मंडळीचे ध्येयवाक्य 'निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु' हे त्याच्या पार्श्वभूमीतील कल्पनेसह चित्रित करून लावले आहे. हे वचन

ज्यातून उचलले, तो मूळ ' मुद्राराक्षस ' नाटकातील संस्कृत श्लोक समग्र असा आहे :

' किं शेषस्य भरव्यथा न वपुषि क्ष्मां न क्षिपत्येष यत्,
किं वा नास्ति परिश्रमो दिनमणेरास्ते न यन्निश्चल: ।
किं त्वङ्गीकृतमुत्सृजन् कृपणवच्छ्लाघ्यो जनो लज्जते,
निर्वाह: प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम् ॥ '

या श्लोकाचा सारांश असा : ' शेषाच्या मस्तकावर पृथ्वी आहे, ती तो फेकून देत नाही तो काय त्याला तिचे ओझे होत नाही म्हणून ? सूर्य सतत भ्रमण करीत आहे, तो हे भ्रमण सोडून देऊन एका जागी विसावत नाही तो काय त्याला फिरण्याचे श्रम होत नाहीत म्हणून ? नाही. शेषालाही ओझे होते, सूर्यालाही श्रम होतात. पण ते आपली कामे झुगारून देत नाहीत, याचे कारण असे आहे की, अंगीकृत कार्य क्षुद्र पुरुषांप्रमाणे झुगारून देण्याची मानी लोकांना लाज वाटते. हाती घ्यावे, ते तडीला न्यावे, हा मुळीं सज्जनांचा कुळाचारच होय ! ' या श्लोकाच्या आशयावरून पृथ्वीधारी शेषाच्या चित्राचे मर्म ध्यानात येईल. रंगमंचाच्या डाव्या-उजव्या बाजूंना भिंतीवर दिवाण-बहादूर काशिनाथ रामचंद्र गोडबोले आणि साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर यांची छायाचित्रे आहेत. या दोघांनीही अनुक्रमे १९२५ ते १९३७, आणि १९३८ ते १९४७ या काळांत शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाची धुरा वाहिली. १९४७-पासून ही धुरा महा-महोपाध्याय दत्तो वामन पोतदार हे वाहत आहेत. म. म. पोतदार हे नूतन मराठी विद्यालयाचे विद्यार्थी. ' १८९६ सालीं एका बुधवारीं दिवस उजाडतांच ' त्यांनी शाळेच्या पहिल्या इयत्तेत ' तरटी बसकटावर पाटी घेऊन ' बसून श्रीगणेशा गिरविला; १९०६ साली ते मॅट्रिक होऊन बाहेर पडले; पुढे १९१० साली बी. ए. झाल्यावर नू. म. वि.-मध्ये शिक्षक, आणि १९१५-मध्ये शि. प्र. मंडळीचे आजीव सदस्य झाले. १९३६-मध्ये सेवा-निवृत्त झाल्यावर १९४६-मध्ये शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे सदस्य आणि १९४७-मध्ये अध्यक्ष झाले. म्हणजे सेवानिवृत्तीनंतरचा सुमारे दहा वर्षांचा काळ सोडल्यास गेली ४५ वर्षे ते या ना त्या स्थानावरून शि. प्र. मंडळीचे कार्य करीत आहेत. एका व्यक्तीने एका संस्थेची निरलसपणे इतकी वर्षे सेवा केली आणि पुढेही चालू ठेविली, अशी उदाहरणे फारच विरळा सापडतील.

देवी रमाबाई सभागृहाने किती समारंभ पाहिले, किती व्याख्याने ऐकली; किती नामवंत पुरुषांचे पाय याला लागले, याची गणती करणे कठीण आहे. या निमित्ताने, ' न्यू पूना कॉलेज '-मध्ये आणि स. प. म.-मध्ये येऊन गेलेल्या नामवंत लोकांचा नामनिर्देश करणे उचित होईल : महात्मा गांधी ( १९१९, १९२७ ), कविवर्य रवींद्रनाथ टागोर ( '३२ ), डॉ. ॲनी बिझांट ( '२४ ), पं. जवाहरलाल नेहरू ( '२८, '४५ ), डॉ. राधाकृष्णन् ( '३४, '४९ ), देशगौरव सुभाषचंद्र बोस ( '३१ ), श्री. मानवेंद्रनाथ रॉय ( ? ), पूज्य विनोबाजी भावे ( '४९ ), स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर ( '२० ), श्रीमंत सर परशुरामभाऊ पटवर्धन ( '१७ ), रँग्लर र. पु. परांजपे ( '१७ ), डॉ. सरोजिनी नायडू ( '१७ ), महर्षी धोंडो केशव कर्वे ( '२० ), बॅ. महंमदअली जिना ( '२३ ), श्री. कन्हय्यालाल मुनशी ( '२५, '३८ ), डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य ( '२६ ), सर एम. विश्वेश्वरय्या ( '३१ ), सर सी. व्ही. रामन ( '३१ ), जस्टिस सर गोविंद माडगावकर ( '३२ ), डॉ. बा. शिं. मुंजे ( '३३ ), सर विठ्ठल नारायण चंदा-वरकर ( '३४ ), बॅ. जमनादास मेहता ( '३६ ), डॉ. ध. रा. गाडगीळ, ( '३९, ... ), स्वामी कुवलयानंद ( '४९ ), लो. मा. श्री. अणे ( '४१, '४९ ), डॉ. भी. रा आंबेडकर ( '४४, ) डॉ. मु. रा. जयकर, ( '४५, '४८, ... ), मौलाना आझाद ( '४६ ), श्री. अच्युत-राव पटवर्धन ( '४६, '४९ ), गुरुदेव रा. द. रानडे ( '४७ ), प्रा. लुई रनू ( '४८ ), सर महाराज सिंग ( '४८ ), डॉ. न. वि. ( काकासाहेब ) गाडगीळ ( '४८, '६४ ), डॉ. झाकीर हुसेन ( '४९ ), ना. भाऊसाहेब फिरोदिया ( '५० ), श्री. गिरिजाशंकर बाजपाय ( '५३ ), ना. यशवंतराव चव्हाण ( '६० ), जस्टिस प्र. बा. गजेंद्रगडकर ( '६० ), जनरल करिअप्पा ( '६१ ), डॉ. जयंत नारळीकर ( '६५ ). अशी आणखीही बरीच नावे देता येतील. यांपैकी काही व्यक्ती स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिल्या. काही व्यक्ती निर्देशिल्याहूनही अधिक वेळा येऊन गेल्या आहेत. यांचे कार्य, यांची विद्वत्ता, यांचे व्यक्तिमत्व, यांचे वक्तृत्व यांनी स. प. म.-च्या प्राध्यापक-विद्यार्थ्यांवर वेळोवेळी प्रभाव पाडून त्यांच्यावर जे चिरस्थायी संस्कार केले, त्यांच्या स्मृती या सभागृहाने जतन करून ठेविल्या आहेत. याच सभागृहात प्रतिवर्षी पहिल्या दिवशी प्राचार्यांचे उद्घाटनाचे भाषण होते; आणि विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनांचे विविधरंजनाचे कार्यक्रमही यातच होतात.

## ग्रंथालय

लोकमान्यांच्या मूर्तीकडे तोंड केल्यावर उजव्या हाताला प्रायः समोरच्या सभागृहाच्याच मोजमापाची सर 'शापुरजी ब्रोचा ग्रंथालया'ची इमारत येते. ( १९३५ : खर्च रु. ३६,०००. ) या इमारतीच्या खालच्या मजल्यावर ग्रंथसंग्रह असून वरच्या मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी अभ्यासशाला आहे. तीत दक्षिणेकडच्या भिंतीशी साहित्यसम्राट कै. न. चिं. केळकर यांची संगमरवरी ऊर्ध्वांग-प्रतिमा आहे. ( १९४७ : शेठ रामदेवजी पोदार यांची देणगी. ) कॉलेजच्या ग्रंथालयाचा प्रारंभ एका फार थोर मराठी साहित्यिकाच्या नावाशी निगडित झालेला आहे. ही व्यक्ती म्हणजे थोर मराठी कादंबरीकार स्व. हरी नारायण आपटे. न्यू पूना कॉलेज सुरू झाले, तेव्हा त्यांनी स्वतःचा जिवाभावाने जपलेला अमूल्य ग्रं संग्रह कॉलेजला देणगी म्हणून दिला. कॉलेजच्या सुरवातीच्या काळात त्यांनी कॉलेजवर केलेले हे उपकार कधीही न फिटण्यासारखे आहेत. त्यांचे न्यू पूना कॉलेजवरचे प्रेम केवळ या देणगीने पूर्ण समजणार नाही. कॉलेज सुरू होण्याच्या मार्गात आलेल्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी अतोनात साहाय्य केले. सर क्लॉड हिल, डॉ. मान इत्यादी अधिकाऱ्यांशी त्यांचे स्नेहाचे संबंध होते; त्यांचे मत कॉलेजच्या स्थापनेला अनुकूल करण्यासाठी हरिभाऊंनी आपली सारी पुण्याई पणाला लावली; गव्हर्नर आणि त्याचे सेक्रेटरी यांच्याकडे खेटे घातले; इतकेच काय, ज्योतिष्यांना पत्रिका दाखवून भविष्यही वर्तवून घेतले! या सर्व घटना नमूद करून प्रा. द. रा. धारपुरे लिहितात : 'Haribhau Apte was the one person who did his level best in every direction to see that the College did come into existence. I can safely say that he was the real founder of the College.' हरिभाऊंनी दिलेल्या या ग्रंथसंग्रहाच्या गंगोत्रीतून सुरू झालेल्या प्रवाहाला प्रतिवर्षी नवनवे ओहोळ आणि लहानमोठ्या नद्या – यांत नाट्यच्छटाकार दिवाकर यांचा देणगी म्हणून मिळालेला संग्रह अवश्य उल्लेखिला पाहिजे – येऊन मिळाल्या; आणि या सर्वांचा मिळून आज सुमारे ६०,००० ग्रंथांचा, आणि वेळोवेळी येणाऱ्या १५० नियतकालिकांचा एक प्रचंड सिंधू तयार झाला. आता तो मूळच्या जागेत मावेनासा झाला आहे, – ग्रंथालयात आतून चहू बाजूंना पुस्तके ठेवण्यासाठी १९५५-५६ - च्या सुमारास रुंद सज्जे ( गॅलरी ) बांधूनदेखील मावेनासा झाला आहे. ग्रंथालयाच्या भिंती आजूबाजूला सरकण्यासाठी अवसर शोधू लागल्या आहेत. ग्रंथालयाच्या वरच्या मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी जी अभ्यासशाला ( रीडिंग हॉल ) आहे, तेथे ३२५ विद्यार्थ्यांची सोय केली असून अभ्यासशाला संध्याकाळी ५·३० ते ८ ही वेळ सोडून सकाळी ८ वाजल्यापासून रात्री ११ वाजेपर्यंत उघडी असते. अभ्यासशालेत विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी क्रमिक आणि क्रमिकेतर अशी शेकडो पुस्तके ठेविलेली आहेत. अभ्यासशालेत प्रवेश करिताना प्रत्येक वेळी विद्यार्थी प्रवेशद्वारात ठेविलेल्या नोंद-पुस्तकावर स्वाक्षरी करितात. अशा स्वाक्षऱ्या वर्षभराच्या अवधीत सुमारे ४०-५० हजार होतात; यावरून अभ्यासशालेत होणारी येजा अजमावता येईल. ग्रंथालयाच्या व्यवस्थेसाठी १९२२ साली प्रथमच ग्रंथपाल म्हणून श्री. वि. म. ऊर्फ काका कोल्हटकर ( ग्रंथालयशास्त्राचे पुण्यातील पहिले तज्ज्ञ ) यांची नेमणूक करण्यात आली. त्यांच्या मागून श्री. कृ. द. पुराणिक ( सध्याचे मुंबई राज्य ग्रंथाधिपाल ), श्री. चिं. ग. आंबेकर ( सध्या बँकॉकमध्ये राष्ट्रसंघाच्या इकाफे–ECAFE – संघाच्या ग्रंथालयात नियुक्त ), श्री. रा. ना. खासनीस यांनी या जागी काम केले असून आज श्री. अ. रा. मेहेंदळे हे पद सांभाळीत आहेत. ग्रंथालयाधिकारी म्हणून ग्रंथालयाच्या कार्यात मार्गदर्शन करण्याची जबाबदारी संस्थेने वेळोवेळी नियुक्त केलेल्या मान्यवर प्राध्यापकांनी पार पाडली असून आज या जागी प्रा. म. कृ. केळकर कार्य करीत आहेत. ग्रंथालयातर्फे प्रतिवर्षी विजयादशमीच्या दिवशी सरस्वतीपूजनाचा कार्यक्रम होतो.

## मुख्य इमारत

लोकमान्यांच्या मूर्तीच्या पाठीकडे कॉलेजची मुख्य इमारत ( १९२६ : खर्च रु. ४,१३,३५३ ) पूर्व-पश्चिम ( आग्नेय-वायव्य दिशांना किंचित झुकलेली ) अशी पसरली असून तिच्या टोकांना दक्षिणेकडे काटकोनात दोन लहान फाटे काढले आहेत. तिचा मधला सुमारे एक-तृतीयांश भाग तीन-मजली असून अवशिष्ट भाग दोन-मजली आहे. तळमजल्यावर मध्य भागात कॉलेजची आणि पश्चिम टोकाला शि. प्र. मंडळीची कचेरी आहे. दुसऱ्या मजल्यावर प्राचार्य आणि उपप्राचार्य यांच्या कचेऱ्या, अध्यापकविश्राम ( प्रोफेसर्स कॉमन रूम ) आणि विद्यार्थि-हितसंवर्धन-योजनादी उपक्रमांचे कार्यालय यांची सोयीनुसार लहानमोठ्या खोल्यांतून

डॉ. सर भांडारकर



लोकमान्य टिळक



हरिभाऊ आपटे



जगन्नाथमहाराज पंडित



प्रा. द. रा. धारपुरे





प्राचार्य आपटे



प्राचार्य शहा



प्राचार्य सबनीस

**सर**
**परशुरामभाऊ**
**महाविद्यालयाचे**
**संस्थापक**
**संवर्धक आणि**
**प्राचार्य**

'पन्नास वर्षांची वाटचाल'
१९१६ — १९६६



प्राचार्य दांडेकर



प्राचार्य करमरकर

प्राचार्य केरकर



प्राचार्य भिडे



प्राचार्य हुल्याळकर



प्राचार्य मालेगावकर



माजी विद्यार्थी



श्री. **कोपर्डेकर**
अध्ययनार्थ पोलंडला



श्री. **कापडी**
पीएच्. डी. प्राप्त



श्री· मुद्दापूर शिष्यवृत्ती–वितरण–प्रसंगी



**कु. चोपडे. जमखंडीच्या राणीसाहेबांकडून**
शिष्यवृत्ती स्वीकारताना

**संस्मरणीय**
**समारंभ**

व्यवस्था केली असून अवशिष्ट सर्व भागात छोटेमोठे व्याख्यानवर्ग आणि काही विषयांच्या प्रयोगशाला-संग्रहशाला आहेत. या प्रयोग-संग्रहशालांपैकी भूगोलाची आणि संख्याशास्त्राची पूर्व टोकाला, मानसशास्त्राची पश्चिम टोकाला, आणि जीवशास्त्राची तिसऱ्या मजल्यावर अशी व्यवस्था सध्या आहे. या तिन्ही विभागांना सध्याची उपलब्ध जागा फार अपुरी पडत असून त्यांच्यासाठी स्वतंत्र, प्रशस्त जागा बांधणे आवश्यक झाले आहे. इतरही जवळजवळ प्रत्येक विषयासाठी एक-एक स्वतंत्र खोलीची गरज आहे; ही उपलब्ध झाली असता विद्यार्थ्यांशी चर्चा, नवनव्या उपक्रमांचे संयोजन, त्या-त्या विषयाच्या निवडक ग्रंथांचा लघुसंग्रह, लहानमोठी संशोधने अशी कार्ये सुकर होतील. आज काही विषयांना अशा खोल्या दिलेल्या असल्या, तरी त्यांतून अशी कार्ये करण्याला मर्यादा पडते; कारण हे 'व्याख्यानवर्ग' असल्या-मुळे तासाची वेळ होताच ते मोकळे करावे लागतात.

पोर्चमधून आत शिरले, की उजव्या हाताला कॉलेजची कचेरी लागते; आणि डाव्या हाताला वर जाण्याकरिता जिना लागतो. मधल्या जागेत चहू बाजूंना भिंतींवर सूचनाफलक आहेत. जिन्यावर पाऊल टाकण्यापूर्वी, समोर भिंतीवर बी. ए.–बी. एस्सी. तसेच एम. ए.–एम. एस्सी. ( एम. ए. आणि एम. एस्सी. वर्गांचे अध्यापन पुणे विद्यापीठाने स्वतःकडे घेईपर्यंत ) परीक्षांत प्रथम वर्ग आणि विशेष पारितोषिके मिळविलेल्या कॉलेजच्या विद्यार्थि-श्रेष्ठांची नावे वर्षक्रमानुसार मोठमोठ्या फलकांवर लावि-लेली असून दोन फलकांवर कॉलेजमध्ये आज शिकवीत असलेल्या कायम प्राध्यापकांची नावे दृष्टीस पडतात. वर गेल्यावर उजवीकडे कचेरीच्या बरोबर वरती प्राचार्यांची कचेरी आहे. या कचेरीतून कॉलेजची सर्व सूत्रे हलतात. ही कचेरी आतापर्यंत नऊ नामवंत प्राचार्यांनी म्हणजे कॉलेजच्या पालकांनी भूषविली आहे. आत शिरताच उजव्या हाताला भिंतीवर त्यांच्या प्रतिकृती लावलेल्या दिसतात.

## स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य

### प्राचार्य आपटे

हे पहिले, प्राचार्य विनायक गणेश आपटे. ( यांच्याविषयी माहिती मागे आली आहे. ) १८९५ साली आजीव सदस्य झाल्यापासून एकवीस वर्षे यांनी नू. म. वि. मराठी शाळा आणि प्रशाला यांची, आणि महाविद्यालय सुरू झाल्यावर पहिली सहा वर्षे ( १९१६–२२ ) त्याची धुरा वाहिली. अशी एकूण २७ वर्षे संस्थेची निरलस, एकनिष्ठ सेवा केल्यावर १९२२ साली सेवानिवृत्त होताना त्यांनी लिहिले आहे :

'I feel my work is done. How it has been done I leave it to those whom it concerns to judge, praying–

> "Blame where you must,
> be candid where you can
> And be each critic
> the Good-natured Man."

असे कार्य, असा विनय, असा सद्भाव, असा निर्मळ-पणा विनायकरावजींखेरीज अन्यत्र कोठे शोधावा? त्यांच्या थोर कार्याचा गौरव महाविद्यालयाने त्यांची मूर्ती लोकमान्यांच्या मूर्तीबरोबर इमारतीच्या दुसऱ्या बाजूला बसवून यथार्थपणे आणि उचितपणे केला आहे; आणि जणू असे सूचित केले आहे की, कॉलेजच्या जीवनप्रवाहाची ही दोन भरभक्कम तिरेच आहेत.

### प्राचार्य शहा

प्रा. विनायकरावजी आपट्यांच्या नंतर प्रा. नगीन-दास माणिकलाल शहा हे प्राचार्यपदावर नियुक्त झाले ( १९२२–३० ). प्रा. शहा हे गणिताचे प्रथमपासून अत्यंत हुषार विद्यार्थी. १९१२ साली ते फर्गसन कॉलेजमधून बहुमानाने बी. ए. झाले. गणितातली त्यांची असामान्य बुद्धिमत्ता ध्यानात घेऊन शिक्षण प्रसारक मंडळीने १९१६ साली त्यांना आजीव-सदस्य करून घेतले, आणि गणिताच्या उच्च शिक्षणासाठी खर्चाची तरतूद करून त्यांना इंग्लंडला पाठविले. तेथे ते १९१९ साली 'बी-स्टार रँग्लर' होऊन, आणखी दोन वर्षे संशोधनकार्यही करून १९२१-मध्ये परत आले; आणि न्यू पूना कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक झाले. १९२२ ते १९३० अशी आठ वर्षे कॉलेजचे प्राचार्य म्हणून त्यांनी काम पाहिले. १९३० साली त्यांनी मंडळीच्या आजीव-सदस्यत्वाचा राजिनामा दिला, तोपर्यंत गणिताचे अध्यापन आणि महाविद्यालयाचा कारभार या दोन्ही गोष्टी दक्षतेने आणि हुषारीने सांभाळल्या. ज्यांच्या विद्वत्तेच्या ओढीने शेकडो योजनांच्या अंतरावरून विद्यार्थी येतात, अशा आचार्यांना जुन्या काळी संस्कृतात 'यौजन-शतिक' म्हणत असत; अशा अध्यापकांपैकी प्रा. शहा हे एक होते. महाविद्यालयाच्या एक माजी विद्यार्थिनी सौ. यमुनाबाई हिर्लेकर यांनी त्यांच्याविषयी लिहिले

आहे : ' रँग्लर शहांचें नांव त्यावेळीं इतकें गाजलें होतें की वास्तविक मी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमधून गणित विषय घेऊन बी. ए. ऑनर्स झाले होते तरी रँग्लर शहांच्या मार्गदर्शनाखालीं एम्. ए.-चा अभ्यास करावा म्हणून पुण्यास न्यू पूना कॉलेजमध्यें हजर झालें... शहा आम्हांला लेक्चर देऊं लागले कीं एखाद वेळ तीनतीन तास देत पण तेही दमत नसत व आम्हीही दमत नसूं. '

### प्राचार्य सबनीस

प्रा. राजाराम परशुराम सबनीस हे महाविद्यालयाचे तिसरे प्राचार्य (१९३०–३३). यांचे शालेय शिक्षण हुबळीं येथे, आणि बी. ए.-पर्यंतचे महाविद्यालयीन शिक्षण प्रथम पुण्यातील फर्गसन कॉलेज आणि नंतर मुंबईतील विल्सन कॉलेज येथे झाले. १९१४-मध्ये पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला जाऊन केंब्रिज विश्वविद्यालयात दोन वर्षे अभ्यास करून अर्थशास्त्रातील एम. ए. पदवी यांनी संपादन केली. याच सुमारास शिक्षण प्रसारक मंडळीने त्यांना आपले आजीव-सदस्यत्व स्वीकारण्याची पत्रद्वारे विनंती केली; आणि त्यांनी ती मान्य केली. इंग्लंडहून परत आल्यावर त्यांची नू. म. वि. प्रशालेचे प्रमुख म्हणून नेमणूक झाली; आणि महाविद्यालयात अर्थशास्त्राचे अध्यापन करीत असतानाच त्यांनी ही धुरा नऊ वर्षे दक्षतेने वाहिली. पुढे प्राचार्य शहांनी राजीनामा दिल्यावर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रा. सबनिसांची नियुक्ती झाली. आपल्या एकनिष्ठ, त्यागी सेवावृत्तीने त्यांनी शिक्षक आणि अधिकारी या दोन्ही नात्यांनी विद्यार्थी, पालक, सहकारी आणि जनता या सर्वांकडून धन्यवाद मिळविले.

### प्राचार्य करमरकर

प्राचार्य सबनिसांनंतर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी आलेले प्रा. रघुनाथ दामोदर करमरकर हे या पदावर आजवरच्या प्राचार्यांत सर्वांहून अधिक काळ, म्हणजे अखंड बारा वर्षे ( १९३३–४५ ), होते. या काळात महाविद्यालयाची विद्यार्थिसंख्या हजारावर गेली, आणि विश्वविद्यालयाच्या विविध परीक्षांत प्रथम श्रेणी तसेच परितोषिके-शिष्यवृत्त्या मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा जवळ-जवळ अखंड प्रवाहच सुरू झाला. संस्कृत विषयाची तर दिगंत कीर्ती झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सतत ३३ वर्षे महाविद्यालयाची सेवा केलेली प्राचार्य करमरकरांहून अन्य व्यक्ती झाली नाही. त्यांच्याशी तुलना करिता येईल इतकी दीर्घ सेवा केलेल्या आणखी दोनच व्यक्ती निर्देशिता येण्यासारख्या आहेत : एक, इंग्रजीचे प्राध्यापक हरी विठ्ठल तुळपुळे; दुसरे, कचेरीतले मुख्य कारकून श्री. दत्तात्रय काशिनाथ बापट. या तिघांचाही एका खास ठरावाच्या रूपाने गौरव महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवप्रसंगी आजीव-सदस्य-मंडळाने नमूद केलेला आहे.

प्राचार्य करमरकरांनी आपले शालेय शिक्षण मोठ्या आपत्तीतून मार्ग काढीत सन्मानाने पूर्ण केले. पुढे प्रथम श्रेणी आणि संस्कृताची पारितोषिके पटकावीत महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथील फर्गसन कॉलेज आणि डेक्कन कॉलेज या संस्थांतून पूर्ण केल्यावर १९१५ साली त्यांनी एम. ए. पदवी संपादन केली; आणि प्रा. द. रा. धारपुरे यांच्या विनंतीवरून सरकारी नोकरीचे विलोभन दूर सारून नव्याने सुरू व्हावयाच्या ' न्यू पूना कॉलेज 'मध्ये काम करावयाचे तत्काल मान्य केले. येथपासून सेवानिवृत्तीच्या काळापर्यंत त्यांच्या सर्व उद्योग-उपक्रमांचा केंद्रबिंदू प्रामुख्याने स. प. महाविद्यालय हाच राहिला. अध्ययन-अध्यापन, ग्रंथरचना, विश्वविद्यालयादी विविध संस्थांची अधिकारिमंडळे, परीक्षा-मंडळे, यू. टी. सी. – अशा विविध क्षेत्रांत आणि भूमिकांत कार्य करीत असताना महाविद्यालयाचा उत्कर्ष हीच त्यांची मुख्य प्रेरणा राहिली. यासाठी वाटेल तो त्याग करण्याची त्यांची तयारी होती. एका ख्यातनाम विद्वान प्राध्यापकांचा महाविद्यालयाला लाभ व्हावा म्हणून त्यांना अपेक्षित असलेल्या अधिक वेतनाची भरपाई प्राचार्य करमरकर ( आणि अन्य काही आजीव-सदस्य ) पुष्कळ दिवस त्यांना कळू न देता आपल्या वेतनातून करीत असत, ही अद्याप पुष्कळांना माहीत नसलेली गोष्ट आता प्राचार्यांच्या निधनानंतर नमूद करावयास प्रत्यवाय नाही. व्यायामाने कमावलेली धिप्पाड शरीर-यष्टी, डोक्याला रुमाल, अंगात लांब कोट, टिळक-पद्धतीने नेसलेले धोतर, गळ्याभोवती उपरणे, मोठाल्या मिशा, जरब बसविणारी करारी मुद्रा, करडा आवाज — अशा प्रभावी व्यक्तिमत्त्वाने वावरणाऱ्या या अजस्र माणसाने एका काळी ' भटजी कॉलेज ' म्हणून हेटाळल्या जाणाऱ्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचा क्रीडा-क्षेत्रासकट सगळ्या आघाड्यांवर असा काही दबदबा बसविला, की ' भटजी कॉलेज 'चा विद्यार्थी असणे ही पुढे अभिमानाची गोष्ट ठरू लागली. मुंबई विश्व-विद्यालयात त्यांचे फार वजन असे. त्या काळी असा एक प्रवाद रूढ झाला होता की, ' मुंबई विश्वविद्या-

लयाच्या कचेऱ्या दोन : एक मुंबईस; आणि एक करमरकर असतील तेथे!' प्राचार्य करमरकरांसारख्या आपाततः उग्र व्यक्तिमत्त्वाच्या माणसाने ही जी सिद्धी मिळविली, तिला साहाय्यभूत झालेली त्यांच्या स्वभावाची दुसरी बाजूही येथे नमूद केली पाहिजे. प्रा. श्री. म. माटे यांनी आपल्या आत्मचरित्रात त्यांचा 'उमदा गृहस्थ' असा गौरवपूर्ण निर्देश करून म्हटले आहे : 'ज्याला त्यांनी एकदा आपला म्हटलें, त्याला ते कधींही अंतर देत नाहींत. इतकेंच काय, त्याच्या गुणानुरूप त्याचें जें जें कांहीं बरें करतां येण्यासारखें असेल, तें तें प्रिं. करमरकर न चुकतां करतात.' प्राचार्य करमरकरांच्या या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक लक्षणीय अंग म्हणजे त्यांचा निर्व्यसनीपणा. संस्कृताचे प्राध्यापक असूनही यू. टी. सी. - मध्ये लेफ्टनंट-कर्नलच्या हुद्द्यापर्यंत चढलेल्या या गृहस्थाला चहाचे-सुद्धा व्यसन नव्हते. सभा-बैठकी इत्यादी प्रसंगी इतरांसाठी खाद्य-पेये काही येवोत, करमरकरांसाठी फक्त जिंजर-सोडा, अशी व्यवस्था नित्याचीच ठरून गेली होती. पुणे विद्यापीठाच्या संगोपन - संवर्धनांतही करमर-करांच्या या व्यक्तिमत्त्वाने भरीव कार्य घडवून आणले; इतकेच नव्हे, तर या विद्यापीठाच्या वाङ्मयशाखेचे प्रमुख ( डीन ) आणि कुलगुरू ( व्हाइस-चॅन्सेलर ) ही पदेही त्यांनी काही काळ भूषविली. प्राचार्य करमरकरांच्या या कर्तृत्वाचा उचित गौरव त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी त्यांचे विद्यार्थी, स्नेही आणि चाहते अशा सर्व मंडळींनी निधी जमवून पुणे विद्यापीठात बी. ए. - ला संस्कृत विषयासाठी त्यांच्या नावाने पारितोषिक ठेवून केला.

प्राचार्य करमरकरांनी लेखनही पुष्कळ केले. महा-विद्यालयात काम करीत असतांना आणि सेवानिवृत्ती-नंतरही त्यांनी इतर लेखकांच्या सहकार्याने आणि स्वतंत्रपणेही अनेक संस्कृत ग्रंथांच्या महाविद्यालयोपयोगी सानुवाद, सटिप्पण अशा नेटक्या मुद्रावृत्ती काढल्या. सेवानिवृत्तीनंतरच्या काळात त्यांनी 'भांडारकर प्राच्य-विद्यासंशोधन मंदिर' आपले कार्यक्षेत्र नियत करून गौडपादकारिका, रामानुजभाष्य इत्यादी ग्रंथांचे विद्वत्ता-पूर्ण असे सानुवाद, सटिप्पण संपादन केले; आणि अनेक विद्यार्थ्यांना संशोधनकार्यात मार्गदर्शन केले. याच संस्थेने आंतरराष्ट्रीय पातळीवरून महाभारताची जी चिकित्सित आवृत्ती प्रकाशित केली, तीतील 'आश्वमेधिक पर्व' प्राचार्य करमरकरांनी संपादिले आहे.

## प्राचार्य दांडेकर

प्राचार्य करमरकरांनी प्राचार्यपदाची धुरा उतरून ठेविली, ती एकमताने त्या पदी निवडून आलेल्या प्राचार्य शंकर वामन दांडेकरांनी उचलून सहा वर्षे वाहिली ( १९४५–५१ ). स. प. महाविद्यालय सुरू झाल्यापासून प्रथमच त्याला हा प्लेटोच्या आदर्श व्यवस्थेत बसणारा तत्त्वज्ञ शास्ता लाभला. प्राचार्य दांडेकरांनी विद्यार्थ्यांना उद्देशून जे पहिलेच अभिभाषण (अॅड्रेस) केले, ती त्यांच्या अधिकारपर्वाची वैशिष्ट्यपूर्ण नांदी ठरली. कोणाच्याही ध्यानीमनी नसता इंग्रजीची पूर्वपरंपरा बाजूला सारून त्यांनी हे अभिभाषण मराठीत – म्हणजे आपल्या आणि विद्यार्थ्यांच्या मातृभाषेत – करून विद्यार्थ्यांना आणि सहकाऱ्यांना एक सुखद असा धक्का दिला; आणि 'शिक्षणाचे माध्यम मातृभाषा' हे त्यांनी हिरिरीने पुरस्कारिलेले तत्त्व महाविद्यालयाच्या क्षेत्रात प्रविष्ट होत असल्याची जाणीव करून दिली. या भाषणाने त्यांनी विद्यार्थ्यांशी जे एक जवळिकीचे नाते प्रस्थापित केले, ते आपल्या अधिकारकालात साक्षेपाने टिकविले. 'मी अधिकारपदावर असताना कोणाही विद्यार्थ्याला आर्थिक अडचणीकरिता शिक्षण सोडावे लागणार नाही,' अशी त्यांची प्रतिज्ञा असे. या प्रतिज्ञेच्या पूर्तीसाठी त्यांनी महाविद्यालयाकडून तर गरजू विद्यार्थ्यांना साहाय्य करविलेच; शिवाय पुष्कळदा पदर-मोड करूनही त्यांची गरज भागविली. 'Poverty is no crime' ही आपली दृष्टी त्यांनी उक्तीनेच नव्हे, तर कृतीनेही प्रतीतीला आणून देऊन महाविद्यालया-बाहेरच्या व्यक्तींनाही अशा विद्यार्थ्यांना साहाय्य करण्यास प्रेरणा दिली.

पुणे विद्यापीठाची पुण्यातील महाविद्यालयीन शिक्षणाच्या केंद्रीकरणाची योजना कार्यवाहीत यावयाचे ठरल्यावर काही महाविद्यालयात चालू असलेले वाङ्मय-शाखेचे सकाळचे वर्ग बंद व्हावयाचे ठरले; आणि नोकरी करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची फारच कुचंबणा होऊ लागली. तेव्हा त्यांचे अपुरे शिक्षण पुरे होण्याची तरतूद करण्यासाठी प्राचार्य दांडेकरच पुढे झाले. विद्यार्थ्यांविषयीच्या या जिव्हाळ्यामुळे प्राचार्य दांडेकरांना सर्वच विद्यार्थ्यांच्या मनांत एक अनन्य-साधारण असे आदराचे स्थान मिळाले. त्यांनी ज्यांना प्रत्यक्ष शिकविले, त्यांना तर प्राचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारूनच टाकले. त्यांनी शिकवून तयार केलेल्या तीन पिढ्यांचे प्रतिनिधी तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होऊन त्यांच्याच

महाविद्यालयात शिकवू लागलेले पाहण्याचे भाग्य त्यांना आपल्या कार्यकालातच लाभले.

शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषेचे – मराठीचे – महत्त्व जसे दांडेकरांनी ओळखले, तसे राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचेही महत्त्व ओळखले. महाविद्यालयात अध्ययनाचा विषय म्हणून हिंदीची रुजवात करणारे पहिले प्राचार्य हा मान दांडेकरांकडेच जातो. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर तेथेही हिंदीसाठी अध्यासन निर्माण होण्यास दांडेकरांचेच प्रयत्न कारणीभूत झाले आहेत.

दांडेकरांचे शालेय शिक्षण इंग्रजी पहिलीपासून पुढे नूतन मराठी विद्यालयात आणि महाविद्यालयीन शिक्षण फर्गसन कॉलेजमध्ये झाले. १९१९-मध्ये एम. ए. झाल्यावर ते प्राचार्य विनायकराव आपटे इत्यादिकांच्या ध्येयवादाने प्रभावित होऊन शिक्षण प्रसारक मंडळीला येऊन मिळाले. याच सुमारास महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीत उडी घेण्यासाठी प्रा. ना. सी. फडके आजीव-सदस्यपदाचे त्यागपत्र देऊन ( याच वेळी महाविद्यालयाचे एक संस्थापक प्रा. द. रा. घारपुरे यांनीही याच कारणासाठी त्यागपत्र दिले ) संस्था सोडून गेले. त्यांच्यासारख्या विद्यार्थिप्रिय अशा तत्त्वज्ञान-प्राध्यापकाची उणीव भरून काढण्याची मोठी जबाबदारी दांडेकरांवर पडली; ती त्यांनी प्रा. ना. ग. नारळकरांच्या सहकार्याने उत्तम प्रकारे पार पाडली. पुढे सहकाऱ्यांच्या आग्रहावरून काही वर्षे ( १९४०–४५ ) मुंबईच्या रामनारायण रुइया महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदाची आणि कार्यकारी प्राचार्यपदाची धुरा वाहून त्यांनी त्या महाविद्यालयाला बिकट परिस्थितीतून तारून नेले.

संस्थेचे कार्य सुरळीत चालण्यास त्यांची शांत, सहानुभूतीची, दोन पक्षांमधला सुवर्णमध्य शोधून काढणारी, अल्पभाषी पण परिणामकारक वृत्ती फार साहाय्यकारक झाली. हीच वृत्ती ते अन्य संस्थांशी व्यवहार करितानाही प्रकट करीत. ते प्राचार्यपदी असताना डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सुवर्णमहोत्सव वर्ष आले. त्या प्रसंगी फर्गसन कॉलेजचे प्राचार्य रँग्लर महाजनी आणि अन्य प्राध्यापक यांना अगत्याने आपल्या महाविद्यालयात चहासाठी बोलावून दांडेकरांनी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. या छोट्याशाच पण अर्थपूर्ण गोष्टीचे महत्त्व, ज्यांना या दोन महाविद्यालयांमध्ये वर्षानुवर्षे चाललेली चुरस माहीत आहे, त्यांच्याच पूर्णपणे ध्यानात येईल. पुणे विद्यापीठाची जडण-घडण करण्यातही त्यांनी याच वृत्तीने विविध समित्यांत कार्य केले. विद्यापीठाच्या ( मानस, नैतिक आणि सामाजिक शास्त्रांच्या – मेंटल,मॉरल अँड सोशल सायन्सेस ) शाखेचे प्रमुख ( डीन ) म्हणूनही त्यांनी काही काळ कार्य केले.

दांडेकरांना ' प्राचार्य दांडेकर ' म्हणून ओळखणाऱ्या समाजापेक्षा ' हरिभक्तिपरायण सोनोपंत ऊर्फ सोनूमामा दांडेकर ' म्हणून ओळखणारा समाज अनंत पटींनी मोठा आहे. त्यांची महाविद्यालयातली तत्त्वज्ञानावरची व्याख्याने ऐकलेल्यांची संख्या दहावीस, शे-दीडशे, आणि महाविद्यालयीन वर्षाच्या उद्घाटनाचे अभिभाषण असल्यास सहा-सातशे, यापलीकडे गेलेली आढळणार नाही; पण त्यांनी चंद्रभागेच्या आणि इंद्रायणीच्या तिरी देवधुंद होऊन केलेल्या हरिकीर्तनांच्या श्रोत्यांची संख्या सहा-अंकी किंवा निदान पाच-अंकी याहून अलीकडे आलेली आढळणार नाही. डोक्यावर पांढरा शुभ्र रुमाल, अंगात पारशी पद्धतीचा आजानुलंबी कोट, खाली टिळक पद्धतीचे धोतर, गळ्याभोवती उपरणे असा नखशिखान्त खादीचा निर्मळ वेष परिधान केलेली, गोऱ्यापान कपाळावर उभे गंध लावलेली आणि भरीव मिशा राखलेली त्यांची सस्मित, सात्त्विक, ब्रम्हवर्चसाने विलसणारी मूर्ती आणि तिच्या मुखातून स्रवलेली ' सुंदर ते ध्यान ' या अभंगाने प्रारंभ होऊन गंगौघाप्रमाणे प्रवाहित होणारी कीर्तनवाणी महाराष्ट्रात लाखो लोकांच्या हृदयांत अजरामर झाली आहे.

या त्यांच्या पारमार्थिक वैभवामागे त्यांची फार मोठी तपस्या उभी आहे. लहानगा सोनू इंग्रजी शिक्षणासाठी पुण्याला आल्या वेळेपासून त्याला आणि त्याच्या सवंगड्यांना ' पोऱ्यो ! ' अशी मायेची हाक मारणाऱ्या वैकुंठवासी विष्णुबोवा जोगांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्याच्यावर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. बोवांनी त्याला तीन गोष्टींची दीक्षा दिली : व्यायाम, नैष्ठिक ब्रम्हचर्य आणि ज्ञानेश्वरी. यांपैकी पहिल्या दीक्षेचा छाप दांडेकरांच्या शरीरयष्टीवर आज सत्तरीतही दिसून आल्याशिवाय राहत नाही. देशधर्मसेवेसाठी आजन्म ब्रम्हचर्यव्रत स्वीकारलेल्या मोजक्या महाराष्ट्रियांपैकी ते एक आहेत, हे प्रसिद्धच आहे. ज्ञानेश्वरी तर त्यांना माउलीच झाली आहे; इतकी की, हाताशी असली तरी तिचा ते लिहिण्यासाठी पुष्ठिपत्र म्हणून उपयोग कधीही करणार नाहीत, आणि तिला जमिनीवर ठेवण्याचा प्रसंग आल्यास ते आपल्या अंगावरचे उपरणे तिला

आसन म्हणून आंथरतील ! ते प्राचार्य होते-नव्हते त्या सर्व काळात त्यांची पंढरीची वारी कधीही चुकली नाही. ( त्यांना काहींनीं गमतीने 'पंढरी विद्यापीठाचे कुलगुरू' अशी पदवी यामुळेच दिली आहे. ) दांडेकरांच्या जीवनाचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी अध्यात्म न सोडतां व्यवहार केला; अध्यात्माचा व्यवसाय केला केला नाही; आणि व्यवहारही कर्मयोग्याप्रमाणे अनासक्त वृत्तीने आणि निर्भयपणे केला. स्वतः मागे राहून इतरांना पुढे जाण्यास साहाय्य केले. स्वतः मानमान्यतेपासून अलिप्त राहून शि. प्र. मंडळीला मानमान्यता आणि प्रतिष्ठा मिळवून दिली, आणि 'जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ' ही अभंगोक्ती वेगळ्या क्षेत्रात अन्वर्थक केली.

## प्राचार्य केरकर

प्रा. दांडेकरांनंतर प्राचार्यपदी आलेल्या ( १९५१–५४ ) प्रा. रँग्लर दत्ताराम वामन केरकर यांनी १९२४-मध्ये केंब्रिजची 'रँग्लर' पदवी संपादन करून ( प्रा. शहांच्यानंतर स. प. महाविद्यालयात आलेले 'रँग्लर' प्राध्यापक केरकर हेच होत ) आय. सी.एस.-च्या परीक्षेतही उत्तम यश मिळविले. १९३२ साली ते महाविद्यालयात आले. तेव्हापासून १९६० साली सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांनी गणिताच्या अध्ययन-अध्यापनांचे व्रत अखंड पाळून उत्तमोत्तम विद्यार्थी घडविले; आणि महाविद्यालयीन क्षेत्रात शिक्षकाचा एक आदर्श निर्माण केला. दिवस कामाचा असो वा सुट्टीचा असो, एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे पहाटे उठून गणिते सोडविण्याचा परिपाठ प्रा. केरकरांनी वर्षानुवर्षे चालवून आपली विद्या सदैव ताजी, टवटवीत ठेविली; आणि गणिताचे एक विद्वान, सिद्धहस्त शिक्षक म्हणून मोठा लौकिक संपादन केला. साहजिकच त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांत स्वतःविषयी असामान्य प्रेमादर निर्माण केला. त्याचेच प्रतीक म्हणजे त्यांच्या सेवानिवृत्तीच्या प्रसंगी त्यांच्या विद्यार्थ्यांनी निधी जमवून पुणे विद्यापीठात गणित विषयासाठी ठेविलेली 'केरकर शिष्यवृत्ती'.

प्राचार्य केरकर आय. सी. एस. झालेले असले, तरी त्यांचा ओढा प्रशासनापेक्षा विद्येकडेच अधिक होता. त्यामुळे प्राचार्यपदाची तीन वर्षे पूर्ण होताच त्यांनी आपण होऊन या कामातून स्वतःची मुक्तता करून घेतली. त्यांच्या प्रशासनकालात त्यांचा महाविद्यालयात सर्वत्र मोठा दरारा असे; आणि या दराऱ्याचे त्यांच्याभोवतीचे वलय ते प्रशासकपदी नसतानाही जाणवत असे.

## प्राचार्य भिडे

प्रा. केरकरांनंतर प्राचार्यपदी आलेले ( १९५४–६० ) प्रा. बळवंत वासुदेव भिडे हे शास्त्रशाखेचे पहिले प्राचार्य. गणितात जसे प्रा. केरकर, तसे रसायनशास्त्रात सिद्धहस्त, विद्वान शिक्षक म्हणून प्रा. भिड्यांचा लौकिक आहे. 'शास्त्रशाखेतील प्रावीण्य हा स. प. महाविद्यालयाचा प्रांत नव्हे, –येरा गबाळाचे काम नोहे' हा प्रवाद उत्तम विद्यार्थी तयार करून खोटा पाडण्याचे श्रेय शास्त्रशाखेच्या ज्या शिक्षकांना आहे, त्यांमध्ये प्रा. भिड्यांचे नाव अग्रगण्य आहे. प्रा. भिड्यांनी १९३७ साली रसायनविभागाच्या प्रमुखपदाची सूत्रे हाती घेतली; आणि स्वतःचे संशोधन, अध्यापन, अनेक ( एकूण ४० ) विद्यार्थ्यांना संशोधनात मार्गदर्शन अशा विविध अंगांनी कार्य करून रसायनप्रस्थानाला चांगला लौकिक प्राप्त करून दिला. पुणे विद्यापीठातील शास्त्रशाखेचे प्रमुखपदही ( डीन ) त्यांनी काही काळ भूषविले. मध्यंतरी १९३२ साली इंग्लंडला जाऊन, लंडनमध्ये वर्षभर राहून त्यांनी युनिव्हर्सिटी कॉलेजचा 'डिप्लोमा इन केमिकल एंजिनियरिंग' मिळविला. त्यांचे चित्त संशोधनात इतके गुंतलेले असे, की रसायनशाळा हे त्यांचे दुसरे घरच झाले होते; आणि वेषभूषा, बाह्य उपचार इत्यादी गोष्टींना त्यांच्या व्यक्तिगत व्यवस्थेत दुय्यम-तिय्यम स्थान मिळाले होते.

प्राचार्य भिड्यांच्या मनात नेहमीच नानाविध वैशिष्ट्यपूर्ण कल्पना घोळत असत. त्यांतली एक कल्पना यशस्वीपणे प्रत्यक्षात उतरवून त्यांनी काही वर्षांमागे उद्योगधंद्यांना लागणाऱ्या काही रसायनांचे महाविद्यालयाच्या रसायनशाळेत अल्पायासाने उत्पादन करून त्याच्या विक्रीतून महाविद्यालयाला पुष्कळ लाभ मिळवून दिला. अशाच योजकतेने त्यांनी १९३०–३७ या काळात 'स. प. पुस्तक-केंद्रा'ची ( एस. पी. बुक स्टॉल ) धुरा वाहून शि. प्र. मंडळीला सुमारे ५०,००० रुपये फायदा मिळवून दिला. आजची भौतिकी-प्रस्थानाची इमारत हे त्यांच्या योजकतेचे आणखी एक लेणे होय. ही इमारत त्यांनी तपशीलवार योजना आखून, जागरूकपणे देखरेख करून अवघ्या दीड वर्षात उभी केली आहे. जेथे इतरांना काही दिसत नसे, तेथे प्रा. भिड्यांना

बरेच काही दिसत असे. ते प्राचार्यपदी आल्यानंतर ग्रंथालयाला भासू लागलेल्या जागेच्या अडचणीचे निवारण त्यांनी अतिशय कल्पकतेने अल्प खर्चात मूळ जागेतच आतून चहू बाजूंना रुंद सज्जा (गॅलरी) बांधवून घेऊन केले; आणि जवळ-जवळ मूळ जागेच्या इतकेच क्षेत्रफळ पुस्तके ठेवण्यासाठी नव्याने उपलब्ध करून देऊन नवी इमारत बांधण्याचे भारी खर्चाचे काम काही वर्षांपुरते तरी लांबणीवर टाकणे शक्य केले. स. प. महाविद्यालयाच्या आवारात पोहण्याचा तलाव बांधण्यात त्यांनीच पुढाकार घेतला; आणि पानशेतच्या प्रलयानंतर सगळीकडे पाण्याची टंचाई झाल्यावर महाविद्यालयाच्या आवारातील दोन मोठ्या विहिरींचे उदंड पाणी नळाने आणून, महाविद्यालयाच्या इमारतीत खेळविण्याची योजना कार्यवाहीत आणून त्यांनी महाविद्यालयापुरते तरी पाण्याचे दुर्भिक्ष दूर केले. अशा अनेक योजना आखून त्यांनी तडफेने पूर्णतेला नेल्या. निर्णय आणि कार्यवाही यांच्यामधला कालावधी त्यांनी जवळ-जवळ नाहीसाच केला; आणि अखंड उद्योगाने कामाचे डोंगर लीलेने पार केले.

### प्राचार्य हुल्याळकर

यानंतर प्राचार्यपदी आलेले (१९६० – ६३) प्रा. श्रीकृष्ण गोपाळ हुल्याळकर हे या पदावरचे स. प. महाविद्यालयाचे पहिलेच माजी विद्यार्थी असून प्रा. नारळकर आणि प्राचार्य दांडेकर यांनी आपणांस घडविल्याचे ते अभिमानाने आणि कृतज्ञतेने सांगतात. १९३४ साली तत्त्वज्ञान हा विषय घेऊन बी. ए. झाल्यावर इंग्लंडला जाऊन लंडन युनिव्हर्सिटीची एम. ए. पदवी त्यांनी विशेष प्रावीण्याने (डिस्टिंक्शन) संपादन केली. १९३९ साली ते स. प. महाविद्यालयात आले. उत्तम शिक्षक आणि प्रशासक म्हणून त्यांनी अल्पावधीतच लौकिक संपादन केला. कोणताही उपक्रम, कार्यक्रम, समारंभ हा पूर्ण योजनापूर्वक, नेटका, आकर्षक आणि महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेला साजेसा, उत्तम झाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे; आणि तसा तो होण्यास आवश्यक ती तरतूद ते तत्काळ करीत. महाविद्यालयातील शिक्षकांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी अभ्यासविषयक आणि सोयी-सवलतींच्या स्वरूपाचे अनेक उपक्रम – प्राध्यापक वादसभा, विद्यार्थी भेटण्याचे वेळापत्रक, इत्यादी – त्यांनी सुरू केले. शिस्तीचे ते अतिशय भोक्ते होते. त्यांचे स्नेही-परिचितांचे वर्तूळ फार मोठे असून परदेशातही पसरलेले आहे. याचा लाभ ते संधी मिळेल तेव्हा महाविद्यालयाला करून देण्यास चुकत नसत. पुणे विद्यापीठात त्यांनी अनेक समित्यांवर काम केले; आणि शिक्षण, विद्यापीठ आणि महाविद्यालय यांच्या हिताची दक्षतेने जपणूक केली. विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे तर ते सतत बारा वर्षे सदस्य होते. १९५६-मध्ये अण्णामलई येथे 'इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस'चे जे अधिवेशन भरले होते, त्यात नैतिक आणि सामाजिक तत्त्वज्ञान-विभागाचे अध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळाला. भारतातील आणि परदेशातील अनेक शैक्षणिक आणि तत्त्वज्ञानविषयक संस्था परिषदांचे ते सदस्य असून भारतात आणि परदेशात (अमेरिका, होनोलुलू) भरलेल्या तत्त्वज्ञानविषयक आणि शैक्षणिक परिषदांतील चर्चा-परिसंवादांत त्यांनी अनेक वेळा भाग घेतला; आणि काही वेळा त्यांचे प्रवर्तक म्हणूनही काम केले. १९५८–५९ या वर्षी ते अमेरिकेत येल युनिव्हर्सिटीत निमंत्रित संशोधन-प्राध्यापक म्हणून होते; आणि त्या काळात त्यांनी भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि धर्म या विषयांवर सात विद्यापीठांत व्याख्याने दिली. याचप्रमाणे अमेरिकेतून भारतात येणाऱ्या निमंत्रित अध्यापकांना भारतीय इतिहास आणि संस्कृती यांची ओळख करून देण्याची जी योजना पुणे विद्यापीठाने अमेरिकेतील यासंबंधीच्या संघटनेच्या (USEFI) सहकार्याने आखली होती, तिचे १९६०–६१ या दोन वर्षांचे प्रमुख संयोजक म्हणून प्राचार्य हुल्याळकरांनी काम केले. ही बहुविध कार्ये संभाळून त्यांनी पुष्कळ वर्षे राष्ट्रीय छात्रसेनेतही (एन. सी. सी.) अधिकारी म्हणून काम केले. ते तीतून निवृत्त झाले, तेव्हा त्यांच्या छात्रसेनेतील विद्यार्थ्यांनी आणि सहकाऱ्यांनी त्यांच्या नावाने छात्रसेनेत एक पारितोषिक ठेवून त्यांच्याविषयीचा आदरभाव व्यक्त केला. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी उद्योगधंद्याच्या क्षेत्रात प्रवेश करून अल्पावधीतच तेथेही प्रशासक म्हणून चांगला लौकिक संपादन केला आहे. तेथूनही त्यांची स्नेहदृष्टी स. प. म.-वर आहे, हे नेहमी प्रत्ययास येते.

### प्राचार्य मालेगावकर

स. प. महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य (१९६३– ) प्रा. राजाराम रामचंद्र मालेगावकर हे असून आपल्या कार्यकालात महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्याचा दुर्मीळ मान त्यांना लाभला आहे. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यावर काही काळ फर्गसन कॉलेजमध्ये इंग्रजीचे अध्यापन करून १९४३ साली ते स. प. महाविद्यालयात आले; आणि काही महिन्यांच्याच

अवधीत इंग्रजीचे उत्तम आणि रसिक शिक्षक म्हणून त्यांनी ख्याती मिळविली. त्यांनी अनेक जबाबदारीच्या जागांवर काम केले. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी धाक किंवा दंड यांवर भर न देता कर्तव्यबुद्धीला आणि सद्भावनेला आवाहन करून विद्यार्थ्यांचे, सहकाऱ्यांचे आणि इतरांचे सहकार्य मिळविण्याची आपली वैशिष्ट्यपूर्ण पद्धती प्रत्ययाला आणून दिली. आपल्या सहानुभूतिपूर्ण, मनमिळाऊ आणि खेळीमेळीच्या वृत्तीने त्यांनी सर्वांशी अधिकारापेक्षा प्रेमाचे संबंध निर्माण केले असून हेच त्यांच्या लोकप्रियतेचे आणि यशाचे मर्म आहे.

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या या आजवरच्या नऊ प्राचार्यांच्या कार्याचे समालोचन केल्यावर असे जाणवल्यावाचून राहत नाही की, प्राचार्य हा महाविद्यालयाच्या मूर्तीचा एकमेव नसला, तरी महत्त्वाचा शिल्पकार होय. त्याची विद्वत्ता, त्याचे व्यक्तिमत्त्व, त्याचा नावलौकिक, त्याचे प्रशासनकौशल्य, त्याचे संघटनचातुर्य, त्याचे संबंध, त्याची अन्य कार्यक्षेत्रे, त्याची जीवनदृष्टी, त्याच्या निष्ठा, त्याचे चारित्र्य, अशा किती तरी गोष्टींचा प्राचार्य म्हणून करावयाच्या कार्यावर आणि महाविद्यालयाची घडण, प्रतिष्ठा, वाढ, योगक्षेम यांवर प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम होत असतो. थोडक्यात, महाविद्यालयाच्या राज्याचा प्राचार्य हा मुख्य मंत्री होय. स. प. महाविद्यालयाचे भाग्य हे की, या अनेक आवश्यक अंगांपैकी बहुसंख्य अंगांत एकापेक्षा एक सरस असे प्राचार्य त्याला लाभत गेले. आजची महाविद्यालयाची समाजातली वास्तविक आणि लाक्षणिक उंची आणि विस्तार यांना पुष्कळ अंशी त्यांचे कर्तृत्व कारणीभूत आहे.

प्राचार्यांचे कर्तृत्व ही महाविद्यालयाच्या यशाची एक आघाडी मानली, तर उत्तमोत्तम विद्वान, प्रेरक, वाकबगार शिक्षक आणि हुषार, मेहनती, क्रीडाकलापटू विद्यार्थी या आणखी दोन आघाड्या आहेत. स्थूल तुलनेने पाहता प्राचार्यांची आघाडी ही काहीशी बाह्य आणि व्यवहारप्रधान असून बाकीच्या दोन आघाड्या आंतर आणि निर्मितिप्रधान आहेत. या तिन्ही आघाड्यांचे समुचित सामर्थ्य हा स. प. म.-च्या परिपूर्ण यशाचा व्यापक पाया होय. यांतल्या एका आघाडीचे समालोचन केले आहे; अवशिष्ट दोन आघाड्यांचे समालोचन आता करावयाचे आहे.

### अध्यापक-विश्राम

प्राचार्यांच्या कचेरीतून बाहेर पडून उजवीकडे थेट अखेरपर्यंत गेल्यावर 'अध्यापक-विश्राम' अर्थात 'कॉमन रूम' लागते. अध्यापक-विश्राम हे सर्व अध्यापकवर्गाचे प्रतीक मानल्यास महाविद्यालयाच्या अजस्र देहात त्याचे स्थान निःशंकपणे हृदयाच्या तोलाचे आहे. देहाचे व्यापार सुरळीत चालण्यासाठी हृदय भक्कम असावे लागते. महाविद्यालयाचे कार्य सुरळीत चालण्यासाठी अध्यापकवर्ग भक्कम असावा लागतो. स. प. महाविद्यालयाच्या आजवरच्या प्राध्यापक-मालिकेवर धावती दृष्टी फिरविली, तरी कळून येण्यासारखे आहे की, या महाविद्यालयाच्या अधिकारिवर्गाने अगदी प्रारंभकालापासून हे हृदय भक्कम, सशक्त, कार्यक्षम ठेवण्यासाठी अतोनात प्रयत्न केले आहेत. अध्यापक-विश्रामात दक्षिण बाजूस ओळीने लावलेली ही वेळोवेळी काढलेली अध्यापकांची समूह-छायाचित्रे (ग्रुप फोटो) आहेत. त्यांतला हा पहिला, 'न्यू पूना कॉलेज' सुरू झाले तेव्हाच्या अध्यापकांचा. बहुतेक मंडळी डोक्याला रुमाल किंवा टिळक-पद्धतीची आटोपशीर पगडी, अंगात आजानुलंबी कोट, गळ्याभोवती उपरणे, खाली धोतर आणि पायात बंदाचे बूट किंवा जोडे, — असा पेहराव केलेली आहे. दोघांचे कोट पाश्चात्त्य पद्धतीच्या उघड्या गळ्याचे, गळ्याला बांधलेले टाय दाखविणारे असून दोघे धोतराऐवजी पॅंट घातलेले दिसत आहेत; पण त्यांच्याही डोक्याला रुमाल-पगडी आहेच. खाली लिहिलेल्या नावांच्या मदतीने यातल्या व्यक्ती ओळखू येतील. प्राचार्य आपटे, प्रा. करमरकर आणि प्रा. शहा (यांची माहिती मागे आली आहे) यांच्याखेरीज या छायाचित्रात गणिताचे प्रा. हर्डीकर, फिजिक्सचे प्रा. घारपुरे, इंग्रजीचे प्रा. तुळपुळे, तर्कशास्त्राचे प्रा. ना. सी. फडके ही आपापल्या क्षेत्रात मान्यता पावलेली प्राध्यापक-मंडळी आढळेल. येथून क्रमशः पुढची छायाचित्रे पाहत गेल्यास स. प. महाविद्यालयाची अध्यापकवर्गाच्या बाबतीतली थेट आजपर्यंतची भाग्यवत्ता कळून येईल. यातले प्रा. लक्ष्मणशास्त्री लेले, प्रा. श्री. म. माटे, डॉ. के. ना. वाटवे, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, डॉ. रा. शं. वाळिंबे, प्रा. अ. गं. मंगरूळकर, प्रा. रा. ना. गद्रे, डॉ. प्र. रा. भुपटकर, प्रा. द. वि. कुलकर्णी इत्यादी काही चेहरे नू. म. वि. प्रशालेतून महाविद्यालयात प्रविष्ट झालेले आढळतील. अशा मातबर शिक्षकांच्या बळावरच प्रा. नारळकर मोठ्या अभिमानाने

म्हणत असत की, 'माझ्या शाळेत दोन कॉलेजे काढण्याइतका निष्णात शिक्षकवर्ग आहे!' शिक्षण प्रसारक मंडळीचे मोठेपण हे की, महाविद्यालयात शिकविण्याच्या योग्यतेचे जे शिक्षक नू. म. वि.-मध्ये होते, त्यांना महाविद्यालयात अवसर निर्माण होताच तिने आनंदाने पाचारण केले; आणि या शिक्षकांचे मोठेपण हे की, त्यांनी शाळेत मिळविला, तसाच महाविद्यालयात काम करितानाही उत्तम लौकिक मिळविला. ग्रंथकार, संशोधक, मार्गदर्शक, वक्ते, ललितलेखक, कलाभिज्ञ, कलाकार, समाजकार्यकर्ते, क्रीडानिपुण, — इत्यादी नानागुणसंपन्न व्यक्तींची जणू 'मांदियाळी'च स. प. महाविद्यालयाच्या अध्यापकवर्गात एकवटल्यासारखी वाटते. (या शिक्षकांविषयी अधिक तपशील पुढे येणार आहे.) या अध्यापकवर्गाने केलेले अध्यापन, तसेच त्यांच्या मार्गदर्शनाने चाललेली विविध अभ्यासमंडळे, वाङ्मयमंडळे, कलामंडळे, विद्यार्थिसंघटना, क्रीडासंघ, छात्रसेना इत्यादींमधून शिकून बाहेर पडलेला विद्यार्थी केवळ परीक्षेतील उत्तीर्णता घेऊन न जाता अनेक गुणांचे, निष्ठांचे, कार्यांचे संस्कारही घेऊन जातो.

गेल्या अर्धशतकात या महाविद्यालयाने १६,०००-वर पदवीधर निर्माण केले. त्यांपैकी अनेक विद्यार्थी देशाच्या विविध भागांत व जीवनाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाने तळपले आहेत. वृत्तपत्रसृष्टीत सर्वश्री. सकाळचे संपादक डॉ. ना. भि. परुळेकर, शि. ल. करंदीकर, मामाराव दाते, पु. रा. भिडे, दत्तप्रसन्न काटदरे; शास्त्रीय जगतात बंगलोरच्या हिंदुस्थान विमान कारखान्याचे जनरल मॅनेजर पद्मश्री डॉ. व्ही. एस. घाटगे, पुण्याच्या राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळेचे संचालक डॉ. बा. द. टिळक, डिफेन्स रिसर्च लॅबोरेटरीचे संचालक डॉ. डब्ल्यू. डी. पटवर्धन, दिल्लीच्या लाला श्रीराम इन्स्टिटयूटचे संचालक डॉ. चिपलकट्टी, कॅलिको मिल्सचे मॅनेजर श्री. खेर; साहित्यक्षेत्रात कै. साने गुरुजी, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, डॉ. सरोजिनी बाबर, डॅा. दु. का. संत, कवी वसंत बापट; शिक्षणक्षेत्रात पुणे अनाथ विद्यार्थी गृहाचे प्रमुख डॉ. ग. श्री. खैर, म. सयाजीराव विद्यापीठातील तत्त्वज्ञान-प्रस्थानप्रमुख डॉ. अ. गं. जावडेकर आणि रसायनशास्त्राचे प्राध्यापक डॉ. सुरेश सेठना, सौ. यमुनाबाई हिर्लेकर, पुणे विद्यापीठाच्या जीवशास्त्र-प्रस्थानाच्या प्रमुख डॉ. लीलाबाई गोळे, डॉ. शरयू बाळ, डॉ. वि. सी. टिळक आणि सौ. कमलाबाई टिळक, श्री. ल. नी. छापेकर; भांडारकर प्राच्यविद्यामंदिराचे क्युरेटर डॉ. अ. द. पुसाळकर, गोव्याच्या पुरालेखविभागाचे क्युरेटर डॉ. वि. त्रि. गुणे, महाराष्ट्रराज्याचे माजी ग्रंथालयाधिकारी श्री. त्र्यं. दि. वाकनीस, रोमच्या जागतिक अन्नसंघटनेचे संख्याशास्त्रज्ञ डॉ. पी. व्ही. सुखात्मे, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आग्नेय आशिया विभागाचे संचालक श्री. डी. एस. सावकार; संरक्षणदलातील लेफ्टनंट-जनरल एस. पी. पी. थोरात; सरकारी क्षेत्रात प्लॅनिंग कमिशनचे श्री. एम. आर. यार्दी व श्री. व्ही. एम. भिडे, कायदा-खात्यातील श्री. डी. व्ही. शहा, श्री. द. बा. कुलकर्णी, श्री. मु. रा. कोल्टकर; अ. भा. चार्टर्ड अकौंटंट्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. एम. पी. चितळे; स्काऊट संघटनेचे डॉ. मो. ना. नातू, श्री. द. प. जोशी; कामगार-जगतात कै. विष्णू चितळे, कॉ. निमकर; राजकारणात मुंबईचे खासदार के. के. शहा, खासदार मोहन धारिया, खासदार गुलाबराव जेधे, खासदार ताराबाई साठे; पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष शंकरराव उरसळ, पुण्याचे महापौर श्री. किल्लेदार; औद्योगिक क्षेत्रात पॅफ्को मिल्सचे श्री. पारखे, स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्सचे श्री. दादासाहेब वैद्य, 'सह्याद्री डायस्टफ'चे श्री. बोडस व जठार, व्हिक्टरी फ्लास्क्सचे श्री. व्ही. आर. भिडे, राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळेतील डॉ. इंगळे, — हे सर्व स. प. म.-चे माजी विद्यार्थी आहेत. डॉक्टर, एंजिनियर, प्राध्यापक इत्यादी मंडळी तर शेकड्यांनी मोजावी लागतील. महाराष्ट्रातील पंधरावर महाविद्यालयांचे प्राचार्य व सुमारे शंभर प्रशालांचे मुख्याध्यापक या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. बँका, इन्शुरन्स कंपन्या, सरकारी कचेऱ्या, औद्योगिक कारखाने, व्यापारी संस्था, संरक्षण दले यांतूनही स. प. म.-चे माजी विद्यार्थी शेकड्यांनी विखुरले आहेत.

या महाविद्यालयाने आपल्या शिक्षणाचा दर्जा सदैव उच्च ठेवला आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या विविध परीक्षांमध्ये या महाविद्यालयाचे विद्यार्थी वर्षोवर्षी गुणांनी व संख्येने श्रेष्ठ ठरत आले आहेत. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून विद्यापीठीय परीक्षेत प्रथम श्रेणीचा मान मिळविणाऱ्या विद्यार्थिश्रेष्ठांची एक मालिकाच निर्माण झाली आहे. त्यांपैकी अनेकजण विद्यापीठामध्ये सर्वप्रथम आले आहेत, तर अनेकांनी विविध पारितोषिके पटकावली आहेत. गणित, संस्कृत, मराठी, तत्त्वज्ञान, रसायन, मानसशास्त्र इत्यादी काही विषयांत या महाविद्यालयाने उज्ज्वल परंपरा निर्माण केल्या आहेत.

[पृष्ठ ११२-वर चालू]

## बी. एस्‌सी. प्रथमश्रेणीचे मानकरी : एप्रिल १९६६



कु. अलका देवधर
( गणित )
विद्यापीठात सर्वप्रथम



श्रीकृष्ण वाघोलीकर
( संख्याशास्त्र )



एस्. एन्. जोशी
( पदार्थ-विज्ञान )



उदय कारखानीस
( पदार्थ-विज्ञान )



चंद्रशेखर रानडे
( संख्याशास्त्र )



बी. जी. जाधव
( संख्याशास्त्र )



शि. रा. गोगावले
( पदार्थ-विज्ञान )



एस्. बी. गोखले
( पदार्थ-विज्ञान )



के. यू. सुरतवाला
( संख्याशास्त्र )



ए. एस्. कुलकर्णी
( संख्याशास्त्र )



आर्. के. केंजळे
( पदार्थ-विज्ञान )



एस्. डी. जोगळेकर
( पदवीपूर्व शास्त्र )
विद्यापीठात प्रथम

## बी. एस्सी. प्रथमश्रेणीचे मानकरी : एप्रिल १९६६


विनायक तडवलकर
( रसायन )


कु. शकुंतला साने
( रसायन )


कु. उषा नांदेडकर
( रसायन )


व्ही. एस्. काळे
( रसायन )


ग. भि. सुदंबरेकर
( रसायन )


कु. मीना यादव
( रसायन )


जा. सो. भांबारे
( रसायन )


रमेश साने
( रसायन )


कु. मंगला शिरोळे
( रसायन )


वसंत पालकर
( रसायन )


मुकुंद गलगली
( रसायन )


कु. हेमलता जोशी
( रसायन )



# मराठी विभाग


| | |
|---|---|
| केशवसुत | १८ |
| आजचे जीवन, आजचे चित्रपट | १९ |
| बंधन | २४ |
| पण का ? | ३१ |
| सा–रे–ग–म | ३६ |
| स्मृती | ३९ |
| एक शून्य बाजीराव | ४१ |
| अकरा कविता | ४५ |



# केशवसुत

**मनोहर राजर्षी**
प्रथम वर्ष साहित्य

शंभर वर्षांपूर्वी, मराठी काव्यात क्रांती घडवून आणणारी एक व्यक्ती जन्माला येणार आहे, याची कोणाला कल्पनाही नव्हती आणि केशवसुतांच्या अल्पायुष्यातही कोणाला होऊ शकली नाही. खुद्द केशवसुतांना मात्र वयाच्या विसाव्या वर्षीच, आपल्याला ' नवी काव्ये ' गावयाची आहेत, अन ' माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनि ' ' सरसवाङ्निष्यन्द ' पुढे चालावयाचा आहे, याची जाणीव झालेली दिसते.

आज इतक्या वर्षांनी केशवसुतांच्या कवितेकडे पाहिल्यावर ती तितकीशी सुरस वाटत नाही; पण तरीही उठून दिसते, विशेषत्वाने प्रतीत होते, ते त्यांनी मराठी कवितेला दिलेले नवे वळण. रुक्मिणी अन द्रौपदी, श्रीकृष्ण अन अर्जुन, ईश्वर अन भक्त या सर्वांच्या मगरमिठीत सापडलेल्या मराठी कवितेला गुलाबाचे फूल अन लहान मूल, रांगोळी अन कामिनी, घड्याळ अन सतार यांच्यांत स्वैर विहार करण्यासाठी सोडून देण्याचे कालदत्त काम त्यांनी केले. यासाठी त्यांनी इंग्रजीचा आधार घेतला. किंबहुना थोड्या गमतीने असेही म्हणता येईल की, शेले, बायरन आणि कीट्स यांच्याच रांगेतला एक रोमँटिक कवी मराठीतून आपले काव्यलेखन करी – तोच केशवसुत! प्रचलित म्हणून जे जे असेल त्याविरुद्ध आघाडी, नव्या विश्वाचे स्वप्न, आत्मकेंद्रितता, प्रेमाचे आकर्षण नि सौंदर्यदृष्टी ही इंग्रजी रोमँटिक कवितेची वैशिष्ट्ये केशवसुतांच्या कवितेतून प्रतीत होतात. अर्थात हे तत्कालीन जुन्या वळणाच्या कवींना पटणारे नव्हते; म्हणूनच केशवसुतांना

' अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहात मोठे, पुसतो तुम्हांला. '

असे काहीसे उद्दाम उद्‌गार काढावे लागले.

नव्या मराठी काव्याचे वळण इंग्रजी काव्याकडे झुकणारे असले तरी केशवसुतांच्या सामाजिक कविता निखालसपणे ' त्यांच्याच ' आहेत. ' तुतारी ', ' नवा शिपाई ', ' स्फूर्ति ' या त्यांच्या कविता म्हणजे, एका दृष्टीने त्यांच्या आवडत्या स्वर्गसमक्षतेच्या कल्पनेचा स्फुलिंगवत आविष्कार. या आविष्काराच्या समयी ते विलक्षण आवेगी होतात. त्यांचा जिव्हाळा, भावनावेग यांमुळे त्यांच्या या कविता मराठीला निःसंशयपणे ललामभूत झाल्या आहेत.

' तुतारी 'द्वारे गगने भेदण्याची ईर्ष्या बाळगणारा, ' स्फूर्ती 'च्या साहाय्याने बंडाचा झेंडा फडकावणारा हा नवा शिपाई, 'झपूर्झा 'द्वारे उदात्त बुद्धीच्या एकतानत्वाचे नि सृजनशीलतेचे गायन करणारा हा कवी, जेव्हा ' मृत आशांच्या चितांवरूनिया पिशाच माझें भटकत आहे ', ' आसवे न आणू नयनीं, मरून जाऊं एक दिनीं ' असे विलक्षण दुःखाचे उद्‌गार काढतो, त्रिखंडभर ' हरपलें श्रेय ' धुंडू लागतो, तेव्हा क्षणभर रसिक बावरतो. ही उदासीनता, हे नैराश्य, ही कटुता – सारेच काही निव्वळ रोमँटिक कवितेच्या अनुकरणापायी आलेले नाही, यात कुठेतरी केशवसुत असले पाहिजेत, असे त्याला अपरिहार्यपणे वाटू लागते. फुलाच्या अकृत्रिम सौंदर्याचे गुणगान करता-करता त्यांनी एकदम मृत आशांची चिता का जाळावी, हे उमजून घेण्यासाठी मग त्यांच्या चरित्राकडे वळावे लागते. केशवसुतांचे बंधू असे सांगतात की, लहानपणी ते मुलांत फारसे मिसळत नसत. गंभीर, दुर्मुखल्या चेहऱ्याने कुठेतरी दूर, एकांतात जाऊन बसत – अन मोठेपणी लहान मुलांत मिसळत! लहानपणीच मोठ्या झालेल्या नि मोठेपणी बालपणाच्या तीव्रेच्छेने विव्हळलेल्या या कवीकडून कधीच शुद्ध निसर्गवर्णनपर कविता लिहिली गेली नाही, याचे कारण हेच. त्यांच्या आवडत्या कल्पना कधीच साकार होऊ शकल्या नाहीत. शिवाय वैयक्तिक जीवनातल्या अडचणी, मानी स्वभावामुळे उद्‌भवलेला नोकऱ्यांतला अस्थिरपणा, तुटपुंजी

मिळकत, – यांमुळेही त्यांचे आधीचेच गंभीर मन विषण्णतेला बिलगले असणे शक्य आहे. निसर्ग नि मानव यांतली दरी आणि हरपलेली निरागसता त्यांना अधिकच व्यथित, व्याकूळ करीत असावी. सामाजिक क्षेत्रातील अन्याय पाहून त्यांचे विलक्षण संवेदनाक्षम मन विजेचा धक्का बसल्यासारखे उफाळून येत असावे; पण वैयक्तिक जीवनातल्या काळ्याकुट्ट अंधाराकडे नजर वळताच ‘अमुचा प्याला दुःखाचा, डोळे मिटुनी प्यायाचा’ असे भावोद्गार काढीत असावे ! एकाच वेळी नैराश्य नि आवेश, अगतिकता अन कृतिप्रवणता यांचे संमिश्र दर्शन घडविणारे केशवसुतांचे व्यक्तिमत्त्व मोठे अभ्यसनीय वाटू लागते.

आजही केशवसुतांच्या कवितेबद्दल विशेषतः तिच्यातल्या विपुलतेच्या नि लालित्याच्या अभावाबद्दल, ओबडधोबड रचनेबद्दल नाराज असलेले टीकाकार आहेतच. पण ‘घुबड’, ‘वातचक्र’, ‘सतारीचे बोल’, ‘झपूर्झा’, ‘हरपलें श्रेय’ या त्यांच्या शेवटच्या कविता निरीक्षल्या, तर असे कोण्याही सहृदयाच्या मनात आल्यावाचून राहत नाही की, ते अधिक जगले असते तर त्यांनी त्यांहूनही सुंदर, आत्मनिष्ठ कविता लिहिल्या असत्या. पण शेले-बायरनप्रमाणे केशवसुतही अल्पायुषित्वाचा शाप चुकवू शकले नाहीत. पण अल्पावधीतही मराठी काव्याच्या भूधरात केशवसुत स्वतःच्या नावाचे एक महत्त्वपूर्ण लेणे खोदून गेले, एवढे मात्र नक्की !



# आजचे जीवन, आजचे चित्रपट

**शशिकांत पटवर्धन**
प्रथम वर्ष साहित्य

‘परशुरामीय’ निबंधस्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविलेला निबंध.

मानव जसजसा प्रगत होत गेला, तसतसा तो आवश्यक गरजांव्यतिरिक्त सुखद साधनांच्या शोधात रमू लागला. माणसाच्या सर्वंकष प्रगतीसाठी या शोधांचा विचार आवश्यक वाटू लागला. यातूनच प्रवासाची सुखद साधनं, करमणुकीची अनेक माध्यमं उदयास आली. करमणुकीच्या या साधनांपैकी चित्रपटकला आधुनिक माणसाच्या जीवनात एकरूप होऊन बसली आहे. चित्रपट ही संस्था आजच्या काळात आपल्या सामाजिक जीवनातील एक महत्त्वाचा घटक बनून राहिलेली आहे. चित्रपट पाहणं ही आता एक केवळ करमणूक किंवा चैनीची गोष्ट राहिलेली नसून ती दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य घटक होऊ पाहत आहे. चित्रपटाचं माध्यम दृश्य व श्राव्य असा दोन्ही प्रकारचा परिणाम करणारं असल्यानं त्याचं सामर्थ्य जबर असतं. इतकं जबर असतं की चित्रपट सर्वसामान्य जनतेच्या जीवनाबद्दलच्या दृष्टिकोणावर, आचारविचारांवर आणि व्यवहारावर प्रभाव पाडतात. आणि म्हणूनच चित्रपटांचं सध्याचं स्वरूप, त्यांचे सामाजिक जीवनावरील परिणाम व त्यांवरील उपाय यांचा विचार करावासा वाटतो.

संगीत, चित्रकला, शिल्पकला, वाङ्मय, चित्रपटकला इत्यादी सर्व कलांचा विचार हा मानवी जीवनाच्या संदर्भात करावयाचा झाल्यास तिथं कलेचे वर्ग पाडता येणार नाहीत. कारण कला हीच एक गोष्ट अशी आहे की तिचा मानवी जीवनाशी असलेला संबंध सापेक्ष असतो. कलेचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व अस्तित्वात आणणं अवघड ठरतं. प्रत्येक युगात कलेला पैलू पाडले जात असतात. कलाकृती व जीवन यांचा परस्परसंबंध असा घनिष्ठ असतो. जीवनाचं प्रतिबिंब कलाकृतीत पडतं आणि कलाकृतीत जीवनाला नवं वळण, नवी दिशा दाखविण्याचं सामर्थ्य असतं, हे मान्य करावं लागेल. हे तत्त्व जर मान्य झालं तर आजच्या चित्रपटांचं स्वरूप हे आजच्या जीवनाचं एक फळ आहे असं म्हणावं लागेल. आणि थोडाफार विचार केल्यास हे खरं असल्याचं आढळून

फोन्स } पुणे : ५६४२८
श्रीपूर : पी. सी. ओ.

॥ श्री ॥

तारेचा पत्ता : श्री { पुणे
श्रीपूर

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

**रजिस्टर्ड ऑफिस** : ९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे २.
**फॅक्टरी** : श्रीपूर, व्हाया अकलूज, जि. सोलापूर.

* * *

**० शुभ्र दाणेदार साखरेचे आणि रेक्टिफाइड व डिनेचर्ड स्पिरिटचे उत्पादक ०**

बृहन्महाराष्ट्रांतील मध्यम वर्गाने गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वी रीतीने चालू असलेला
हा साखर व स्पिरिटचा कारखाना मध्यमवर्गीयांचे भूषण होय !

**गो. श्री. वाळिंबे**
बी. कॉम्.
मॅनेजर

**शं. ल. लिमये**
बी. एस्सी., एल्एल्. बी., वकील
अध्यक्ष

---

**बौद्धिक श्रम व मानसिक अशांतता यांवर गुणकारी**

## -: प्र श म :-

( व्हिटॅमिन बी–युक्त )

**सर्व तऱ्हेच्या यकृत-विकारांवर गुणकारी**

## -: कुमारी कल्प :-

सर्व तऱ्हेची आयुर्वेदीय औषधे शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार केली जातात.

# दी आयुर्वेद रसशाळा, पुणे ४.

शाखा : अमरावती, बेळगाव, मुंबई, दिल्ली, हुबळी, इंदोर, जोधपूर,
कोल्हापूर, नागपूर, पुणे व सांगली.

येईल. कलाकृती जितकी अविकृत, शुद्ध, तितकी ती अक्षर, चिरंतन होते. हिणकस कृती काळाच्या उदरात नाहीशी होते. परंतु हे जरी खरं असलं, तरी चित्रपट ही कला या नियमाला अपवाद होऊ पाहत आहे. आजची सर्व चित्रपटसृष्टी बऱ्याच दृष्टींनी प्रगतिपथावर असली व काही चित्रपटांनी आपल्या गुणवत्तेवर आंतरराष्ट्रीय कीर्ती व मान्यता मिळविली असली, तरी आजच्या बहुसंख्य चित्रपटांचं स्वरूप भ्रष्ट झालेलं आहे, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. या स्वरूपाचा विचार करण्यापूर्वी ते तसं का झालं याची पार्श्वभूमी पाहणं आवश्यक आहे.

रंजकता हा चित्रपटांचा आत्मा आहे ही गोष्ट खरी; पण या रंजकतेचा अर्थ मात्र चुकीचाच लावला जातो. मनोरंजन किंवा रंजकता हे चित्रपटांचं प्रमुख कारण. पण रंजकता म्हणजे बेगडीपणा नव्हे. रंजकतेच्या नावाखाली पडद्यावर जो धुमाकूळ घातला जातो ते रंजकतेचं विकृत हिडीस स्वरूप असतं. आणि दुःख असतं ते इथंच असतं. ह्या हिडीस, ओंगळ प्रकारांना सर्वसामान्य प्रेक्षक सहजपणे बळी पडतात. करमणूक झाली असं समजून मनाशी प्रतारणा करतात. आज पैशाकडे नजर ठेवून रंजकता हा सोज्वळ गुण सर्वच ठिकाणी अफूसारखा वापरला जात आहे. चित्रपटसृष्टी यात आघाडीवर आहे.

मानवी भावनांचं द्वंद्व – संघर्ष – हा सर्व कथानकांचा, सर्व कलांचा पाया असतो. चित्र रेखाटताना चित्रकाराच्या मनातील संघर्ष कॅन्व्हासवर उमटत असतो. लेखक, कवी ह्याच प्रकारातील. संगीतशास्त्र तर सारं मनाच्या आंदोलनावरच आधारलेलं आहे. आणि चित्रपट म्हणजे या सर्व कलांचा सुरेख संगम ! अंतःकरणात दडून असलेल्या भावनांची उकल सर्वांनाच करता येत नाही. कथाकार ती करतो, चित्रपटकार त्याचं चित्रण करतो. अगदी एखाद्या जुन्या संस्कृत वा ग्रीक महाकाव्यापासून तो आजच्या एखाद्या सनसनाटी चित्रपटापर्यंत, कोणत्याही कलाकृतीवर नजर टाकली तर हेच आढळेल की, दोन परस्परविरोधी भावना तुल्यबल झाल्या की कथा जन्म घेते. त्याकरता कथेतील पात्रांच्या भावनांचं चित्रण थोडंसं चाकोरीबाहेर करावं लागतं. आणि त्यामुळे-कथा वा चित्रपटातील पात्रं आपल्याला काहीशी असच मान्य वाटतात. तात्त्विक दृष्टीनं हे ठीक आहे. परंतु वास्तवात ती तशी असतात का, याचा प्रेक्षकानं विचार करायला हवा. आणि तसा विचार त्याच्याकडून केला जात नाही. याचा फायदा निर्माता घेतो. असामान्यतेच्या नावाखाली, रंजकतेच्या गोंडस रूपाखाली अवास्तवतेचं, हीन अभिरुचीचं मोठ्या दिमाखानं तो प्रदर्शन करतो. भव्य-दिव्य प्रेमाच्या नावाखाली ओंगळ, विकृत बाजारी प्रेमाचं चित्र पडद्यावर दाखवितो. आणि हे सर्व माहीत असूनही ' याचा आपल्यावर काहीएक परिणाम होणारा नाही ' अशी भ्रामक समजूत करून सुजाण प्रेक्षकही बळी पडतो. यातूनच निर्माता ' प्रेक्षकाला हेच हवं आहे ' अशी गोड समजूत करून घेऊन पुरवठा सुरू करतो. प्रेक्षक बळी पडतो. आणि हे चक्र अखंडित चालू राहतं.

चित्रपटांच्या बाबतीत ज्याला ' जनतेची अभिरुची ' किंवा लोकांची आवड म्हणतात, त्यासाठी कथानकाच्या व आविष्काराच्या (प्रेझेंटेशनच्या) या तत्त्वांनाच फाटे फोडून त्यांचा विपर्यास कसा केला जातो, हे पाहणं मोठं उद्‌बोधक ठरेल.

पुष्कळ वेळा असं घडतं की, चित्रपटातील संघर्ष साधण्यासाठी ज्या भावनांचा आधार घेतला जातो, त्या भावना सामाजिक किंवा नैतिक मूल्यांच्या दृष्टीनं काहीशा धोकादायकच असतात. काम, क्रोध, लोभ इत्यादी षड्‌रिपूंचा आश्रय कथेच्या चित्रणासाठी घेतला जातो. सामान्य प्रेक्षकाला समाजबंधनाच्या कोंडीतून बाहेर पडून आपल्यातील वरील प्रकारच्या सुप्त विकारांना वाट करून देण्याची इच्छा साहजिकच असते. जे आपल्या समाजाच्या भीतीमुळे करता येत नाही ते निदान पहायला मिळालं, तरी माणसाचं समाधान होत असतं. आनंद या भावनेचा उगम या सुप्त विकारातून झालेला आहे. समोर असणारं दृश्य,– मग ते दुःखाचं असो, सुखाचं असो – ते प्रेक्षकवृत्तीनं पाहत असताना माणूस रडतो, हसतो, रागावतो, ह्या त्याच्या प्रतिक्रिया (रिॲक्शन्स) म्हणजेच त्याला होणाऱ्या मानसिक आनंदाच्या तऱ्हा असतात. विदूषक धडपडतो, मार खातो हे पाहताना आपण स्वतः सुरक्षित आहोत ही जाणीव ठेवूनच, म्हणजेच प्रेक्षकवृत्तीनं, माणूस आनंदभोग घेतो. ह्या त्याच्या वृत्तीचा फायदा कलेच्या उत्कर्षासाठी होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या मर्यादा उल्लंघिणारा आविष्कार थोड्या-फार प्रमाणात प्रत्यक्ष स्वरूपात पाहणं आवडतं. रोजच्या रामरगाड्यात कंटाळलेल्या त्याच्या मनाला दोन घटका गूढगुंजनाची अफू हवी असते. हीच गोष्ट ध्यानात घेऊन ' मागणी, तसा पुरवठा ' या न्यायानं सामान्य प्रेक्षकाला आवडेल, त्याला पसंत पडेल अशा

**Phone : 55175**

*For your latest choice in*

*Woollen, Terylene, Terycot,*
*Decron &*
*Cotton Suitings & Shirtings*

*Visit*

**INDIA WOOLLEN HOUSE**

**(New Show Room)**

**Laxmi Road, Poona 2.**

*( Best Tailoring Executed )*

EYE, TRY, BUY.

SUIT SPECIALIST

**SELECT TAILORS**

**Opp. Saraswati Building,**
**Laxmi Road, Poona 2**

Telephone : 54544

*With the compliments of :*

**HOLLYWOOD**

**PHOTO STUDIO**

☆

Authorised AGFA Dealers
POONA-4.
Phone: 57575 (extn.)

*With the best of*

*compliments from :-*

**Sunrise**

**Manures & Chemicals**

MANURE MIXTURES
CHEMICAL FERTILISERS
INSECTICIDES
FUNGICIDES
GARDEN FERTILISER

**813-14, Bhavani Peth, Poona 2**
**( India )**

Phone : 23012

प्रकारचाच चित्रपट तयार करण्याचा प्रयत्न निर्मात्याकडून केला जातो. चित्रपटात स्वप्नमयी नगरी निर्माण केली जाते. वास्तवतेवर पांघरूण टाकून अवास्तवतेचे इमले चढविले जातात. प्रेक्षकाला अतिरिक्त भावनांनी लडबडलेल्या अशा वेगळी दुनियेत नेलं जातं. प्रेक्षक सुखावतो, आणि निर्मात्याचा फायदा होतो.

प्रवाहपतित आणि अपरिपक्व प्रेक्षकांसाठी – बहुसंख्य प्रेक्षक याच प्रकारचे असतात – दोन भावांतील अकृत्रिम प्रेमाच्या कथेऐवजी त्यांच्यातील तीव्र द्वेषच पडद्यावर दाखविला जातो. सोज्वळ प्रीतीपेक्षा वासनेवर अधिष्ठित अशा खोट्या प्रणयावर भर दिला जातो. विध्वंसक कृत्यांचं व गुन्हेगारीचं चित्रण केलं जातं. अभिनय, नृत्य, संगीत या अभिजात व विशाल कलांचा उपयोग उथळपणे केला जातो. प्रणयाची रंगपंचमी, डोळे फिरविणाऱ्या मादक नृत्यांची खैरात व अवास्तव झगझगाट प्रेक्षकांसमोर उभा केला जातो.

अशा प्रकारच्या बहुसंख्य बाजारी चित्रपटांचा परिणाम समाजावर काय होतो, याचा विचार निर्माते करीत बसत नाहीत. दुर्दैवानं चित्रपट मिटक्या मारीत पाहणारे प्रेक्षकही तो करीत नाहीत. मग अशा स्थितीत हा लोंढा तसाच चालू राहतो, यात नवल नाही. याची सर्व जबाबदारी निर्माते व प्रेक्षक या दोघांवरच पडते. केवळ सेन्सॉर बोर्डाच्या हातात नैतिक जबाबदारीच्या किल्ल्या सोपविल्या की झालं, असं समजणं चुकीचं आहे. सेन्सॉर बोर्डाच्या किंवा तत्सम कोणत्याही सरकारी वा निमसरकारी बंधनाच्या कार्यालाही मर्यादा आहे. नैतिकतेची अशी कोणतीही कात्री अस्तित्वात नाही की ज्यायोगे घातुक गोष्टी विनयास छाटून टाकता येतील. सेन्सॉर बोर्डाच्या चौकटीत चपखलपणानं बसूनही घातुक चित्रपट कसा तयार करता येतो, याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आजचे देशी, विदेशी गुन्हेगारी चित्रपट. 'गुन्हेगारी अंती फलदायी ठरत नाही' हे शाश्वत तत्त्व जरी त्यात सेन्सॉर बोर्डाच्या समजुतीसाठी गोवलेलं असलं, तरी त्याचा कृत्रिमपणा तेव्हाच उघड्यावर पडतो. गुन्हेगारीच्या भावना गोंडस स्वरूपात प्रदर्शित केल्या जातात, गुन्हेगारीचं समर्थन केलं जातं. काही अपवादात्मक प्रसंगी गुन्हेगारी समर्थनीय असेलही; पण चित्रपटासारख्या प्रभावी माध्यमातून केलेलं गुन्हेगारीचं समर्थन हे केव्हाही असमर्थनीयच ठरतं, पण सेन्सॉर बोर्ड त्याचा परिहार करू शकत नाही.

आणि म्हणूनच प्रत्येक निर्मात्यानं आत्मसंशोधन करण्याची वेळ आली आहे. त्यांच्या चित्रपटात माणसामाणसातील तेढीचं, दुष्टाव्याचं चित्र दिसण्याऐवजी प्रेमाचं व सामाजिक दुव्याचं चित्र दिसलं पाहिजे. एकांगी प्रणयापेक्षा सर्वंकष प्रेमाचं दर्शन घडलं पाहिजे. रूढीला विरोध दाखवताना श्रद्धेला धोका पोहोचविता कामा नये. चित्रपटातील अनेक दृष्टांतांमुळे माणसाची कोणावरच, कशावरच श्रद्धा राहिलेली नाही. 'देव म्हणजे दगड', 'धर्म म्हणजे अफूची गोळी' असे विचार प्रसवून फोफावले आहेत. तर मग श्रद्धा हा शब्दच कशाला उपयोगात आणला जातो ? आजच्या विचारमंथनातूनच उद्याची जीवनमूल्ये तयार होत असतात. माणसाच्या विकृत भावनांचं प्रदर्शन समर्थक स्वरूपात होऊ लागलं तर उद्याचं सामाजिक जीवनच उद्ध्वस्त झाल्याखेरीज राहणार नाही. मुलांच्या तसंच सामान्य प्रेक्षकांच्या अपरिपक्व बुद्धीवर होणारा आज तात्कालिक वाटणारा परिणाम पुढे शाश्वत बनतो, व त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोणच बदलून जातो. चित्रपटनिर्माते हे जरी सामाजिक नीतिमत्तेचे ठेकेदार नसले, तरी त्यांच्या चित्रपटांचा होणारा परिणाम लक्षात घेऊन त्यांनीही जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. प्रेक्षक हा दुबळा असतो. आणि म्हणूनच चित्रपट हा व्यवसाय असं मान्य करूनदेखील प्रेक्षकांच्या अभिरुचीचा त्यानं फार उदो उदो करू नये. निर्मात्यांनी मनांत आणलं, तर ते प्रेक्षकांच्या अभिरुचीला चांगलं वळण लावू शकतील.

मात्र हेही खरं की, निर्मात्याइतकाच विचार प्रेक्षकांनीही करायला हवा. कोणता चित्रपट आपल्या पदरात काय टाकतो, याचा थोडाफार विचार त्यांनी केलाच पाहिजे. मनावर व बुद्धीवर थोडं नियंत्रण ठेवून धोकादायक चित्रपटांपासून चार हात दूर राहण्याची खबरदारी त्यांनी घ्यायला हवी. असं झालं, तर ते हा घातुक लोंढा थोपवू शकतील. वेगळ्या अर्थानं सांगायचं झालं, तर त्यांनी आपली रसग्रहणाची शक्ती वाढविली पाहिजे. अशिक्षितांना ते जरा कठीण वाटेल; पण सुशिक्षितांनी तरी एवढे मनावर घ्यायलाच हवे.

आजचे प्रगत मानवी जीवन आणखी प्रगत करण्याचं एक हुकमी साधन जे चित्रपट, तेच मानवी संस्कृतीला, मनाच्या नैतिक अधिष्ठानाला सहजपणे पोखरत आहे, सुरुंग लावत आहे. ही पडझड थांबविण्यासाठी खरी गरज आहे ती सुबुद्ध निर्मात्यांची व सुजाण प्रेक्षकांची !



# बंधन


**आनंद हर्डीकर**
प्रथम वर्ष साहित्य


१९६५–६६ च्या आंतरमहाविद्यालयीन युवकमहोत्सवात पारितोषिक मिळविलेली एकांकिका

*खोलीत एका बाजूला एक कॉट असून आजूबाजूला २–३ खुर्च्या आहेत. या बाजूच्या कोपऱ्यात दार आहे. दुसऱ्या बाजूला एक टेबल असून त्यावर बरीच पुस्तकं लावून ठेवलेली आहेत. बाजूलाच एक बैठक असून तीवर सतार ठेवली आहे. भिंतीवर एक सुंदर निसर्गचित्र आहे, त्याच्या एका बाजूला सुभाषबाबूंचा नि दुसऱ्या बाजूला रामकृष्ण परमहंसांचा मोठा फोटो आहे.*

*पडदा वर जातो, तेव्हा सुरेल संगीताचे स्वर ऐकू येतात. सकाळचे कोवळे सूर्यकिरण खिडकीतून खोलीच्या मध्यापर्यंत आत आलेले असतात. थोड्या वेळानं 'निनाद' केस पुशीत, एखादी चीज गुणगुणत आत येतो. संगीतातला चांगलाच दर्दी वाटतो. बैठकीवरची सतार उचलून कोपऱ्यात नीट ठेवतो. तिपाईवरच्या पुष्पपात्रात ताजी फुलं ठेवतो नि मग टेबलाजवळच्या खुर्चीवर बसून लिहू लागतो.*

**निनाद :** ( *पत्र लिहिता लिहिता* ) आज किती दिवसांनी पत्र लिहितोय माईला ! जवळजवळ ६ महिने झाले. संक्रांतीच्या वेळी पाठवलं होतं त्यावर पाठवलंच नाही. म्हणूनच काल मला राखी पाठवली नाही तिनं. नाहीतर नारळीपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पोचेल अशा बेतानं राखी पाठवायला विसरली नाही आजपर्यंत कधी ती. आता एक मोठं लांबलचक पत्र पाठवून राग काढायलाच हवा तिचा. लिहायला हवं... ( *दारावर टकटक...* )...तुझ्या बंधुराजांनी फार मोठा पराक्रम गाजवला आहे. नि तो... ( *दारावर पुन्हा जोरात टकटक... 'कुणी आहे का घरात ?'...* ) कोण आहे रे ? मी काल संध्याकाळी सांगितलं होतं ना की मला...( *दार उघडतो.* )

**गायत्री :** त्रास देऊ नका म्हणून, होय ना ? पण मी ऐकलं नाही ते. अन आले त्रास द्यायला. जाऊ का परत ?

**निनाद :** नाही, नाही. अहो, आपल्याला नाही मी म्हटलं. माझे मित्र आहेत ना हो, तसे – फार चांगले आहेत सगळे, पण मला खोलीत कधी राहूनच देत नाहीत. अभ्यास नाही करायचा, रियाझ नाही, काही काही नाही. फक्त त्यांच्याबरोबर भटकायचं, गप्पा मारायच्या. ( *एकदम लक्षात येऊन* ) आय ॲम सॉरी. माझ्या लक्षातच नाही. तुम्हाला – म्हणजे आपणाला आत बोलवायचं. या ना या. आज पहिल्यांदाच येता आहात. तसं मी आपल्याला बऱ्याच वेळा पाहिलंय कॉलेजमध्ये – ग्राउंडवर, सभांतून. पण खरं सांगू, आपलं नाव ? – नाव नाही माहीत मला.

**गायत्री :** गायत्री...

**निनाद :** किती सुंदर नाव ! किती पवित्र ! गायत्री... बरं, आज इकडे कसं काय येणं केलंत ?

**गायत्री :** आहे, तसंच फार महत्त्वाचं काम आहे तुमच्याकडे. पण मला असं सांगा, तुम्ही काय करीत होतात ?

**निनाद :** मी...मी...

**गायत्री :** हो, हो तुम्हीच. एवढे कशात दंग झाला होतात ? मी किती वेळा दारावर टकटक केली – लक्षच नव्हतं तुमचं.

**निनाद :** हं, हं...पत्र लिहीत होतो...माईला, माझ्या बहिणीला. कोल्हापूरला असते ती.

**गायत्री :** म्हणजे तुम्हाला बहीण आहे ? मी तर ऐकलं होतं...

**निनाद :** काय ऐकलं होतंत ?

**गायत्री :** की तुम्ही एकुलते एक आहात म्हणून...

**निनाद :** तसं बरोबरच आहे ते. खरं म्हणजे मी एकुलता एकच. सख्खं भावंड मला नाहीच. मीच माझ्या आई-वडलांचा पहिला मुलगा. पण मी दोन वर्षांचा होतो

तेव्हाच आई मला सोडून गेली. त्या माउलीच्या रूपाची पुसटशी आठवणही नाही मला. दहा वर्षांचा होतो तेव्हा वडील गेले. नंतर काकांकडे होतो. तेही तीन वर्षांपूर्वी वारले. आता मी अगदी एकटा आहे तसा.

**गायत्री :** मग या माई कोण ? तुमच्या लांबलांबच्या...

**निनाद :** नाही, नाही. माई माझी मानलेली बहीण. अथांग सागरात लाकडाचे दोन ओंडके एकत्र येतात ना, तसेच आम्ही दोघे एकत्र आलो...कोल्हापूरला रहात होतो ना मी काही वर्षे, तेव्हा. परमेश्वराजवळ एवढंच मागणं आहे माझं, माईचं प्रेम मला कायम मिळो, तिचा आशीर्वाद माझ्या पाठीशी सदैव राहो.

**गायत्री :** का नाही मिळणार तुम्हाला त्यांचं प्रेम, त्यांचा आशीर्वाद ? तुमच्यासारखा भाऊ मिळाला याचा त्यांनाही अभिमान वाटत असेल, खात्री आहे माझी. तुमच्यासारखा हुशार, सुस्वभावी भाऊ कुणालाही हवासाच वाटेल.

**निनाद :** अहो, असं काय आहे माझ्यात ? एक बिंदूही मिळवू शकलो नाही मी अजून. फार मिळवायचं आहे अजून, फार साठवायचं आहे मला.

**गायत्री :** पण तुम्ही जे काही मिळवलं आहे, तेच सामान्यांच्या दृष्टीनं बरंच मोठं आहे, वाखाणण्याजोगं आहे. मला तर हेवा वाटतो तुमचा. एवढ्याशा वयात एवढं ज्ञान तुम्ही मिळवलंत कसं ? मला सांगाल ? तुमच्या पाठोपाठ त्या ज्ञानपथावरून...

**निनाद :** मी ? अहो, त्या मार्गावर मी स्वतःच अजून चालायला सुरवात केली नाही, तर दुसऱ्या कुणाला कसं नेणार मी ? पण मला असं मात्र वाटतं निश्चित, त्या अथांग ज्ञानसागरात अखंड पोहत रहावं. साऱ्या जीवनभर अखंड तपश्चर्या करावी. अखंड ज्ञानसाधना. मी ब्राम्हण आहे. थोर ज्ञानवृद्ध ऋत्विजांचा अभिमानी वंशज ! ते ज्ञानार्जनाचं असिधाराव्रत मला घ्यायचं आहे, मानव्याधिष्ठित, ज्ञाननिष्ठ, विश्वधर्माचं यशोगीत, सप्तस्वरांतून गायचं आहे मला. पण...पण अजून रियाझ व्हायचा आहे,... सूर जुळावयाचे आहेत ... धून सापडायची आहे !...

**गायत्री :** माझी खात्री आहे की एक दिवस तुम्ही ते यशोगीत निश्चित गाल. निनाद, तुम्हीच त्या विश्वधर्माचा जयनिनाद व्हाल. माईच्या आशीर्वादानं, तुमच्या प्रयत्नानं, माझ्या सदिच्छेनं... ( *पोस्टमन एक पत्र टाकतो.* ) बघा, कुणाचं पत्र आहे ते !

**निनाद :** ( *पत्रावरचं अक्षर बघून* ) कुणाचं काही कळत नाही. थांबा, उघडतोच हं ! ( *पत्र उघडून सही वाचतो* ) गोविंद आपटे ? म्हणजे माझ्या माईचे यजमान, त्यांचं पत्र आहे. आज पहिल्यांदाच लिहिताहेत पत्र मला. त्यांना माईचं नि माझं नातं फारसं पसंत नाही असं दिसतं. बोलून नाही दाखवलं त्यांनी मला तसं; पण मी ओळखलं...बरं. काय म्हणताहेत ते तर बघू...(*पत्र वाचतो...काही वेळानंतर तोंडावर दुःखाची छाया. शेवटी एकदम 'माई' म्हणून किंकाळी फोडतो.* ) माई ! का का ग मला सोडून गेलीस ? – मी पत्र नाही पाठवलं म्हणून रागावलीस होय ? – मी तुला आज पत्र पाठवणारच होतो – खरं, अगदी खरं...तुझ्या शपथ...माई, मी तुला माझी प्रगती सांगणार होतो – नाशिकच्या वक्तृत्वस्पर्धेतला सुवर्णकरंडक दाखवणार होतो. हुतुतूचा सामना जिंकताना झालेली जखम अभिमानाचं बिरूद म्हणून...आता कुणाला दाखवू मी हे सारं ? कुणाजवळ बोलू आता ? माई, तूच माझी आई होतीस ... तू गेलीस ... आता कोण मला जवळ घेईल ? ... कोण मला आशीर्वाद देईल ? ... ( *भ्रमिष्टासारखं* ) मी तुझ्याकडे येणार होतोच, तू दूर निघून गेलीस... हरकत नाही, मी तुझा पाठलाग करीन ... तूच म्हणायचीस ना – आपलं नातं अभंग आहे, अतूट आहे म्हणून ? ... मग आता मी बरा तुला सोडीन ... मीही येतो तुझ्याबरोबर ... परमेश्वराकडे ... हो...थांब जरा !

**गायत्री :** निनाद, असं काय करता ?

**निनाद :** माझी माई गेली ! मी आज पोरका झालो हो ! ! आता फक्त मृत्यूच माझ्यावर प्रेम करू शकेल. होय, मृत्यू !

**गायत्री :** निनाद, असं का म्हणता; मी तुमच्यावर प्रेम करीन. करीन नव्हे, करते आहे. माई गेली, पण मी आहे ना. तिच्या जागी तुम्ही मला माना. ती तुमची मोठी बहीण होती. ही धाकटी बहीण. ती आशीर्वाद देणारी होती. ही सदिच्छा व्यक्त करणारी नि आशीर्वाद मागणारी. पण निनाद, असं काहीतरीच वेडंवाकडं बोलायचं नाही हं ! मृत्यूचं नावही काढायचं नाही. आपली माई गेली,

With best

compliments from :

M/s. Nichrome Metal Works

46, Wellesley Road,
Sangam, Poona 1

MAKERS OF STEEL STRUCTURES, STEEL WINDOWS,
ROLLING SHUTTERS, CHEMICAL VESSELS ETC.

LEARN
the banking habit,
with

THE
BANK OF
MAHARASHTRA LTD.

-: Regd. Office :-
1177 Budhwar Peth, Poona 2

Your Bank

with the personal touch,
At your service, for years to come.

पण मी इथं आहे ना. खरं म्हणजे मी तुला राखी बांधायलाच आले होते निनाद ... ही बघ ...

**निनाद :** नको, नको. मी अपशकुनी आहे. माझ्याशी नातं जोडणारं कुठलंच माणूस परमेश्वर माझ्याजवळ ठेवत नाही – आई-बाबा-काका-माई नि आता तुम्ही ... नको, नको. माझ्यासारख्याची बहीण होण्यापेक्षा –

**गायत्री :** असं म्हणू नकोस, निनाद. मी आज फार मोठ्या आशेनं तुझ्याकडं आले आहे. रेशमाच्या राखीनं आपण आपलं हे परमपवित्र नातं निर्माण करू या. तुझ्या दीपाबरोबरच माझीही पणती – मिणमिणती का होईना, पण – जळू दे.

**निनाद :** नको, नको.

**गायत्री :** निनाद, मलाही भाऊ नाही. मीही प्रेमाची भुकेली आहे. फार वर्षांपूर्वी एका बहिणीनं भिन्नधर्मीय भावाला राखी पाठविली होती. त्या दोघांचं प्रेम इतिहासपुरुषानं अमर केलं. त्या अमर प्रेमाला साक्षी ठेवून आपणही आज या पवित्र नात्याच्या बंधनानं बद्ध होऊ या. या भ्रातृहीन गायत्रीला नाही का बहीण मानणार ? ( *निनाद स्तब्धच आहे.* ) तुझी नेत्रदीपक प्रगती दुरून पाहूनच आजपर्यंत मी समाधान मानलं. एका सामान्य मुलीला वाटणारं ते समाधान तुला अज्ञातच राहिलं. पण ती मुलगी तुझ्यासमोर आल्यावरसुद्धा तू तिला, तिच्या प्रेमाला, या रेशमी धाग्याला झिडकारणार आहेस का ? एका अभद्र कल्पनेपायी ? नको – असं नको करू रे... ( *तरीही निनाद बोलत नाही.* ) बरं. मी जाते परत. मी भाऊ शोधायला आले होते. तुझ्यात तो नाही सापडला. तुला तर काय, बहीण नकोच आहे ... निनाद, जाऊ मी परत ?

**निनाद :** नको. गायत्रीताई, बांध ती राखी माझ्या मनगटावर. आकाशस्थ माईला साक्षी ठेवून आज मी तुझ्या पावित्र्याशी नातं जोडतो आहे. तुला आपली धाकटी बहीण मानतो आहे. माई, मृत्यूपासून मी तुझं रक्षण करू शकलो नाही. पण आता निदान माझ्या मनगटात एवढं तरी सामर्थ्य दे, की मी या माझ्या धाकट्या बहिणीचं साऱ्या संकटांपासून रक्षण करू शकेन.

**गायत्री :** बरं. मी आता जाते परत. बराच वेळ झाला आहे. निनाद, खरोखर आज मी धन्य झाले. कृतार्थ झालं माझं जीवन.

**निनाद :** जातेस ? बरं. पण लौकर परत ये हं. खूप खूप बोलायचंय मला तुझ्याशी.

**गायत्री :** बरं, येईन हं लौकरच !

*त्या घटनेला सुमारे पाच वर्षे लोटली आहेत. टेबलावरची पुस्तकं बदलली आहेत. टेबलाशेजारीच एक पुस्तकांचं कपाट आलं आहे. बाकी सारं तसंच.*

**गायत्री :** ( *बाहेरून* ) निनाद, आहेस का रे ?

**निनाद :** हो, ये ना आत. ( *गायत्री आत येते.* ) काय म्हणतेस ताई ? बरी आहेस ना ?

**गायत्री :** निनाद, आज फार मोठ्या अडचणीत सापडली आहे तुझी ताई. ज्या वृक्षाला बिलगून माझ्या आयुष्याची लता उभी राहणार होती, तो वृक्षच मुळी दैवाच्या झंझावाती वादळात माझ्यापासून कायमचा दूर गेला आहे. काय करू नि कुठं जाऊ, काही सुचत नाही मला.

**निनाद :** ताई, शांत हो बरं. मला सारं कसं नीट सांग बघू. एवढं अचानक असं काय झालं ?

**गायत्री :** निनाद, एक प्रश्न विचारते. प्रियकर-प्रेयसीच्या प्रेमाला कशाची उपमा द्यावी रे ?

**निनाद :** का ग ?

**गायत्री :** नाही, सांग ना.

**निनाद :** बरेच लोक त्या प्रेमाला मद्याची उपमा देतात. त्यांच्या मते प्रेम धुंद करणारं आहे, नशा आणणारं आहे. पण मला नाही आवडत ही उपमा.

**गायत्री :** मग तुला काय वाटतं ते सांग ना.

**निनाद :** मला वाटतं, प्रेम ही एक सरिता आहे. तिरीचे पादप पोसणारी, जनांचे पाप-ताप क्षालन करणारी, जीवनदायिनी, प्रवाही सरिता. आयुष्याच्या पात्रातून अद्वैताच्या सागराला नेऊन मिळवणारी सरिता.

**गायत्री :** नाही निनाद, प्रेम हे एक कोळ्याचं जाळं आहे. प्रेम करताना दुसरं काही कळत नाही. प्रेम केल्यावर कळतं, आपण काहीच केलं नाही – आपल्याजवळ प्रेमही राहिलं नाही, आपला जीवही राहणार नाही. मी आज त्या विफल प्रीतीचं दुःख उरी घेऊन आले आहे निनाद.

**निनाद :** विफल प्रीती ? तू कुणावर प्रेम केलं होतंस गायत्री ? मला कधी सांगितलं नाहीस तू !

**गायत्री :** त्या प्रीतीला प्रथम निश्चिती नव्हती. निश्चिती आल्यासारखी वाटली तेव्हा लाजेखातर म्हणून सांगितलं नाही. आज सांगते आहे, साऱ्या जीवनाचं

वैराण वाळवंट झाल्यावर. तुझ्या मदतीच्या ओयासीसकडे नजर ठेवून.

**निनाद :** सांग ना गायत्री. तुझ्यासाठी मी काय वाटेल ते करायला तयार आहे. कुणावर प्रेम केलं होतंस तू ? त्यानं तुला का झिडकारलं ? सांग. लवकर सांग.

**गायत्री :** तो दिलीप सहस्रबुद्धे माहीत आहे का तुला ?

**निनाद :** हो, माझ्यामागे एक वर्ष होता तोच ना ? बरं, त्याच्यावर तू प्रेम करीत होतीस ?

**गायत्री :** हो निनाद, त्याच्यावर मी अगदी प्राणांपलिकडे प्रेम केलं. तू नेहमी मला सांगायचास, त्याग ही प्रेमाची शिदोरी आहे.

**निनाद :** आपली संस्कृती असंच सांगते, त्याग ही प्रेमाची शिदोरी आहे.

**गायत्री :** मी त्याच्यासाठी सर्वस्व द्यायला तयार होते. तो मला म्हणायचा, 'गायत्री, तू माझी आहेस, मी तुझा आहे. आपण एक सुंदर घरकुल बनवू. त्यात तू, मी नि आपली मुलं अगदी आनंदात राहू.' त्याच्या रुबाबदारपणावर, त्याच्या स्वप्नाळू बोलण्यावर मी फार भाळले. त्याच्याबरोबर मनसोक्त, तो म्हणेल तशी, स्वच्छंदीपणानं भटकले. तासन्तास त्याच्याशी गप्पा मारल्या ... दीड महिन्यापूर्वी तो कानपूरला सामन्यासाठी गेला ना, तेव्हाही त्याला ऊबदार स्वेटर करून दिला. तो माझ्याकडे बघून त्या वेळी विचित्र हसला का, ते मला त्या वेळी कळलं नाही. आज कळतं आहे. कालच दुपारी कॉलेजच्या पत्त्यावर त्याचं पत्र आलं मला. मी काल दोनदा येऊन गेले संध्याकाळी तुझ्याकडे. तू नव्हतास.

**निनाद :** बरं, बरं. त्या पत्रात असं काय होतं ते तर मला सांगशील की नाही ?

**गायत्री :** कसं सांगू निनाद ? त्यानं लिहिलंय, त्यानं लिहिलंय की त्याचं लग्न झालं आहे. सामने आटपून घरी गेला नि वडलांनी ताबडतोब ठरवलं. जमीनदाराची मुलगी आहे म्हणे. मला सारं विसरायला सांगितलंन आहे त्यानं. यंदा परीक्षेलाही बसणार नाही स्वारी.

**निनाद :** ताई, त्याचा पत्ता दे बघू मला. जातो त्याच्या गावी नि विचारतो जाब. असं करायचं होतं तर माझ्या गायत्रीशी ते प्रेमाचे खेळ का म्हणून खेळलास ?

**गायत्री :** निनाद, काही उपयोग नाही आता. जे व्हायचं ते सारं होऊन गेलं आहे. तिथं जाऊन आपलीच बेअब्रू व्हायची. आता त्या बिचाऱ्या मुलीच्या मनाला तरी यातना नकोत.

**निनाद :** मग काय ? जा विसरून, त्याच्यावर प्रेम केलं होतंस म्हणून, म्हणजे मिटेल सारा कारभार !

**गायत्री :** ते विसरता आलं असतं तर फार बरं झालं असतं. पण त्या विफल प्रेमाचा एक डाग आहे माझ्या शरीरावर ! त्या प्रेमाची निशाणी... मी केलेल्या सर्वस्वाच्या त्यागाचं प्रतीक ! कसं विसरूं मी ?

**निनाद :** डाग ? निशाणी ?

**गायत्री :** निनाद, कसं सांगू तुला ? दीड महिन्यापूर्वी तो गेला, त्याअगोदर दोन दिवस आम्ही खूप भटकलो आणि एकदा त्याने माझ्याकडे एक मागणी केली. मी प्रथम नकार दिला. पण नंतर त्यानं पुन्हा पुन्हा आळवलं. मी मोहाला बळी पडले. त्याला मन कधीच दिलं होतं. त्या दिवशी माझं शरीरसुद्धा मी त्याच्या स्वाधीन केलं. फार मोठी चूक झाली माझी.

**निनाद :** ताई !

**गायत्री :** स्त्रीजातीला लाभलेलं ते वरदान माझ्या बाबतीत शाप ठरू पाहतं आहे. मी आईबाबांना सांगितलं नाही. सांगू तरी कशी मी ? त्यांना हे कळलं तर क्षणभरसुद्धा घरात ठेवणार नाहीत मला. मैत्रिणी तर मदत न करता फिदीफिदी हसतील. केवळ तूच एकटा आता या सैरावैरा धावणाऱ्या हरिणीला मदत करू शकशील.

**निनाद :** नाही गायत्री, तू अशी चूक केली आहेस, की जी सुधारणं मला शक्य नाही. तू असं पाप केलं आहेस की ज्याचं प्रायश्चित्त मी घेऊ शकणार नाही. गायत्री ! एवढी कशी ग घसरलीस ! पापाच्या खोल गर्तेत रुतली आहेस तू ! समाजाच्या वखवखलेल्या डोळ्यांना नि वळवळणाऱ्या जिभेला खाद्य पुरवलं आहेस तू ! ... मी तरी तुला कसं वाचवणार ? आता तुझ्या कुकर्मांची फळं भोगायला तयार राहिलंच पाहिजे तुला ... प्रेम केलंस ते मला न सांगता ; गुन्हा केलास तोही माझ्या नकळत; आणि आता मात्र माझ्याकडे मदतीसाठी आलीस होय ? जा गायत्री, हा तुझा दुर्दैवी भाऊ तुला यात काही मदत करू शकत नाही. जा तू. (*अस्वस्थपणे येरझाऱ्या.*)

**गायत्री :** असं नको रे म्हणूस निनाद. आयुष्यात मी एकदाच चूक केली. त्या चुकीबद्दल एवढं मोठं शासन

करू नकोस मला.

**निनाद :** नाही गायत्री, तुला मी मदत करू शकेन असं मला नाही वाटत.

**गायत्री :** निनाद, माझ्यासाठी नाही तरी निदान उद्या जन्माला येणाऱ्या त्या निष्पाप जिवासाठी तरी !

**निनाद :** त्या येणाऱ्या बालकाचं नाव काढलंस अं ! बरं, त्या येणाऱ्याच्या माथ्यावर कलंकाची कट्यार कुणी मारू नये म्हणून मला काहीतरी केलंच पाहिजे. पतित बहिणीसाठी नव्हे, तर निरागस, निष्पाप भाच्यासाठी ! ( *थोडा विचार.* ) गायत्री, मला एकच मार्ग दिसतो आहे. मी स्वत: दिलीपला जाऊन भेटतो.

**गायत्री :** ( *हुंदका देत* ) निनाद– !

*निनाद जातो. गायत्री तो गेला त्या दिशेकडे हताश नजरेनं पाहते.*

*स्थळ तेच, सारं काही तसंच. संध्याकाळ उलटून गेली आहे. रातकिड्यांच्या किर्र आवाजामुळं वातावरण भेसूर बनलं आहे. मधेच दूरवरून कुत्र्यांचं भांडण ऐकू येत आहे. गायत्री हताश मनानं येरझाऱ्या घालते आहे.*

**गायत्री :** निनाद अजून परत आला नाही. काय झालं असेल ? दिलीप त्याला बोलला असेल, दोघांचं भांडणही झालं असेल. नाही तर होणार तरी काय दुसरं ? ( *निनादचं* ' गायत्री, तू अशी चूक केली आहेस......आता माझ्याकडे मदतीसाठी आलीस होय ? ' *हे बोलणं आठवतं* ) खरंच, मी किती पापी आहे ? मी केलेलं पाप निस्तरणं निनादला किती कठीण जाईल, मला ठाऊक का नाही ?...माझ्या पापाचं प्रायश्चित्त मीच घेतलं पाहिजे. कोणतं प्रायश्चित्त ? आत्महत्त्या ? होय, दिलीप नकार देणार ही तर दगडावरची रेघ आहे, मग एक पतिता म्हणून आयुष्य कंठण्यापेक्षा मेलेलंच काय वाईट ? उद्या जन्माला येणाऱ्या अर्भकाला समाजटीकेचा बळी बनवण्यापेक्षा आज जन्म देण्यापूर्वीच मारून टाकलेलं काय वाईट ?...होय, मला आत्महत्त्याच केली पाहिजे...( *दुसरा विचार मधेच प्रभावी होतो.* ) पण येणाऱ्या अर्भकाची हत्या करून आजवरच्या पातकात भर टाकणं चांगलं होईल का ? आणि मी आत्महत्त्या केली तर निनादला काय वाटेल ? माझ्याशिवाय दुसरं मायेचं माणूस त्याला नाही. त्याच्यावर प्रेम करण्यासाठी ना मी त्याला राखी बांधली होती ? निनाद जर माझ्यासाठी सारं काही करायला तयार असतो तर मी नको का काही त्याच्यासाठी त्याग करायला ? ... हो, मला त्याच्यासाठी जगायलाच हवं. सारी बेअब्रू, कष्ट, यातना सहन करून ... ( *पुन्हा पहिला विचार प्रभावी होतो.* ) पण निनादला माझ्यासारख्या पातकी बहिणींची काय गरज ? त्या येणाऱ्या बालकाला आयुष्यभर दुःख देण्यापेक्षा जन्म न दिलेलाच बरा. नाही गायत्री, तू जिवंत राहता कामा नये. तुला आत्महत्त्याच केली पाहिजे. ( *माईंच्या फोटोजवळ जाते, नमस्कार करते.* ) माई, तुमच्या निनादला मी सांभाळणार होते. पण माझाच पाय घसरला. मी त्याला आधार देऊ शकले नाही. आता मी माझ्या पापाचं प्रायश्चित्त भोगायला नरकात जाते आहे. पण माझा पुनर्जन्मावर विश्वास आहे. पुढल्या जन्मी माई, तुम्ही, मी नि निनाद, एकाच मातेची लेकरं म्हणून जन्म घेऊ नि आपली प्रेम करण्याची अतृप्त राहिलेली हौस भागवून घेऊ.

*( खुर्चीवर बसते. बरोबर आणलेली विषाची कुपी पिते. दाराकडे डोळे लावून बसते. थोड्या वेळानं निनाद दारातून आत येतो. त्याच वेळी गायत्री मान टाकते. त्याला ती बसली आहे असं वाटतं. )*

**निनाद :** गायत्री, गायत्री, गायत्री, निराश होऊ नकोस. ( *तिच्याजवळ जातो. काहीच हालचाल नाही म्हणून गायत्रीच्या अंगाला हात लावतो. अंग थंडगार पडलेलं असतं.* ) म्हणजे गायत्री, तूही मला सोडून गेलीस. माझ्यावर माया करणारं कुठलंच माणूस माझ्याजवळ का बरं रहात नाही ? हाय दैवा, जर असं दुःख मला द्यायचं होतं तर मला जन्मच कशाला दिलास ? निष्प्रेम, एकाकी जीवनाच्या बंधनात तरी गुरफटून कशाला ठेवलं आहेस ?

स. प. महाविद्यालयाच्या
सुवर्णमहोत्सवानिमित्त
-: अभिनंदन :-
शाळा, कॉलेज इत्यादींकरिता
लाकडी किंवा मेटलची अक्षरे,
स्प्रे-पेंटिंग व ग्रंथालयाकरिता
बुक लेबल्स्, कॅटलॉग कार्डस्
इत्यादींसाठी.

**भारत आर्ट वर्क्स्**

७८३ सदाशिव पेठ, पुणे २

☆

टेलिफोन : ५४६०८

हार्दिक
अभिनंदन

☆

**इमानी व विक्रम इंजिनचे**

-: अधिकृत विक्रेते :-
मेसर्स : पूना मशिनरी एजन्सीज्
एल्. आय्. सी. बिल्डिंग,
संभाजी पुलाजवळ, पुणे २.

☆

स्थापना : सन १९०६ : दूरध्वनी : ५६२८३

**दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड**

लक्ष्मी पथ, पुणे २
कामाच्या वेळा : सकाळी ९-१५ ते ११-४५
सायंकाळी ५-१५ ते ६-४५
( शनिवारी फक्त सकाळी )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ३,४४,६४० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २,६७,००० |
| ठेवी | रु. २७,७१,००० |
| खेळते भांडवल | रु. ३६,३०,००० |

सभासदांना कर्जे मिळण्याची सोय आहे.
बँकिंगचे व कलेक्शनचे सर्व व्यवहार केले जातात.
-: अधिक माहितीसाठी समक्ष भेटावे :-
य. श्री. शाळिग्राम — कार्यवाह
द. ग. देव — कार्याध्यक्ष

स. प. महाविद्यालयाच्या
सुवर्णमहोत्सवास

शुभेच्छा

**शर्मा स्वीट मार्ट**

२३४ बुधवार पेठ, मंडई रस्ता
पुणे २.

फोन : ५७२३२



# पण का ?


**ना द शिंदे**
द्वितीय वर्ष शास्त्र


मनाला आज शांत वाटत नाहीय. एरव्ही बेटं कसं धीरगंभीर असायचं अगदी ...किती वेगळ्या रीतीतून जीवनभर वागलं आजपर्यंत अगदी...आकाशात एकाएकी मळभ यावं तसं आज एकाएकी एकाकी वाटायला लागलं आहे...एकाकी...हो एकाकीच...

आषाढ नुकताच सुरू झालाय...सकाळपासनंच पावसानं अंग धरलंय नुसतं... म्हणूनच की काय ?

माझ्या त्या छोट्याशा बंगल्यात मी एकटाच होतो ...समोर पसरलेली विस्तीर्ण बाग...मनाला कधी वाटलं नाही की हे छोटं आहे. निसर्गानंही मुक्त हस्तानं उधळण केली होती रंगाची, वासाची माझ्या बागेवर...मी त्याला कधीच रोखलं नाही...फक्त राखलं मात्र...तो जसा वाढला तसा मी त्याला वाढवला...अगदी मुलासारखा ....जिवापाड जीव लावला मी त्यावर...आज तो मला दिसत नाहीय...नजर जाईल तिथवर अगदी रोखून पाहतो आहे...पण बेटा...आज इतका मोठा झालाय ...अगदी मोठा...म्हणूनच...

की मीच छोटा झालो आज ?... माझं मलाच कळत नाहीय. तो मात्र माझ्याकडं पाहून हसतोय... कशाचं हसू होतं आज ?... माझा मुलगा तो...त्याला मी वाढवला... मोठा केला...आजवर त्यानं कधीच तोंड उघडलं नाही...मीच समजून घेत गेलो त्याला...त्याला काय हवं हे मला कधी त्याला सांगावं लागलं नाही...तोदेखील कधी बोलला नाही...सारा कसा मूक कारभार... पण त्यातही कसा आनंद होता !...

...पण आज तो मला का हसतोय ? काही समजत नाहीय...त्यानं माझी सारी रूपं पाहिली...रूपं...कधी बदललीच नाहीत तर ती रूपं कसली ?...सारं जीवन कसं एकाच रूपात सरलं.. कधी सरलं, समजलंही नाही... पण ते रूप यानं पाहिलं... अगदी छोटा होता तेव्हापासून मला पाहत आला... माझ्यामागचा तो, पण माझ्या नजरेत बसत नाहीय आज...

...पावसाचे थेंब पानापानावर आवाज करताहेत...संथपणानं तो झोडपतोय पानाफुलांना...त्याला त्यात आनंद वाटत असावा...पण त्याला दुःख नाही ... जणू याची तो वाट पाहून होता. कधी येतोय आणि...तरी मला तो हसतोय...

...की तो स्वतःशीच हसतोय ?...असेलही... कोणी सांगावं ?...आज मी असा आणि तो तसा...मला सुखात सुख, त्याला दुःखात दुःख नाही...त्याला त्याची जाणीव देखील नाही...पण मला होतेय ना ... माझं मन कसं हेलकावे खातंय...त्याला स्थिरता ती कशी नाहीच... मलादेखील शांतता नाही...एरव्हीची शांतता मला आज भयाण वाटते आहे...

...सकाळपासून अगदी एकटा आहे...दहा वाजत आले असावेत...अंग कसं आंबून गेलं आहे...अजून आंघोळीचा पत्ता नाहीय...

... समोर काही दिसतच नाहीय ... दहा हातावरचं दिसणं मुष्कील झालं आहे. तरी मी उगीचच निरखून पहात असतो...दिसेल तेवढं अजमावत असतो... उगीचच ...

... कोसळणाऱ्या धुवांधार सरी मनाला उगीचच चटका लावून जात असतात ... त्यांनाही एवढं कोसळायला काय झालं आहे ते मला समजत नसतं...

... पण त्यांनी माझं काम हलकं केलेलं असतं. आज त्या पडत नसत्या, तर एरव्हीसारखा मी कामाला लागलो असतो ... या वेळी कोणी ना कोणी आलं असतं त्याच्याबरोबर खाना झाला असता. हे सारं मीच केलं असतं ... मी यजमान ना !... मला मात्र कधीच कुणाचा पाहुणचार स्वीकारावा वाटत नसतो. म्हणून मी सहजासहजी कोणाकडं जायचाच नाही.

... आज ... आजच्या या सरी ... मी सहज नजर फिरवतो ... सगळीकडं तोच पसरलेला असतो ... त्याच्याच एका कोपऱ्यात पर्जन्यमापक यंत्र खडं असतं ... मला उगीचच वाटतं ... पाऊस मोजावा लागेल ...

आताच मोजावा का! ...छे .. आता कसं शक्य आहे? पाऊस थांबल्यावरच मोजायचा ...

... मी उठतो. ईझीचेअरमधून ... पाईपमधला तंबाखू संपलेला असतो .. मी तो झटकून साफ करतो... उगीच पुन्हा भरण्याची हुक्की येते ...

... धुराचे फवारे सोडताना मला उगीचच अस्वस्थ वाटत असतं. हलकेच मी थर्मामीटरकडं नजर टाकतो. तपमान चोवीसला टेकायला आलेलं असतं.

...तेव्हा मला कुठं हवेतला गारठा जाणवतो. जरासा उत्साहित झाल्यासारखा होऊन मी स्वेटरला हात घालतो ...तोच नजर एका कोपऱ्यावर स्थिरावते ... तिथं तू ... होय तूच लिहिलेलं असतंस 'उमाकडून.' मला जरी तो दिला तरी माझा उल्लेख त्यावर तू केलेला नसतो. जेव्हा तू मला तो दिलास, तेव्हा मला ते बरंच खटकलं होतं. मी तुझ्यावर कितीतरी रागावलेलो असतो. डोळ्यांत पाणी आणून सांगितलेला खुलासा मला पटला नव्हता. मी जणू पेटलो होतो... नजरेत विखार आणून मी तुझ्यावर नाही नाही ते आरोप केलेले असतात...

...मी असाच आहे शीघ्रकोपी ... माझ्या अंगात कोणी संचरलं होतं जणू...मला आता हसू येतं....

...स्वेटर अंगात घातल्यावर जरा हुषारी वाटतेय. मी जरा पुढं सरकतो ... हीटर चालू करतो. चहा प्यावासा वाटत असतो. मी आधण ठेवतो. कसला भयानक शॉक बसतो! ...भांडं हातातून पडलेलं असतं .. आतला कच्चा चहा इतस्ततः उडालेला असतो. मी बटण बंद करून पुन्हा आधण ठेवतो....

... तू मला सांगितलं होतंस ...वारंवार बजावून अगदी ...पण मी अगदी विसरून गेलो. आता ठेच लागली तेव्हा आठवण झाली ... असाच आहे मी... काही म्हणता काही लक्षात रहात नाही ... तुम्ही स्त्रिया कसं कोण जाणे एवढं सगळं लक्षात ठेवता!

...तुला मी विचारलं होतं...बोटावर पदर गुंडाळीत तू उत्तरली होतीस – " आहे आमचं एक गुपित..." मी काहीच बोललो नव्हतो पुढं.

...चहा मला कसा तो जमतच नाही. होस्टेलवर असताना कितीतरी चहा प्यायचो मी ...मला तरीसुद्धा चहा करताच आला नाही की ज्यामुळं तलफ भागेल...

...पण तुला मात्र ते चांगलं साधलं होतं. कितीतरी वेळा चहा प्यायलो. समाधानाच्या पुऱ्या कसोटीला तू तो उतरवलास. तुझं आपलं ठरलेलं मत. जर मी स्तुती केली,– 'झालाय आपला, योगायोग सारा ...'

... मला वाटतं, तुझा योगायोगावर फार विश्वास असावा. खूपच. कुठं बोलाफुलाला गाठ पडली की तुझा योगायोग आपला हिशोब मांडीतच पुढं यायचा.

... त्या तुझ्या भावनेला मी मात्र कधी हसू शकलो नाही. मला तुझं कौतुक करावं वाटायचं...मी केलंही होतं...अशा वेळी कोण लोभस दिसायचीस तू! मी तुझ्याकडं पहातच रहायचा नुसता ...

चहाचे घुटके घेत घेत पाईपही संपवतो आहे. चाळा म्हणून बूटही हलवतो आहे... कुठल्यातरी नसलेल्या तालासुरांत!

अशा वेळी तुझी मूर्ती मनासमोर उभी रहाते आहे. मधूनच मी तुला न्याहाळत आहे. अगदी कधी न बघितल्यासारखी मनाच्या अंतरंगातून एक हाक निघते आहे. साद दिल्यासारखं करून तू खुळ्यासारखी हसते आहेस. मी आणखी टवकारून पहातो आहे.

का कोण जाणे...अशा वेळेला, असा वरुण कोपल्यासारखा कोसळत असताना, माझ्या वेड्या मनाला वाटतं आहे... तू जवळ असायला हवीस... असायला हवीस.

चहा संपलेला असतो..पाईप पुन्हा एकदा विझलेला असतो... तुझ्या आठवणीला जरा संथपणा येतो ... नकळत तुझी मूर्ती नजरेआड सरकलेली आहे...

जरा उत्साह आल्यासारखं वाटतं मला. अंघोळ करावी असं फिरून एकदा वाटतं... कृतीला अजून हात घातलेला नसतो...

मी उठतो...अगदी अंग झाडून आळस घालवण्याचा प्रयत्न करतो. कळत-न-कळत पावलं केबीनकडं चालू लागतात. मीही त्याला आडवा येत नाही.

तिथं गेलं की अगदी प्रयोगशाळेची आठवण येते मला. मला अजून किंचित दचकल्यासारखं होतं, अजून जेव्हा माझं एक मन दुसऱ्या मनाला सांगतं –

" या दोन खणी खोलीतला एक माणूस शंभर एकर शेतीची व्यवस्था पाहतो...इतर कोणत्याही सजीवाची मदत न घेता..."

माझं एक भव्य स्वप्न पूर्ततेला गेलं आहे. ही प्रयोगशाळेसारखी भासणारी केबीन माझा जीव की प्राण आहे...

केवळ तुझ्यामुळं...उमा, तुझ्यामुळं...

. .. प्रयोगशाळा ...

. . ..तीच ती प्रयोगशाळा, तिथं तुला मी प्रथम पाहिलं . . .

. . . मला सतत जाणवत राहिलं . . . तूच मला पुढं नेलंस . . . माझ्या कल्पनांना भविष्यात न ठेवता वर्तमानात आणलंस. . . ते स्वप्नच होतं माझं. . .मला वाटत राहिलं होतं – कसं शक्य आहे एकट्याला मला हे सगळं ?....त्या स्वप्नाचा अवाढव्य आकार माझ्याच डोळ्यांत मावत नव्हता... मला तू मोठं केलंस... आयुष्याचा पाया जणू घातलास. . .

. . . पण तुला याचं काहीच वाटलं नाही... माझ्या कल्पनांना मूर्त स्वरूप आणावं म्हणून भांडलीस माझ्याशी . . . त्या वेळेचा तुझा तो लाल झालेला चेहरा मला अजून आठवतो. . . ती नजर. . . जणू तुला सांगायचं होतं. . . कल्पना सुचण्याला महत्त्व नाही. . . प्रत्यक्ष कृतीलाच महत्त्व. . . डोक्याला श्रम देऊन भागणार नाही, तर हातांनी काम केलं पाहिजे. . .

. . . मला थोडंसं पटलं होतं. . . मग मी गणितं सोडवण्यात मग्न झालो होतो . . . हजारो प्लॅन उलट सुलट फिरत होते डोक्यातून . . .

. . . मला हसू आलं होतं माझंच . . . जमीनदाराचा मुलगा मी . . . नॅरो बॉटम घालून कॉलेजमध्ये भटकायचं . . येणाऱ्या जाणाऱ्या मुली निरखून पाहता पाहता त्यांची टर उडवायची . . . एक मजेचं जीवन . . . पण मला कल्पना सुचत होत्या. त्यांना मला कधीच कागदावर उतरवावंसं वाटलं नव्हतं ... मग तिथून प्रत्यक्षात येणं तर किती दूर ... जमीनदार होणार होतो ... व्यवस्था बघणार होतो...आणि ..आणि शिक्षण घ्यायचं म्हणून घेणार होतो ... कसं विचित्र वाटतं आता ... पण तेव्हा काहीच वाटत नव्हतं ...

किती सहजपणे माझ्या जीवनात शिरलीस ... मला ते कधी कळलं नाही ... कळत - न - कळत माझ्यावर हुकमत गाजवायला सुरवात केली होतीस ...

... भेटीगाठीला सुरवात कधी, कुणी, कशी केली हेही कळलं नाही ...

... मीही बेटा तुझ्यामध्ये मला हरवून गेलो. मला त्याची जाणीवही झाली नाही . . . कितीतरी तू पुढाकार घेतलास . . . मी तुला कधीच अडवू शकलो नाही . . . उलट मीच वहावत गेलो . . .

. . . कळत - न - कळत माझ्या मनातल्या कल्पना मी तुला सांगितल्या होत्या. तेव्हा एक अशक्य स्वप्न म्हणून रचलं होतं सगळं . . .

. . . कसं स्वच्छपणे आठवतं एक एक. आता मला काहीही कमी वाटत नाही . . . केवळ तुझ्यामुळं . . . महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमातून आपण एकदाचे पसार झालो – चुकलो, तू फार चांगल्या रितीनं उत्तीर्ण झालीस आणि मी . . . मी आपला नेहमीसारखा बाहेर पडलो इतकंच.

परंतु तू एका शब्दानंही मला तुझ्या मोठेपणाची जाणीव दिली नाहीस.

आणि नंतर साऱ्याच गोष्टी किती अकल्पितपणे घडल्या ! मला अजूनही त्या स्वप्नासारख्या वाटतात !

बोहल्यावर तुझ्या समोर मी उभा होतो. भटया वेदेवाकडे अंतरपाट धरून मंत्र म्हणत होते आणि तुझ्या समोर मुंडावळ्या बांधलेला मी मीच आहे का जी संभ्रमात शेवटपर्यंत होतो.

आणि मग हळू हळू आपल्या जीवनाला तू कसा आकार दिलास ! किती व्यवस्थित गाठ मारलीस त्याची तू...एक विशिष्ट संथ जीवन, पण तितकंच शहरी, आधुनिक...किती सोशीकपणे केलंस तू...तुला जणू आवडच तशी होती...

...हे सारं केलंस तू...तू नसतीस तर काय घडलं असतं...ते त्या ब्रम्हदेवालाच ठाऊक ?

पण सारं घडवतांना तू कशी निर्विकार होतीस. सारं केलं, पण ते कुणासाठी केलं हे तुलाही सांगता आलं नाही. पण तुला जाणीव खासच होती त्याची...

पावसानं चांगलाच जोर धरला आहे बाहेर...किती कमी पावसाच्या प्रदेशात माझी शेती...पण यंदा जणू ओला दुष्काळ पडणार आहे....किती विक्षिप्त, नाही ?

....पण तुला निसर्गाला कधी आळवावं लागलंच नाही...पर्यायी मार्ग खूप मिळाले तुला...साहजिकच निसर्ग गौण न वाटला तुला, तर काय नवल ? पण तरी तुला तो आवडायचा. लहरी महंमदासारखा वागला, तरी तुला तो आवडायचा...प्रत्येक ऋतूचं तू तितक्याच उत्साहानं स्वागत केलंस...त्यातही तू कधीच माघार घेतली नाहीस...

.. पण मी या सकाळपासूनच्या पावसाला कंटाळलो आहे...सारीच कामं अशी रेंगाळत रेंगाळत चालू आहेत ...

.. केबीनमधनं बाहेर येता येता मी रेग्युलेटर फिरवतो...इंजिनचा स्पीड कमी करण्यासाठी .. काय जरूर आज त्याची ? ... असंच मन माझं .. सदा व्यवहारात गुंतलेलं .. पण तुला मात्र तसं कधीच वाटलं नाही .. सारा व्यवहार बाजूला ठेवून तू आपलं कार्य चालू ठेवायचीस ..

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड, सातारा

( रजिस्टर्ड ऑफिस : १४३-१४६, चिरमुले निकेतन, भवानी पेठ, सातारा )

स्थापना : १९३६ ] : : [ शेड्यूल्ड बँक

( महाराष्ट्र राज्यात एकूण २७ शाखा )

दि. ३०-६-१९६६ अखेर

वसूल भांडवल ... रु. बारा लाखांचे वर.

रिझर्व ... रु. आठ लाखांचे वर.

ठेवी वगैरे ... रु. साडेपाच कोटींचे वर.

आकर्षक व्याजाचे दराने ठेवी स्वीकारल्या जातात.

से. बँक : द. द. शे. ४% क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना.

—: मुदत-ठेवी :—

| १ वर्ष | २ वर्षे | ३ वर्षे | ५ वर्षे | ७ वर्षे | ९ वर्षे अगर अधिक. |
|---|---|---|---|---|---|
| रु. ६·२५ | रु. ६·५० | रु. ६·७५ | रु. ७·२५ | रु. ७·५० | रु. ७·६२ |

श्री. रा. ना. गोडबोले, ( चेअरमन )
B. A., B. Com., C. A. I. I. B.

श्री. सी. ह. जोशी, ( ज. मॅनेजर )
B. A., B. Com.

फोन : ५४८६१

# ○ दत्त डाईंग हाऊस ○

२५७ ड, बुधवार पेठ, आगीचे बंबासमोर, पुणे २.

गंजिफ्रॉकवरील मोनोग्राम छपाई, मंडपाकरिता छते, झालरी व पडदे छपाई, नाटकांत लागणाऱ्या पडद्यांची छपाई, सुती, लोकरी, रेशमी, रेऑन, नायलॉन, सिफॉन, डेकरॉन वगैरे कपड्यांची रंगणी, पातळांवरील खडी छपाई, एरोग्राफ प्रिंटिंग.

या करिता सुप्रसिद्ध

○○○

... किती कमी मी तुझ्या मानानं ! पण तुला तसं कधी वाटलं नाही ... तुझ्या-माझ्यात आडपडदा नव्हता यानंच ... तू सोबतीला असलीस की ... मी कसा सारा व्यवहार विसरायचा. बाह्य जगाची जाणीवही रहायची नाही ...

... तिथनं मी एकदाचा बाथरूममध्ये शिरतो ... चांगलं गरम पाणी अंगावर पडत असतं... वाफा निघणारं ... पण किती प्रसन्न वाटलं मला ... मनसोक्त आंघोळ झाली ... पण उणीव आलीच आहे ... आता टॉवेल द्यायला कोणी नाही. कितीतरी वेळा सांगितलंस तू मला ... मी अगदी व्यवस्थित टॉवेल विसरणार ... आणि नंतर तुला हाका घालणार ...

ही आपली बेडरूम. कपाटाला लावलेल्या आरशात रूप मनमोकळेपणानं न्याहाळता येतं नाही ? ... तेवढ्यात उशीवर नजर जाते माझी....किती साधे शब्द होते... पण आजही मला तेवढाच चटका लावून जाताहेत — ' स्वी ट हो म ' ... जणू तुझं सर्वस्व घराशी निगडित झालं होतं ... किती सहजपणं तू रममाण व्हायचीस घरात ...

... मला आठवतं ... ते दिवस ... ज्याला बहार म्हणतात ... तरी पण तुझ्या कपाळावरचं कुंकू एक वर्षाचं झालं होतं ... घराचा सारा कारभार तू पहायचीस. साऱ्यांचा रामरगाडा तुझ्याभोवती असायचा. तुझं आपलं काही-ना-काही चालूच असावं. ... पण तिन्ही सांजेला तू अंगणात तुळशीपुढं दिवा लावायला कधी विसरली नाहीस. तिथं तुळशीला नमस्कार करून मिनिटभर थांबण्याची सवयही कधी गेली नाही. किती सहज पण विशिष्ट लकब होती तुझी ती ...

...बाहेर पाऊस अजून चालू आहे...प्रसाधन आटोपून मी परत बाहेर येतो...मघापेक्षा किती वेगळं वाटतं आहे...आजूबाजू दरवळून निघालीय...मघापेक्षा दूरवर काही दिसत नाहीय.

तरी पण मी उगीचच कुठेतरी खोल खोल पहात असतो. सारं काही पाहून झालेलं असतं अनेक वेळा. तरीपण....

...मनाला अजून तुझी आठवण येत असते... तरळत्या श्रावणासारखी...

...आता तू अंधूक अंधूक होता होता मला खुणावते आहेस. आठवणी कशा ताज्या आहेत. पण आकृती जरा पुसटच झाली आहे तुझी. मला अजून आठवतं — किती पोळलो मी ! मला अजून वेदना होतात.

त्या पुसट आठवणीतूनच तू अचानक वरती येतेस आणि क्षणभर मला भास होतो की, नेहमीच्या हसऱ्या चेहऱ्यानं स्वागत करण्यासाठी तू माझ्यासमोर उभी आहेस..

...तुझे वडील तुला पहिल्या बाळंतपणाच्या वेळी न्यायला आले, त्या वेळी गाडीत बसताना कशा भरल्या डोळ्यानं तू माझ्याकडं पाहत होतीस. ती तुझी शेवटचीच नजर...

तू गेलीस ती परत आलीच नाहीस...

पाखरू उडून जावं तशी तू निघून गेलीस...किती अकस्मात...तुझं सारंच तसं.. तरीपण असं खासच व्हायला नको होतं...अजून तुझी मूर्ती...अजून हसते आहेस...भरल्या डोळ्यानं निरखतो आहे...

...खरंच... काय साधलंस माझ्या आयुष्यात येऊन ?... अगदी खुळेपणा वाटतो मला माझा ! किती मूर्खपणा केला मी...उगीचच माझं आयुष्य तू एवढं वर नेलंस...कितीशा सुखाची वाटणीदार केली तुला मी ?...तुला मी काहीच करू शकलो नाही...तुझी ओटी भरता आली नाही मला...शेवटच्या क्षणी... सारे उपचार केले असते...पण करताच आले नाहीत ...तू मारलेली गाठ ही अशी ढिली झाली...पण का ?....

पण का... ऽ ऽ ?



# सा—रे—ग—म


**यशवंत जोशी**
तृतीय वर्ष शास्त्र


सकाळची ८-८॥ ची वेळ असावी. हवेत थंडी होती, गुलाबी जिला म्हणतात तशीच! कारण वाऱ्याच्या झुळकीबरोबर कातडी थरारून उठे, सारे शरीर शहारे, पण लगेच सौम्य उन्हामुळे उबाराही मिळे. अशा धुंद नि कुंद वेळी मित्राबरोबर मी संगीत-विद्यालयात गेलो.

तसे पाहिले तर गाणे ऐकून ठेका धरण्यापलीकडे माझी मजल नाही. नाही म्हणायला आंघोळीच्या वेळी ताना मारतो; पण खोलीवर मीच तेवढा असतो. आजूबाजूच्या लोकांची मला तमा नसते, आणि सकाळच्या वेळी आमच्या हजामती करायला कोणाला वेळही नसतो. जाऊ द्या!

विद्यालयात उदबत्तीचा वास नुसता भरून राहिला होता. नकळत दीर्घ श्वास घेतला गेला. वाद्ये वाजत होती, पेटीबरोबर गाण्याचेही सूर उठत होते. आल्हाददायक असा एकच किनरी आवाज तेवढा ऐकवत होता, आतल्या खोलीतून, सुरेल कंठाने म्हटलेला एक अभंग—

बैठकीवर बसलो नि नजर फिरविली. केवळ एकाने माझे लक्ष वेधून घेतले. गायनमास्तर त्यास प्राथमिक धडा देत होते; 'सा रे ग म—'

२० — च्या आसपासचा, कोकणस्थ म्हणण्याइतपत गोरापान, पण हाडकुळा मुलगा. खाकी हाफपँट नि पांढरा लष्करी थाटाचा शर्ट त्याने घातलेला होता. डोक्यावर शाखेची टोपी चापून-चोपून बसविली होती. तोंडावर तेज होते. पण चर्या अशी की पहाताक्षणीच याची कीव यावी. इवलाले डोळे — मिचमिचे; दाट भुवया — मध्यभागी—सुद्धा जोडल्या गेलेल्या नि कपाळावर ताणलेल्या; किंचित आठाळलेले कपाळ; जिवणीची ठेवण धड हसरीही नाही नि धड रडवीही नाही अशी. किरकोळ देहाचा हा मुलगा वाजविण्यापेक्षा पेटी 'चांगली कुठलीय?' हेच निरखीत बसलेला! मास्तरने त्याचा हा गुण बघितला नि त्याला टाळले. मधूनच मोठ्या पेटीकडे बघत तो हसत होता. दिलखुलास स्मित करीत मनाशीच म्हणायचा—'गुरुजींना विचारून आपण तीच पेटी घेणार उद्या—छानय!' गोरापान, गुळगुळीत दाढी केलेला त्याचा तो केविलवाणा चेहरा उजळायचा थोडा वेळ. पुन्हा निरीक्षण करी त्या नव्या मोठ्या पेटीचे, तर कधी तबला-व्हायोलीनचे.

मास्तरांची वेळ झाली, ते निघून गेले, अन मी त्याच्याकडे सरकलो. मला बघून काहीसा गोंधळून हसला. मीही हसलो, त्याच्याशी बोलण्याच्या इराद्याने. "काय रे! पेटी शिकतोस? आजच पहिला दिवस वाटतं?"

"होय हो, पण हे मेणकापडय ना, फाटलय! शिवलेलंही नाही. उद्या गुरुजींना विचारून ती चांगली पेटी घेणारय!" एका नव्या, मोठ्या पेटीकडे मान वेळावत त्याने उत्तर दिले. तो आज ज्या पेटीवर बसला होता, त्या पेटीच्या स्वराच्या स्प्रिंग्जवरील मेणकापड त्याला आवडत नव्हते. त्याला दिलेली ती पेटी निस्तेज होती. तिच्यातून निघणारा आवाज म्हाताऱ्याच्या नरड्यातून निघणारा खर्ज वाटायचा.

तेवढ्यात, दिलेल्या धड्यांची त्याला आठवण झाली. भाता न हालवताच, बोटे प्रयासाने वाकवत तोंडानेच तो 'सा-रे-ग-म' म्हणायला लागला. बोटे हालवताना मान एकदा डावीकडून नि एकदा उजवीकडून वळवायचा, शरीर झुलवायचा.

कोठल्या पट्टीने कोठले स्वर काढायचे हे तो थोड्याच वेळात विसरला. त्याला मी वाजवून दाखविले. त्यानेही भाता अडखळत हलवला अन तेच स्वर व्यवस्थित काढले, तोंडाने म्हणत 'सा रे ग म' पुन्हा पहिले पाढे '9चावन्न. केवळ बोटेच चालविणे. देहाचा परत एकदा झूला झाला.

त्याने स्वतःचे नाव 'जोशी' सांगितले. मीही जोशी असल्याचे ऐकून त्याने स्वतःच्याच मांडीवर एक चापट मारून घेतली, अन प्रसन्न हसला — डोळे मिचमिचवत त्यांतून पाणी येस्तोवर हसला. मीही मंद साथ दिली: "कितवीतयस?"

" आम्ही ? मराठी तिसरी ; गुरुजींनी ना प्रगति-पुस्तकावर पासच्या तिथं नापास लिहिलं. " गुरुजनांबद्दल आदर असल्याची जाणीव झाली. हसत हसत, माझ्या तोंडाकडे विश्वासाने पहात पुढे म्हणाला – " नि आजारीही पडलो. मग, मग सोडून दिली शाळा. "

म्हटलं, " कशानं रे आजारी पडलास तू ? "

" हेच आपलं, – ताप, फिटा ! औषध घेतो रोज. डॉक्टर गोळ्या देतात. " थोडा वेळ पुढ्यातील पेटीकडे पहात त्याने संथपणे बोटे चाळविली अन आठवल्या-सारखे करून तो म्हणाला, – " मला एकाने ना, सांगितलय की तू नमस्कार घालत जा, साफ बरा होशील; म्हणून मी ना, आता रोज नमस्कार घालतो. बारा; जास्त निघत नाहीत. चक्करल्यासारखं होतं, डोळ्यांपुढं असं अंधारतं की काही काही दिसत नाही. " उत्तराचा शेवटचा भाग 'मी ४०० । ५०० जोर काढतो ' यावर त्याचे स्पष्टीकरण होते. परत पुन्हा बोटे चाळविणे नि तोंडी ' सारेगम ' सुरू झाले. केविलवाणं हसत मोठ्या पेटीकडे बघत म्हणाला,— ' उद्या चांगली पेटी घेणारय, गुरुजींना विचारून ! '

विलक्षण भोळा वाटला. इतर मुले टिंगलीने हसत होती; वेडेवाकडे शेरे मारत होती. केविलवाण्या जिवाशी जीवघेणी टिंगल करण्यातच काहींना मनस्वी आनंद होतो. त्यातल्याच एकाने खवचटपणे विचारले, – " अरे एऽऽ, कुणीरे सांगितलं तुला पेटी शिकायला ? " प्रश्नाचा सरळ अर्थ घेऊन त्याच्याकडे हसत बघत मनापासून म्हणाला,—" मला ना, मला आवडय. मी चारपाच ठिकाणी विचारलं. सगळ्यांनी पाच रुपये फी सांगितली, " डोळे नि भुवया उडवून मान वेळावत उजव्या हातांची पाचही बोटे हवेत उडवत म्हणाला. " मग मी या गुरुजींना विचारलं. ते म्हणाले, चार रुपये घेईन. म्हणून मी येथे आलो, पेटी शिकायला. " परत त्याचे तोंडाने सारेगम नि बोटे व्यवस्थित ठेवण्यासाठी प्रयास सुरू झाले.

" तुम्हाला माहितय का ? आज आफळ्यांचं कीर्तनय तुळशीबागेत. मी कीर्तनाला गेलो ना, की पेटीवाल्याजवळ बसतो नि बघतो. मला पेटीची आवडय, पण किनईऽऽ, वाजवता कुठं येतीय ? "—पिवळट, भसाडे दात लहानशा जिवणीतून काढत डोळे किलकिले करत, त्यांतून पाणी येईपर्यंत मान वेळावत हसला.

मधूनच मी त्याला मास्तरांनी दिलेला पहिला धडा समजावून देण्याचा प्रयत्न करीत होतो; पण वाजविण्या-पेक्षा गोड आवाजात ' सारेगमऽ ' म्हणायचा तो ! त्याबरोबर बोटे चाळवायचा. बोट अडले तर तेच बोट परत परत दाबत एकेक स्वर परत म्हणायचा. या वेळी खांदा उगीचच हालायचा, भाता क्वचित हालायचा. एकाच वेळी इतक्या क्रिया – भाता हालवणे, बोटे व्यवस्थित फिरविणे, नि परत तोंडाने म्हणणे – त्याला जमत नसाव्यात, किंबहुना ते त्याच्या कक्षेबाहेरील होते, प्रयत्नांतीही न जमणारे.

खूप वेळ गेला, माझा मित्रही तबला वाजवून थकला. एव्हाना वर्ग आम्हाला सोडून रिकामा झाला होता. आम्ही निघालो. त्यालाही म्हटले,– ' चल येतोस ना घरी ! '

' छे: ! गुरुजींना कुठं विचारलय ? " त्याने मोठी जांभई दिली, आलेला कंटाळा जास्तीत जास्त प्रभावीपणे तोंडावर दाखवत. त्याला सांगितले— " मास्तर गेलेत. आपली वेळ झाली की जायचं. त्यात काय विचारायचं ? चल चल. "

तेलकट पिशवीत एक नवी कोरी वही – भसाड्या अक्षरांत नाव असलेली – त्याने व्यवस्थित ठेवली. परत एकदा समोरील पेटीचे मेणकापड हाताळले. नव्या पेटी-कडे पहात म्हणाला, — ' उद्या ती घेऊ ; छानय ! ' उठण्याकरिता त्याने हाताने जमिनीवर रेटा दिला नि तो ओणवा झाला — एकदम थरारला ; तोल गेला नि पडला. त्या जुन्या पेटीवर. त्याला फिट आली होती. डोळे फिरवत, हातपाय झाडीत तो उताणा झाला. थोड्याच वेळात शुद्धीवर आला नि आमच्या बरोबर चालू लागला. थोड्या वेळाने म्हणाला, — " आज संध्या राहलीय. मी ना, १०१ वेळा गायत्रीमंत्र जपतो. आणखीन, धडा गिरवायचाय — घरच्या पेटीवर — सा–रे–ग–म ऽ ऽ — "

मळकट पिशवी तोलत तोलत, धीमी पावले टाकत तो चालत होता. आम्हांला रस्ता बदलावयाचा होता. तो त्याच्या रस्त्याला लागला होता. त्याच्याकडे वळून बघितले — शाळेची काळी टोपी डाव्या हाताने पुढे ओढीत, मान वेळावत नि देह झुलवीत, तोंडाने बरळत इकडे तिकडे पहात एका धुरकटलेल्या वाड्याच्या दिशेने तो केविलवाणा देह जात होता.

स्टेनलेस स्टीलची भांडी
भाड्याने व
विकत मिळतात.

**एन्. एच्. पंड्या अ‍ॅन्ड सन्स**

तुळशीबागेत,
दत्तमंदिरासमोर,
पुणे–२.

फोन ५४९९१

---

हार्दिक

अ
भि
नं
द
न

**मे. नरसय्या सायन्ना कुंदेन**

आधुनिक फॅशनच्या बेंबर, सिल्क व जरी
हातमाग साड्यांचे प्रमुख उत्पादक

ऑफिस – फोन – फॅक्टरी
२३८३७ २६६२५

११५०, भवानी पेठ, पुणे २.

---

स. प. कॉलेजच्या
सुवर्ण महोत्सवानिमित्त
अभीष्ट-चिंतन

**धूतपापेश्वर**
**इंडस्ट्रीज लिमिटेड**
पनवेल – मुंबई

९४ वर्षे राष्ट्राच्या सेवेत

---

फोन : २५८२३

सुवर्ण महोत्सवात सहभागी आहोतः—

तिजोऱ्या, कपाटे, टेबले, खुर्च्या,
सोफासेटस् वगैरे लोखंडी फर्निचर
बनविणार.

**शक्ति स्टील फर्निचर**
संगम
शिवाजीनगर.

··· स्टील फर्निचर मिळण्याचे ठिकाण ···
जयको
८९० रविवार पेठ,
दारुवाला पुलाजवळ, पुणे २.



# स्मृती

सुधीर जोशी
प्रथम वर्ष साहित्य

कधी कधी जखमेवरची खपली उडून जाते आणि ती जखम भळभळा वहायला लागते. विलक्षण वेदनांनी मन बधीर होऊन जातं ! विस्मृतीच्या आड कुठंतरी, काहीतरी जाणवायला लागतं ... खोल खोल कुठंतरी स्मृतीची असंख्य पिसं पिंगा घालायला लागतात. कात टाकल्यासारख्या सुस्त पडलेल्या आठवणी वेड्यापिश्या होऊन जातात. मन भरकटायला लागतं अन गळ्याशी एक अनावर हुंदका दाटून येतो ... ते सगळं परत डोळ्यासमोर दिसायला लागतं ...

“ ... सलाईनच्या अन रक्ताच्या अशुभ वटवाघुळाप्रमाणं उलट्या टांगलेल्या बाटल्या, प्राणवायूच्या नळ्या, भणाणणाऱ्या स्टोव्हवर उकळणाऱ्या वखवखलेल्या इंजेक्शनच्या तीक्ष्ण सुया, स्टुलावर पडलेल्या मॉर्फियाच्या गलेलठ्ठ नळ्या, – कण्हणारे, गुराप्रमाणे ओरडणारे, ओकणारे विखुरलेले असंख्य रोगी अन पळापळ करणारे डॉक्टर्स व नर्सेस आणि ... आणि त्यामध्ये पडलेलं एक अचेतन शरीर, एक तरणा देह दिसायला लागतो ... कापलेल्या पायातून ठिबकणारं रक्त – कॉटखाली त्याचं झालेलं थारोळं, दिसतं. “ अरे आता नाही जगत ” कोणाची तरी कुजबूज उकळत्या रसासारखी कानांत ओतली जाते. सगळी दृश्यं मनःपटलावर ठळक ठळक दिसायला लागतात. त्या अचेतन शरिरावर ओळखीच्या खुणा दिसायला लागतात, कुठंतरी ... केव्हातरी पाहिल्यासारखं वाटतं ! कदाचित घरातच ... मनातली जखम खूप वाढायला लागते. वेदनेला अंतच नसतो ... !

ते तरणं शरीर तस्संच्या तस्सं तीन रात्री, तीन दिवस बर्फासारखं पडलेलं असतं ! मृत्यूच्या काळ्याकुट्ट छायेत ... वणव्यात धुराच्या लोटांत पक्षी सापडावा तसं ! मृत्यूच्या आगमनासाठी उघड्या ठेवलेल्या खिडकीतून वाहत येणाऱ्या वाऱ्याच्या हिंदोळ्यावर बसून केसाच्या दोनचार बटा गोबऱ्या गोबऱ्या गालावर झुलत असतात. त्यांना हसत हसत लीलया बाजूला सारणारा तो हात... तो हात उठतच नाही, ती काळीभोर वलयं बापुडवाणी होऊन रुळतच राहतात, तिच्या डाळिंबी ओठांतून सांडलेलं अस्फुट हास्य तिथंच शिजून गेलेलं असतं... कायमचं ! नाकात खुपसलेल्या नळ्यांतून उठणारे बुडबुडे मंद मंद होत असतात. आजूबाजूच्या रोग्यांवरून उडून आलेल्या दोन-चार माशा त्या चेहऱ्यावर दृष्ट लागू नये म्हणून ठेवलेल्या ठिपक्यासारख्या बसून राहतात...

कॉटला टेकून बसलेली एक बाई हात हलवून त्यांना उडवते आहेशी वाटते. चार रात्रीच्या जागरणाने काळवंडलेला तिचा चेहरा किती व्यग्र दिसतो आहे ! पण तिने हिंमत सोडलेली नाही. चेहऱ्यावरच्या काळजीच्या सुरकुत्यात कुठंतरी उमेदीचे धागे दिसत आहेत... तिच्या काळजात कुठंतरी आशेचा नंदादीप तेवतोय... ही ज्योत विझणार नाही ... ही ज्योत विझणार नाही. कॉटवरचं सुहास्य तिला असंच काही तरी सांगतय ..! थिजलंय तरीसुद्धा ! मुलीला जाग आल्यावर काही तरी सांगण्यासाठी तिनं पदराला गांठ मारून ठेवली आहे. पण तिला बापडीला काय माहीत ? तिला जाग कधी येणारच नाही आहे ... पदराची गाठ कधी सुटणारच नाही आहे !

त्या हसऱ्या ओठातून उमटलेले शेवटचे शब्द तिला आठवत आहेत पुनःपुन्हा ! “ देव पाण्यात ठेव ”, “ गणपति पाण्यात ठेव ! ”, कानात घर केलं आहे त्या शब्दांनी. ते शब्द बोलणारे ओठ पुन्हा हसतील, बोलतील, रडतील, जगतील ... हो जगतील ...तिला खात्री आहे. ज्या जिवाला अजून जीवनातले असंख्य भोवरे पार करायचे आहेत, कधी तरी डोळ्यासमोर तरळलेली संसाराची स्वप्नं पुरी करायची आहेत, असला अतृप्त जीव देव कशाला नेईल ? तरीही मनावरची काळ्या ढगांची सावटं हालतच नाही आहेत. तिचे डोळे पेंगुळले आहेत...सरत्या संध्याकाळची

वाकडी-तिकडी किरणं खिडकीतून शिरून दवाखान्यात पसरली आहेत. त्या बाईच्या गालावरून ओघळणारे अश्रुबिंदू सूर्याची सोनेरी किरणं पकडून चमकत आहेत......

रात्रीची गडद काळी छाया आसमंतात पसरू लागली आहे...कण्हणाऱ्या कॉट्सवरसुद्धा निद्रादेवीचं अनभिषिक्त साम्राज्य चालू झालं आहे. आणि...आणि ती हालचाल कसली दिसते आहे? त्या कॉटवर काहीतरी प्रचंड हालचाल चालू झाली आहे. भूकंपात आतून धडक बसून जमीन थरथरावी तशी त्या अचेतन देहाची तडफड चालू झाली आहे. घुसमटलेली प्रचंड शक्ती आतून निसटायला बघते आहे. कॉटवरचं अचेतन शरीर तीन-चार रात्रींत पहिल्यांदा अन कदाचित शेवटचं हालतंय! हात उंच उंच आभाळापर्यंत उचलले गेले आहेत. आतून कोणीतरी ढकलावे तसे! कुठली तरी शक्ती कुडीचा पिंजरा फोडायला बघते आहे. पक्षी उडायला बघतो आहे....आणि...आणि अचानकपणे हवा गेलेल्या फुग्यासारखी त्या देहाची तडफड थंडावली आहे. प्राणवायूच्या नळ्या आहेत तिथंच आहेत; फक्त त्यातून उठणारे बुडबुडे थांबले आहेत. प्राणवायूची आता जरूरीच नाही आहे...संपलय! सगळंच संपलय आता!! मॉर्फियाच्या अन इंजेक्शनच्या नळ्या उदासवाण्या दिसायला लागल्या आहेत. कुणीतरी सगळ्यांना नकळत फसवलय! सगळं कसं शांत शांत झालं आहे. पायावरची थिजलेली जखम आता वाहणार नाही, चेहऱ्यावर रुळणाऱ्या बटा नाजूक हातांनी आता कुणी बाजूला सारणार नाही, ओठावरचं हासू आता काळाच्या अंतापर्यंत असंच हसत राहणार आहे. त्या बटा, ते हसू, ती जखम आता लवलवत्या ज्वालांच्या मिठीत विलीन होणार आहे. ते तारुण्य, ते सौंदर्य अर्पण झालं आहे फक्त मृत्यूला!

सकाळच्या सूर्याची निष्पाप कोवळी उन्हं परत दवाखान्यात पसरली आहेत. खालीवर, रिकाम्या कॉटवरसुद्धा! दवाखाना उठला आहे. रोगी नव्या दमानं कण्हत आहेत. ती कालची कॉट रिकामी आहे. तिथं काही नाही...काल ठिबकलेल्या रक्ताचे दोनचार थेंब फक्त कॉटखाली पुसायचे राहून गेले आहेत. कॉट उदास दिसत आहे...उघड्या खिडकीतून पुन्हा झुळूक आत आली आहे, कदाचित दुसऱ्या केसांच्या बटा उडवायला...!"

सगळी दृश्यं माझ्या अश्रूंमध्ये विरून जायला लागतात, अन माझ्या डोळ्यांवर विलक्षण झापड येते...!

"Das Gvaŭsame des Todes liegt darin, dass er den Wirklichen Schmerz des Endes bringt, aber nicht das Ende."

The most horrible aspect of death lies therein, that it brings only the real pangs of the *End*, but not the *End* itself.

*Franz Kafka.*



# एक शून्य बाजीराव

**जयश्री नरगुंदकर**
तृतीय वर्ष साहित्य

' एक शून्य बाजीराव ! ' पहिला नव्हे, दुसरा नव्हे, पेशवाही नव्हे, हा एक शून्य बाजीराव ! पण हे शून्य मोठे झाले. खूप मोठे झाले. त्याने सारे काही व्यापले आणि त्यातून ब्रम्हांड बाहेर पडले. शून्य बाजीरावाने एक नाटक लिहिले. नाटकातले नाटक ! हे नाटक अनेक माशांचे. लहान मासे, मोठे मासे, देवमासे, शब्दांचे बुडबुडे सोडणारे मासे, रंगीत मासे, आणि या माशांच्या जोडीला जगातल्या उरल्या-सुरल्या प्रामाणिक-पणाच्या फळकुटांचा आधार घेऊन तरंगू पाहणारा स्वतः बाजीराव !

खरे म्हणजे बाजीरावाने हे नाटक लिहिले नाही. तो या नाटकाचा लेखक नाही. या दुनियेच्या रंग-मंचाच्या एका टोकाला तो आला आणि तिथेच एक खिडकी होऊन गेला. हाडामासाची खिडकी. या खिडकीतून प्रेक्षकांनी दुनियेच्या रंगमंचावर रोज घडणारे नाटक पहायचे. बाजीराव या नाटकाचा लेखक नाही; तो एक माबडा, निर्मळ डोळा आहे. या डोळ्यावर अती बोचक, मिष्किल पाणी तरारते आणि त्यातून स्पष्ट होते पलीकडचे नाटक. बाजीराव सूत्रे चाळवतो आणि अलिप्तपणे बाजूला होऊन एखादा दगडी पुतळा जसा होऊन जातो. या अलिप्त डोळ्यांतून ते भाजणारे नाटक पहायचे म्हणून ते पलीकडचे; नाही तर खरे म्हणजे अलीकडचेच. आपल्यातच घडणारे. नाटकातल्या या नाटकात सारे जग न्यायासाठी आक्रोश करू लागते, ' न्याय हवा, आम्हांला न्याय हवा ! ' म्हणते. पण खुद्द न्यायाधीशाच्या वास्तूत न्याय मुळी दिलेला असतो. कान पिळून बळीने न्यायदानाचा अधिकार छिनून घेतलेला असतो. बाजीराव फक्त पाहत असतो. कर्ता तर तो नसतोच, करविताही नसतो. असतो फक्त प्रेक्षक. पण प्रेक्षक त्याला आपल्यातला समजत नाही.

' एक शून्य बाजीराव ' या नाटकाचा बाजीराव हा नायक नाही. खरे म्हणजे एक व्यक्ती म्हणून त्याला प्रत्यक्ष अस्तित्वच नाही. तो केवळ प्रतीक आहे. ती मनाची प्रबुद्ध जाणीव आहे. या नाटकाला नेटका सांगाडा नाही. एकापुढे एक अनेक रंगीबेरंगी, तरल कल्पना ठेवण्यात आल्या आहेत. त्या सर्वांना एकत्र आणून पक्के करणारा बाजीराव हा अखंड आणि प्रमुख असा धागा आहे. ही एका वा अनेक व्यक्तींच्या जीवनाची कहाणी नाही. ' जन्माचेच पुण्यवंत ' आप्पाराव, त्यांच्या डोळ्यांच्या दोन्ही मृत्युगोलांत नाच करणारी गौरी आणि ज्याचा आत्मा गौरीशी बोलण्यात ' एंगेज्ड ' आहे असा बाजीराव, — या तिघांचा हा त्रिकोण नाही. किंवा बाजीराव आणि त्याचे नाटक चोरून ' नाटककार ' म्हणून मिरवणारा ' कोवळा नाटककार ' यांच्यांतील हा संघर्ष नाही. आप्पाराव आणि बाजीराव यांच्यांतील महदंतर हाही या नाटकाचा विषय नाही. बाजीरावाने लिहिलेले या नाटकातले गर्भनाटक हाच या नाटकाचा नायक होऊ शकेल.

या दुनियेच्या रंगमंचावर रंग न लावता कोणीही वावरत नाही. साधी भोळी, कशाच्या तरी आधाराने वाढू पाहणारी वेलीबाईसुद्धा रंग फासूनच येथे येते. इतकेच नव्हे, तर ते रंग जपण्यासाठी प्रयत्न करते. ते पुसले जाऊ नयेत म्हणून बाजीरावाने पुढे केलेले अत्तर — ' प्रेमाचे तात्पर्य 'ही ती लावून घेत नाही. या रंग-मंचावर मुखवटे आहेत. त्यांच्या जपणुकीसाठी अट्टा-हास आहे. अमुकच एक मुखवटा आपल्यावर का लादला गेला, अशी प्रामाणिक पृच्छाही आहे. पण या प्रश्नाला उत्तर नाही. सारेच भिकारी ! त्यांतले काही ' श्रीमंत ' भिकारी का, आणि काही गरीब, दुबळे का, याला समाधानकारक उत्तर नाही. काही ' जन्माचेच पुण्यवंत ' हेच याला उत्तर. या न्याय मागणाऱ्यांना न्याय नाही. हे सारे चालू असतानाच, मुखवटा जपतानाच तो फेकून द्यायची स्वतःलाही जाणवेल-न-जाणवेलशी केविलवाणी धडपडही कुठेतरी आहे. एखादी वेलीबाई या साऱ्याचा उबग येऊन दूर दूर पळून जायची इच्छा बाळगते. पण आपण

**पुणे मध्यवर्ती सहकारी**
**ग्राहक भांडार लि., पुणे २**
**९ ( नवा ) शुक्रवार पेठ, पुणे २**

अल्पावधीत लोकादरास पात्र झालेले,
ग्राहकांनी ग्राहकांकरिता,
ग्राहकांच्या नियंत्रणाखाली चालविलेले भांडार.
निर्भेळ माल, अचूक वजन व रास्त भावात
नित्योपयोगी वस्तू मिळण्याचे,
वीस शाखांनी सेवेस समृद्ध भांडार.
शेअर भांडवल रु. ३,३०,०००
सभासद संख्या ९,०००

**भांडाराचे सभासद व्हा**
**भांडाराचा फायदा घ्या**

**अ. दा. कानडे** — मॅनेजर
**र. गो. काकडे** — चेअरमन

# मनोहर

**तरुण - तरुणींचे मासिक**
**रगेल आणि रंजतदार**
**अधिक मोठ्या आणि अधिक मनोहर**
**स्वरूपात प्रसिद्ध झाले.**

- आकार : ' किर्लोस्कर ' मासिकाएवढा
- अंक प्रसिद्धी : दरमहा १ तारखेस.
- किंमत : १ रुपया
- वार्षिक वर्गणी : ९ रुपये फक्त.

**आजच वर्गणीदार व्हा !**
**किर्लोस्कर प्रेस**
**( प्रोप्रायटर : किर्लोस्कर ब्रदर्स लि. )**
**स्वारगेट : पुणे ९.**

**पुणे जिल्ह्यातील दुग्ध व्यवसायाच्या**
**सर्वांगीण विकासासाठी**
**अहर्निश झटणारी संस्था**
**पुणे जिल्हा—**
**सहकारी दूध उत्पादक संघ, लि.**
**(१८८५, सदाशिव पेठ, नातूबाग, पुणे २)**
टेलि. नं. ५५४०७. तार—मिल्कफेड.

श्री. **पांडुरंग दत्तात्रय साबणे**
बी. ए., जी. डी. सी. अँड ए., मॅनेजर.

श्री. **पर्वतराव कृष्णाजी दिघे**
चेअरमन

श्री. **शांतिलाल चिमणलाल शहा**
व्हाइस चेअरमन

**अहा ! काय मस्त बांग आहे ही !**

❀

# गांधी कंपनी

❀

**४० शुक्रवार पेठ,**
**रामेश्वर चौक, पुणे २.**

**प्रफुल्ल व आकर्षक बागेसाठी भेटा.**

फोन नं. ५६७४९

का पळून जाऊ पाहतो याचे कारणही तिला उमगत नाही. जाणवत नाही. ती नुसतीच पळून जाऊ पाहते. पण अखेर तिलाही समजून चुकते की प्राण असेतोवर श्वासापासून सुटका नाही.

आणि हे सारे पाहत असणारा बाजीराव ती आतून सलणारी, जाळणारी, शुद्धिबुद्धी, ती सत्याची ओंगळ, रोगट जाणीव – तिला एक रंगच प्यालेली गौरी उखडूनच टाकते. मारून टाकते. जणू विष पाजते. आणि असे सदसद्‌विवेकाला चिरडून टाकून संथपणे, शांतपणे भिकाऱ्यांतल्या डोंगराएवढ्या श्रीमंत भिकाऱ्याला ती शरण जाते. ‘ एक शून्य बाजीराव ’ संपते.

खानोलकरांना हेच अभिप्रेत आहे काय आणि एवढेच अभिप्रेत आहे काय हा प्रश्नच आहे. अशा प्रकारची हाताळणी मराठी नाटकात स्वतंत्रपणे आजवर झाली नव्हती. असा नवीन आणि संमिश्र विषय संपूर्ण नव्या धर्तीने, स्वतंत्रपणे प्रथमतः खानोलकरांनीच हाताळला. त्यांच्या मनात फार काही होते असे वाटते. ते या नाटकात नीट राहू शकले नाही. कोंबूनच बसवावे लागले. अनेक धागे एकमेकांत गुंतून बसले. त्या खटाटोपात मुख्य धागाच पुष्कळदा हातचा निसटला. नाटकाची बांधणी नीटस झाली नाही. अनेक लक्ष्ये समोर ठेवल्याने तिला विस्कळितपणा आला. अतिसूचकतेमुळे नाटक गुदमरले. प्रतिमांच्या माऱ्याखाली झेंजरले. ‘ एक शून्य बाजीराव ’-चीही ‘ काठूबाई ’ आधाराशिवाय उभी राहण्यास पांगळी ठरली. हवा तसा परिणाम एकसंधपणे घडवून आणण्यास खानोलकर उणे पडले. परंतु ‘ रंगायन ’ने त्यांना चांगला बळकट हात दिला. ‘ रंगायन ’च्या प्रयोगातून ‘ एक शून्य बाजीराव ’ जेवढे प्रतीत होते तेवढे लिखित नाटकातून होत नाही. याच्या पाठीमागे काय आहे ? ‘ रंगायन ’चे सामर्थ्य आहे की खानोलकरांचा तोकडेपणा आहे ? की रसिकांपाशीच तैलबुद्धीचा अभाव आहे ?



मजबूत बांधणीच्या सूटकेसीस्, हँडबॅग्ज्,
हाँगकाँग बॅग्ज्, होल्डॉल्स्, वॉर्डरोब्ज्
तसेच मंगल प्रसंगी भेट देण्याकरिता अनेक
आकर्षक वस्तूंचे विविध प्रकार
योग्य किंमत देऊन खरेदी करण्याकरिता
आजच प्रवदाला भेट द्या

☆

"प्र व दा"

प्रवासी वस्तु दालन
बाजीराव रस्ता,
पुणे २.

इलेक्ट्रिक मोटर पंपासाठी–
राजेंद्र आणि कंपनी

लिफ्ट इरिगेशनसाठी–
फॉरवर्ड इंजिनिअर्स

सिमेंट पाईपसाठी–
राजेंद्र सिमेंट प्रॉडक्ट्स्

पत्ता : ७१८ सदाशिव पेठ, पुणे २.
फोन ५६५१४.

प्रतिभा मुद्रणालय
स्थापना १९३६ दूरध्वनी ५६५६५
२०११ सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ९

❀ ❀ ❀

आमचेकडे मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी व उर्दू भाषेतील छपाई कामे, तसेच विविध रंगांतील लिथो छपाईची कामे करून दिली जातात. ग्राहकांनी आपले छपाई काम करण्यापूर्वी वरील पत्त्यावर चौकशी करावी, अशी विनंती आहे.

❀ ❀ ❀

लक्षात असू द्या!

तयार कपडे व होजियरीचे
पुण्यातील प्रमुख विक्रेते

छेडा ब्रदर्स

गणपती चौक,
लक्ष्मी रोड, पुणे २



## विषण्णता


अशोक अवचट
प्रथम वर्ष शास्त्र


काय करावे
कोठे जावे
काहीच कळत नाही
दिवसासारखा दिवस
पेंगुळल्या रात्रीसारखा वाटतोय
हरवली वाट सापडत नाही
उमटलि पावले दिसत नाहीत
वातावरण कसं मरगळलं आहे
विषण्णतेच्या लाटा
देतात तडाखे
निराशेचे विणले जातात धागे
आशेला जात आहेत तडे
हृदयात कोठेतरी
अनामिकाची चिंता
घर करते आहे
अनामिकाला शोधू पहात आहे !

## प्रतीक्षा


वसंत गोखले
द्वितीय वर्ष साहित्य


भकास दुपार
उदास छाया
झडलेला वड
गोठली माया ।
डोहाच्या काठी
तापल्या वाळूत
बसे एकला
तुझ्या प्रतीक्षेत ।
जळतो अंतरी
तापली काया
तुझी माझी गडे
वेगळी दुनिया ।
आणि तुझा आठव
जाता जाईना
वेड्या मनाला
शांती मिळेना ।

## थांबा ! स्वागत सुवर्णद्वारी !

मुकुंद इनामदार
तृतीय वर्ष साहित्य

अव्यक्तातुनि व्यक्त होउनी
स्मृतीस अमुच्या स्मरण देउनी
कालदूत हा वदे गर्जुनी
थांबा ! स्वागत सुवर्णद्वारी ॥

जरा थांबवा ज्ञानाचा रथ
पंच दशक वर्षांचा हा पथ
आक्रमिला त्याचे हे कौतुक
ब्रह्मसुता स्वमुखे उद्गारी ॥

विद्येचा पति मंगलदाता
पहुनि ' कलेची ' विकासवार्ता
प्रसन्न होउनि श्रीगजदंता
आशीर्वचना करा उभारी ॥

विज्ञानाचे ' यज्ञ ' चालले
बृहस्पती स्वानंदे डोले
आयासांचे सार्थक जाले
प्रयोगिकांच्या पुण्यमंदिरी ॥

परशुरामिया बाण्यालागुन
सिद्ध असे नित विद्यार्थीगण
त्या तेजाचे अखंड पूजन
हृदयि वसे धैर्याते प्रेरी ॥

अपार गुरुजन कष्ट साहती
ज्ञानाच्या पालविण्या ज्योती
त्या ज्योतींची पसरे दीप्ती
उजळित सकला वास्तु अंतरी ॥

लक्ष लक्ष हे दीप उजळले
वर्णि सुवर्णी क्षितिज रंगले
ज्ञानार्थी अति मोदे जमले
निमग्न उत्कट नादी, गजरी ॥

## आज !

शोभा किनरे
तृतीय वर्ष साहित्य

प्रीती म्हणजे काय वेड हे
समजत नव्हते जेव्हा मजला
केलिस वृष्टी माझ्यावरती,
तुला न कळता, मला न कळता.
गंधफुले जी दिलीस तेव्हा
जपली मीही नकळत मजला,
कळल्यावाचुन दरवळली अन
प्रीती फुलली कधी ? कशाला ?
प्रीती केलिस मजवर जेव्हा
मी न जाणिले भाव मनीचे,
जीव लोभला आज तुझ्यावर
आणि आटले झरे तुझे !

## उपेक्षा

शुभा गलगली
द्वितीय वर्ष साहित्य

इंद्रधनूचे सप्तरंग
भाव मधुर हे तरंग
उमटावे रंगकाव्य !
करूनि थकले प्रतीक्षा
असह्य ही उपेक्षा !
वीणारव झंकारले
स्वरमंडल उमलले
येइल तो दिव्य सूर !
करूनि थकले प्रतीक्षा
असह्य ही उपेक्षा !
शब्द मृदु मुलायम
कल्पनाहि भावमय
जन्मा येईल काव्य
करूनि थकले प्रतीक्षा
असह्य ही उपेक्षा !

## व्यथा !

कुंदा गोखले
द्वितीय वर्ष साहित्य

स्वातंत्र्याच्या इतिहासाने
कितिक पाहिली बलिदाने !
समर्पणांना सीमा नाही
किती तळपती तेजाने !
अमर तयांच्या कर्तृत्वाची
शाहीरांनी गात्री गीती
अनामिकांची परंतु आहे
जीवनगाथा रिती रिती
गाइल का कुणि त्यांची वदनी
स्फूर्तिदायिनी शौर्यकथा ?
मातृभूमिच्या हृदयांतरि ही
एकच सलते अजुन व्यथा !

## वर्षा

सुधीर जोशी
प्रथम वर्ष साहित्य

थेंबा-थेंबाने क्षरते
संध्या रातीच्या पेल्यात
गर्भ धरून ढगाचा
वीज सळाळे नभात
ओला काजवा चितारे
नक्षी पुसट रेखांची
चित्रे अपुरी राहिली
लाल रंगाची आकाशी
दिशा अंधारून आल्या
विरे तळ्याची निळाई
बिंब काळोखाचे झरे
खोल तळाशी तळाशी
मेघ भरली पाठ
झूल पृथ्वीला पेलेना
गेले कलंडून नभ
पूर थांबेना थांबेना !

विद्या मनुजाय विनयं, पात्रत्वं, धनं, धर्मं तथा सुखं ददाति । विद्याप्रभावादेव मनुजः पञ्चमहाभूतानि जेतुं समर्थः । विद्यासामर्थ्यादेव पृथिव्यां राज्यं लब्धुं, पालयितुं च प्रभवति नरः । संप्रति जगति यानि यानि सुखसाधनानि, तानि तानि विद्ययैव संप्राप्तुं शक्तः अस्ति नरः । येषां न विद्या, ते मृत्युलोके भारभूताः एव । सर्वप्राणिषु मनुजः श्रेष्ठः गण्यते । किं कारणम् अस्य ? विद्या एव ।

अम्ब विद्यादेवि, नमस्तुभ्यं देवतानां देवतायै ।





## गुरुपरीक्षका

जयश्री कानिटकर
प्रथम वर्ष एम्. ए.

गुरूपरीक्षका अभ्या तपन्ति मा-
घान्यर्यो वनुषामरातयः।
युवं हि वस्व उभयस्य राजथो
ऽधस्मा नोऽवतं पार्ये दिवि ॥ १ ॥
युवां हवन्त उभयास आजिषु
गुरुं तदित् परीक्षकं च सातये।
ग्वन्ग्त्रभ्भीर्मदरीर्भिनभीवरं।
प्र जयश्रियमावतं सखीभिः सह ॥ २ ॥

## जगतः कुशलम्

मङ्गला वझे
अनुवादिका

वसन्तसमयं प्राप्तं वर्षं
दिवसः प्राप्तः प्रभातसमयम्।
प्रभातसमयः सप्तवादनं
गिरिपार्श्वं हिममुक्ताभूषम्।
विहरति गगने मधुरवाक् पिकः
स्थितः कण्टके किल शम्बूकः।
निवसति परमेशोऽसौ निजदिवि
भवति च निखिलं जगतः कुशलम् ॥

–रॉबर्ट–ब्राउनिङ्ग–कृतस्य 'पिपाज सॉङ्ग' इत्यस्य स्वैरानुवादः।

## टिक्ट्वेण्टिः

श्रीकान्त बहुलकर
पदवीपूर्व साहित्य

विष्णुर्मत्कुणदंशनात्स कुपित-
श्वासार्त एवाभवत्,
तेन क्षीरधिशान्तशीतलतले
निद्रानिवासौ कृतौ।
भीरुः सोऽप्यधुना सुयोधन इवा-
ह्वानं करोति क्षणाद्—
'भो भो मत्कुण! गच्छ गच्छ सदनं
टिक ट्वेण्टिरागच्छति ॥"

THE SYMBOL
OF THE HOUSE OF
SATHE
STANDS FOR
THE FINEST

BISCUITS, COCOA & CHOCOLATES

SBC-231



# ENGLISH SECTION


| | |
|---|---|
| *Why Art ?* | *76* |
| *Impact of the Industrial Revolution on Literature* | *78* |
| *Life's For Living* | *80* |
| *Aspiration* | *81* |
| *The Guiding Force* | *81* |



## Why Art ?

**Rajanikant Belsare**
Third Year B. A.

In everyday parlance, the term 'art' is used in a very loose sense. It is used either to denote skill or to define branches of learning. Art is both a descriptive and an evaluative term. When we say, 'This is a work of art', we describe it in order to distinguish it from other human activities. At other times when we say, 'This is a work of art', we praise the art of the book. It is also used in the sense of fine arts. The term 'art' is derived from the Latin root 'ars'. In ancient Latin 'ars' means a craft of a special kind. No distinction is made between art and craft. In mediaeval Latin 'ars' means any peculiar form of book-learning like logic, magic and grammar. From times immemorial, art is worshipped with reverence. Why is it that man takes so much interest in art ? The answer to the query is the apology for this study.

Man does not live on bread alone. A plethora of intricate things also inspire him and form the basic impulses of his life. He does not remain content even when his physical appetites are satisfied. His higher aspirations are embodied in works of art and the dome of eternity of art scorns aloud—

"All that man is,
All mere complexities,
The fury and the mire of human veins"
—Byzantium ( W. B. Yeats ).

Facts about the mundane world and long lists of facts regarding his own conscious life, do not satisfy him. He has an instinctive urge to understand and theorise about the events and activities he sees around him. He is amazed to see the enchanting mystery and majesty of things. Art is an important organ to express the spiritual life. There are some indefinable experiences having a savour of reality and permanence which our other experiences do not possess. These experiences are controlled and expressed by the artist and therefore he unmistakably leaves his 'foot-prints on the sands of Time'.

Art has human feelings for its subject-matter. Nature evokes a myriad impressions in us. As Virginia Woolf puts it, 'Life is an incessant shower of innumerable atoms'. No subject is inartistic or inexplicable for art. Art expresses the total man. A man is superior to other creatures in that whereas they have hunger for food and procreation, he has in addition to these an insatiable hunger for society, knowledge and God.

Art is the expression of the artistic sense. Every man has some artistic tastes dormant in him. These latent tastes find their manifestation in the form of artistic expression. Artistic sense can be said to be of two kinds. The first is negative which consists of meticulous and laborious attempts to eschew all that is inharmonious and discordant. The second is positive which consists of the creation of harmony through intense, disinterested emotions.

Art does not create something which does not exist before. It merely gives form to a thing which already exists. In this it very much resembles the organizing func, tion of the sense which, with intuition-gives form to objects and spaces, colour and sound. Art gives, in the words of

Bertrand Russel, 'knowledge by acquaintance of affective experience below the level of belief in the deeper level of insight and attitude'.

An intimate relation exists between an artist and his fellowmen which creates in the artist uncontrollable urge to express himself to them. He is not estranged from them even if he is a rebel and a revolutionary. If he interprets, his interpretation justifies their lives. The artist, being a man whose faculties are more developed than those of his fellow-beings, is able to express his experience more clearly. The artist is a human being and therefore his experience embodies the experience of all human beings. It is because of this that concrete tends to become abstract and particular to become general in art. Tennyson's 'In Memorium' deals with his genuine sorrow on the death of his alter ego ( Arthur Hallum ). This experience of sorrow is particular; but all men have exprienced sorrow, though on different fronts. So the experience of sorrow which is particular becomes general. Whatever is intensely individual has the quality of becoming universal. This universality of human experience is beautifully brought out by Emerson who, referring to young men, says, 'The young man revers men of genius because, to speak truly, they are more himself than he is.'

An artist is an embodiment of unforgettable traditions and instincts, religions and philosophies. His experience is nurtured by che hopes and aspirations he has cherished in his heart for ages. He is expressing the remembrances of his race which are as old as the hills. When his experience is brought in contact with the human spirit, its alchemy transmutes the experience into love, religion, poetry, prose etc. Within these components of human experience, the raw fact is converted into values. And art is the supreme value, for it transmutes the brazen world into the dazzling colours of a golden world !

सत्य, भावना, सौंदर्य किंवा मूल्ये यांची एक शाश्वत अशी वेगळीच सृष्टी आहे असे मानणे चूक आहे. कारण या सर्व गोष्टी स्थलकालसापेक्ष आहेत. दुसरे असे की कलाकृतीला या शाश्वतांचे चिन्ह मानणेही बरोबर नाही. कलाकृतीला एक स्वतंत्र अस्तित्वात असलेली स्वायत्त वस्तू मानल्याने अनेक प्रश्न सहज सुटू शकतील.

**दि. के. बेडेकर**



# Impact of the Industrial Revolution on Literature

**Vijay Madge**
Second Year B. A.

The Industrial Revolution upset the agricultural way of life as early as in the 18th century. The writers of those times dimly perceived the major changes coming over society. To them it was a matter of great regret that the villages should be deserted and a vast population should move towards the cities. In the poem, " The Deserted Village ", Goldsmith regretted the evergrowing tendency among people to leave the rural areas. He understood the shift only in the economic way of life, but had no vision to grasp the fact that the movement towards the urban areas of the farm–labour was a part of the vast change to come. Other writers, mainly Fielding, were blissfully unaware of the fact. They still continued to describe the beauty of changing rural scenes. In general, the eighteenth century writers did not have the perspective to understand the Industrial Revolution, since it was but an infant force.

It was left to the 19th century writers to explore the effects of the Industrial Revolution on society. Dickens was aware of the vast masses of the city and their unhappy conditions. Dickens described with compassion the sufferings of the lower class of people. He brought to light the evils of factory-life. He knew as to how the industrial management exploited labour and ignored the basic human needs of the workers. Further, he viewed the suffering with great compassion, but the only remedy he had was to awaken the conscience of the upper classes to this condition through his satire. The concern for the 'urderdog' is to be explicitly seen in the political novels of Disraeli. In his novel, ' Sybil ', he gave graphic descriptions of the tyranny of the petty mill-owners. It was made compulsory, he says, that every worker must buy things at the owner's shop. There being no restriction on prices and cruelty, many a worker had to suffer silently the indignities hurled at him. Disraeli, however, did not ask for mercy and favour, but his heroes believed in the revolution. Certain writers like Kingsley and Ruskin tried to appeal to the compassion in man for man. Ruskin once said, " you can't sit at the banquet unless blindfold. " He knew that Disraeli had called the unequal situation as the ' two-England situation ' – one very rich, the other very poor. Kingsley embarked on an experiment to set up a new colony, wherein to create an ideal society. There was among writers an awareness of the growing class-struggle, but they believed that philanthropy was all that was needed.

Mrs. Gaskell is a writer with a difference. she was the first to perceive the class-struggle in its modern form. There are hints of trade–unionism in her working-class heroes. In her famous novel, ' North and South, ' she selects a factory in the north as a locale for her story. The relations between the owner and the labour-leader have come to a breaking point. Workers are on strike, are determined to fight for human dignity and rights. The owner also is equally stubborn. Only the good-wishes and an active effort of the south-born heroine resolve the deadlock. In this

novel, for the first time there is no attempt to suggest a philanthropic solution. For the first time, workers show an awareness of their rights. And it is because of this that Mrs. Gaskell's work is a high water-mark, as it were, in the portryal of the class-struggle.

It was in 1880's that another writer, of working class bias, appeared on the scene. George Gissing had French models like Emile Zola before him. He was the first to focus the writer's camera on the slum-life. His novels have a strange pathos about them. Gissing himself was an integral part of the slums. In such novels as " Born in Exile " he strikes for the first time the note of self-pity, so characteristic of the working-class hero. This theme recurrs in ' The Liza of Lambeth ' by W. Somerset Maugham.

It was not enough,however, to depict the filhy and squalid surroundings of the slums, and the plight of the poor. Galsworthy it was who supplied the missin-element in the series of plays he wrote ' Justice ',·' The Silver Box ' and ' The Strife ' are the plays in which he held the brief for the poor. In the play, ' The Strife, ' he councels restraint to both, – the management and the leaders of the workers. It is the story of a strike of workers, demanding better conditions of work. Neither party budges and the strike goes on grimly. When, at last, compromise is reached, it is found that nothing substantial is gained or lost by either party. If this be the moral, much of suffering of the workers on strike, would have been avoided if the strike itself would have been avoided.

As the technological age replaced the Industrial Revolution, the problems of the lower classes and their suffering took on subtler forms. To explore the problems of the working classes is too subtle a subject to·be dealt with in this essay.

या नव्या जाणिवेतच साहित्यसाधनेचा अंतर्भाव करणे इष्ट आहे. जीवनाच्या गूढाचा अंतिम शोध लावून मानवांना उद्धारक ठरणारी वाङ्मय ही एक गुरुकिल्ली आहे असा भ्रम रेंगाळत आहे खरा. पण तो भ्रम आहे हे बरेचसे कळू लागले आहे. आज निर्व्याज, कलात्मक आसक्ती कलेच्या उगमस्थानी मानून नवे कलावंत रचना करीत आहेत. ही एका नव्या कलात्मक स्वातंत्र्याची जाग आहे.

दि. के. बेडेकर



## Life's For Living

**S. K. Limbore**
Second Year B. A.

All performances of human art, at which we look with praise or wonder, are instances of the idea to make the life worth living.

Youth is a blessed time, the blessedness of which is fully realised only when it has passed. It is a time of inspirations, a time of fancy and the time when the young and plastic mind weaves romance around the future. These dreams of youth rarely materialise; but there is a pleasure in striving for the good and it is striving that makes life worth living. It is because we change our aims and ideals too often that difficulties come in our way, so great sometimes that we are crushed under their pressure and begin to feel that life is not worth living at all. It is at that moment that we realise that life is not a sport but a serious struggle.

Besides singlemindedness we must have self-confidence, if we really wish to feel that 'Life is for living !' In the battle of life, self-confidence is the armour which helps us most when the struggle is sharp. Life cannot fail to bring with it, its storms of thunder of lightning; but self-confidence acts as an invulnerable shield.

Our success in life also depends upon the partner we choose. The partner who knows you, loves you with all your faults, encourages and guides you, cannot but make you feel that 'Life is for living !'

"A faithful partner is hard to find—
But when yon find one good and true,
Change not the old for the new."

The idea that 'Life is for living !' is not based on the idea of happiness, - for we cannot buy happiness with a treasury-note, it is too illusive and belongs to the inner man, - but on the idea of struggle. Struggle is the pith of life. Even birds and beasts, flowers and trees, feel that 'Life is for living !' and there is no reason why only man who is so intelligent and powerful should not feel the same.

What is life ? Some say it is business; some say it is a sport; some say it is a kind of gamble; some say it is a control over nature. I, however, feel that life is an art, the aim of art is to express Beauty. It is the divine touch of beauty that makes works of art immortal. We must always try to express. The Beautiful in every possible way and like a true artist must not rest satisfied until our efforts approach the acme of perfection. It is only in this struggle for perfection that we can hope to feel that

"LIFE'S FOR LIVING ! !"

## Aspiration

— S. S. S.

*My soul is a guided missile*
*That is fuelled by the ancient lore*
*And armed by the golden heritage*
*Its power is beyond any measure*
*And its reach is everywhere*
*One day it will take off*
*From its solid foundations*
*It will go beyond the seven seas*
*And hit the alluring target*
*The vicious commercial giant*
*The fallen political angel*
*Out of their ashes there will emerge*
*A brave new world*
*A BRAVE NEW WORLD*
*My soul is a guided missile*
*One day it will take off*

## The Guiding Force

A. B. Bhurke
Second year B. A.

*When my heart flutters and falters*
*Face to face with destiny dark;*
*Love ! thou art the leading force*
*That guideth the dread dark*
*Of December night to the bracing June*

*The fountain of force that flows and flows;*
*Never lasting, never old*
*Thou hast caught me,*
*For no purpose having a name*
*Held me fast, never to depart*
*As the emotion bodies forth*
*Waves that come, stay and go*
*They leave not there a single mark*
*Of bestial lust, nor of devilish wrath*
*But the unmixed love, that guiding force.*



शैक्षणिक क्षेत्रातील ५० वर्षांच्या बहुमोल कामगिरीबद्दल
शिक्षण प्रसारक मंडळीचे स. प. महाविद्यालय, पुणे ९

यांचे

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेड

तारेचा पत्ता :
माळी शुगर–माळीनगर
टेलिफोन नं २१

स्थापना : १९३२

रजिस्टर्ड ऑफिस :
माळीनगर,
जि. सोलापूर

यांच्या

संचालक मंडळ, उत्पादक सभासद, सर्व सेवक व कामगार

## यांजकडून हार्दिक अभिनंदन

शेतीच्या सर्व उत्पादनांत आघाडीवर असलेल्या
शेतकऱ्यांनीच ३२ वर्षांपूर्वी सहकारी
तत्त्वावर सुरू केलेला व स्वत:
शेतकऱ्यांनी चालविलेला
पहिल्या क्रमांकाचा
साखर–कारखाना

## संचालक मंडळ

*श्री. कृष्णकांत लक्ष्मणराव गिरमे*
*व्हा. चेअरमन*

*श्री. पंढरीनाथ हणमंतराव गिरमे*
*चेअरमन*

*श्री. ह. ब. गिरमे : श्री. भ. ग. गिरमे : रा. ब. ना. स. बोरावके*
*श्री. शं. मा. राऊत : श्री. ज. ग. रासकर : श्री. शं. मा. गिरमे*
*श्री. चं. शं. कुदळे, बी. एस्सी. [ॲग्री.]*
*ऑफिस मॅनेजर : श्री. के. एन. पाटील,*
*बी. ए., बी. एस्सी. बी. कॉम्., एलूएल्. बी.*



# सामाजिक विषय विभाग


बुद्धाची जातिभेदविषयक भूमिका ८४
जिकडे जातो तिकडे माझी भावंडे आहेत ! ८८
विद्यार्थ्यांचे भावजीवन ९०



# बुद्धाची जातिभेद-विषयक भूमिका

**जयश्री गुणे**
तृतीय वर्ष साहित्य

बौद्ध वाङ्मयात इतर कोणत्याही सामाजिक प्रश्नापेक्षा जातिभेद-ब्राह्मणश्रेष्ठता या विषयाच्या चर्चेचे तौलनिक दृष्ट्या जे आधिक्य दिसते, त्यावरून जेव्हा ही सूत्रे रचली गेली, तेव्हाचा हा एक अत्यन्त ज्वलन्त प्रश्न असला पाहिजे हे उघड होते.

### कर्मप्रधान्य

हिंदुधर्म जातिवादी आहे, बौद्धधर्म तसा नाही. म्हणजेच हिंदुधर्मात जातीला जसे महत्त्वाचे स्थान आहे, तसे ते बौद्धधर्मामध्ये नाही, इतकेच. बुद्धाने अनेक सुत्तांत जातिभेदविषयक अशी स्वतःची भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्याच्या धर्मप्रतिपादनामध्ये जातीपेक्षा गुणांना आणि कर्माला अधिक महत्त्व आहे,—

" धर्मचर्यया जघन्यो वर्णः पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ । अधर्मचर्यया पूर्वो वर्णो जघन्यं जघन्यं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ । " ( आपस्तम्ब २. ५. १०, ११ ) व " चातुर्वर्ण्यं मया सृष्टं **गुणकर्मविभागशः** ( भगवद्गीता ) ह्या प्राचीन विचारांशी समान अशीच बौद्ध धर्माचीही भूमिका आहे.

जातीमुळे—जन्मामुळे—माणूस शूद्र होत नाही वा ब्राह्मणही होत नाही. त्याच्या चांगल्या किंवा वाईट कर्मावरच त्याचे श्रेष्ठत्व वा नीचत्व—ब्राह्मणत्व वा शूद्रत्व अवलंबून असते. येथे पूर्वजन्मीच्या कर्मावर भर नाही, तर याच जन्मी हातून घडणाऱ्या क्रिया, कृत्ये यांवर भर आहे. अर्थात त्याही काही अंशी पूर्वकर्मावर अवलंबून असतात हे खरे. पण त्यावरच सर्व भर दिला, तर माणसाला हात-पाय हालविण्यासही जागा राहणार नाही. कर्मश्रेष्ठत्वाबाबतचे आपले मत बुद्धाने खुद्दकनिकायातील सुत्तनिपातामधील ' वसलसुत्तात ' मांडलेले आहे.

**" न जच्चा वसलो होति न जच्चा होति ब्राह्मणो ।**
**कम्मुना वसलो होति, कम्मुना होति ब्राह्मणो ॥ "**

यावरून बुद्धाला जातिप्राधान्य मान्य नसून कर्म—प्राधान्यच मान्य होते, असा प्रस्तुत विषयाचा सारांश.

प्रत्यक्षतः संपूर्णरीत्या जातिभेदावर विचार न करता ब्राह्मण कोणाला म्हणावे; वसल कोणाला म्हणावे; अशा वेगवेगळ्या प्रश्नांच्या संदर्भातच जातिवादाचा विचार अधिक वेळा आलेला आहे. उदाहरणार्थ—वसलसुत्त, वासेठ्ठसुत्त, अस्सलायनसुत्त इत्यादी.

केवळ जातींच्या श्रेष्ठकनिष्ठत्वाचा विचारही ' अम्बट्ठसुत्ता'सारख्या दीघनिकाय, ( सीलक्खन्धवग्ग ) सुत्तात आलेला आहे. या ठिकाणी श्रेष्ठत्वाबाबत द्विविध चर्चा आहे—

( १ ) अम्बट्ठाच्या पातळीवरून जातिविषयक सामान्य विवेचन. ( २ ) ' सील ' सांगून ' विज्जाचरणसंपन्न ' माणूस सर्वात श्रेष्ठ कसा याचे विवेचन, म्हणजेच बुद्धीचे खरे मत.

### क्षत्रियांचे श्रेष्ठत्व

या अम्बट्ठसुत्तात भगवान बुद्धांनी अम्बट्ठ या गर्विष्ठ ब्राह्मणकुमाराला असे सिद्ध करून दाखविले की, ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यापासून मिश्रजातीचा मुलगा झाला तर ब्राह्मण त्याला कमी समजत नाहीत. क्षत्रिय मात्र त्याला अभिषेकास लायक होण्याइतका शुद्ध समजत नाहीत. याहूनही विशेष म्हणजे, ब्राह्मण अपराधी ब्राह्मणाला आपल्यामध्ये वावरू देत नाहीत. पण जातिबहिष्कृत अपमानित अशा अपराधी क्षत्रियाला मात्र आपल्यामध्ये वावरू द्यायला त्यांना हरकत वाटत नाही. यावरून क्षत्रिय हेच ब्राह्मणांपेक्षा श्रेष्ठ आहेत असेच दिसून येते. शिवाय, अम्बट्ठाचा गुरू पोक्खरसाति; याच्यासारखे धनाढ्य ब्राह्मण आपले कर्तव्य असणारे अध्ययनाध्यापन न करता व आचरणही शुद्ध न ठेवता विद्याचरणसंपदा तर दूरच राहिली पण तिच्या अपायमुखाचेही परिपालन न करता निव्वळ चैनीत काळ घालवीत असत. हे असले ब्राह्मण विद्याचरणसंपन्न क्षत्रियांपेक्षा कसे श्रेष्ठ ठरणार ? म्हणूनच बुद्धाने सनत्कुमाराची म्हणून उद्धृत केलेल्या पण त्याच्या नावावर अन्यत्र कोठेही उपलब्ध न होणाऱ्या गाथेत म्हटले आहे—

" खत्तियो सेट्ठो जनेतस्मिं ये गोत्तपटिसारिनो ।
विज्जाचरणसम्पन्नो सो सेट्ठो देवमानुसे ॥ "

म्हणजे, जे गोत्रावरून श्रेष्ठत्व ठरवितात त्यांच्या हिशेबी क्षत्रियच श्रेष्ठ असतो पण खरोखरी पाहता विद्या व आचरण यांनी संपन्न असणारा, सर्व देव व मानव यात श्रेष्ठ असतो.

### बुद्ध ब्राह्मणद्वेष्टा नव्हता

बुद्ध ब्राह्मणद्वेष्टा होता असे मत वरील विवेचनावरून काही अभ्यासकांनी प्रसृत केलेले आहे. पण ब्राह्मणजात तेवढी वाईट, असे बुद्धाने कोठेही म्हटलेले नाही, हे लक्षात घेणे जरूर आहे. याउलट ' ब्राह्मण ' या संज्ञेबाबत बुद्धाच्या मनामध्ये प्रगाढ असा आदरच वसत होता हे त्याने केलेल्या––

" बाहितपापो सो ब्राह्मणो "

अर्थात, ' ज्याचे पाप पूर्णतः नष्ट, व्यक्त आहे, तो ब्राम्हण ' या ' ब्राह्मणा 'च्या व्याख्येवरून स्पष्ट दिसून येते. धम्मपदातील सबंध 'ब्राह्मणवग्गच'च या दृष्टीने लक्षणीय आहे. बुद्धाने ही संज्ञा 'अर्हत्' पदवीस प्राप्त झालेल्यांना अनुलक्षून वापरलेली आहे. केवळ जातीने ब्राह्मणत्व प्राप्त होत नाही, तर कर्माने, आचरणाने ब्राह्मणत्व प्राप्त होते, अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. त्याची ब्राह्मण या जातीवर वक्रदृष्टी नव्हती. पण जे केवळ ' ब्रह्मबंधु ' असून ज्यांच्या अंगी खऱ्या ब्राह्मण्याचा लवलेशही नव्हता, त्यांच्याबाबत मात्र त्याला तिटकारा होता.

ब्राह्मण केवळ जन्माने इतरांहून श्रेष्ठ नव्हेत या आपल्या भूमिकेचे समर्थन त्याने मज्झिमनिकायातील मज्जिमपण्णासकामधील वासेट्ठसुत्तात अत्यंत चांगल्या रीतीने व मोठ्या कुशलतेने केलेले आहे. अस्सलायनसुत्तातही याच प्रकारचे विवेचन आले आहे.

### मानवांत जातींचा असंभव

( १ ) बुद्धाच्या मतानुसार मानवांत जातीच असू शकत नाहीत; कारण किडे, वनस्पती, सर्प, मत्स्य, आदींमध्ये ज्याप्रमाणे निरनिराळ्या जाती स्पष्टपणे डोळ्यास दिसतात, तशा माणसांत दिसत नाहीत. केस, डोके, कान, नाक हे सर्वच अवयव माणसांत समान असतात. 'उच्च' वा 'नीच' या केवळ बोलण्याच्या तऱ्हा आहेत; प्रत्यक्षात जाती अशा मुळीच नाहीत ––

" ततो कीटे पतङ्गे च याव कुन्थकिपिल्लिके ।
लिङ्गं जातिमयं तेसं अञ्ञमञ्ञाहि जातियो ॥
चतुष्पदे पि जानाथ खुद्दकेपि महल्लके ।
लिङ्गं जातिमयं तेसं अञ्ञामञ्ञा हि जातियो ॥
ततो पक्खीपि जानाथ पत्तयाने विहङ्गमे ।
लिङ्गं जातिमयं तेसं अञ्ञमञ्ञा हि जातियो ॥
यथा एतासु जातीसु लिङ्गं, जातिमयं पुथु ।
तथा नत्थि मनुस्सेसु लिङ्गं, जातिमयं पुथु ॥
न केसेहि न सीसेन न कण्णेहि न अक्खिहि ।
न मुखेन न नासाय न ओट्ठेहि भमूहि वा ॥ "

( २ ) ब्राह्मणही योनिजच असतात. ब्रह्मयाच्या मुखापासून उत्पन्न होत नाहीत. ( मज्झिम. ९३. )

( ३ ) शारीरिक शुद्धाशुद्धतेच्या दृष्टीनेही ब्राह्मण व शूद्र दोघेही स्नानादी व्यवहारांनी सारखेच शुद्ध होऊ शकतील.

( ४ ) चारही जातींतील लोक पाणातिपातापासून पटिविरत राहून पुण्यभाक् होऊ शकतील वा पाणातिपातादी पापे करून पापाचे धनी होऊ शकतील; आणि सर्वांना त्या कर्माबाबत स्वर्ग वा नरक सारखाच मिळेल. त्यामध्ये जातीमुळे यत्किंचितही फरक पडणार नाही. येथील कायद्याप्रमाणेही अपराधाबाबत सर्वांना समानच शिक्षा मिळेल. ( मज्झिम. ९४, ९०, ९१, ९६ )

( ५ ) श्रेष्ठ आचारविचार प्राप्त करून घेण्याबाबतही सर्वांनाच मेत्ताभावना प्राप्त करून घेता येईल.

( ६ ) सर्वांचेच श्रेष्ठ धन म्हणजे आर्यलोकोत्तर मार्ग होय.

( ७ ) विद्या वा आचरण यांनीच मान मिळतो; जन्माने नव्हे.

( ८ ) 'जाती अनादिकालापासून चालत आल्या, त्या सर्व जगतात आहेत व त्या बदलत नाहीत,' हे खोटे आहे. कम्बोज देशात आर्य व दास अशा दोनच जाती असून त्या बदलून आर्याचा दास व दासाचा आर्य होऊ शकतो. ( अस्सलायन सुत्त. )

( ९ ) स्वश्रेष्ठत्व प्रतिपादिण्यासाठी ब्राह्मण जी स्वनामाची ब्रह्मयापासून व्युत्पत्ती सांगतात तिचे खंडन करण्यासाठी अग्गञ्ञसुत्तात सृष्ट्युत्पत्तिविषयक एक पौराणिक कथा दिली आहे.

अशी अनेक प्रकारची कारणे ठिकठिकाणी दाखवून देऊन मानवात जातींचा संभवच नाही हे मत बुद्धाने मांडले आहे.

### संघात जातिभेद नव्हता

मानवांत जाती असू नयेत, या स्वमताला अनुसरून, ज्यावर त्याचे पूर्णपणे नियंत्रण होते त्या संघात

मात्र त्याने जातींचे अस्तित्व काढून टाकले होते. त्याचा शिष्यसमुदाय फार मोठा होता. त्यांत सर्व जातींच्या लोकांचा समावेश होता. त्यांत शूद्र होते, कोळी होते, न्हावी होते, दास होते. वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मणही होते. उदाहरणार्थ,

ब्राह्मण - सारिपुत्त, मोग्गलान इत्यादी.
क्षत्रिय – आनंद, अनुरुद्ध इत्यादी.
वैश्य – सोण, वक्कुल वगैरे.
न्हावी – उपालि. कोळी – स्वाती. गोप – नंद
चाण्डाल – सोपाक. फासेपारधी – उपक इत्यादी.

बुद्धाने या बाबतीत स्पष्टच म्हटले आहे—

**" या काचि महानदियो सेय्यथीदं – गङ्गा, यमुना, अचिरवती, सरभू, मही, ता महासमुद्दं पत्ता जहन्ति पुरियानि नामगोत्तानि महासमुद्दो त्वेव सङ्खं गतानि, एवमेव खो ! भिक्खवे, चत्तारो, वण्णा, खत्तिया, ब्राह्मणा, वेस्सा, सुद्दा, ते तथागतप्पवेदिते धम्मविनये अगारस्मा अनागारियं पब्बजित्वा जहन्ति पुरिमानि नामगोत्तानि, समणा सक्यपुत्तिया त्वेव सङ्खं गच्छन्ति । "**

म्हणजे नद्या समुद्रास मिळाल्यावर जशी त्यांची स्वतंत्र नावे राहत नाहीत, त्याचप्रमाणे सर्व वर्णांचे लोक संघात प्रव्रज्या घेतल्यावर आपली पूर्वीची नावे, गोत्रे टाकतात व केवळ शाक्यपुत्र श्रमण म्हणूनच ओळखले जातात.

( १ ) ब्राह्मण जन्माने होत नसून कर्माने, आचरणाने होतो. ज्याची पापे नष्ट झालेली आहेत तो ब्राह्मण,

( २ ) " बाहितपापो ति ब्राह्मणो । " ( धम्मपद ब्राह्मणवग्ग तपश्चर्या, संयम, दम आणि ब्रह्मचर्य पाळणारा, विद्या व आचरण यांनी संपन्न असणारा तोच ब्राह्मण,—

**" तपेन ब्रह्मचरियेन संयमेन दमेन च ।**
**एतेन ब्राह्मणो होति, एतं ब्राह्मणमुत्तमं ॥**
**तीहि विज्जाहि संपन्नो सन्तो खीणपुनब्भवो ।**
**एवं वासेट्ठ जानाहि ब्रह्मा सक्को विजानतं ॥**

( ३ ) केवळ योनिज तो ब्राह्मण नसून अकिंचन अनादान असा माणूस म्हणजे ब्राह्मण कारण सकिंचन माणूस उद्धट असतो.

**" न चाहं ब्राह्मणं ब्रूमि योनिजं मत्तिसंभवं**
**भोवादी नाम सो होति, स चे होति सकिंचनो ।**
**अकिंचनं अनादानं तमहं ब्रूमि ब्राह्मणम् ॥**

( ४ ) त्याचप्रमाणे ' दीघनिकायाच्या सीलक्खन्दवग्गा ' तील सोणदण्डसुत्तांतही ब्राह्मण कोणाला म्हणावे याचा विचार आहे. सोणदण्डमते जाती, वर्ण, मंत्र, शील, प्रज्ञा, या पाच गोष्टी ब्राह्मण्यास आवश्यक आहेत; तर बुद्धाने त्याच्याकडून तीन अंगे अनावश्यक असल्याचे मान्य करून घेऊन शील व प्रज्ञा यांनी युक्त अशा कोणालाही ब्राह्मण म्हणावे हे सिद्ध केले.

मनुष्य आपल्या कर्माने ब्राह्मण होतो, जन्माने नव्हे, हेच बुद्धाला लोकांच्या मनावर ठसवायचे होते. यासाठीचतो अर्हत्पद प्राप्त करून घेणाऱ्या श्रेष्ठ पुरुषास ब्राह्मण संज्ञा देत असे. त्याचप्रमाणे पूर्वी ब्राह्मण शुद्ध राहून स्वकर्म योग्य रीतीने कशी करीत, पण पुढे त्यांचा ऱ्हास कसा झाला, हे त्याने ' ब्राह्मणधम्मिकसुत्ता 'त वर्णिलेले आहे. यावरूनही भगवंताचा कटाक्ष ब्राह्मणजातीविरुद्ध नसून नामधारी ब्राह्मण असून दुराचरणात काल घालविणाऱ्यांवर होता, हे दिसून येते.

बुद्धाच्या मताप्रमाणे वसल [ वृषल=शूद्र ] कोण हे सुत्तनिपातातील ( खुद्दकनिकाय १.७) वसलसुत्तात सांगितलेले आहे—

( १ ) जो माणूस अत्यंत तापट, तामस वृत्तीचा, पापी असतो, त्या कपटी माणसाला ' वसल ' म्हणावे, असे बुद्धाचे मत आहे—

**" कोधनो उपनाही च पापमक्खी च यो नरो ।**
**विपन्नदिट्ठि मायावी तं जञ्ञा वसलो इति ॥ "**

( २ ) त्याचप्रमाणे जो आपल्या वृद्ध झालेल्या मातापित्यांचे शक्य असून पोषण करीत नाही, त्यांना व भावाबहिणींना मारतो, टाकून बोलतो, ज्याला अर्थ विचारल्यास अनर्थ सांगतो, त्याला ' वसल ' म्हणावे,—

**" यो मातरं वा पितरं जिण्णकं गतयोब्बनं ।**
**पहु सन्तो न भरति, तं जञ्ञा वसलो इति ॥**
**यो अत्थं पुच्छितो सन्तो अनत्थमनुसासति ।**
**परिच्छन्नेन मन्तेति तं जञ्ञ वसलो इति ॥**

( ३ ) आणि अखेरीस जो बुद्धाची, त्याच्या श्रावकाची, परिव्राजकाची वा गृहस्थाची निन्दा करतो, तोही वसलच समजावा—

**" यो बुद्धं परिभासति, अथवा तस्स सावकं ।**
**परिब्बाजं गहट्ठं वा तं जञ्ञा वसलो इति ॥ "**

( सुत्तनिपात )

## समारोप

ह्या सर्व विवेचनावरून बुद्धाला जन्मावरून श्रेष्ठत्व मानणे हे अजिबात मान्य नव्हते, हे स्पष्ट दिसून येते.

जन्मामुळे कोणी ब्राम्हण ठरत नाही वा शूद्रही ठरत नाही.

" न जच्चा ब्राह्मणो होति न जच्चा होति अब्राह्मणो ।
कम्मुना ब्राह्मणो होति कम्मुना होति अब्राह्मणो ॥
कस्सको कम्मुना होति सिप्पिको होति कम्मुना ।
वाणिजो कम्मुना होति पेस्सको होति कम्मुना ॥ "

( वासेट्ठसुत. )

अशांसारखे विचार बुद्धाने पुनः पुनः अनेक निरनिराळ्या सुत्तांमधून, प्रवचनांमधून मांडलेले आहेत.

जुन्या शब्दांत नवा अर्थ बसविण्याची बुद्धाची नेहमीची पद्धती या बाबतींतही दिसून येते. त्याने अर्हत्पद प्राप्त झालेल्या, विद्या आणि आचरण यांनी युक्त असलेल्या माणसासच ' ब्राह्मण ' अशी संज्ञा वापरली असून असा माणूस सर्व देवमानुषांतही श्रेष्ठ मानावा, असे त्याचे म्हणणे आहे. ( धम्मपद. )

पण बौद्धधर्म हा प्रामुख्याने भिक्षूंचा समाजविमुख धर्म असल्याने, संघापुरता जातिभेद नष्ट झाला तरी समाजात तो तसाच चालू राहिला. जर बुद्धाच्या या मतांचा त्या वेळी सर्वत्रच प्रभाव पडला असता, तर हिंदूंची जातिव्यवस्था इतकी दृढमूल झालीच नसती व तिच्यामुळे झालेले अनेक अनर्थ, उत्पन्न झालेल्या अनेक समस्या निर्माणच झाल्या नसत्या, असे म्हणता येईल.


## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित

**स्थापना १९१७**

**मुख्य कार्यालय : लक्ष्मी रस्ता, पुणे २**

तारेचा पत्ता — सेन्कोबँक

दूरध्वनी क्रमांक
२४९११ : कार्यकारी संचालक
२४४६४ : व्यवस्थापक
२२४८३ : हिशेब विभाग

( आकडे लक्ष रुपयांत )

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | ... | ... | ७०·१५ |
| खेळते भांडवल | ... | ... | ८०३·८६ |
| ठेवी | ... | ... | ६४८·६१ |
| गंगाजळी व इतर निधी | ... | ... | ३२·०४ |

**याशिवाय वाढत्या कार्यक्षम ३३ शाखा आणि सुरक्षित ठेवघरे**

म. मो. देशमुख
बी. एस्सी. एल्. एल्. बी.
कार्यकारी संचालक

ना. स. मोहोळ
आमदार
अध्यक्ष



# जिकडे जातो तिकडे माझी भावंडे आहेत !


वसन्त शिन्दे
तृतीय वर्ष साहित्य


रवीन्द्रनाथ टागोरांनी पूर्व-पश्चिमेतील भेद मिटावा यासाठी विश्वभारतीची स्थापना केली. 'यत्र विश्वं भवत्येकनीडम्' जेथे सारे विश्व एका घरट्यासारखे होते अशी ती विश्वभारती ! जेथे सारा भारत एक होईल अशीही एखादी संस्था का असू नये ? 'अविभक्तं-विभक्तेषु' — जेथे विभक्तपणाचा भास होतो तेथे अविभक्तपणा, भक्ती निर्माण होईल अशी योजना का नसावी ? विश्वभारती हे आपल्या परराष्ट्रसंबंधाचे सूत्र तर 'आन्तर-भारती' हे आपल्या अन्तर्गत संबंधाचे सूत्र असले पाहिजे. 'आपण सारे एक' ही भावना संतांनी सर्वत्र फैलावली, ती भावना बलिष्ठ झाली पाहिजे.

'अविभक्तं विभक्तेषु' हा तर साने गुरुजींचा स्थायी भाव. जेथे जेथे त्यांना भेद दिसे, तेथे तेथे तो जावा म्हणून त्यांचा प्रयत्न असे. 'मी' आणि 'माझे' या भावनेच्या कात्रीने जीवनाचे सलग असे महावस्त्र कापण्याचा अविवेक माणसाने करू नये ही त्यांना तळमळ. जातीयतेप्रमाणेच प्रांतीयताही त्यांना खपायची नाही. एका भारताचा विचार मनात येऊन ते उचंबळत. परंतु भाषाभिन्नतेमुळे लोकांचा एकमेकांशी परिचय होत नाही आणि ह्या अपरिचयामुळे भीती आणि अप्रीती फोफावत जाते. द्वेषमत्सर निर्माण होतो. परस्परात सद्भाव व विश्वास असला तरच भारत सामर्थ्यसंपन्न व समृद्ध होणार. जर एकमेकांच्या भाषा, रीतिरिवाज समजले, परस्परपरिचय वाढला तर ह्या विविधतेमधील एकता अनुभवण्याची शक्ती येईल.

आन्तरभारती भारतातील परस्परांना जोडणारी व विश्वभारती जगाशी भारताला जोडणारी. परंतु एवढ्याने साने गुरुजींचे समाधान नव्हते. प्रत्यक्ष या कामासाठी एखादी संस्था असावी असे त्यांना वाटे. ते म्हणत, "आन्तरभारती स्थापण्याचे माझे कधीपासूनचे स्वप्न. सुंदरशी जागा असावी. तेथे त्या त्या प्रांतीय भाषेतील कोणी तज्ज्ञ असतील, त्या सर्वांना हिन्दी येत असावी. त्या त्या भाषेतील वाङ्मय तेथे राहील. संस्थेला जोडून विद्यालय असावे. शेती, हस्तोद्योग असावेत. भारतीय भाषा शिकवण्याची तेथे सोय होईल. विद्यार्थ्यांच्या कानावर सर्व भाषा पडतील. त्या त्या साहित्याचे मराठीला परिचय करून देण्यात यावेत. इतर भाषांतूनही मासिके काढून त्या त्या प्रांतीयांना सकल भारताची ओळख करून द्यावी. असे माझे स्वप्न."

विविधता ही वैरभावाला कारणीभूत न ठरता वैभवाची जननी बनावी ही आन्तरभारती मागील भूमिका आहे. भारताचा विकास होत असताना विविध प्रांतांनी परस्परांच्या समृद्धीसाठी, विकासासाठी प्रयत्नशील व्हावे हेच अभीष्ट आहे आणि तेच आन्तरभारतीचे कार्य आहे.

आन्तरभारती ही काही केवळ वेगवेगळ्या भाषा शिकण्याची चळवळ नव्हे. आन्तर-भारती म्हणजे अंतःकरणाची ओळख. अंतःकरणात प्रेम असेल तर शब्द न समजले तरी हृदय उचंबळून येईल; त्या उलट जर अंतःकरणात प्रेम नसेल नि परस्परांच्या भाषा अवगत केल्या तर त्या परस्परांना शिवीगाळ करण्याच्याही कामी येतील. साने गुरुजी म्हणत, साऱ्या जगभर चालणारी एक भाषा आहे आणि ती म्हणजे हासूची आणि आसूची. शब्दांपलीकडची ही भाषा. अंतःकरणाला जाणवणारी, हलवणारी. आणखी एक सार्वत्रिक भाषा आहे आणि ती म्हणजे घामाची. परस्परांसाठी जर आपण एकत्र घाम गाळू लागलो तर त्या घामात प्रेमाची बीजे तरारून उठतात. ही भाषाही सार्वत्रिक आहे. आन्तर-भारती वृत्ती ज्यांच्यात भिनली ते परस्परांच्या भाषांचा, कलांचा, रीतिरिवाजांचा, सणा-उत्सवांचा अभ्यास करतील. बंगालचा दुर्गापूजेचा उत्सव सर्वांना आपलाच वाटेल आणि कर्नाटकाच्या नाडहब्बामध्ये सगळे सामील होतील. तमिळनाडचा पोंगळ आणि उत्तर प्रदेशातील होळी, साऱ्या देशाची. आणि महाराष्ट्रातील दिवाळीच्या आनंदातही सारे सामील

होतील. भारतीयत्वाचा विकास हेच अन्तर-भारतीचे ध्येय आणि त्याला पोषक अशी जी शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक कामे ती ती आन्तर-भारती चळवळीची अंगोपांगे. एका इंग्रजी ग्रंथकाराने म्हटले आहे, "ज्याला फक्त इंग्लंडच माहीत आहे त्याला इंग्लंडही धड माहीत नसते!" त्याप्रमाणे ज्याला फक्त आपलाच प्रांत वा देश माहीत आहे त्याला आपला प्रांतही धड माहीत नसतो.

साने गुरुजी म्हणत, "आपण अखंड भारत म्हणून म्हणत आलो. परंतु या भारताचे आपणास ज्ञान नाही. हे सारे प्रांत माझे, या सर्व भाषा माझ्या, हे सारे माझे भाऊ, सर्वांना भेटेन, सारे अभ्यासीन, असे आपणास कोठे वाटते? महात्माजी देशातील निर-निराळ्या भाषा वेळात वेळ काढून अभ्यासीत. विनोबाजी तेच करीत आले. आपणांपैकी कितीकांना ही तहान आहे? मुंबईत रशियन, फ्रेंच, जर्मन वगैरे भाषा शिकवायची सोय आहे. परंतु अशी संस्था नाही की, जेथे सकल भारतीय भाषा शिकता येतील."

१९५१ मध्ये साने गुरुजींच्या निधनानंतर त्यांच्या मित्रांनी निधी उभारून महाराष्ट्रात ह्या कार्यास आरंभ केला. आचार्य स. ज. भागवत यांनी बंगाली भाषेचे वर्ग चालवले. कर्नाटकचे साहित्यिक श्री. मास्ती व्यंकटेश व प्रा. रं. श्री. मुगळी यांची कन्नड साहित्य आणि लोकजीवन यावर व्याख्याने झाली. गुजरातचे श्री. गुलाबदास ब्रोकर व श्री. उमाशंकर जोशी यांचीही गुजरातच्या लोकजीवनावर व साहित्यावर पुण्यात व्याख्याने झाली. गुजराती भाषेचे वर्ग चालवले गेले. पुण्यात 'आन्तरभारती' क्लबचे कार्य सुरू झाले. त्यात विविध भाषिक एकत्र येऊन साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक समस्यांवर औपचारिक चर्चा करू लागले. रवीन्द्रजयंती व त्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम होऊ लागले. 'ईद–होली' मीलनाचा कार्यक्रम साजरा होऊ लागला. आसाम दुष्काळाच्या वेळी मदतफंड उभारला गेला. पुण्याबाहेर भारतातील काही प्रमुख शहरी आंतरभारतीचे कार्य हळूहळू वाढू लागले.

गतवर्षी युवकांना दक्षिणभारतीय भाषा शिकण्याचे आवाहन करून आन्तरभारतीने एक तमिळ भाषाभ्यास वर्ग चालवला. त्या वर्गातील १५ विद्यार्थ्यांनी ह्या वर्षी तमिळनाडला जाऊन, तेथील परिवारातून राहून, खेड्या-तून पदयात्रा करून लोकजीवनाचा अभ्यास केला. हिन्दी-विरोधी-
आंदोलनाच्या निमित्ताने तमिळ माणसाचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न केला. प्रा. वसंत बापट व श्री. हेगडे यांनी आन्तर-भारतीच्या शिष्यवृत्तीवर संपूर्ण भारताचा प्रवास करून सांस्कृतिक जीवनावरील महाराष्ट्र-दर्शनानंतर 'भारत-दर्शन' हा कार्यक्रम घडवण्याची पूर्वतयारी केली.

या वर्षी गुजरातमधील 'बेतालिस-बिरादरी' व आन्तर-भारतीच्या वतीने अहमदाबाद व पुणे येथे स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम झाले. त्यात साहित्य, शिक्षण, सामाजिक समस्या आदी विषयांवर उद्बोधक चर्चा झाली; व 'स्टूडंट एक्स्चेंज' सारखे कार्यक्रम निश्चित केले गेले.

विभिन्न प्रादेशिक भाषांचे वर्ग, आन्तर-भारती क्लब, विद्यार्थी व युवकांची आन्तरप्रांतीय श्रम-शिबिरे, पत्र-मैत्री, प्रादेशिक भाषांतील साहित्याचा अनुवाद, विविध सांस्कृतिक-सामाजिक वैशिष्ट्यांची परिचयात्मक व्याख्यान-माला, सण, समारंभ, संगीत, नृत्य, लोककथामाला, अन्य प्रदेशातील विद्यार्थ्यांना सुट्टीत निमंत्रण देऊन सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा परिचय करून देणे इत्यादी गोष्टींचा आन्तर-भारतीच्या कार्यक्रमात समावेश होऊ शकेल.

आन्तर-भारतीचा कार्यक्रम शैक्षणिक व सांस्कृतिक-सामाजिक आहे. राष्ट्रीयता हा प्रत्यक्ष जीवनानुभव झाला तरच तो प्रभावी होईल. केशवसुत आपल्या अमर-काव्यात ही दृष्टी देऊन गेले आहेत.

**जिकडे जातो तिकडे माझी भावंडे आहेत**
**सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत!**

ही अनुभूती म्हणजेच अभिजात राष्ट्रीय भावना, हीच आन्तर-भारती वृत्ती! तिचा या देशात सुकाळ होवो!

०००



# विद्यार्थ्यांचे भावजीवन

## एक मनोगत

**बाजीराव शिंदे**
तृतीय वर्ष साहित्य

एखाद्या कॅलिडिओस्कोपमधल्या रेखाकृती क्षणाक्षणाला बदलत असाव्यात त्याप्रमाणे आजच्या समाजजीवनाचे झाले आहे. विज्ञान युग उंबरठा ओलांडून आले आहे आणि त्याच्या स्पर्शाने एक चमत्कार घडवला आहे : या चमत्कारातून अनेक यांत्रिक किमया घडल्या असल्या, चंद्र-मंगळावर उड्डाण करायची स्वप्ने साकारत असली तरी 'माणूस' त्यात हरवतो आहे. आणि एका कसल्यातरी अस्वस्थेचे सावट अवघ्या समाजजीवनावर झाकोळते आहे. परिणाम म्हणून की काय विद्यार्थ्यांच्या भावजीवनावरही त्याची छाया पडली आहे; निरनिराळी आव्हाने त्यांना पुरती न आकळल्याने त्यांच्या शक्ती वेगळेच रूप धारण करत आहेत.

आजच्या परिस्थितीचा हा असा विचार करताना एकसारखे मनात येते : हे घडते ते काही एखाद्या क्षणिक उद्रेकाने नव्हे. पूर्वी कधी तरी तड गेली नि त्याचा हा परिणाम झाला. विद्यार्थ्यांचे भावजीवन, त्यांच्या आकांक्षा-त्यांच्या प्रेरणा ह्यांचा नि समाजाचा संवाद कुठेतरी खंडित झाला, दुवा तुटला; त्यामुळेच दिशा चुकली. संवेदनाशील वयात विद्यार्थ्यांवर जे संस्कार व्हावयास हवेत, जे वळण त्यांना लागायला हवे त्याकडे योग्य ते लक्ष दिले गेले नाही. शालेय अभ्यासानंतर जीवनाच्या संगरात यशस्वी होण्यासाठी जे पाथेय—संस्कारांचे, विचारांचे, प्रेरणांचे पाथेय – ते त्यांना पुरेसे मिळाले नाही. ती शिदोरी अपुरी पडली आणि मोहोरणारे झाड बहर येण्याआधीच खुरटावे, त्याची पाने गळावीत, केवळ सांगाडा तेवढा उभा असावा; पुन्हा पर्जन्याची, भूमीच्या ओलाव्याची वाट पहात असावे, तसे झाले आहे. हा पर्जन्य, ओलावा विद्यार्थ्यांना कुठून मिळावा – आजच्या समाजात ? – अर्थातच विद्यामंदिरे, थोर विचारवंत, उत्तमोत्तम ग्रंथांचे वाचन यांतून !

पण हे सारे विचार मनात येऊनही एक मोठीच खंत वाटते. हे शब्दच उरतात केवळ थोर थोर ! त्यांचे मूल्य हाती लागत नाही – त्यामुळेच खूप निराशा वाटते. मग वाटते खटपट केली पाहिजे; आणि तेही समाजाच्या सर्व थरांत चालले पाहिजे. विचारांना जेव्हा प्रत्यक्ष कृतीची जोड मिळते, नव्या प्रेरणा मिळतात, कालमानानुसार नवी ध्येये, जिद्द हे सारे मिळते तेव्हाच नवे मूल्य मिळेल.

आजच्या विद्यार्थ्यांच्या पिढीवरच उद्याच्या समृद्ध समाजाची स्वप्ने साकार करण्याची जबाबदारी आहे. आज जरी मळभ दाटलेले असले तरी उद्या पुन्हा स्वच्छ, सोनेरी उन्हे पडतील किंवा सरसरून पाऊस बरसून जाईल ! मग आकाश मुक्त असेल ! पण तूर्त तरी असे म्हणावे लागते की आजच्या विद्यार्थ्यांचे भावजीवन, त्यांना मिळणारे उच्च शिक्षण, संस्कार यावरच हे अवलंबून आहे.

भावजीवन म्हणजे तरी काय ! –विद्यार्थ्यांचे वय संवेदनाशील असते. या वयातच जीवनाचे चौफेर दर्शन वेगवेगळ्या माध्यमांतून त्यांना घडू शकेल, आणि स्वत: काहीतरी करण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. त्यांच्या आकांक्षांना योग्य ती संधी मिळवून दिली पाहिजे. अनेक अडचणी, प्रश्न जागजागी उभे असतात, एखादा क्षण जरी हुकला तरी अवघी दिशाच कलाटणी घेऊन जाते; एखादेवेळी असा प्रसंगच आला तर धीराने त्याला तोंड देण्यासाठी जे सामर्थ्य लागते तेही त्यांच्यात निर्माण केले पाहिजे. यासाठी त्यांच्या मनोभूमीची मशागत लहानपणापासूनच केली पाहिजे. यासाठी त्यांच्या धडपडीस यशाची वाटचाल दाखवून देणारी आणि समाधान वाढवणारी माणसे सुद्धा हवीतच. ज्यांनी स्वत:च्या प्रेरणा शोधून आपले जीवन उन्नत केले आहे, ज्यांनी जीवनाचे सखोल चिंतन, मनन केले आहे, अशांचे अनुभव त्यांना उपयोगी पडू शकतील. ह्यालाच 'ओरिएंटेशन' म्हणजे नवी दिशा असेही म्हणता येईल. ह्यातून विद्यार्थ्याला स्वत:च्या प्रेरणांचा

शोध घेता येईल.

आजचे जग विस्तारते आहे. जीवनाची क्षितिजे विस्तारत आहेत. या व्यापक क्षितिजांचे दर्शन विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या माध्यमांतून दिले तर त्यांतून नवा ध्येयवाद निर्माण करता येईल. नवी दिशा म्हटले ते अशा अर्थाने. प्रत्येकाच्या अभिरुची पडताळून त्याच्या मनावर ध्येयाचे शाश्वत चित्र उमटेल अशा प्रकारचे प्रयत्न अपेक्षित आहेत. अभ्यासक्रमातूनसुद्धा हे करता येईल. शिकविण्याच्या पद्धती, पुस्तके, गुरु-शिष्याचे दृढतर स्नेहसंबंध यांच्यातून या नव्या दिशेची जोड करून घेता येईल. नवीन काही घडवण्याची जबाबदारी आजच्या विद्यार्थ्यांवर आहे, याची जाणीव करून देता येईल.

अर्थात हे करायचे म्हणजे मुळातूनच हळूहळू प्रयत्न केले पाहिजेत. मुलांच्या ऊर्मी जोपासण्याचे आणि त्यांना योग्य वळण लावण्याचे काम हे पायाभूत काम आहे. सत्य, शिव, सुंदर यांची ओढ मानवी मनाला जात्याच आहे. आजचा संदर्भ पाहिला तर ! सत्य, त्याची आराधना मृगजळासमानच आज होते ! शिवाच्या बाबतीत घटपटाची साधना जमत नाही. मग उरले ते सुंदर ! विद्यार्थ्यांच्या सौंदर्यपूजक मनाला नवी दिशा देता येईल. जगात जे असुंदर आहे, त्याला सुंदर करण्याची शक्ती माणसात आहे; तिला चेतना देता येईल. केवळ कलाकृतीचेच नव्हे तर समाजातलेही सौंदर्य पाहण्याची शक्ती त्याला साहित्यातून, माणसामाणसांच्या सहजसंवादातून देता येईल. ही सुद्धा नवी दिशा नव्हे काय ? प्रत्येक क्षणाला बदल घडत असतो, त्या परिवर्तनातही लावण्य असते, हे दाखवून दिले तर मनाला केवढे तरी क्षितिज गवसल्याचा आनंद होईल ! मग निराशेतूनही चैतन्य, सोनेरी कडा चमकू लागतील !

समाजातील विविध घडामोडींचा विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होत असतो. कित्येक वेळा त्यांना आपल्या सभोवती काय घडते याचा अन्वयार्थ लागत नाही. सत्यच त्यांना गवसत नाही. मग कुणी तरी संधिसाधू त्यांच्या कार्याला भलतेच वळण लावतात. त्यांच्या शक्तीला कुठली वाट मिळते हे पहायचे काम ज्यांचे आहे त्यांचे या बाबतीत दुर्लक्ष होते आहे ही दुःखाची गोष्ट आहे. त्या विद्यार्थ्यांच्या मनात कसली वादळे उठताहेत हे कुणी जाणूनच घेत नाही. त्यांच्याशी बोलायला कुणी जात नाही. बोलायला म्हणजे त्यांच्या मनात विश्वास निर्माण होईल असा संवाद करायला ! त्यांच्या अंतर्मनाशी संपर्क साधायला ! आज माणसे गर्दीशी बोलू शकतात; गर्दीची नाडी, 'मास–सायकॉलॉजी,' त्यांना चांगली अवगत असते. पण व्यक्तिव्यक्तीत आपण स्नेहसंबंध राखू शकत नाही. आवाहन करू शकत नाही.

विद्यार्थ्यांच्या भावजीवनाचा विचार करावा, तो तो आपल्याला त्यांच्या अंतर्मनातले आणखी तरल थर जाणवतात. आपली सामाजिक घडी अशी काही विचित्र झाली आहे की कित्येक मुलांना सारे काही त्यांच्या मनाविरुद्ध करावे लागते. कुणाला चित्रकार व्हायचे असते, त्याच्या नशिबी आकडेमोडीची कारकुनी येते. कुणाला पायलट व्हायचे असते, तो कारखान्यात ठाकठोक करतो. काम कुठलेही असो ते वाईट नाही ! अगदी खडी फोडणारापासून ते पायलटपर्यंतची सारी सारी कामे थोरच ! पण ज्याची ज्याला आवड असेल त्या क्षेत्रात जर त्याला संधी मिळाली तर तो खऱ्या खुऱ्या अर्थाने उत्तम प्रगती घडवू शकेल ! भव्यदिव्य स्वप्नांना जमिनीवर आणू शकेल ! अर्थात प्रत्येक वेळी सर्व संधी हात जोडून उभ्या असतील असे नव्हे. पण शक्यतो संधी मिळायला हव्यात, द्यायला हव्यात !

ज्यांचे भावजीवन असे संस्कारित, विकसित झाले आहे ते विद्यार्थी मग उद्याचे भवितव्य उज्ज्वल करू शकतील. नवे जीवन ते घडवतील. 'भावजीवन' मग हे केवळ असे पाच अक्षरांत अडकून रहाणार नाहीत ! आणि शब्द शब्द राहणार नाहीत ! मात्र त्यासाठी शिक्षकांनी, प्राध्यापकांनी, शिक्षणतज्ज्ञांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी, शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. स्वतः विद्यार्थ्यांनीही याबाबतीत भावसाक्षर बनले पाहिजे !



# विज्ञान विभाग


| | |
|---|---|
| पर्णसंभार | ९३ |
| जीवनविषयक एक उर्ध्वपातित दृष्टिकोन | ९७ |
| *History of Calculus* | *99* |



# पर्णसंभार

प्रा. तारा वामन केळकर

पर्णसंभार म्हटल्याबरोबर, मोहोरलेल्या डेरेदार आम्रवृक्षांची पर्णराजी डोळ्यापुढे येते. आम्रवृक्षांच्या शाखाग्रांवर बसलेल्या कोकिळांचे कुहूकुहूचे मधुर स्वर कानांत घुमू लागतात.

पौर्णिमेच्या रात्री अथांग सागरातून नौकाविहार करीत असताना, चांदण्याच्या रुपेरी रसात भिजलेल्या माडांच्या झावळ्या चमचमत असतात; आणि वाऱ्याच्या धुंगुरांवर त्यांचे मनोहारी नृत्य चालू असते.

उगवतीजवळ असणारा अरुणाचा गुलाबी पडदा, हलक्या हाताने बाजूला सारून उषादेवी रविकराला धरून लाजून भूतलावर येऊन हास्याचा सोनेरी गुलाल उधळते. त्याच्या वर्षावाने रंगून गेलेला पिंपळाचा पर्णसंभार, आनंदून हर्षाने नाचू–बागडू लागतो. सळसळणारा तो त्याचा हर्ष आपल्याला धुंद करतो.

बादली मेघांच्या वर्षावाचे पाणी पिऊन धरणी तृप्त होते. तृप्तीचे समाधान, हिरव्यागार बीजांकुरांच्या इवलाल्या रोपाच्या स्वरूपात दिसते.

कोवळ्या पातीसारख्या पर्णांच्या हातांनी टाळ्या पिटणारा, सृष्टीदेवीच्या भजनात तल्लीन होणारा हा पर्णसंभार, डोळ्यापुढे आणि मनःचक्षूंपुढे सतत डोलत राहतो.

अशी कितीतरी तऱ्हेची पर्णराजी आपल्याला मोहून टाकीत असते; अन त्याच क्षणी विचार येतो, की खरोखरच किती तऱ्हेचा पर्णसंभार या भूतलावर आहे ! खरोखरच, पर्ण, पान, म्हणजे आहे तरी काय ? अनेक तऱ्हांच्या प्रश्नांची विचारमालिका सुरू होते.... शेवटी विचार, कुतूहल आणि उत्सुकता अगदी एका टोकाला जाऊन पोहोचले; त्यांची एक दुर्बीण सज्ज झाली, सूक्ष्मदर्शक यंत्र तयार झाले. त्याच्या साहाय्याने, वनस्पतीच्या जन्मापासून निरीक्षणाला सुरुवात झाली.

निरीक्षणाने असे सांगितले की अगदी प्राथमिक स्वरूपाच्या वनस्पतीपासूनच उत्क्रांती होत होत आजची विद्यमान वनस्पती पृथ्वीतलावर निर्माण झाली. आणि आजच्या वेगवेगळ्या तऱ्हांच्या म्हणजे पाने, फुले, फळे, बिया येणाऱ्या वनस्पतीचा अभ्यास करणारा मानवही उत्क्रांतीतूनच पृथ्वीवर वावरू लागला.

विद्यमान वनस्पतींबरोबरच, प्राथमिक वनस्पतीही भूतलावर आनंदात वाढत आहेत.

प्राथमिक वनस्पतींना पाने नाहीत. काही वनस्पतींना पानांची कार्ये करणारे नुसते अंकूरच आहेत. काहींना नुसते पानांसारखे दिसणारे पातळ, बारीक, पसरट भाग आहेत, पण त्यांना फुलेच नाहीत. नेच्यासारख्या वनस्पतींना पाने आहेत, पण फुलेच नाहीत. खरी पाने मात्र फुले, फळे येणाऱ्या वनस्पतींनाच आहेत.

पानांना दोन बाजू असतात. शिरांचे जाळे, नाही तर समांतर शिरा असतात. ह्या शिरांमुळे पानाला आकार मिळतो, कणखरपणा येतो, पाने फाटू शकत नाहीत. आणि पानांना कच्चे अन्न पुरविण्याचे कार्य शिरा करतात.

पाने वनस्पतींची नाके आहेत. कारण त्यावर असलेल्या छिद्रांच्या साहाय्याने पाने श्वासोच्छ्वास करतात, शोषून घेतलेले जास्तीचे पाणी वाफेच्या स्वरूपात बाहेर टाकतात. आणि सूर्यप्रकाशात अन्न तयार करतात. अन्न तयार करण्याच्या वेळी पानांच्या अंतरंगात अनेक तऱ्हेच्या रासायनिक क्रिया घडतात; म्हणून पानांना वनस्पतींचा रासायनिक कारखाना म्हटले आहे. बुडलेल्या पाणवनस्पतीत पर्णछिद्रेच नाहीत, तरी ती अन्न तयार करतात; तर तरंगणाऱ्या पाणवनस्पतीत फक्त वरच्या भागावरच छिद्रे आहेत; तर रुक्ष वातावरणात वाढणाऱ्या वनस्पतीत अगदी कमी, मोजकी आणि खालच्या बाजूवरच फक्त पर्णछिद्रे आहेत.

काही पानांना देठे आहेत, तर काहींना नाहीत काहींचे पर्णतळच देठाचे कार्य करतात. ऑस्ट्रेलियन

बाभूळ-वनस्पतीत बारीक उपपर्णे पर्णतळाशी असतात, पण मुख्य पानच लवकर गळून पडते, त्यामुळे बिचाऱ्या देठालाच पानाचे स्वरूप घेऊन पानांच्या सर्व भूमिका रंगवाव्या लागतात. असे हे पर्णदेठ अर्धचंद्राकृती आकाराचे असून सतत हलत राहून आपले बदललेले स्वरूप लोकांच्या निदर्शनाला आणण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो.

इतकी माहिती मिळाली तरी पानांची ही कथा अगदी रसहीन वाटते ना! आपण म्हणू लागाल की पानांत काही रसच नाही. पण सबूर सबूर! असे एकदम एका टोकाला नका जाऊ. जरा सहृदयतेने, रसिकतेने त्यांच्यावर नजर टाका.

प्रामुख्याने हिरवाच रंग दिसतोयना! पण जरा एकाग्रतेने पाहिले की हिरव्या रंगाच्या कितीतरी विविध छटा त्यांच्यात दिसतात. विस्तीर्ण पसरलेल्या गवताच्या पट्ट्याकडे पाहिले किंवा घनदाट वृक्षराजीकडे पाहिले म्हणजे वाटते की हा गर्द हिरवा रंग चांगला, की पाचूसारखा हिरवा रंग मनमोहक, की हा पोपटी रंग मनोवेधक की शेवाळी रंग मनाला आनंद देणारा! अशा संभ्रमात वाऱ्यावर डोलणाऱ्या पर्णसंभाराच्या तालावर मन आंदोलत असते.

काही वेळी ही संभ्रमावस्था मनाला हिरव्या पर्णराजीऐवजी, लाल, विटकरी, पिवळी, पांढरी, जांभळी, शिडकाव्याची, अनेक रंगांच्या वेगवेगळ्या छटा असलेली, पर्णसंभाराचा साज घातलेली वनस्पती आकर्षणाच्या चक्रात पूर्णपणे घुमवते. मनात रस्सीखेच सुरू होते. मन विचारांच्या कल्लोळात सापडते.

विविध तऱ्हेच्या रंगांच्या बुरख्याआड हरितद्रव्य दडलेले असते. म्हणून अशी रंगीत पानांची झाडे अन्न तयार करतात. पानांचा हा हिरवा रंग, आणि अनेक रंगांची सरमिसळ असलेला हिरवा रंग पानापासून काढून घेता येतो. एक आहे क्लोरोफिल ए. आणि दुसरे आहे क्लोरोफिल बी.

हिरव्या रंगाने, आणि अनेक रंगांनी नटलेला हा पर्णसंभार नुसत्या रंगांनी नाही मोह घालीत, तर त्याच्या जोडीला, आकार, कडा, टोके, खोडावरील मांडणी, यांची भर घालून मोहातील मोह वाढवितो.

आंबा, चाफा, पेरू, आणखी कितीतरी झाडांची, रोपांची वेलींची पाने बहिर्गोल भिंगाच्या आकारासारखी तर मुद्रा, भेंडीचे झाड, निळी घंटी, पोपटवेल यांची पाने आहेत हृदयाकृती. गवत, ज्वारी, मका, बाजरी, गहू, नागदवणा, लिली, केवडा यांना आहेत पातीसारखी पाने. वडाची आणि वडासारख्या इतर वृक्षांची पर्णराजी आहे अंडाकृती पानांची. उंदिरकानी वनस्पतींची पाने आहेत पिटुकल्या उंदराच्या कानाच्या आकाराची. कमलपत्रे आहेत ताटलीसारखी वाटोळी. अशाच एका कमलपत्रावर कमलकलिकेच्या कलमाने शकुंतलेने प्रेमपत्र लिहून कमलपत्रांना अमर केले. व्हिक्टोरिया रेजियाची पाने थाळ्यासारखी जलाशयात – उपवनातील सरोवरात आणि ॲमेझॉन नदीच्या पात्रात अगदी हारीने मांडल्यासारखी दिसतात. ब्रह्मीची पाने घेवड्याच्या बीच्या आकारासारखी. एरंड, पपई यांची पाने पंजाकृती आहेत. द्राक्षाच्या, कृष्णकमळाच्या वेलीचे त्रिकोणी पान प्रियपतीचे नाव काव्यात गुंफण्याचा मान स्त्रीला मिळवून देते.

गणेशपुष्पांची पाने अतिकोमल, नाजूक पण फणीच्या दात्यांच्या आकाराची. तर अळूची आणि अळूवर्गातील वनस्पतींची पाने बाणाच्या टोकासारखी टोकदार. पण अशा पानांनी कुणाच्या हृदयाला जखम केली नाही; पण ते हृदय मात्र हेलावून टाकते. पिंपळाच्या कोवळ्या पानांचा गहिरा, गाभूळलेल्या चिंचेसारखा रंग आणि त्यांची निमुळती टोके मनात घर करतात, तर घायपातीच्या पानाचे सुईसारखे टोक जपून राहण्याचा इशारा देते. आपटा–कांचनाचे जुळे पान भिन्नत्वाची भावना भिरकावून द्यायला लावते.

कर्दळ, केळी, आंबा, वड यांच्या पानांच्या कडा सरलमार्ग स्वीकारा असे सांगतात. पण याच्या उलट अबोली, मका, पानांचा अशोक यांच्या पर्णांच्या कडा सरलमार्ग सापडला नाही तर वक्र मार्गाने ध्येय कसे गाठावे याचा सल्ला देतात. घाठोरीच्या जास्वंदीच्या पानांची कड करवतीच्या दात्यांसारखी. केवडा, पिवळा धोत्रा यांची पाने काटेरी कडा अंगाला टोचून आपले अस्तित्व दाखवितात.

काही पर्णसंभार संयुक्तपर्णांनी युक्त आहेत. ते दरवळेस साधे राहू नका असा आदेश देतात. चिंच गुलमोहर, टाकळा, बाभळी यांच्या संयुक्त पानात सम पर्णिकांच्या समांतर ओळी आहेत; तर गुलाब, कडूनिंब, बूच यांच्या पानांत विषमपर्णिका असतात.

लिंबाची पाने, बेलाची, निर्गुंडीची त्रिदळे, सप्तपर्णीची सातदळे, काटे-सावरीची पाने पंजाकृती संयुक्त पाने आहेत. बेलाचे त्रिदळ मिळाले नाही तर निर्गुंडीचे त्रिदळ शंकराला वाहून पूजेची सांगता करता येते.

ताडाची, पोफळीची पाने पंख्यासारखी आहेत. सृष्टि-देवीचे हे वाऱ्याचे पंखे, मानवाने गरजेमुळे वापरायला सुरुवात केली. अन पंखे, पंख्यांचे असंख्य प्रकार अस्तित्वात आले.

सुयांसारखी पाने असलेले सूचिपर्ण वृक्ष बर्फाच्छादित जागेत रहातात. आणि ही सुईसारखी पाने त्यांचे जीवन जगवतात. पंचमढीच्या उंच अन विस्तीर्ण पठारावर गवताच्या हिरव्यागार गालिच्यावर हे अनेक तऱ्हेचे सूचिपर्णांचा पर्णसंभार असलेले वृक्ष ध्यानस्थ मुनींसारखे उभे राहिलेले दिसतात.

बाभळी, बोरी, तरटी या झाडाची काटेरी उपपर्ण असलेली पाने रुक्ष, प्रदेशात कणखरपणाने उभी राहून 'ज्या गावच्या बाभळी, त्याच गावच्या बोरी' ह्या म्हणीला जरी जन्म दिला असला तरी, अतिशय बिकट परिस्थितीवर कशी मात करावी याचा धडा घालून देतात.

घोटवेल, वाटाण्याचा वेल, मटाराचा वेल, आम्ही एकएकटे जरी कुमकुवत असलो तरी सज्जनांच्या नुसत्या आधारांवर कसे बळकट होतो ते पहा, असे सांगताना दिसतात. कळलावीच्या पानांच्या टोकाचे तणावे, सगळ्यांच्या नकळत, गोड कळ लावून, आपला खोडकरपणा दाखवतात.

घोटवेलाचे उपपर्ण-तणावे एखाद्या वृक्षाला विळखा घालून सूर्यकिरणांचा मेवा खाऊन उंच निळ्या आकाशाच्या समुद्रात पोहण्याकरिता सज्ज होतात. तर वाटाण्याचे वेल त्याच्या पर्णिकांच्या तणाव्यांच्या मदतीने आधारावर तुरूतुरू चढून विशाल आकाशास आपल्या कवेत घ्यायला बघतात.

काही पसंर्णभारांनी तर आपले बाह्यरूप पार बदलून टाकले. का? तर केवळ त्यांची जन्मदात्री भूमी, पोषण करायला कामकुवत झाली, असमर्थ झाली म्हणून अशा वनस्पतींनी आपल्या जन्मदात्या भूमीला दोष दिला नाही, तर स्वतः जोमाने जोषात वाढून तिची बाळे बलवंत आहेत असा दिलासा दिला. छंदपर्णी या कीटकभक्षी वनस्पतीची पाने निरनिराळ्या प्रकारचे कलश, घट तयार करतात. तर गेळ्याची पाणवनस्पती पानांचे बारीक बारीक पारदर्शक फुगे दाखविते. माशीमारी वनस्पतींत पानांचे वेगवेगळ्या घडणीचे सापळे तयार झालेले दिसतात. ही रूपांतरित पाने जरा कठोर वृत्तीची वाटतात नाही! पण ह्या लालपत्ता किंवा पानचेटीकडे पाहिल्यानंतर असे वाटते की त्याची लाल-लाल रक्तवर्णी पाने परागसिंचन घडवून आणण्याकरिता लहान लहान फुलांच्या गुच्छांच्या भोवताली आपल्याशीच रंगून जाऊन सतत फेर धरत असतात; माखनकटोरी हा वृक्ष सर्वांचे कौतुक करत असतो. आपल्या पर्णसंभारातील पानांच्या पाठीमागील बाजूवर पर्णाच्या भागाचा पेला तयार केलेला असतो. लोण्याच्या वाट्यांची पाने असलेला हा पर्णसंभार, ह्या वाट्यातील लोणी साखरेच्या चवीने खायला कृष्ण केव्हा येईल म्हणून केव्हाचा उभा आहे.

निसर्गाने पर्णसंभाराची मांडणी खोडावर अतिशय कुशलतेने आणि हारीने केलेली आहे. सर्व वनस्पतींच्या पर्णसंभाराला उन्हात स्वच्छंदाने पोहता आलेच पाहिजे हा त्याचा कटाक्ष आहे. वड, आंबा, सूर्यफूल, मका याची पाने नागमोडी वळणात एकमेकांकडे तोंड करून मोडलेली असतात. पेरू, लटकचमेली खोडाच्या पेरा-पेरावर आमोरासमोर जोडीजोडीने असतात. इकडे रुई, तुळस, घाणेरी, मरवा, पाचू यांची पाने आमोरासमोर आणि जोड्या काटकोनात असतात. कण्हेरी, हमेलिया वनस्पतींत पाने तीनतीन, चारचार, पाचपाच, पाने खोडाभोवती पेरावर कडीच तयार करतात.

नेचांची कोवळी पर्णकळी, टोकाकडून देठाकडे गुंडाळलेली असते. जणू घड्याळाची गोल स्प्रिंगच. केळीची रसदार पाने, कर्दळीची पाने कोवळेपणात काबलीच्या, चिवड्याच्या, किंवा विपाणीच्या पुड्याप्रमाणे गुंडाळलेली असतात. कमळाची, अळूची कोवळी पाने दोन्ही कडा आतल्या बाजूवर पोकळ गुंडाळ्यासारख्या गुंडाळलेल्या दिसतात. गुलाबाच्या कोवळ्या पर्णिका हात जोडल्यासारख्या असतात.

असा हा अष्टपैलू पर्णसंभार अतिशय उपयोगी आहे. वेगवेगळ्या तऱ्हांनी उपयोगी झाला आहे.

निळीच्या पानात निळ्या रंगाचे भांडार, तर मेंदीच्या पानात नारिंगी रंग लपलेला आहे. कोमल करात चुरगळून घेतल्याखेरीज हात रंगवतच नाही. चाकवताच्या पानातील हिरवा रंग हलवा हिरवा करतो, पांढऱ्या, केशरी हलव्यात भर टाकून स्नेहबंधनाचे तिरंगी निशाण कीर्तीच्या वाऱ्यावर फडकवत ठेवतो. अडुळसा, सताप, गवती चहा, तुळस, दूर्वा, कोरफड, एक दांडी, पिवळा धोत्रा, ब्रम्ही, माका, ह्या आणि इतर अनेक वनस्पतींत औषधी द्रव्याची साठवणे आहेत.मानवाकरिता त्यांनी दिव्य औषधी निर्माण केल्या आहेत. परंतु त्या निष्ठेने कार्य करणाऱ्यालाच अमाप मिळतात. खैर, पेरू, आमणी, चहा यांच्या पानातील टॅनिन औषधी म्हणून, रंग म्हणून

आणि कातड्याला सुंदर रंग आणि तकाकी आणण्यात हातखंडा म्हणून आहेत. गुंज, विड्याची पाने, ओव्याची पाने खाण्याकरिता उपयोगी पडतात. पाचू, मरवा, जिरॅनिअम, केवडा यांच्या पर्णात तेलाचे बुधले आहेत. योग्य उपयोगाकरिता रिते करण्यास निसर्गाने मानवाला पूर्ण मुभा दिली आहे. कितीही रिते केले तरी ते न संपणारे कोठार आहे.

क्रोटान, कोलियरु, अशोक, नेचे, ताड, माड, गुलमोहोर याचे पर्णसंभार सौंदर्य, शोभा वाढविण्याकरता तुमच्या हाती सोपविले आहेत. दूर्वा, बेल, तुळस, आपटा, कांचन आघाडा, केनी अशासारखी कितीतरी प्रकारची पाने पत्री म्हणून देवाला प्रिय असल्याकारणाने आपण ती प्रयत्नाने मिळवून त्याच्या चरणी अर्पण करतो. ऋषी-मुनींनी, वाडवडिलांनी घालून दिलेला संस्कृतीचा ठेवा जतन करीत असतो. फूल ना फुलाची पाकळी ह्या रूपात आपल्या जवळील वस्तू द्यावी अशी भावना ही पत्री आपल्या मनात रुजविते. वड, पिंपळ, फणस, पळस, यांची पाने पत्रावळी म्हणून जेवणाची पात्रे ठरली आहेत, तर नेम म्हणून चिंचेची पाने पत्रावळीसाठी वापरून नेमस्तपणा, आणि निष्ठेचे वाण आपल्याला मिळते. अशी ही पत्री अग्रस्थानी विराजलेली असून मानवतेचे केंद्र म्हणून उच्च स्थानावर अधिष्ठिलेली आहे.

असे एक ना अनेक तऱ्हांचे, वेगवेगळी सामर्थ्ये असलेले पर्णसंभाररूपी दूत प्राणिमात्राच्या, मानवाच्या करिता सृष्टिदेवीने, निसर्गाने दान केले आहेत.

पानमळयाच्या हिरव्यागार कुंपणावर वळणावळणाने चढणारी नागवेलीची पाने की ज्यांच्या शिवाय कोणताही विडा उचलला जात नाही, विडा बनत नाही! पण यामुळेच अक्षनीचे देवाला निमंत्रण दिले जाते. देवाची पूजाअर्चा सुरू होते. कोणत्याही उदात्त भव्य, समारंभाची पूर्तता विड्याने, पानसुपारीने होते. संध्यारंगात मोकळा वारा खाण्याकरिता अहमहमिकेने हा संभार पुढे होतो.

कडूनिंबाच्या गार सावलीत हिरव्यागार गवती गलिच्यावर पडून त्याच्या संयुक्त पर्णसंभाराचा खेळ पाहता पाहता, निद्रादेवी आपले पांघरूण केव्हा घालते कळतच नाही!



# जीवनविषयक एक ऊर्ध्वपातित दृष्टिकोन

वसंत शेंबेकर
तृतीय वर्ष शास्त्र

जीवनाचा लघुतम साधारण काढण्यात मी जेव्हा कॉलेजची दोनतीन वर्षे घालवली आणि जेव्हा मला माझ्या बौद्धिक वयाबद्दल उमज पडला, तेव्हा कुठेतरी खोली घेऊन स्थायिक व्हावे असे विचार माझ्या मनात घोळू लागले. सायन्सच्या हाउसिंग सोसायटीत माझा अर्ज टाकलेला होताच. मेडिकलच्या रूम्सना फार पागडी म्हणजे 'फर्स्ट क्लास' द्यावी लागत होती आणि त्याचप्रमाणे इतर टेक्निकल कोर्सेसनाही बराच ॲडव्हान्स भरावा लागत होता. त्यामुळे मी शेवटी बीएस्सीच्या चाळीत केमिस्ट्री लॅबोरेटरीमध्ये २'+३' ची एक लहानशी रूम-लॉकर व ४' × ४' चे लाकडी अंगण व नळ असलेली एक जागा मिळवली आणि मी जीवनाविषयी विचार करायला लागलो.

या जागेत रहायला आल्यापासून पहिली टर्म जवळजवळ संपत आली आहे. तोच या नव्या जीवनाशी मी पूर्णपणे समरस झालो आहे. जीवनाच्या या अवघड वाटेवर चालण्यासाठी आवश्यक ते गुण माझ्यात निर्माण झाले आहेत.

सुरवातीलाच मी माझ्या पार्टनरची निवड केली आणि ३' × ३' च्या लॉकरमध्ये माझा संसार थाटला. चंबू, परीक्षानळ्या, त्यांचे स्टँडस वगैरे प्रकारची सर्व भांडीकुंडी जेव्हा एवढ्याशा जागेत व्यवस्थित लावण्याचा प्रसंग आला, तेव्हा जागेच्या टंचाईच्या काळात लहानशा खोलीत संसार 'नेटका' चालविण्याचा गुण माझ्या अंगी बाणला.

पाणी भरण्याचा नळ एकच आणि शेकडो कुटुंबे पाणी भरण्यासाठी तिथे येणार, तेव्हा सोशिकपणा हा गुण, लवकर उठण्याची सवय आणि कोणत्याही घरकामाला लाज न वाटणे वगैरे व्यावहारिक गुणांची वाढ होते. (घरी आल्यावर काहीतरी विशेष ज्ञान मिळवून आल्याच्या थाटात वावरणारे, हे महाभाग केमिस्ट्री लॅबोरेटरीमध्ये असलेच 'घरकाम' भांडी विसळणे, ती व्यवस्थित लावणे, पाणी तापवणे वगैरे–करून आलेले असतात.) पुराणात दमयंतीला वरण्यासाठी जसे शेकडो दिखाऊ 'नळ' उभे राहिले, तसे इथे जरी जागोजागी नळ उभे असले तरी 'डिस्टिल्ड वॉटर' च्या नळाजवळ दमयंत्यांची गर्दी असते! तरीसुद्धा ७ वाजता उठून आधी बर्नर्स पेटवून कडेवर वॉशबॉटलचे 'घट' घेऊन यमुनेहून (लांबून) 'डिस्टिल्ड वॉटर' भरून आणून त्याचे आधण ठेवावे लागते.

इथे काम करताना गरम क्रुसिबल्सचे, स्ट्रॉंग ॲसिड्सचे अनेक वेळा आणि बर्नरचे नेहमीच चटके सहन करावे लागत असल्याने जीवनात प्रवेश करताना माणूस तावूनसुलाखून निघतो.

आजच्या काळाचा संदेश असलेले समता, शांती, प्रेम, विश्वबंधुत्व वगैरे सर्व गुण या ठिकाणी जोपासले जातात. या वसाहतीतल्या माणसांच्या रोमारोमांत समता भिनलेली असते. प्रत्येकाला ठराविक क्वांटिटीचाच सब्स्टन्स मिळतो; व त्याचे ॲनॅलसिसही एकाच पद्धतीने करायचे असते. शिवाय हे सर्व काम 'सहकारी तत्त्वावर' चालते. एकाने टेस्ट्स द्यावयाच्या, दुसऱ्याने मेल्टिंग पॉइंट काढायचा, तिसऱ्याने कन्फर्मेटरी घ्यावयाची आणि मगच 'अपेक्षित' उत्तर ॲडजस्ट करायचे! जीवनात या ॲडजस्टमेंटला फार महत्त्व; आणि त्या गुणाविषयी मी निःशंक आहे.

याच 'रसायन-वसाहती'त राहून मी शेजाऱ्यापाजाऱ्यांशी प्रेमाने मिळून-मिसळून वागायला शिकलो. अत्यंत जीवनावश्यक गुण. (काही ठरावीक नंबरांनंतर सर्वांना सारखाच सब्स्टन्स असतो.) आवश्यक ते उत्तर प्रेमाने विचारायला शिकलो.

दुसऱ्यांच्या अडचणी समजून घेण्याला फार मोठे मन लागते, केमिस्ट्री लॅबमध्ये असे मन डेव्हलप होते. पार्टनरची अडचण लक्षात घेऊन ९ ते ९॥ च्या सुट्टीत आपल्याप्रमाणेच त्यालाही चहाकरता लीव्ह देणे

आवश्यक ठरते. ( ही ९ ते ९। ची सुट्टी म्हणजे आर्ट्स आणि सायन्स ही दोन समांतर मने जोडणारा दुवा असतो. ) आणि जीवनसाथी पडला तरी निश्चयाने आणि ध्येयाने त्याची जागा चालविण्याची लढाऊ वृत्ती, काम करण्याचे ॲक्टिंग ( सरकारी नोकरीतले ग्रेट क्वालिफिकेशन ) वगैरे सोयिस्कर गुण वाढतात.

सत्य हे कल्पनेपेक्षा अद्‌भुत असते, या अद्‌भुत कल्पनेचा सत्य स्वरूपातला विपर्यास नेहमीच अनुभवाला येतो. काढलेले उत्तर हे नेहमीच अद्‌भुत निघते आणि पुस्तकातले किंवा सरांच्या वहीतले उत्तरच फक्त ( बोचक ) सत्य असते !

सतत ४ तास काम, तेही आगीजवळ व उपाशीपोटी ( सकाळी ७ ते ११ ) करण्याची सवय ( एक श्रमिक ॲप्रोचही वसाहत लावते. जीवन ही एक ( अणु- ) भट्टी आहे. तिच्या आसपास वावरताना ( मेल्टिंग पॉइंट काढताना ) कपाळावर कष्टाने ( आणि वैतागाने ) घर्मबिंदू जमा होतात. घर्मबिंदू गाळल्याशिवाय ( आपल्या ) सहनशीलतेचा मेल्टिंग पॉइंट हाय होत नाही, हे निर्मळ सत्य !

केमिस्ट्री प्रॅक्टिकल ही जीवनाची अनुभूती आहे. इथे फॉस्फेटसारखे नको असलेले पाहुणे हटकून समोर उभे राहतात, ॲनॅलिसिस करताना सेकंड ग्रुप डेफिनिटली प्रेझेंटअसतो. या सगळ्या अडचणी रिमूव्ह कराव्या, तेव्हा पुढे !

इथले वातावरण काव्यालाही पोषक आहे. अल्कोहोल वाटायला येणारे सर मला नेहमी ' साकिया ' वाटतात. हा स्थितप्रज्ञ साकिया अल्कोहोलचे चषक भरून प्रत्येकाला देतो. ( त्यामुळेच प्रॅक्टिकल सुटल्यावर सर्वजण डायरेक्ट घरी जाऊ शकत नसावेत. ) मग समोर बुक ऑफ प्रॅक्टिकल ( व्हर्स ) असावे, हातात ' जाम ' असावा, समोर बर्नरची ' शमा ' असावी–हे उमर खय्यामचे स्वप्न साकार होते. ( दूरून कुठूनतरी डेमॉन्स्ट्रेटरचा ' आर्तनाद ' ऐकू येत असतो. ) इथे ' कार्माईन रेड'चे रक्तांकित तारकगण फ्लुरोसंट ब्लूच्या नभःप्रांगणात ' टोकदार ' आशय ( ब्युरेट्स, पिपेट्स ) अनुभवीत असतात.

जीवनातल्या अडचणींना यशस्वीपणे तोंड देण्याचे शिक्षण इथे देतात. रसायन–प्रयोगशाळाही या प्रचंड जीवनरसायनात अस्तित्व टिकवून धरायला शिकवणारी योगशाळा आहे.

लहानपणी भातुकलीचा खेळ खेळणाऱ्या पार्टनर्सना त्यांचा खेळ हा जीवनाची रंगीत तालीम आहे याची कल्पना नसते. या ठिकाणी प्रॅक्टिकल करणाऱ्यांना आपल्या रोलची जाणीव असते. या ठिकाणी काम करताना फार उदात्त विचार मनात येतात. नाहीतरी जग म्हणजे काय आहे ? एक मोठा टेस्टट्यूब स्टँड आहे. त्यातली ही माणसे म्हणजे निरनिराळ्या लीक्विड्स भरून ठेवलेल्या टेस्टट्यूब्स आहेत. प्रत्येकाचा रूप-रंग वेगळा, चव वेगळी, बिहेवियर वेगळे; पण सगळ्यांच्यात एक क्वालिटी कॉमन आहे; ठराविक रि-एजंट्स वापरले, की प्रत्येकाचा प्रेसिपिटेट मिळतो. हा प्रेसिपिटेट म्हणजे ( पीपीटी ) जीवनाविषयीची आसक्ती आहे. थोड्याफार फरकाने ती प्रत्येकात आढळते. सहानुभूतीचे डायल्यूट किंवा आकर्षणाचे कॉन्सेंट्रेटेड रि-एजंट्स ही पीपीटी निर्माण करतात. निराशेचे कृष्णमेघ ओठंगून आले, की जरी हा पीपीटी डिस्-ॲपियर झाल्यासारखा वाटला, तरी एन-ए-ओ-एच किंवा एच-सी एल यांच्या मुलायम स्पर्शाने तो रि-ॲपियर होतो. ( कधी कधी मोहमयी टर्बिडिटीला पीपीटी समजण्याचा गैरसमज केला, की ग्रूपच्या डिटेक्शनमध्ये ' संशयकल्लोळा 'चे नाट्य उभे राहते ! )

टॅप वॉटर, डिस्टिल्ड वॉटर यांच्या बरोबर तासनतास काढणाऱ्यांना निराशेची इंप्युरिटी क्षणात नाहीशी करता येते. जीवन म्हणजे त्यांच्या दृष्टीने काहीच नाही. इथला प्रत्येक माणूस हा वर्तमानाच्या कठोरहृदयी शिलेवर स्वतःच्या भवितव्याचे ' कोरीव लेणे ' तयार करीत असतो. आजच्या प्रयोगशाळेतला प्रत्येक ' प्रायोगिक जीव ' हा उद्याच्या रसायनशाळेतला मार्गदर्शक ( डेमॉन्स्ट्रेटर– ) असतो. त्याच्या दृष्टीने जीवन जीवन म्हणजे काय ? तर एक एक्स्ट्रॉ प्रॅक्टिकल आहे !



# A History of Calculus


**A. M. Sathaye**
Third Year B. Sc.


**Caleulus–What it Means ?**

All are usually familiar with mathematical operations. Addition and multiplication with subsraction and division as their inverses are taught at a very early stage of education. These are basic operations in Arithmetic and Algebra.

But a mathematician wants to learn about curves also. For understanding the behaviour of a curve he wants to know the position of a tangent to the curve at every point. This is nearly all that differential calculus tackles. For this, the mathematician requires a new operation : the limit of a certain quantity. We shall deal with this idea in the end; since this is historically the last thing discovered.

**The result before a theory**

Discovery of calculus has been like the discovery of oxygen. Oxygen is being used by living organisms hundreds of centuries before it was discovered in the 17th century. Techniques of calculus were also being ased from as early a period of as *Archimedes.*[1]

Archimedes determined the arc of a circle by dividing it into narrow vertical strips, - almost the same as what integral calculus does today. He also constructed a tangent to his curve given by an equation, $r = a\,\theta^2$

Hindu astronomers were familiar with the proposition of diferential calculus that the rate of change of sin $\theta$ with respect to $\theta$ is cos $\theta$. In modern notation, this is represnted as $\frac{d}{d\theta} \sin\theta = \cos\theta$. Hence for approximation they used $\delta \sin\theta = \delta\theta \cos\theta$ where $\delta \sin\theta$ denotes a small change in sin $\theta$ while $\delta\theta$ denotes a small change in $\theta$.

**Techniques worked but theory failed**

The problem of determination of area was taken up again by an Italian named *Cavalieri*[3] after about 1800 years. He gave methods to find out areas and volumes by what he called the method of '*indivisibles.*' His results were all right; but his methods were not acceptable to reason. Others like *Roberval, Pascal* and *Wallis*[4] tried to correct him, and the determination of area took a form similar to the one in vogue today; but they too could not remove the logical faults therein completely.

**Knowledge came, but imagination lingered**

*Descartes* along with *Fermat*[5] discovered a new way ro represent the curves, viz. the analytical geometry. The curves were now represented by equations; and determination of tangents was taken up again with the help of algebra, now applicable to the equation of the curve.

*Descartes, Roberual, Fermat* and *Barlow*[6] all had methods to construct tangents to particular curves. The method of *Fermat* given at the end reveals how near he was to the present-day methods. Yet none of these even thought that this could be generalised as a new operation.

**The two who did it**

*Newton* and *Leibnitz* were the mathematicians who gave a systematic way of doing this. Newton gave the theory of fluents while leibnitz gave the differentials and differential coefficient.

**The flow of things' : Newton's method**

*Newton*[7] was a physicist first and a mathematician afterwards. So it is not surprising that his method was based upon physical concepts.

The things which change with the time were called '*Fluents*,' i. e. things which flow with time. Position of a moving particle, or in other words, the x and y coordinates of a moving particle change with time. Hence they are fluents. Rate of change of x and y with respect to time was denoted by $\dot{x}$ and $\dot{y}$ respectively. Naturally, we know that these are the velocities of the particle along the respective axes.

Newton conceived of curves as generated by the motion of a particle along the curved line. So in terms of $\dot{x}$ and $\dot{y}$, the velocity of a particle at a point was obtained by combining these velocities ( $\dot{x}$ and $\dot{y}$ ). The resultant velocity makes an angle $\tan^{-1} \frac{\dot{y}}{\dot{x}}$ with the x axis. Further we know that the velocity of a particle in motion is always directed along the tangent line. Hence the slope of the tangent line is given by $\tan \tan^{-1} \frac{\dot{y}}{\dot{x}} = \frac{\dot{y}}{\dot{x}}$. Thus the tangent is determined.

As remarked earlier, this is in a sense physics applied to mathematics for the use of physics.

For determinig the fluxions Newton found the ratio of $x_o$ and $t_o$ where $x_o$ was an increment in x in infinitely small time to. He argued that this ratio as both $x_o$ and $t_o$ become zero should exist, since in that case it represents the ultimate velocity of the particle at the point; and there surely exists an ultimate limiting velocity. This is certainly near to the theory of limits: but is not as rigorous as it should be.

Newton gave the rules for differentiation of $x^n$, sum of functions and function of a function.

**The differentials : Leibnitz**

*Leibnitz* was a selftaught German methematician and discovered calculus simultaneously with Newton.

His method was perfectly geometrical. He treated $y = f(x)$ as the equation of a curve. He wrote $dy$ for infinitesimal increment in $y$ and $dx$ for that in x. $\frac{dy}{dx}$ was then the slope of the tangent.

He gave rules for differentiation of sum, product, quotient and power of functions. He illustrated the method of differentiating the function of a function.

The merit of Leibnitz lies in his powerful notation, $\frac{dy}{dx}$. It does not require the time variable and is suitable for introducing partial differentiation. Even the integral notation as we use today ( $\int$ — an elongated s ) was invented by him.

There was an unfair dispute between the followers of Newton and Leibnitz regarding the priority of discovery. As we know today, both deserve the credit simultaneously.

**Calculus as a religion**

Mathematicians criticised the methods of calculus. The quantities $x_o$, $t_o$, $dy$. $dx$ were all different from zero, but less than any positive number. There were no numbers like these.[9] Also, calculus used quantities which were something at one stage and nothing at a later stage[10] 'Religion was no worse than mathematics,' they argued, 'if things like this had to be accepted on mere faith.[9]'

The attacks were really justified. The arguments of calculus had logic behind them, but were not expressed logically until *Cauchy*[11] did it.

**The limits—**

According to Cauchy, the objectionable phrases like 'infinitely small' or 'very near to zero' can be avoided. He put the whole thing rigourously as follows : If for every positive number ( however small but

nonzero ) the difference between 1 and $\frac{x_o}{t_o}$ can be made less than $\epsilon$ by choosing a suitable positive number $\delta$( corresponding to each $\epsilon$ ) such that $o < t_o < \delta$; then we say that limit of $\frac{x_o}{t_o}$ as t tends to zero is 1. This long statement simply means that $\frac{x_o}{t_o}$ can be approximated to 1 with any desired accuracy by choosing a suitable maximum for $t_o$ In this we observe that all quantities are finite and computable and all that we are required to do is to establish a relation betweeu e and $\delta$. Hence there is nothing objectionable.

The thing to be observed is that the idea of '*x tends to a*' is replaced by the idea of '*f (x) tends to l as x tends to a*' It is an investigation of the behaviour of f (x) in relation to x and not of x alone.

The limit of $\frac{f(x+h) - f(x)}{h}$ as h tends to zero is the differential coefficient of f (x) denoted by $f'(x)$ or $\frac{d}{dx} f(x)$ in the new notation. Thus from f (x) we produce a new function-f' ( x ) by a new operation involving the limit of a function, This *Limit* is a new operation for creating new functions.

Further the inverse operation of diffrentiation was also studied and was found to evaluate the area of a curvilinear figure This provided a satisfactory basis for the summation process discovered earlier. This is modern integration.

Thus at last the struggle against logic was won by the mathematicians. more rigorous investigations continue still and subtle discrepancies or exceptions are still being discovered. But it is now more of a game than a struggle.

**Books consulted**


1 ) Calculus of variation : Bliss.
2 ) Men of mathematics : E. T. Bell.
3 ) Encyclopaedia Britanica.
4 ) Textbook on differential calculus : Gorakh Prasad.
5 ) भारतीय ज्योतिर्गणित : श्री. कृ. कोल्हटकर.


**Interpretations of different mathematicians**




PQ is the arc of a curve in the ( OX, OY ) plane.

PT is the tangent at P.

Let Q tend to P along the curve.

Then we get :

[ Continued on page 103 ]

NOTES

**The Progress at a glance—**

| No. | Name | Date | Nationality | Contribution–Integration. | Contribution–Differentiation. |
|---|---|---|---|---|---|
| (1) | Archimedes | 287 (?) 212 BC | Greece | Area of a cirle | Tangent to $r = a\theta$ |
| (2) | Munjal and other astronomers | 932 AD | India | | $\delta \sin\theta = \delta\theta \cos\theta$ involving $\frac{d}{d\theta} \sin\theta = \cos\theta$ |
| (3) | Cavalierli | 1598–1647 | Italy | Areas and volumes by 'indivisibles'' logically faulty | |
| (4) | Roberval<br>Pascal<br>Wallis | 1602–1675<br>1623–1662<br>1616–1703 | France<br>France<br>England | Improved method of Cavalieri. Form of modern integration though not rigour. | |
| (5) | Descarte<br>Fermat | 1596–1650<br>1601–1665 | France<br>France | | Analytical geometry. |
| (6) | Descortes<br>Fermat<br>Roberval<br>Barlow | <br><br><br>1630–1677 | <br><br><br>England | | Construction of tangents to particular algebraic curves. |
| (7) | Newton | 1642–1727 | England | | Fluents and fluxions. |
| (8) | Leibnitz | 1646–1710 | Germany | Integral notation. $\int$ Some integrals. | Differentials, $\frac{d}{dx}$ |
| (9) | Berkeley | 1734 | England | | Attack on calculus methods |
| (10) | Nieuwentijit | | Holand | | Attack on calculus methods |
| (11) | Cauchy | 1789–1851 | | | Theory of limits |
| (12) | Riemann | 1826–1866 | Germany | Riemann integration. | |

[ Continued from page 101 ]

| | NEWTON | LEIBNITZ | FERMAT |
|---|---|---|---|
| PM | $x_o$ | dx | e |
| QM | $y_o$ | dy | a |
| PP' | y | y | y |
| OP' | x | x | x |
| QQ' | $y + y_o$ | y + dy | y + a |
| OQ' | $x + x^o$ | x + dx | x + e |
| Slope at tgt. = ultimate values of | $\frac{y_o/t_o}{x_o/t_o}$ | $\frac{dy}{dx}$ | $\frac{a}{e}$ |

In actual practice every one of the mathematician, neglected the second and the higher powers of small quantities like $x_o$, e, a, dx etc. Then the ratios could be determined on giving the values.



## शिक्षण प्रसारक मंडळीची

# कौशिक व्याख्यान माला

कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांनी देणगी म्हणून दिलेल्या वीस हजार रुपयांच्या व्याजातून प्रतिवर्षी कौशिक व्याख्यानमाला गुंफली जाते. ज्ञानेश्वरादी संत व त्यांचे वाङ्मय आणि वैदिक संस्कृती या विषयावर एक वर्षाआड एक, तीन ते पाच अशी व्याख्याने होतात. आतापर्यंत पुढील व्याख्याने झालेली आहेत.

| | सन | विषय | व्याख्याते |
|---|---|---|---|
| | १९४७ | ज्ञानेश्वर व हिंदी संत कवी | प्रा. रा. द. रानडे |
| * | १९४८ | वैदिक देवतांचे अभिनव दर्शन | डॉ. रा. ना. दांडेकर |
| * | १९५० | श्री ज्ञानदेव | प्रा. न. र. फाटक |
| * | १९५२ | ऋग्वेदातील भक्तिमार्ग | डॉ. ह. दा. वेलणकर |
| | १९५३ | ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाची पार्श्वभूमी व प्रयोजन | डॉ. शं. दा. पेंडसे |
| * | १९५५ | ऋग्वेदातील राजकारण | पं. श्री. दा. सातवळेकर |
| * | १९५८ | श्री शैवागम आणि ज्ञानेश्वर | श्री. बाळाचार्य खुपेरकरशास्त्री |
| | १९५९ | वेदांचे अपौरुषेयत्व | पं. राजेश्वरशास्त्री द्रवीड |
| + | १९६१ | ज्ञानदेव व प्लेटो | प्राचार्य शं. वा. दांडेकर |
| | १९६२ | अथर्ववेदातील प्रतिपाद्य | प्रा. दुर्गामोहन भट्टाचार्य |
| | १९६३ | संतमहंतांचा पूर्णशंभू विठ्ठल | प्रा. द. रा. बेंद्रे |
| | १९६५ | वेद आणि त्यांची शिकवण | डॉ. सूर्यकांत |

* ही व्याख्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आहेत.

\+ ही व्याख्याने लवकरच प्रसिद्ध होत आहेत.

## साहित्य विभाग : बी. ए. प्रथम श्रेणी व पारितोषिकांचे मानकरी : एप्रिल १९६६



कु. रोहिणी जोशी
( गणित )



कु. जयश्री कानिटकर
( संस्कृत )



कु. विजया दिवेकर
( संस्कृत )



कु. सुलभा पटवर्धन
( संस्कृत )



कु. प्रतिभा आगाशे
( संस्कृत )



कु. विजया थत्ते
( संस्कृत )



श्री. ल. आठलेकर
( संस्कृत )



कु. शैला काळे
( मानसशास्त्र )



अनिलकुमार देवधर
( मराठी )
एक सुवर्णपदक व
तीन पारितोषिके



सुनील तांबे
( अर्थशास्त्र )
शंकरराव कृष्णाजी शिंदे
पारितोषिक



रामचंद्र डिंबळे
प्रथम वर्ष साहित्य
विद्यापीठात प्रथम



सुधाकर जोशी
संस्कृत संशोधनासाठी
केंद्रीय शिष्यवृत्ती



व्यवसायपूर्व, प्रथम वर्ष शास्त्र : प्रथम श्रेणीचे मानकरी : एप्रिल १९६६



पदवीपूर्व शास्त्र : प्रथम श्रेणीचे मानकरी : एप्रिल १९६६

## व्यवसायपूर्व, प्रथमवर्ष शास्त्र प्रथम श्रेणीचे मानकरी मार्च एप्रिल १९६६

बसलेले– ( डावीकडून )

( १ ) कु. शशिकला रा. जोशी, ( २ ) कु. मीरा मा. कुंटे, ( ३ ) कु. रजनी ज. देवधर, ( ४ ) कु. विदुला ह. जोशी, ( ५ ) कु. विमल परांजपे, ( ६ ) उपप्राचार्य रं. ना. गायधनी, ( ७ ) प्राचार्य रा. रा. मालेगावकर, ( ८ ) ध. ओं. कुंडलकर, ( ९ ) र. वि. जोशी, ( १० ) अ. वि. पंडित, ( ११ ) प्र. शं. बुरुटे, ( १२ ) आ. व. बाम, ( १३ ) श. रा. जोशी.

उभे–रांग १– ( डावीकडून )

( १ ) कु. शुभा बा. गलगली, ( २ ) कु. उषा केसकर ( ३ ) कु. नीलिमा जोशी, ( ४ ) कु. शोभना मा. काकडे, ( ५ ) कु. सुधा वि. कुलकर्णी, ( ६ ) कु. कुंदा द. मराठे, ( ७ ) कु. शशिकला द. मोडक, ( ८ ) कु. शकुंतला घाटे, ( ९ ) कु. भारती म. कुलकर्णी ( १० ) कु. मंगला सहस्रबुद्धे ( ११ ) कु. सुनीला मोडक ( १२ ) कु. मीना भाटे.

उभे–रांग २– ( डावीकडून )

( १ ) य. गं. पटवर्धन, ( २ ) श्री. वि. नेने, ( ३ ) अ. वा. करंदीकर, ( ४ ) ध. द. नरवणे, ( ५ ) ए. के. उत्तुरकर, ( ६ ) प्र. रं. कानडे, ( ७ ) दि. के. इनामदार, ( ८ ) प्र. र. खरे, ( ९ ) ए. ए. मेहता ( १० ) कि. रा. कुलकर्णी, ( ११ ) आर. व्ही. शेळ्ळीकेरी, ( १२ ) आर. के. चौधरी, ( १३ ) प्र. वि जोग, ( १४ ) र. म. सिन्नरकर, ( १५ ) ग. खं. कुलकर्णी, ( १६ ) प्र. द. उतेकर, ( १७ ) रं. श्री. ताविलदार, ( १८ ) प्र. सू. अत्रे, ( १९ ) कि. वि. पटवर्धन ( २० ) वि. शा. देशमुख.

उभे–रांग ३– ( डावीकडून )

( १ ) प्र. वि. पाटील, ( २ ) व. र. करंजवडेकर, ( ३ ) अ. ल. कुदळे, ( ४ ) के. एन्. पटेल, ( ५ ) ए. आर. चौधरी, ( ६ ) आर. सी. गुजराथी, ( ७ ) वि. प. साठे, ( ८ ) ज. कृ. जोशी, ( ९ ) प्र. आ. होनशेट्टी, ( १० ) न. म. शहा, ( ११ ) सु. रा. कारळे, ( १२ ) अ. वा. वैद्य, ( १३ ) सं. वा. चोळकर, ( १४ ) र. म. सायखेडकर, ( १५ ) चं. म. चौबळ, ( १६ ) वि. वि. जोशी, ( १७ ) मो. रा. दीक्षित, ( १८ ) मा. पु. जोशी, ( १९ ) वि. शां. दात्ये, ( २० ) सु. सु. गडकरी.

## पदवीपूर्व शास्त्र प्रथम श्रेणीचे मानकरी एप्रिल १९६६

बसलेले– ( डावीकडून )

( १ ) कु. वासंती म. माथेसूळ, ( २ ) कु. सुनंदा य. दीक्षित, ( ३ ) कु. प्रभा ज. विनोद, ( ४ ) कु. अरुण र. भिडे, ( ५ ) कु. उषा. के. चोपडे, ( ६ ) उपप्रचार्य रं. ना. गायधनी, ( ७ ) प्राचार्य रा. रा. मालेगावकर ( ८ ) स. दि. जोगळेकर, ( ९ ) प्र. चिं. जोशी, ( १० ) मा. स. अभ्यंकर, ( ११ ) प्र. गो. पोंक्षे ( १२ ) भ. बा. जोशी, ( १३ ) ज. क. कुलकर्णी.

उभे–रांग १– ( डावीकडून )

( १ ) कु. मृणालिनी वि. आपटे, ( २ ) कु. मीरा ह. देशपांडे, ( ३ ) कु. प्रतिभा भा. अष्टेकर, ( ४ ) कु. नीला दामले, ( ५ ) कु. माधुरी कुलकर्णी, ( ६ ) कु. हेमलता पटवर्धन, ( ७ ) कु. आशा कुलकर्णी, ( ८ ) कु. रोहिणी

पटवर्धन, ( ९ ) कु. पुष्पा कृ. दिवाण, ( १० ) कु. शोभना श्री. चितळे, ( ११ ) कु. प्रमिला वि. माणकीकर, ( १२ ) कु. रोहिणी प्र. रानडे, ( १३ ) कु. रोहिणी लिखिते, ( १४ ) कु. उषा ना. कोल्हटकर, ( १५ ) कु. शांता चिंचणीकर, ( १६ ) कु. उषा शहा.

उभे–रांग २– ( डावीकडून )

( १ ) श. चिं. जोशी, ( २ ) श्री. स. काजरेकर, ( ३ ) प्र. वि. कुलकर्णी, ( ४ ) ज. ग. नेने, ( ५ ) अ. रा फौजदार, ( ६ ) द. दि. कवि, ( ७ ) सं. धुं. विनोद, ( ८ ) अ. श्री. ताविलदार, ( ९ ) र. ह. फाळके, ( १० ) सु. श्री. पुराणिक, ( ११ ) पो. भ. अहिरराव, ( १२ ) अ. ज. दीक्षित, ( १३ ) रा. त्रि. केळकर, ( १४ ) म. भि. अहिरराव, ( १५ ) ज. ग. बापट, ( १६ ) प्र. रा. जोशी, ( १७ ) वि. चिं. वाघ, ( १८ ) ज. ना. कर्वे, ( १९ ) वि. रा. देवताळे.

उभे–रांग ३– ( डावीकडून )

( १ ) नि. रा. खळदकर, ( २ ) उ. श. तळवलकर, ( ३ ) अ. ना. दातार, ( ४ ) अ. ल. आगटे, ( ५ ) सु. दि. रावेतकर, ( ६ ) सु. न. पेठे, ( ७ ) श. शं. वैद्य, ( ८ ) उ. त्रिं. गोरे, ( ९ ) ज. त्र्यं. इंगळे, ( १० ) प्र. के. नातू, ( ११ ) अ. द. पाटील, ( १२ ) अ. शं. पाठक, ( १३ ) सु. श्री. ठकार, ( १४ ) अ. य. चोपडे, ( १५ ) स. गो. फडके, ( १६ ) अ. ना. गोखले, ( १७ ) चिरपुटकर.

## व्यवसाय-पूर्व, प्रथमवर्ष शास्त्र प्रथम श्रेणीचे मानकरी एप्रिल १९६६

फोटोत नसलेल्यांची नावे

( १ ) एम्. टी. आगरवाल, ( २ ) सी. जी. देशपांडे, ( ३ ) एस्. जी. देशपांडे, ( ४ ) एस्. एन्. घारपुरे, ( ५ ) के. एस्. घोटणकर, ( ६ ) पी. आर्. जोशी, ( ७ ) पी. एम्. खंडकरी, ( ८ ) एस्. डब्ल्यू. महाजन, ( ९ ) एम्. एम्. पालकर, ( १० ) ए. बी. पाटारे, ( ११ ) व्ही. एम्. पटवर्धन, ( १२ ) पी. एम्. देशपांडे, ( १३ ) के. एम्. गोखले, ( १४ ) पी. व्ही. जोगळेकर, ( १५ ) ए. डी. नाझरे, ( १६ ) व्ही. के. पणीकर, ( १७ ) एम्. एन्. सुभेदार, ( १८ ) एस्. एस्. बोरा, ( १९ ) एस्. डी. पाटील, ( २० ) कु. अलका पटवर्धन, ( २१ ) कु. प्रकाशिनी पेंडसे, ( २२ ) कु. प्रतिभा साने, ( २३ ) कु. रत्नप्रभा शिंदे.

## पदवीपूर्व शास्त्र प्रथम श्रेणीचे मानकरी एप्रिल १९६६

फोटोत नसलेल्यांची नावे

( १ ) एम्. एम्. देवधर, ( २ ) जे. आर्. कुलकर्णी, ( ३ ) एस्. पी. कामत, ( ४ ) कु. अंबिका देसाई, ( ५ ) कु. प्रतिभा कुलकर्णी, ( ६ ) कु. नलिनी ओझर्डे, ( ७ ) आर्. एन. पेंढारकर, ( ८ ) कु. संध्या राणे, ( ९ ) एम्. आर. दातार, ( १० ) कु. शैला दातिर, ( ११ ) डी. व्ही. ढमाल, ( १२ ) पी. टी. दिघे, ( १३ ) जे. टी. इंगळे, ( १४ ) कु. नीलिमा जोग, ( १५ ) कु. लिली काळे, ( १६ ) कु. उषा कानिटकर, ( १७ ) कु. ज्योत्स्ना केळकर, ( १८ ) एस्. व्ही. मोडक, ( १९ ) कु. नीलांबरी नांदेडकर, ( २० ) डी. के. साने, ( २१ ) ए. ए. साठे, ( २२ ) जी. जी. पुरोहित.

# परशुरामीय वार्ता

## एक्कावन्नाव्या वर्षात पदार्पण

१४ जून १९६६ रोजी आपल्या महाविद्यालयाने एक्कावन्नाव्या वर्षात पदार्पण केले. गेल्या पन्नास वर्षात ध्येयदृष्टी ठेवून महाविद्यालयाने शिक्षणक्षेत्रात व समाज-जीवनात स्वतःचे एक मोठे स्थान निर्माण केले आहे. महाविद्यालयाच्या संस्थापनेच्या काळात ज्यांनी आपली पुण्याई खर्च केली, पुढील काळात महाविद्यालयाच्या संवर्धनासाठी ज्यांनी अपार परिश्रम केले त्या सर्वांना याचे श्रेय आहे. कोणाही परशुरामीयास महाविद्यालयाची सुवर्णपरंपरा पाहून अभिमानच वाटेल. ' आजच्या या सोनियाच्या दिवशी ' या परंपरेच्या स्मरणामुळे सर्वांना आनंद होईल हे खचित !

महाविद्यालयाच्या पन्नासाव्या वर्धापनदिनानिमित्त १४ जून १९६६ रोजी एक छोटासा समारंभ घरगुती स्वरूपात साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य मालेगावकर यांनी महाविद्यालयाच्या वाढत्या व्यापाचे वर्णन केले आणि नव्याने निर्माण झालेल्या शैक्षणिक समस्यांमुळे कशा अडचणी येतात ते सांगितले. महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य प्रा. शं. वा. तथा सोनोपंत दांडेकर व शिक्षण-प्रसारक-मंडळीच्या नियामक-मंडळाचे अध्यक्ष म. म. द. वा. पोतदार यांनी ' सारस्वताचे हे वाढलेले झाड ' पाहून आनंद व्यक्त केला आणि पूर्वसूरींचा वारसा पुढे चालवला तर समस्या सोडवता येणे शक्य आहे असे सुचविले. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी शैक्षणिक समस्यांचे विवेचन केले आणि महाविद्यालयाने विद्यापीठास वेळोवेळी दिलेल्या सहकार्याचा उल्लेख करून महाविद्यालयासही विद्यापीठाकडून साहाय्य मिळेल असे आश्वासन दिले.

या प्रसंगी जमखिंडीच्या राणी श्रीमती राजमाता लयलाबाई पटवर्धन यांनी दहा हजार रुपयांची देणगी दिली. महाविद्यालय त्यांचे ऋणी आहे.

जमखिंडीच्या राजघराण्याच्या औदार्याचा लाभ आपल्याला सतत मिळत आलेला आहे. १९२८ साली जमखिंडी संस्थानचे अधिपती श्रीमंत शंकरराव पटवर्धन यांनी आपले वडील सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या स्मरणार्थ दोन लाख रुपयांची देणगी दिली. तेव्हा-पासून ' न्यू पूना कॉलेज ' याऐवजी ' सर परशुराभाऊ कॉलेज ' असे आपल्या महाविद्यालयाचे नामाभिधान झाले. जमखिंडीच्या औदार्याविषयी सतत कृतज्ञ राहण्यात सर्व परशुरामीयांना आनंदच वाटेल.

पुढील विकासाच्या वेगवेगळ्या योजना महाविद्यालयाने आखलेल्या आहेत. त्या यशस्वी करण्यासाठी आवश्यक ते साहाय्य सर्वतोपरी करणे हे सर्व आजी व माजी परशुरामीयांचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य पार पाडण्याचे आश्वासन आपण सर्वमिळून देऊ या.

## शैक्षणिक वर्षारंभ

या वर्षी वर्षारंभाच्या निमित्ताने २१ जून १९६६ रोजी पदवीपूर्व वर्गात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत प्राचार्य मालेगावकर यांनी केले. याच वेळी बदलत्या महाविद्यालयीन जीवनाची ओळख करून देऊन ते कसे व्यतीत करावे याचे उद्‌बोधक दिग्दर्शन त्यांनी केले. २२ जून १९६६ रोजी पदवी- प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांपुढे प्राचार्य मालेगावकर यांचे वेगळे अभिभाषण झाले. या भाषणात, महाविद्यालयाची उज्ज्वल परंपरा विद्यार्थ्यांनी अधिक उजळावी, त्या दृष्टीने त्यांनी ध्येयनिष्ठ व शिस्तशील व्हावे असे समयोचित आवाहन प्राचार्यांनी केले.

प्राचार्यांनी तोकड्या व उत्तान पोषाखाबाबत जे विचार व्यक्त केले ते मननीय आहेत. आपला पेहरावही उच्च सौंदर्याभिरुचीला साजेसा असावा असे या संदर्भात विद्यार्थ्यांना सुचवावेसे वाटते.

प्राचार्यांच्या उद्‌घाटनपर भाषणांच्या प्रसंगी, विद्यापीठाच्या वेगवेगळ्या परीक्षांत उच्च श्रेणीचे यश व पारितोषिके मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने प्रकट सत्कार करण्यात आला. त्या विद्यार्थ्यांची नामावली पुढे दिली आहे; त्यांची छायाचित्रे याच अंकात अन्यत्र छापली आहेत.

## विद्यापीठ परीक्षांतील सुयश

गेल्या शैक्षणिक वर्षात झालेल्या पुणे विद्यापीठाच्या विविध परीक्षांमध्ये ज्यांनी उच्च श्रेणीचे यश मिळविले व पारितोषिके पटकावली त्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

याही वर्षीचा आपल्या महाविद्यालयाचा निकाल अभिमानास्पद असाच आहे.

पदवीपूर्व साहित्य : ६६% प्रथम श्रेणीत : ११
पदवीपूर्व शास्त्र : ७५% प्रथम श्रेणीत : ८४
प्रथम वर्ष शास्त्र : ५१% प्रथमश्रेणीत : ८६
तृतीय वर्ष साहित्य : ८५% प्रथम श्रेणीत : ८
तृतीय वर्ष शास्त्र : ७५% प्रथम श्रेणीत : २५

या वर्षी पुढील विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन करून महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घातली आहे.

**सतीश जोगळेकर** : पदवीपूर्व परीक्षा : पुणे विद्यापीठात सर्वप्रथम.

**रामचंद्र डिंबळे** : पदवी प्रथम वर्ष-साहित्य : विद्यापीठात सर्वप्रथम.

**अलका देवधर** : पदवी तृतीय वर्ष शास्त्र : विद्यापीठात सर्वप्रथम.

**रामचंद्र डिंबळे** : संस्कृतात सर्वप्रथम आल्याबद्दल लो. टिळक–पारितोषिक व दुर्गाबाई परांजपे–पारितोषिक.

**अनिलकुमार देवधर** : बी. ए. मराठीत सर्वप्रथम आल्याबद्दल दिल्ली महाराष्ट्रीय सुवर्णपदक, एच्. एल्. लागू पारितोषिक, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे पारितोषिक, देवल-आपटे-आगरकर पारितोषिक.

**सुनील तांबे** : बी. ए. अर्थशास्त्रात सर्वप्रथम आल्याबद्दल शंकरराव कृष्णाजी शिंदे पारितोषिक.

**रोहिणी जोशी** : बी. ए. विद्यापीठात द्वितीय. गणितात सर्वप्रथम आल्याबद्दल प्रा. द. वा. केरकर पारितोषिक व प्रा. वामन गोपाळ पारितोषिक.

**श्रीकांत भाटवडेकर** : बी. एस्सी. गणितात पहिला आल्याबद्दल प्रा. द. वा. केरकर पारितोषिक.

अलका देवधर, रोहिणी जोशी, जयश्री कानिटकर, विजया दिवेकर यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली आहे. शकुंतला साने यांना 'अ‍ॅटॉमिक एनर्जी'ची शिष्यवृत्ती मिळाली असून रसायनाच्या पुढील अभ्यासासाठी त्यांची निवड झाली आहे.

स्पृहणीय यश मिळविणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांचे पुनश्च हार्दिक अभिनंदन! त्यांचे हे यश पुढीलांना स्फूर्ती देवो!

### संस्कृतसाठी नवीन पारितोषिके

आपल्या महाविद्यालयातील भूगोलाचे प्राध्यापक श्री. प्र. र. करमरकर यांनी आपल्या वडिलांच्या (आपल्याच महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य प्रा. र. दा. करमरकर यांच्या) स्मरणार्थ या वर्षी एक नवे पारितोषिक ठेवले आहे. संस्कृत घेऊन बी. ए. होणाऱ्या विद्यार्थ्यांत महाविद्यालयात जो प्रथम येईल त्यास हे पारितोषिक दिले जाणार आहे.

श्री. ग. म. नातू-ट्रस्ट-तर्फे 'राणी लक्ष्मीबाई पारितोषिक' ठेवले आहे. हे पारितोषिक संस्कृत घेऊन बी. ए. होणाऱ्या विद्यार्थिनीत महाविद्यालयात जी प्रथम येईल तिला दिले जाणार आहे.

या वर्षी **कु. जयश्री कानिटकर** यांना ही दोन्ही पारितोषिके मिळाली. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

पारितोषिके ठेवणाऱ्या व्यक्तींना अंतःकरणपूर्वक धन्यवाद! संस्कृतचा कसून अभ्यास करून या व्यक्तींचे हेतू विद्यार्थ्यांनी सफल करावे.

## पदाधिकारी म्हणून नियुक्ती

### विज्ञानशाखा-उपप्राचार्यपदाची सूत्रे डॉ. परांजपे यांनी डॉ. घाटे यांच्याकडे दिली.

दि. १ एप्रिल १९६६ रोजी **डॉ. मा. कृ. परांजपे** यांनी विज्ञानशाखेकडील उपप्राचार्यपदाची सूत्रे रसायनशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. रा. वि. घाटे यांच्या हाती दिली. पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक व विभागप्रमुख उपप्राचार्य श्री. द. भावे हे १९५९ मध्ये निवृत्त झाले. तेव्हापासून गेली सहा-सात वर्षे पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. मा. कृ. परांजपे यांनी विज्ञानशाखेकडील उपचार्यपद भूषविले. अत्यंत कसोशीने व जागरूकतेने डॉ. परांजपे यांनी आपल्यावर सोपवलेली जबाबदारी पार पाडून आपल्या महाविद्यालयातील विज्ञानशिक्षणाच्या कार्यास नवे वळण दिले आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता, माध्यमासंबंधीच्या त्यांच्या अडचणी इ० चा विचार करून अध्यापन व प्रयोगमार्गदर्शन याबद्दल डॉ. परांजपे यांनी नव्या योजना आखल्या, नवे उपक्रम सुरू केले. त्याचा इष्ट परिणाम झाला. गेल्या दोन तीन वर्षांत विज्ञानशाखेकडील आपल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठीय परीक्षांतील यश हे

एक त्याचे गमक म्हणता येईल. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढले आहे. प्रथमश्रेणी व पारितोषिके मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढली आहे. विज्ञान आणि तंत्रविद्या यांना आज सर्वत्र उत्तेजन दिले जात आहे. या संदर्भात डॉ. परांजपे यांनी घडवून आणलेले विज्ञानशिक्षणाच्या संयोजनातील प्रागतिक बदल मोलाचे आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल महाविद्यालयास अभिमान व आदर वाटतो. डॉ. परांजपे यांचा आपल्या महाविद्यालयाशी वेगवेगळ्या नात्यांनी दीर्घकाळ संबंध आला आहे. सुमारे तीस वर्षे ! त्यामुळे उपप्राचार्यपदाच्या जबाबदारीतून जरी ते मोकळे झालेले असले तरी त्यांचे मार्गदर्शन मोलाचे असून ते सर्वांस मिळत राहील अशी खात्री आहे.

रसायनशास्त्र-विभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉ. **रा. वि. घाटे** यांची दि. १–४–६६ पासून उपप्राचार्यपदी नियुक्ती झाली आहे. महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाचे कार्याध्यक्ष या नात्याने गेली आठ-नऊ वर्षे डॉ. घाटे यांनी क्रीडाक्षेत्रातील आपल्या महाविद्यालयाच्या कार्याचे संयोजन उत्तम प्रकारे केले आहे. विद्यार्थ्यांना सर्वप्रकारे उत्तेजन देऊन त्यांना यशसंपादनाच्या दृष्टीने सर्वांचे सहकार्य मिळवून देण्याच्या कामी डॉ. घाटे यांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे. पुणे विद्यापीठाच्या विद्वत्सभेचे सदस्य, शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अभ्यासमंडळाचे व शास्त्रसभेचे स्वीकृत सदस्य, पूना केमिकल सोसायटीचे उपाध्यक्ष अशा विविध नात्यांनी डॉ. घाटे यांनी विज्ञानशिक्षणविषयक प्रश्नांना विधायक रीतीने चालना देण्यासाठी कार्य केले आहे. विज्ञानाच्या अध्यापनाचा व संशोधनाचा त्यांना बऱ्याच वर्षांचा अनुभव असल्यामुळे डॉ. घाटे यांच्या नेतृत्वाने आपल्या महाविद्यालयाचा विज्ञानविभाग अधिक संपन्न होईल व विज्ञानाच्या उपासनेत नवी शक्ती निर्माण करील असा विश्वास आहे. विज्ञान आणि तंत्रविद्या यांच्या अभ्यासाला – संशोधनाला चालना देण्यासाठी यावर्षी डॉ. घाटे यांच्या प्रेरणेने 'विज्ञान मंडळा'ची – सायन्स असोसिएशनची स्थापना झाली आहे. ही गोष्ट आम्हांस शुभसूचक वाटते. पदार्थविज्ञान व विशेषतः रसायन या विषयांत संशोधनात्मक अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची एक मोठी परंपरा आपल्या महाविद्यालयाने निर्माण केली आहे. ती परंपरा समर्थपणे पुढे पाऊल टाकील व बदलत्या काळाचे आव्हान जिद्दीने स्वीकारील यात शंका नाही.

## मुलांच्या वसतिगृहाचे नवे प्रमुख : प्रा. राईलकर

दि. १–४–६६ पासून मुलांच्या वसतिगृहाचे प्रमुख म्हणून आपल्या महाविद्यालयातील गणित व संख्याशास्त्राचे प्राध्यापक **म. रा. राईलकर** यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेली सहा वर्षे सध्याचे उपप्राचार्य प्रा. **रं. ना. गायधनी** यांनी मुलांच्या वसतिगृहाच्या प्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली होती. महाविद्यालयाच्या वास्तूत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना येथील शैक्षणिक वातावरणाचा पूर्णपणे लाभ घेता यावा व त्यांना सामुदायिक जीवनातील जबाबदारीचा अनुभव यावा अशी महाविद्यालयाची प्रथमपासून दृष्टी आहे. तीस अनुसरून प्रा. रं. ना. गायधनी यांनी सहकारी भांडार, सहकारी कँटीन, पतपेढी, विद्यार्थिविधानसभा इ. उपक्रम सुरू करून वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सांघिक जीवनातील शिस्तीचे प्रशिक्षण मिळण्यासाठी प्रशंसनीय प्रयत्न केला आहे. व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी हे उपक्रम चालू राहतील आणि नवे प्रमुख प्रा. म. रा. राईलकर त्यांत इष्ट ते बदल घडवून आणतील असा विश्वास आहे.

## प्रा. करमरकर जिमखान्याचे कार्याध्यक्ष

आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, भूतपूर्व प्राचार्य कै. र. दा. करमरकर यांचे चिरंजीव, भूगोल विषयाचे प्राध्यापक **प्र. र. करमरकर** यांची या शैक्षणिक वर्षी जिमखान्याच्या कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाविद्यालयातील जिमखाना विभागास आतापर्यंत पद्मश्री **प्रा. दि. ब. देवधर,** प्राचार्य **रा. रा. मालेगावकर,** डॉ. **पु. ग. सहस्त्रबुद्धे** डॉ. **रा. वि. घाटे** इ. चे बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे. क्रिकेट, हॉकी, बास्केट बॉल, कबड्डी–खो खो यांसारखे भारतीय खेळ इ. सर्वच क्रीडाविभागात आत्तापर्यंत आपल्या महाविद्यालयाने नाव मिळविले आहे. प्रा. प्र. र. करमरकर हे क्रीडाप्रेमी आहेत, क्रिकेटपटू आहेत. क्रीडाजीवनाशी त्यांचा जवळून संबंध आलेला आहे. आपल्या कर्तृत्वाने मान्यता पावलेल्या एका विभागाचे उत्तरदायित्व त्यांच्याकडे आले आहे ही आनंदाची गोष्ट आहे. प्रा. करमरकर यांच्या मार्गदर्शनाने आपला जिमखाना सर्व क्रीडाविभागांत नवे पराक्रम करील अशी आशा आहे.

## ग्रंथालयाचे नवे प्रमुख : प्रा. म. कृ. केळकर

दि. १–४–६६ पासून आपल्या ग्रंथालयाच्या प्रमुख-

पदी गणित व संख्याशास्त्राचे प्राध्यापक **म. कृ. केळकर** याची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी गेली पाच वर्षे डॉ. श्री. र. कावळे यांनी ग्रंथालय-प्रमुख म्हणून काम पाहिले. ग्रंथालयाचे नवे प्रमुख प्रा. म. कृ. केळकर यांनी १९५८ साली एम्. एस्‌सी. ( संख्याशास्त्र ) या परीक्षेत प्रथमश्रेणीत प्रथम क्रमांक मिळविला. काही वर्षे त्यांनी एम्. ई. एस. महाविद्यालयात अध्यापनाचे काम केले. आपल्या महाविद्यालयात त्यांची जून १९६१ मध्ये व्याख्याते म्हणून नेमणूक झाली. १९६३ मध्ये ते उपप्राध्यापक झाले आणि शिक्षण प्रसारक मंडळीच्या सेवेत कायम झाले. १९६५ साली शुद्ध गणित हा विषय घेऊन प्रा. केळकर पुन्हा एम्. एस्‌सी. परीक्षेस बसले आणि विद्यापीठात सर्वप्रथम येण्याचा बहुमान त्यांनी मिळविला. आपल्या विषयाचा गाढ व्यासंग आणि कौशल्यपूर्ण अध्यापन यांमुळे प्रा. केळकर यांनी अल्पावधीत लौकिक संपादन केला आहे. १–२–१९६६ पासून प्रा. केळकर यांची शिक्षण प्रसारक मंडळीचे आजीव सभासद म्हणून निवड झाली आहे. याबद्दल आम्ही प्रा. केळकर यांचे हार्दिक अभिनंदन करतो !

आपल्या ग्रंथालयाचा प्रपंच मोठा आहे. त्यात नित्य नवी भर पडत आहे. ग्रंथालय हे ज्ञान संपादनाचे प्रमुख साधन आहे. या साधनाची कार्यशक्ती जागृत ठेवण्याची व तिचे संवर्धन करण्याची सुसंधी प्रा. केळकर यांना मिळाली आहे. तिचा ते योग्य तो उपयोग करून घेतील आणि ग्रंथालयजीवनाची गतिमानता वाढेल अशी आशा वाटते.

## डॉ. वाळिंबे यांचा अभिमानास्पद बहुमान

पुणे विद्यापीठाच्या वतीने प्रतिवर्षी आयोजित होणाऱ्या ' साहित्यसम्राट केळकर व्याख्यानमाले 'चे यंदाचे व्याख्याते म्हणून आपल्या महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख, विख्यात वाङ्मयमीमांसक डॉ. रा. शं. वाळिंबे यांची निवड झाली होती. ' मराठी नाट्यसमीक्षा : १८६५–१९४३ ' या विषयावर त्यांची सहा व्याख्याने झाली.

नागपूर येथेही, नागपूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ' परांजपे स्मारक व्याख्यानमाले 'चे यंदाचे व्याख्याते म्हणून डॉ. वाळिंबे यांनाच निवडण्यात आले होते. ' अभिजात कलेतील व साहित्यातील सौंदर्याची साधना ' या विषयावर त्यांनी चार व्याख्याने दिली.

ही दोन्ही विषयांवरील व्याख्याने यथावकाश ग्रंथरूपाने प्रकाशित होणार आहेत.

साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रातील डॉ. वाळिंबे यांचा व्यासंग व अधिकार फार मोठा आहे. उपर्युक्त व्याख्यानमालांसाठी झालेली त्यांची निवड हा त्यांचा एक प्रकारचा बहुमानच होय.

डॉ. वाळिंबे यांच्यासारख्या मान्यवर विद्वान प्राध्यापकांवरच महाविद्यालयाची प्रतिष्ठा अवलंबून असते. डॉ. वाळिंबे यांच्या बहुमानामुळे आपल्या महाविद्यालयाची प्रतिष्ठा उंचावली आहे असेच कोणीही म्हणेल.

डॉ. वाळिंबे यांच्या बहुमानाचा आम्हांला अभिमान वाटतो. डॉ. वाळिंबे यांचे हार्दिक अभिनंदन !

## प्रा. भुपटकर व प्रा. वाघ यांना पीएच्. डी.

आपल्या महाविद्यालयातील हिंदी-विभागाचे प्रमुख प्रा. प्र. रा. भुपटकर व भूगोल-विभागाचे प्रमुख प्रा. दि. मु. वाघ यांना पुणे विद्यापीठाकडून पीएच्. डी. पदवी मिळाली आहे.

प्रा. भुपटकर यांनी ' हिन्दी और मराठी के ऐतिहासिक नाटक : तौलनिक अध्ययन ' या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला होता. प्रा. वाघ यांच्या संशोधनाचा व प्रबंधाचा विषय ' जिऑग्राफिकल फॅक्टर्स इन द राईज अँड फॉल ऑफ द मराठाज् ' हा होता.

प्रा. भुपटकर हे आपले माजी विद्यार्थी. आपल्या नू. म. वि. प्रशालेमध्ये त्यांनी हिंदीचे अध्यापन उत्तम रीतीने केलेले. आता महाविद्यालयातही आपल्या अध्यापनाच्या व व्यासंगाच्या योगे हिंदी-विभागाला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे.

नाटक हा प्रा. भुपटकर यांचा अतिजिव्हाळ्याचा विषय. ' महाराष्ट्रीय कलोपासक ' या संस्थेचे एक पदाधिकारी या नात्याने नाट्याशी त्यांचा अत्यंत जवळून संबंध आलेला. प्रत्यक्ष अनुभवास खोल अभ्यास व स्वतंत्र, सूक्ष्म चिंतन यांची जोड मिळालेली. या सगळ्याचा परिपाक त्यांच्या प्रबंधात उतरला असल्यास नवल नाही. त्यांच्या प्रबंधाला परीक्षकांकडून मान्यता मिळाली आहेच; अन्य हिंदी-मराठी पंडितांकडून ती मिळेल हे निस्संशय !

प्रा. भुपटकर यांनी वयाची पन्नाशी ओलांडल्यावर संशोधन चालू ठेवले आहे हे विशेष गौरवास्पद आहे.

त्यांच्या हातून आणखी संशोधन व्हावे अशी अपेक्षा आम्ही व्यक्त करून ठेवतो.

प्रा. वाघ यांनी, भूगोल हा विषय विशेष ( Special ) म्हणून सुरू केल्यापासून–म्हणजे १९६१ सालापासून-भूगोल-विभागाची वाढ फार चांगल्या रीतीने केली आहे. भूगोलाचे उत्कृष्ट पदवीधर त्यांनी अल्पावधीतच निर्माण केले आहेत.

प्रा. वाघ यांच्या प्रबंधाचा विषय अभिनव व महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या प्रबंधामुळे अभ्यासकांच्या विचारास अधिक चालना मिळेल यात शंका नाही.

भूगोलाच्या अभ्यासाला आजच्या काळात युद्ध-शास्त्राच्या दृष्टीने आता अधिक महत्त्व येणे स्वाभाविक आहे. प्रा. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोलाचे विद्यार्थी या बाबतीत प्रगती करतील असा विश्वास आम्हांला वाटतो. प्रा. वाघ यांच्या हातून संशोधनाच्या क्षेत्रात यापुढेही मोलाची कामगिरी व्हावी अशी आमची इच्छा आहे.

प्रा. भुपटकर व प्रा. वाघ यांचे संशोधन हे महाविद्यालयास भूषणावह आहे. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन ! विद्यार्थ्यांना त्यांच्यापासून पुढील अभ्यासाची स्फूर्ती यावी व प्रेरणा मिळावी !

### प्रा. लागू यांचे संशोधनार्थ कॅनडास प्रयाण

आपल्या महाविद्यालयातील गणितविभागातील प्राध्यापक श्री. श. गो. लागू हे ' थिऑरेटिकल फिजिक्स ' या विषयातील उच्च अभ्यासासाठी कॅनडास गेले आहेत. ' मेमोरिअल युनिव्हर्सिटी ऑफ न्यू फाउंडलंड ' या विद्यापीठाची शिष्यवृत्ती त्यांना मिळाली असून ती दोन वर्षेपर्यंत चालू राहणार आहे. या काळात संशोधनकार्य पुरे करून प्रा. लागू पीएच्. डी. पदवी संपादन करणार आहेत. त्यांच्या अभ्यासात व संशोधनात त्यांना सुयश मिळावे अशी इच्छा आम्ही व्यक्त करतो.

### कु. सुजाता सुपनेकर क्वीन्स कॉलेजात

आपल्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी कै. नलिनी हुल्याळकर ( शेवटी ' भावांजली ' पहावी ) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नॉर्थ कॅरोलायना ( यू. एस्. ए. ) या राज्यातील क्वीन्स कॉलेजात एक शिष्यवृत्ती ठेवण्यात आली आहे. ही शिष्यवृत्ती आपल्याच महाविद्यालयातील कु. सुजाता सुपनेकर यांना मिळाली. कु. सुपनेकर पदवी-पूर्व साहित्य-परीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाल्या; आणि पदवी प्रथमवर्ष साहित्य-परीक्षेत पुणे विद्यापीठात त्या दुसऱ्या आल्या. इंग्रजी भाषेवर त्यांचे चांगले प्रभुत्व आहे. २५ ऑगस्ट रोजी उच्च शिक्षणासाठी त्या अमेरिकेस गेल्या. इंडिया फाउंडेशनच्या वतीने यापूर्वीच त्या जाव-याच्या; पण अमेरिकेतील वास्तव्याची अभीष्ट अशी व्यवस्था न झाल्यामुळे त्यांना जाता आले नाही. तथापि अल्पावधीत, डॉ. गं. श्री. कोशे व विशेषेकरून प्राचार्य हुल्याळकर यांच्यामुळे सुपनेकर यांना अमेरिकेत जाण्याची संधी मिळाली. प्राचार्य हुल्याळकर यांच्याच अध्यक्षतेखाली त्यांना निरोप दिला गेला. त्यांना मिळालेल्या बहुमानाबद्दल आम्हांला आनंद वाटतो. त्यांना आम्ही सुयश चिंतितो.

### कु. शैलजा भाटे यांचे अमेरिकेहून पुनरागमन

आपल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व सध्याच्या रसायनशास्त्रविभागातील डेमॉन्स्ट्रेटर कु. शैलजा भाटे या ' एक्स्पेरिमेंट इन इंटरनॅशनल लिव्हिंग ' या योजनेअन्वये अमेरिकेस गेल्या होत्या. त्या आता परत आल्या आहेत. त्यांचे स्वागत करताना आम्हांला आनंद होत आहे.

विशाल अमेरिकन जीवनाच्या अत्याधुनिक दर्शनाने त्यांच्या अनुभवात मोलाची भर पडली असेल आणि तेथील वास्तव्यात अनेक मोलाच्या गोष्टी त्यांना आत्मसात करता आल्या असतील ! याचा आपल्या सहाध्यायांस त्यांनी अवश्य लाभ करून द्यावा.

## दि न वि शे ष

### लोकमान्य टिळक पुण्यतिथी :

१ ऑगस्ट १९६६ रोजी देवी रमाबाई सभागृहात प्राचार्य मालेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली लो. टिळक पुण्यतिथी, वादसभेचे उद्घाटन व एस्. पी. रिव्ह्यू–तृतीय-वर्षातील प्रथम अंकाचे प्रकाशन असा त्रिविध कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे म्हणून **प्रा. ग. प्र. प्रधान** उपस्थित होते. प्राचार्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर वादसभेचे कार्यवाह श्री. किशोर देवधर व एस्. पी. रिव्ह्यूचे संपादक श्री. रमेश टिळेकर यांनी अहवाल-वाचन केले. प्रा. प्रधान यांनी **कै. जगन्नाथ महाराज पंडित** यांच्या छायाचित्राचे अनावरण केले. महाविद्यालयाची आजची प्रशस्त जागा कै. पंडित यांच्याकडूनच मिळालेली. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे छायाचित्र त्यांचे पुत्र श्री. बाळ पंडित यांनी दिले आहे. छायाचित्र–अनावरणानंतर वादसभेचे उद्घाटन व एस्. पी. रिव्ह्यूच्या प्रथम अंकाचे

प्रकाशन प्रा. प्रधान यांनी केले. याचवेळी कु. जयश्री कानिटकर यांना संस्कृतात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल अध्यक्षांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

नंतर प्रा. प्रधान यांचे ' लोकमान्यांच्या जीवनातील समरप्रसंग ' या विषयावर भाषण झाले. प्रा. प्रधान म्हणाले, " टिळकांचे अवघे आयुष्य समरप्रसंगांनी भरले होते. देशभक्तीबरोबरच त्यांना ज्ञानाचीही विलक्षण ओढ होती. ज्ञान आणि कर्म यांपैकी नेमके काय करावे हा समरप्रसंग पहिल्यांदा त्यांच्यासमोर उभा राहिला. स्वतंत्र भारतात ते जन्मले असते तर गणितज्ञ झाले असते. परंतु देशाच्या पारतंत्र्याची सतत जाणीव असल्याने स्वतःच्या आवडत्या विषयाकडे पाठ फिरवून राजकारणात त्यांनी उडी घेतली. साध्य आणि साधन याबद्दलचा समरप्रसंगही त्यांच्या समोर होता. क्रांतिकारक शक्तीबरोबर कायदेशीर शक्तीचीही आवश्यकता स्वातंत्र्य-संपादनास हवी होती. म्हणून त्यांनी चतुःसूत्री सांगितली. त्यांचे व्यक्तिमत्त्व गतिमान होते, प्रगत होते असेच दिसून येईल. क्रांतिकारकांना त्यांनी परावृत्त केले नाही हे निश्चित. पण त्यांना प्रोत्साहन दिले किंवा नाही हे सांगता येत नाही. त्यांचा या बाबतचा निर्णय झाला नव्हता. टिळकांनी क्रांतीची तयारी ठेवली; पण प्रत्यक्ष कृती केली नाही, कोणत्या क्षणी कोणते साधन वापरावयाचे हे त्यांनी योग्यवेळी निर्णयाने ठरवले. "

वादसभेचे कार्याध्यक्ष प्रा. द. वि. कुलकर्णी यांनी शेवटी आभार मानले.

## स्वातंत्र्यदिन

यंदाचा स्वातंत्र्यदिन पुण्याचे माननीय महापौर श्री. ब. द. किल्लेदार यांच्या अध्यक्षतेने साजरा करण्यात आला. अध्यक्षांनी ध्वजारोपण केल्यावर सर्व उपस्थितांनी भारतीय लोकशाहीच्या रक्षणाच्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला. त्यानंतर श्री. किल्लेदार यांचे छोटेसे पण मार्मिक भाषण झाले. त्यांनी सद्यःस्थितीची जाणीव करून दिली. आणि परिस्थितीचे आव्हान विद्यार्थ्यांनी कसे स्वीकारावे ते सांगितले.

## हुतात्मा वसंत दाते स्मृतिदिन

१० सप्टें. ६६ रोजी हुतात्मा वसंत दाते स्मृतिदिन, एक थोर विचारवंत व साहित्यक **श्री. ना. ग. गोरे** यांच्या अध्यक्षतेखाली अभिनव पद्धतीने साजरा झाला. प्रथम त्यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या आवारात वसंत दातेच्या स्मृतिप्रीत्यर्थ वृक्षारोपण करण्यात आले. नंतर सभा झाली. विद्यार्थ्यांना उद्देशून श्री. नानासाहेब गोरे म्हणाले, " आपण आपल्यासमोरील आव्हानांचा स्वीकार करून त्यांना प्रतिसाद दिला तरच नवनिर्माण होईल. विद्यार्थ्यांनी विध्वंसक प्रवृत्तींचा त्याग करून विधायक कार्याची कास धरली पाहिजे. जगातील इतर देश आपल्यापुढे चालले आहेत; आपणही विज्ञानाच्या साहाय्याने पुढची मजल मारली पाहिजे. " शेवटी श्री. गोरे यांच्या हस्ते हुतात्मा वसंत दाते पारितोषिके ( गणितातील प्रावीण्याबद्दल ) कु. मीना जोशी व श्री. वसंत ओक ( लक्ष्यवेधातील नैपुण्याबद्दल ) यांना देण्यात आली.

## एस्. पी. रिव्ह्यूची प्रशंसनीय प्रगती

प्रा. श्री. शा. सवदी यांच्या मार्गदर्शनाखाली चाललेले ' एस्. पी. रिव्ह्यू ' हे विद्यार्थी–संपादित पाक्षिक नवनव्या स्वरूपात जोमाने प्रगती करीत आहे. त्याचे संपादक आहेत श्री. रमेश ठिळेकर आणि व्यवस्थापक आहेत श्री. सुरेश बसाळे.

' एस्. पी. रिव्ह्यू 'चे हे तिसरे वर्ष. आता ते खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचे मुखपत्र झाले आहे. त्यातील इंग्रजी व मराठी विभागातील साहित्य व सजावट प्रशंसनीय असते. त्यामुळे त्याचा वाचकवर्ग वाढून ते विद्यार्थिप्रिय झाले आहे.

सतत वीसपंचवीस विद्यार्थी–विद्यार्थिनी आकर्षक अंक काढण्यासाठी राबत असतात; लेखनाचे, सजावटीचे वेगवेगळे प्रयोग करीत असतात, हे पाहून बरे वाटते. सर्व विद्यार्थी, संपादक व त्यांना मार्गदर्शन करणारे प्राध्यापक यांना उदंड धन्यवाद !

## वक्तृत्वसाधना

उज्जयिनीच्या विश्वविद्यालयाने आयोजित केलेल्या ' कालिदास-समारोहा'तील आंतर्विद्यापीठीय संस्कृत-वक्तृत्व-स्पर्धेत यंदा पाचव्यांदा पुणे विद्यापीठीच्या संघाने अजेयपद मिळविले आणि **' रजत वैजयंती '** ( सिल्व्हर ट्रॉफी ) जिंकून आणली. समारोह-स्पर्धा सुरू झाल्यापासून सातत्याने पुणे विद्यापीठ हे यश संपादन करीत आहे.

पुणे विद्यापीठास यश मिळवून देण्यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचाही वाटा बराच आहे. यंदाच्या विजेत्या संघात पुणे विद्यापीठाचे श्री. माधव देशपांडे व आपल्या महाविद्यालयाच्या **कु. जयश्री गुणे** ( पदवीतृतीय वर्ष साहित्य–संस्कृत विशेष ) हे विद्यार्थी होते.



**टिळक पुण्यतिथि : अध्यक्ष : प्रा. ग. प्र. प्रधान**
( कु. जयश्री कानिटकर पारितोषिक स्वीकारताना )




**' परशुरामीय ' निबंध स्पर्धा— पारितोषिक-वितरण**
श्री. शांताराम आठवले भाषण करीत असताना. शेजारी ' परशुरामीय ' संपादक डॉ. श्री. र. कावळे




**' तत्त्वज्ञान—मानसशास्त्र—संघटना ' उद्घाटन**
उद्घाटक प्रा. न. ग. दामले भाषण करीत असताना. डावीकडे : अध्यक्ष : प्राचार्य मालेगावकर



**पदवीपूर्व साहित्य : प्रथमश्रेणीचे मानकरी : एप्रिल १९६६**

**बसलेले :** ( डावीकडून ) कु. प्रमोदिनी ना. दिवाणजी, कु. विद्या ग. फडणीस, उपप्राचार्य रं. ना. गायधनी, प्राचार्य रा रा. मालेगावकर, श्री. बा. गोखले, मा. कृ. जोशी.

**उभे :** ( डावीकडून ) मनोहर राजर्षि, : कु. शोभा तांबे, कु. कुमुदिनी भिडे, कु. विद्या काळे, कु. गौरी जोशी, कु. अलका नगरकर, आ. वा. हर्डीकर.



**' पुरुषोत्तम करंडक '**
**एकांकिका स्पर्धा**
**उपविजेता संघ, १९६६**

( डावीकडून ) : श्री. श्रीराम खरे ( उत्कृष्ट दिग्दर्शक ), श्री. दत्तात्रेय फडके, प्रा. शं. रा. देशपांडे, कु. गौरी जोशी ( अभिनय-नैपुण्य ), श्री. सुरेश बसाळे (अभिनय-नैपुण्य.)

**पी. डी. ए. नाट्य-वाचन-स्पर्धा**
**प्रथम पारितोषिक**
**विजेता संघ, १९६६**

**बसलेले :** ( डावीकडून ) श्री. सुरेश बसाळे ( दिग्दर्शक ), श्री. श्रीराम खरे ( दिग्दर्शक ), प्रा. शं. रा. देशपांडे, श्री. अविनाश बोडस.

**उभे :** ( डावीकडून ) कु. कुमुद मांडके, श्री. श्रीकांत बहुलकर (वाचन-नैपुण्य ), कु. अंजली फडके ( गणपतराव बोडस ट्रॉफी-विजेती )



या स्पर्धेत कु. गुणे यांना प्रथम क्रमांक मिळाला. त्यांना **महाराज जिवाजीराव सिंदिया सुवर्णपदक** देण्यात आले.

पुणे विद्यापीठाचे यश व त्यास कारण असलेले विद्यार्थ्यांचे वक्तृत्व हे गौरवार्ह असेच आहे यात शंका नाही.

**आनंद हर्डीकर व रमेश टिळेकर** या दोघांनी दादरच्या नवयुग ढाल वादस्पर्धेत भाग घेऊन **कै. बंडा हर्डीकर ढाल** जिंकली. या स्पर्धेत तीस संघांनी भाग घेतला होता.

आनंद हर्डीकर यांनी महात्मा फुले वक्तृत्वस्पर्धेत भाग घेऊन प्रथम क्रमांक मिळविला व **फुले-ढाल** जिंकली.

न्या. रानडे वाद-स्पर्धेतही हर्डीकर यांनी प्रशस्तिपत्रक मिळविले.

या वर्षी '**परशुरामीय वक्ता**' म्हणून हर्डीकर यांचीच निवड झाली आहे.

हर्डीकर व टिळेकर यांचे अभिनंदन! हर्डीकर यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. इतरांनीही अशीच वक्तृत्वसाधना पुढे चालू ठेवावी.

### नाट्य-गायन-वादन-नैपुण्य

### पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धा

ह्या स्पर्धेला पुण्याच्या महाविद्यालयीन रंगभूमी क्षेत्रात विशेष महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या महाविद्यालयाच्या नाट्यमंडळाने सादर केलेल्या 'तीस मिनिटे' ह्या एकांकिकेला स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे यश मिळाले. परंतु प्रथम क्रमांकाच्या एकांकिकेपेक्षा गुणवत्तेने तिचा दर्जा मुळीच कमी नव्हता असे परीक्षकांनी जाहीरपणे बोलून दाखवले. छोट्या स्टेशनवरील प्रतीक्षागृह, त्यात काही काळासाठी आलेले दोन प्रवासी व त्यांच्या या अल्पकालीन वास्तव्यातून निर्माण होणारे नाट्य श्री. सुरेश बसाळे व कु. गौरी जोशी या दोन्ही कलावंतांनी प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले. श्री. श्रीराम खरे यांनी आपल्या कुशल दिग्दर्शनाने अतिशय वास्तव, वेधक व अप्रतिम वातावरणनिर्मिती करून त्यास पोषक ध्वनींची जोड दिली होती. दत्ता फडके यांनी उत्तम साथ दिली. **श्रीराम खरे** यांना **उत्कृष्ट दिग्दर्शनाचे** व **कु. गौरी जोशी** व **श्री. सुरेश बसाळे** यांना **उत्कृष्ट अभिनयाबद्दल** प्रशस्तिपत्रे मिळाली. 'मोठे मासे, छोटे मासे,' ही एकांकिका श्री. धनंजय गोळे यांनी दिग्दर्शित केली होती. तिचा पहिल्या चारात क्रमांक लागला. कु. मंगला गुमास्ते व कु. रोहिणी ओक यांच्या अभिनयातील वास्तवता उल्लेखनीय होती.

### आन्तरमहाविद्यालयीन नाट्यवाचन स्पर्धा

पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनतर्फे घेतल्या गेलेल्या आन्तरमहाविद्यालयीन नाट्यवाचन-स्पर्धेत आपल्या नाट्यमंडळाने सादर केलेल्या 'गोष्ट' ह्या एकांकिकेच्या संघाने ढाल जिंकली. सर्वश्रेष्ठ वाचकाची नटवर्य **गणपतराव बोडस ट्रॉफी कु. अंजली फडके** यांनी जिंकली. श्रेष्ठ वाचक प्रशस्तिपत्रे श्रीकान्त बहुलकर, अविनाश बोडस, दिलीप तक (कौंतेय) यांना मिळाली. कु. कुमुद मांडके यांनी उत्कृष्ट साथ दिली. सुरेश बसाळे, श्रीराम खरे यांचे दिग्दर्शन होते.

### संगीत स्पर्धेतील सुयश

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने झालेल्या संगीत स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघाने 'कालिदास संगीत ढाल' मिळविली. त्याचप्रमाणे समरगीत स्पर्धेत आपल्या संघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

### आंतरमहाविद्यालयीन वाद्यवृंद-स्पर्धा

रोटरी क्लबतर्फे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन ऑर्केस्ट्रास्पर्धेत आपल्या वादकसंघाने भारतीय व पाश्चात्त्य संगीताचे प्रथम **पारितोषिक** श्री. **विनय देवरुखकर** यांच्या नेतृत्वाखाली मिळवले.

## काही उल्लेखनीय कार्यक्रम

### श्री. गुराप्पा मुद्दापूर यांची वैशिष्ट्यपूर्ण शिष्यवृत्ती

जमखंडी संस्थानच्या राजघराण्यातील एक निष्ठावंत सेवक, श्रीमंत डॉवेजर लेडी रमाबाई राणीसाहेब पटवर्धन यांच्या सेवेत असलेले सिद्धहस्त आचारी श्री. गुराप्पा मुद्दापूर यांची बरेच दिवसांपासूनची अशी इच्छा होती की ज्या संस्थेशी श्रीमंत लेडी रमाबाई राणीसाहेबांचे नाव सभागृहाच्या रूपाने कायमचे निगडित झाले आहे, त्याच संस्थेशी शोभून दिसेल अशा रीतीने आपलेही नाव निगडित व्हावे. त्यांच्या या औदार्यभावनेचा आदर करून आपल्या महाविद्यालयाचे भूतपूर्व प्राचार्य हुल्याळकर यांनी संस्थेवरील आपल्या अभिजात प्रेमामुळे या कामी लक्ष घातले; श्री. मुद्दापूर यांनी देऊ केलेल्या देणगीचा व

त्यातून सुरू करावयाच्या शिष्यवृत्तीचा तपशील निश्चित केला आणि या शिष्यवृत्तीचा शिक्षण प्रसारक मंडळीने स्वीकार करावा म्हणून प्रयत्न केला. म्हणून मुलींच्या वसतिगृहातील शैक्षणिक व इतर सर्व दृष्टींनी उत्कृष्ट ठरलेल्या विद्यार्थिनीस दरमहा पंचवीस रुपये या शिष्यवृत्तीच्या रूपाने आता दिले जाणार आहेत.

या शिष्यवृत्तीच्या प्रकटनाच्या निमित्ताने एक अनौपचारिक समारंभ बुधवार दि. २८ डिसेंबर १९६६ रोजी आयोजित करण्यात आला होता. समारंभाचे अध्यक्षस्थान प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांनी भूषविले होते. जमखंडी राजघराण्यातील श्रीमंत डॉवेजर लेडी रमाबाईसाहेब पटवर्धन या मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. प्रारंभी श्री. मुद्दापूर यांच्या तैलचित्राचे अनावरण प्राचार्य दांडेकर यांनी केले. हे तैलचित्र मुलींच्या वसतिगृहातील भोजनगृहात लावण्यात आले आहे. ते विद्यार्थिनींना आपल्या भावी जीवनातील गृहिणीपदाच्या कर्तव्याची जाणीव करून देत राहील अशी आशा प्राचार्य दांडेकरांनी अनावरणप्रसंगी व्यक्त केली.

प्राचार्य हुल्याळकर यांनी प्रास्ताविक निवेदन केले. सर्व क्षेत्रांतील सर्व थरांतील व्यक्तींचा स. प. महाविद्यालयाच्या स्थैर्याला — विकासाला हातभार लागत असून तेथे कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाही ही मोठेपणाची समतेची भावना या देणगीमागे उभी आहे; सामान्य माणसे राजघराण्याच्या सत्त्वशील परंपरेचा संस्कार घेऊन असामान्य दातृत्व व औदार्य प्रकट करू शकतात त्याचे प्रतीक म्हणजे ही शिष्यवृत्ती, असे उद्गार प्राचार्य हुल्याळकरांनी काढले. मुलींच्या वसतिगृहाचे प्रमुख प्रा. के. पं. मंगळवेढेकर यांनी देणगीबद्दल — शिष्यवृत्तीबद्दल आनंद व्यक्त करून या शिष्यवृत्तीमुळे वसतिगृहातील जीवनास 'टोन' येण्यास मदत होईल अशी आशा प्रकट केली. प्राचार्य मालेगावकर यांनी जमखंडी राजघराण्यातील सर्वांचे स. प. वरील प्रेम व औदार्य याचे ही शिष्यवृत्ती हे स. प. सुवर्ण महोत्सवसंवत्सरात लाभलेले एक मानचिन्ह आहे असे सांगितले आणि या वर्षीची शिष्यवृत्ती प्रथमवर्ष विज्ञानवर्गातील विद्यार्थिनी कु. उषा चोपडे हिला आपल्या शुभहस्ते द्यावी अशी श्रीमंत राणीसाहेबांना विनंती केली. शिष्यवृत्ती दिल्यानंतर श्रीमंत राणीसाहेबांच्या वतीने त्यांचे जावई कर्नल व्ही. डी. देशपांडे यांनी समयोचित भाषण केले. प्राचार्य दांडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जमखंडी राजघराण्याच्या औदार्यामुळे-प्रतिष्ठेमुळे त्यावेळच्या 'न्यू पूना कॉलेज'ला स्थिरपद होता आले व प्रगतीचा आजपर्यंतचा मार्ग पुढिलांना सुकर झाला याबद्दल संस्थेच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली, आणि श्री. मुद्दापूर यांच्या सात्त्विक औदार्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले. चहापानाने ह्या घरगुती स्वरूपाच्या गोड समारंभाची अखेर झाली. जमखंडी राजघराण्यातील मंडळी या समारंभास जातीने उपस्थित राहिली होती.

## अल्पबचत–स्वयंसेवक–मोहिमेचे उद्घाटन

महाराष्ट्राचे अल्पबचत मंत्री ना. होमी तल्यारखान यांनी अल्पबचत–विद्यार्थी–स्वयंसेवक–मोहिमेचे दि. २६ ऑगस्ट रोजी देवी रमाबाई सभागृहात उद्घाटन केले. विद्यार्थ्यांना अल्पबचत करण्याचे आवाहन करून ना. तल्यारखान म्हणाले, "तुम्ही स्वतः अल्पबचत कराच, परंतु शेजारच्या लोकांना, मित्रांनाही करावयास लावा प्रत्यक्ष कार्याचा अनुभव येईल, लोकशिक्षण करता येईल, विद्यार्थी अल्पबचत-स्वयंसेवक बचतआघाडीवरील सैनिक होतील. त्यामुळे देशाची आर्थिक आघाडी मजबूत होईल."

या प्रसंगी अल्पबचत-संचालक श्री. ए. जी. वालावलकर यांनी अल्पबचत-योजनेची व तिच्या प्रचाराची सविस्तर माहिती सांगितली. प्रारंभी प्राचार्य मालेगावकर यांनी स्वागताचे भाषण करून शि. प्र. मंडळीच्या वतीने भरीव सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. शि. प्र. मंडळीचे सचिव प्रा. मंगळवेढेकर यांनी आभार मानले. उपप्राचार्य गायधनी या कार्यात विशेष लक्ष घालीत आहेत.

## सायन्स असोसिएशनचे उद्घाटन

महाविद्यालयातील विज्ञानविभागाच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या सायन्स असोसिएशनचे उद्घाटन, मिशिगन युनिव्हर्सिटीचे डॉ. मिल्टन टॅमर्स यांच्या व्याख्यानाने झाले. व्याख्यानाचा विषय होता : 'टेंपरेचर अँड एनर्जी'.

व्याख्याने, फिल्म-शो असे वेगवेगळे उद्बोधक कार्यक्रम सायन्स असोसिएशन, आयोजित करीत आहे. या कार्यक्रमांचा सविस्तर वृत्तान्त पुढे देण्यात येईलच.

प्रा. राजे हे असोशिएशनचे उपाध्यक्ष असून डॉ. मांडके व प्रा. सरलष्कर हे कार्यवाह म्हणून काम पहात आहेत.

विद्यार्थ्यांत विज्ञानाची चांगली आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने आणि विद्यार्थ्यांना नवनव्या संशोधनाचा परिचय करून देऊन अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने सायन्स असोसिएशनची स्थापना ही स्वागतार्ह घटना होय. असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. राजे व उप-प्राचार्य डॉ. घाटे यांच्या मार्गदर्शनाखाली असोसिएशन महत्त्वाचे काम करून दाखवील असा विश्वास वाटतो.

### विद्यापीठ परीक्षांतील प्रथम श्रेणीच्या विद्यार्थ्यांचे संमेलन

मार्च-एप्रिल १९६६ च्या विद्यापीठ-परीक्षांत, प. पू. साहित्य, शास्त्र, प. प्र. व. शास्त्र या वर्गांतील प्रथमश्रेणी प्राप्त करणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्राचार्य मालेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली २९ सप्टेंबर १९६६ रोजी संमेलन साजरे झाले. हे संमेलन ' परशुरामीय 'च्या वतीने आयोजित करण्यात आले होते. वर्गवार ग्रुप फोटो काढण्याचा कार्यक्रम झाल्या-नंतर प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून अभिनंदनपर भाषण केले. सुयश टिकवून भावी जीवन उज्ज्वल करावे, आणि महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक भाषणात ' परशुरामीय 'चे कार्यकारी संपादक प्रा. अर्जुनवाडकर यांनी संमेलनाचा उद्देश सांगितला. वेगवेगळ्या निमित्तांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येता यावे आणि विद्यार्थ्यांशी हितगुज करण्याची संधी महाविद्यालयास मिळावी, हा उद्देश आहे, असे ते म्हणाले.

### प्रश्नोत्तररूप खुली चर्चा

२६ सप्टें. १९६६ रोजी ही चर्चा ' परशुरामीय '-तर्फे आयोजित केली होती. अमेरिकेतील पाहुणे, समाज-शास्त्राचे प्राध्यापक डॉ. रेमंड रीस, कोलगेट युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क स्टेट, हे चर्चाप्रवर्तक होते. डॉ. रेमंड रीस हे भारतीय संगीत व भारतीय सांस्कृतिक जीवन यांचा अभ्यास करण्यासाठी मद्रासला आलेले आहेत. त्यासाठी त्यांनी थोडे तमिळचेही अध्ययन केले आहे. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांवर त्यांनी चर्चा केली. डॉ. कावळे या वेळी उपस्थित होते.

### वादसभेच्या वतीने परिसंवाद

न्या. रानडे वादस्पर्धेसाठी स्पर्धकांना मार्गदर्शन म्हणून डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयातील प्राध्यापकांचा ' अविकसित देशात संसदीय लोकशाही आवश्यक आहे काय ? ' या विषया-वर एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यात डॉ. केरूर, प्रा. शिरगुरकर, प्रा. सोमण, प्रा. देव, प्रा. पाटील, श्री. चाफेकर यांनी भाग घेतला.

### हिन्दी वर्गाचा अभिनव उपक्रम

प्राचार्य मालेगावकर यांच्या हस्ते तृ. व. सा. हिन्दी वर्गातील विद्यार्थ्यांनी चौदा भाषांतील प्रातिनिधिक साहित्यसेवकांचा ' आन्तर भारती चित्रसंच ' वर्गाला अर्पण केला. वर्गसंघटक प्रा. केणी यांना त्याचा स्वीकार केला.

या प्रसंगी वर्गप्रतिनिधी श्री. वसंत शिंदे यांनी प्रादेशिक भाषांचा अभ्यास करण्याचा संकल्प बोलून दाखविला आणि आन्तर-भारती-प्रवृत्ती महाविद्यालयात जोपासण्याचा दिलासा दिला. प्राचार्य आपल्या भाषणात म्हणाले, " हिन्दी वर्गाला आन्तर भारतीचे स्वरूप यावे. हिन्दीच्या विद्यार्थ्यांनी प्रादेशिक भाषा आत्मसात कराव्या व राष्ट्रीय एकता दृढ करण्याच्या उद्देशाने आन्तरभारतीय प्रवृत्ती अंगी बाणवावी. "

या कार्यक्रमातच प्रा. भुपटकर यांचा त्यांना ' डॉक्टरेट ' मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी सत्कार केला. " जेथे सदैव हिंदी वातावरण असेल असे एक हिंदी–भवन महा-विद्यालयात असावे. " अशी आपली मनःकामना या वेळी त्यांनी व्यक्त केली.

### ' परशुरामीय ' निबंधस्पर्धा

यंदा ' परशुरामीय 'तर्फे सर्व वर्गांसाठी एकच निबंध-स्पर्धा, ' आजचे जीवन आणि आजचे चित्रपट ' या विषयावर आयोजित केली होती. एकूण ४७ निबंध आले. त्यांचे परीक्षण एक श्रेष्ठ चित्रपट-दिग्दर्शक **श्री. शांताराम आठवले** यांनी केले. रुपये पंचवीसचे प्रथम पारितोषिक श्री. शशिकान्त पटवर्धन यांना व रुपये पंधराचे द्वितीय पारितोषिक सौ. उषा गाडगीळ यांना मिळाले. यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन! श्री. शांताराम आठवले यांच्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद, सर्व स्पर्धकांनाही धन्यवाद!

### ' परशुरामीय ' निबंधस्पर्धा-पारितोषिकवितरण

हा समारंभ श्री. शांताराम आठवले यांच्या अध्यक्षते-खालीच पार पडला. त्यांच्या भाषणाचा विषय होता : ' आजचे जीवन: आजचे चित्रपट '. त्यांनी विद्यार्थ्यांच्या निबंधांचा परीक्षणात्मक आढावा घेऊन पुढील उद्गार काढले, " चित्रपट पहाणाऱ्या सर्वसाधारण प्रेक्षकांची बौद्धिक, वैचारिक पातळी घसरल्यामुळे आजचा प्रेक्षक अवास्तववादी आणि काल्पनिक शृंगाराने नटलेले चित्र-

पट अधिक पसंत करतो व त्यामुळे जीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब आजच्या चित्रपटात पहायला सापडत नाही."

अध्यक्षांच्या हस्ते श्री. पटवर्धन व सौ. गाडगीळ यांना पारितोषिके देण्यात आली.

### पाहुण्यांच्या भेटी

मिशिगन युनिव्हर्सिटीचे डॉ. मिल्टन टॅमर्स व कोलगेट युनिव्हर्सिटीचे डॉ. रेमंड रीस महाविद्यालयात येऊन गेल्याचा उल्लेख यापूर्वी वेगळ्या संदर्भात केलेलाच आहे.

या दोन परदेशी पाहुण्यांशिवाय प्रो. पॅटिनकिन डीन ( एलिझी केपन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, हिब्रू युनिव्हर्सिटी ऑफ जेरुसलेम, इस्राएल ) व मिसेस हान ( केंब्रिज ) हे दोन परदेशी पाहुणेही महाविद्यालयात येऊन गेले. प्रो. डीन हे 'इकॉनॉमिक फोरम'च्या वतीने 'Economic Development of Israel' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी आले होते. मिसेस हान यांना, आपल्या महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या माजी प्राध्यापिका सौ. कुमुद पोरे ह्या अर्थशास्त्राचे अध्यापन कसे चालते हे दाखविण्यासाठी घेऊन आल्या होत्या. मिसेस हान, प्रा. शिरगुरकर यांच्या वर्गात उपस्थित राहिल्या. नंतर त्यांनी स्वतः अर्थशास्त्रातील एक विषय विद्यार्थ्यांना शिकविला.

महाविद्यालयातील वेगवेगळ्या मंडळांची उद्घाटने करण्याकरिता डॉ. नागराजन, श्री. केशवराव भोळे, श्री. बोंद्रे, श्री. अ. ज. करंदीकर, श्री. यदुनाथ थत्ते यांच्यासारख्या मान्यवर व्यक्ती येऊन गेल्या.

डॉ. सु. मं. कत्रे व प्रा. न. ग. दामले यांचा स्वतंत्र उल्लेख केला पाहिजे. दोघेही आपल्या महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक; प्रा. दामले हे तर १९१६ सालच्या पहिल्या अध्यापकवर्गात असलेले प्राध्यापक. ते अनुक्रमे 'प्राध्यापक-चर्चामंडळ' व 'तत्त्वज्ञान-मंडळ' या संघटनांच्या उद्घाटनांसाठी आले होते. सुवर्णमहोत्सव संवत्सरी त्यांचे येणे झाले. यामुळे सर्वांना आनंद झाला. ज्या महाविद्यालयात एके काळी आपण अध्यापन केले, त्याच महाविद्यालयात पुन्हा — तेही सुवर्णमहोत्सव संवत्सरी — आपल्याला व्याख्यानाच्या निमित्ताने येता आले आणि महाविद्यालयाची प्रगती पहाण्याची संधी मिळाली, यामुळे त्यांनाही आनंद वाटला असेल हे खचित !

## माजी विद्यार्थी गौरव

माजी विद्यार्थ्यांच्या यशोगौरवाची जी माहिती हाती आली ती पुढे दिली आहे. माजी विद्यार्थ्यांचे कर्तृत्व पाहून कोणाही परशुरामीयाचे अंतःकरण आनंदाने व अभिमानाने भरून येणे अगदी स्वाभाविक आहे.

### डॉ. टिळक यांच्या संशोधनाचा सन्मान

नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे डायरेक्टर डॉ. बा. द. टिळक यांच्या संशोधनकार्याचा सन्मान काही महिन्यांपूर्वी करण्यात आला. त्यांना भटनागर पारितोषिक, बानर्जी-पदक व नाईक-सुवर्णपदक देण्यात आले.

डॉ. टिळक १९३७ साली आपल्या महाविद्यालयातून बी. एस्‌सी. परीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले. १९४३ मध्ये त्यांनी डॉक्टरेट मिळविली. पुढील काळात त्यांच्या संशोधनासाठी डी. फिल., डी. एस्‌सी. ( ऑक्सफर्ड ) या पदव्या त्यांना बहाल करण्यात आल्या. नोबेल पारितोषिक-विजेते प्रो. आर. बी. वुडवर्ड यांच्यासह हार्वर्ड युनिव्हर्सिटीत त्यांनी संशोधन केले. आतापर्यंत त्यांचे १२० संशोधनात्मक निबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली २५ विद्यार्थ्यांनी पीएच्. डी. पदवी मिळविली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेले इंडियन डायस्टफ् इंडस्ट्रीज, अल्ट्रा लॅबोरेटरीज, अॅनिलीन डाईड कं. लि., अतुरा केमिकल्स, हायको प्रॉडक्ट्स हे उद्योगप्रकल्प तीनचार कोटींचे उत्पादन करीत आहेत.

डॉ. मॅकबेन, डॉ. फिंच, डॉ. वेंकटरामन यांच्यासारख्या थोर व्यक्तींनी भूषविलेल्या डायरेक्टर-पदाची प्रतिष्ठा डॉ. टिळकांच्या कार्यामुळे वाढली आहे असे म्हटल्यास ते मुळीच अतिशयोक्त ठरणार नाही.

डॉ. टिळकांसारख्या माजी विद्यार्थ्यांचे जीवन-कर्तृत्व आज शिक्षण घेणाऱ्या सर्व परशुरामीयांना स्फूर्ति देणारे ठरेल हे निस्संशय !

### प्रा. पुंडलीक यांना नेहरू पारितोषिक

शांतताप्रस्थापनेस उपकारक असे साहित्य निर्माण केल्याबद्दल 'सोव्हिएट लॅंड'च्या वतीने डेक्कन कॉलेजातील प्रा. विद्याधर पुंडलीक यांना नेहरू पारितोषिक दिले गेले. महाभारतातील कथाभागावर आधारलेल्या 'चक्र' या एकांकिकेसाठी प्रा. पुंडलिक यांचा हा बहुमान करण्यात आला.

### श्री. हिंगवे 'इयास्लिक'चे उपाध्यक्ष

पुणे विद्यापीठाच्या 'जयकर ग्रंथालया'चे व ग्रंथपालनशास्त्र-विभागाचे प्रमुख श्री. कृ. शं. हिंगवे

यांची, त्रिवंद्रम येथे डिसेंबर १९६५ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय ग्रंथालयपरिषदेच्या प्रसंगी, 'इयास्लिक' या अखिल भारतीय ग्रंथालयसंघटनेचे उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या 'युनेस्को इन्फर्मेशन सेंटर' या विभागाचे चिटणीस म्हणूनही त्यांची निवड झाली आहे.

### श्री. पाटील पत्रकार परिषदेचे अध्यक्ष

पुण्याच्या 'विशाल सह्याद्रि' दैनिकाचे संपादक श्री. अनंतराव पाटील यांनी औरंगाबाद येथे झालेल्या एकोणिसाव्या पत्रकार परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले.

### डॉ. चुनेकर यांचा प्रबंध सर्वोत्कृष्ट

१९६३-६४ सालातील पीएच्. डी. साठी मान्य झालेला सर्वोत्कृष्ट प्रबंध म्हणून डॉ. सु. रा. चुनेकर यांचा प्रबंध निवडला गेला; आणि त्यांना परांजपे पारितोषिक व साहित्यसम्राट केळकर पारितोषिक अशी दोन पारितोषिके देण्यात आली. 'डॉ. माधवराव पटवर्धन (माधव जूलियन) वाङ्मय : दर्शन आणि चिकित्सा' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. लवकरच त्यांचा प्रबंध एका नामवंत प्रकाशनसंस्थेतर्फे प्रसिद्ध होत आहे.

### श्री. पेठे यांना पीएच्. डी.

पुणे विद्यापीठाच्या जयकर-ग्रंथालयातील सहायक ग्रंथपाल श्री. म. प. पेठे यांना पुणे विद्यापीठाने नुकतीच पीएच्. डी. पदवी दिली आहे. 'ज्ञानदेव आणि ज्ञानेश्वरी एतद्विषयक अभ्यासाचे ऐतिहासिक समालोचन' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. अशा समालोचनेचा हा पहिलाच मोठा प्रयत्न आहे. डॉ. शं गो. तुळपुळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले होते.

प्रबंधाच्या निमित्ताने श्री. पेठे यांनी ज्ञानदेव-वाङ्मयाची बृहत्सूची तयार केली आहे. ती अभ्यासकांना फारच उपयुक्त ठरणार आहे.

पीएच्. डी. पदवी संपादन करणारे श्री. पेठे हे पहिलेच महाराष्ट्रीय ग्रंथपाल असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही.

### सौ. कुलकर्णी यांना पीएच्. डी.

पीएच्. डी. साठी सौ. कुसूम कुलकर्णी यांना पुणे विद्यापीठाची संशोधन-शिष्यवृत्ती मिळाली होती. प्रा. रा. श्री. जोग यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठी कादंबरीतील मनोलेखन' ( The Psycho-Literary study of charaterisation in Marathi Novel ) या विषयावर त्यांनी प्रबंध लिहिला. पुणे विद्यापीठाने तो पदवीयोग्य ठरवून सौ. कुलकर्णी यांना पीएच्. डी. पदवी दिली आहे.

### श्री. कापडी यांना पीएच्. डी.

पूर्वी काही काळ जीवशास्त्रविभागात श्री. अरविंद कापडी यांनी काम केले होते. नंतर चार वर्षांसाठी सीनियर रीसर्च फेलोशिप मिळाल्यावर डॉ. सुखदेव यांच्या मार्गदर्शनाखाली 'Studies in Diterpenoits' या विषयावर त्यांनी संशोधन केले. त्यांचा प्रबंध मान्य होऊन त्यांना पीएच्. डी. पदवी मिळाली आहे. सध्या ते नॅशनल केमिकल लॅबोरेटरीत आहेत.

### श्री. फडके यांचे घवघवीत यश

श्री. भालचंद्र बळवंत फडके हे १९६६ सालच्या एम्. ए. च्या परीक्षेत ८५ टक्के गुण मिळवून सर्वप्रथम आले. त्यांना 'इंडियन मॅथेमॅटिकल कॉन्फरन्स गोल्डन ज्युबिली प्राइझ' व चॅन्सेलर्स गोल्ड मेडल मिळाले.

श्री. फडके एस्. एस्. सी. परीक्षेत तिसरे आले होते; आणि बी. ए. मध्ये दुसरे आले होते.

२ सप्टेंबर १९६६ रोजी ते युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्निया, लॉस एंजेलिस, येथे गेले. त्यांना रीसर्च टीचिंग असिस्टंटशिप मिळाली आहे.

श्री. फडके यांचे यश घवघवीत आहे असेच म्हणावे लागेल. त्यांना परदेशातील वास्तव्यातही भरघोस यश मिळावे !

### श्री. करंदीकर एल्एल्. बी. मध्ये सर्वप्रथम

१९६६ सालच्या सेकंड एल्एल्. बी. परीक्षेत श्री. प्रकाश वासुदेव करंदीकर सर्वप्रथम आले. त्यांना भोपटकर, काळे, आठवले पारितोषिके मिळाली; तसेच विठ्ठलपंत तुळपुळे सुवर्णपदकही मिळाले.

### श्री. कोपर्डेकर नगररचनाशास्त्र-अभ्यासार्थ पोलंडला

पुण्याचे जिद्दीचे प्रकाशक श्री. द. र. कोपर्डेकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. हेमचंद्र हे नगररचनाशास्त्राच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्याच्या वतीने पोलंडला गेले होते. स्टेची विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करून ते परत आले आहेत.

यापूर्वी दिल्ली येथील पदव्युत्तर अभ्यासक्रमात ८१ टक्के गुण मिळवून त्यांनी पहिला क्रमांक पटकावला होता. 'औद्योगीकरणासाठी लागणाऱ्या जागा' या त्यांच्या प्रबंधाबद्दल परीक्षकांनी त्यांची प्रशंसा केली होती.

## श्री. शिदोरे यांचे इंग्लंडला प्रयाण

महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. वा. रा. शिदोरे हे उच्च शिक्षणासाठी इंग्लंडमधील ब्रिस्टल विद्यापीठात गेले आहेत. १९६६–६७ सालासाठी 'कॉमनवेल्थ एज्युकेशन कॉर्पोरेशन स्कीम' खाली 'कॉमनवेल्थ एज्युकेशन टीचर ट्रेनिंग बर्सरी' नावाची शिष्यवृत्ती त्यांना मिळाली आहे. भारतातून यंदा केवळ ७–८ व्यक्तींचीच निवड झाली; त्यांत श्री. शिदोरे यांचा अंतर्भाव झालेला आहे.

## श्री. लेले यांना कॅप्टन–हुद्दा

स्टॅटिस्टिक्स घेऊन बी. एस्‌सी. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले श्री. श्री. वि. लेले यांना भारतीय सैन्यात कॅप्टन हा हुद्दा मिळाला आहे.

## कु. परांजपे यांना प्रथमश्रेणी

कु. स्नेहलता वामन परांजपे यांना १९६६ सालच्या एम्. एस्‌सी. परीक्षेत प्रथमश्रेणी मिळाली आहे.

या सर्व व्यक्तींचे मनःपूर्वक अभिनंदन !

## माजी विद्यार्थी मंडळाची स्थापना

माजी विद्यार्थ्यांचे परस्परांतील व महाविद्यालयाशी असलेले स्नेहसंबंध वाढविण्यासाठी, आजी-माजी विद्यार्थ्यांना आर्थिक, व्यावसायिक मार्गदर्शनात्मक साहाय्य करण्यासाठी घटना तयार करून माजी विद्यार्थी-मंडळाची स्थापना दि. ८–११–६६ रोजी करण्यात आली आहे. 'सकाळ'चे संपादक डॉ. ना. भि. परुळेकर हे अध्यक्ष असून सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. ग. श्री खैर हे कार्याध्यक्ष आहेत. डॉ. श्री. र. कावळे व श्री. कृ. शं. हिंगवे हे मंडळाचे कार्यवाह म्हणून काम करीत आहेत. आतापर्यंत मंडळाचे सुमारे पाचशे सभासद झाले आहेत.

अधिकाधिक माजी विद्यार्थ्यांनी या मंडळाचे सभासद होऊन मंडळाच्या कार्यात सहभागी व्हावे आणि मंडळाचे संकल्प सिद्धीस नेण्यासाठी साहाय्यकारी व्हावे असे आम्हांला वाटते.

## अभिनंदन

दि रोझ सोसायटी ऑफ पूना या संस्थेतर्फे पुण्यात १ जानेवारी १९६७ रोजी भरविण्यात आलेल्या गुलाब-पुष्पांच्या प्रदर्शनात स. प. महाविद्यालयाला **दोन प्रथम क्रमांकाची** पारितोषिके मिळाली आहेत. जीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. राजे व त्यांचे सहकारी हे सर्व अभिनंदनास पात्र आहेत. यापुढेही त्यांनी अशीच पारितोषिके मिळवावी ही सदिच्छा !

## शो क स भा

हिंदी-वर्ग-संगठन, संस्कृत-मंडळ व तत्त्वज्ञान-मंडळ यांच्या वतीने दि. ७ सप्टें. रोजी प्राचीन भारतीय विद्यांचे गाढे उपासक जगद्विख्यात विद्वान डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रा. मंगरूळकर अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. भुपटकर यांनी आपल्या भाषणात, वेदविद्येचा सामान्य हिन्दी भाषिक जनतेला डॉ. अग्रवाल यांनी करून दिलेला परिचय व त्यांचे पद्मावतासंबंधीचे कार्य यांची महती वर्णिली. डॉ. कावळे यांनी 'प्राचीन विद्यांच्या प्रबोधन काळातील एक महत्त्वाचा श्रेष्ठ अभ्यासक' अशा शब्दांत त्यांचा गौरव केला. प्रा. भारद्वाज यांनी डॉ. अग्रवाल यांची शैली व त्यांच्या थोर कार्याची भारतीय वृत्तपत्रांनी केलेली उपेक्षा याविषयी आपले विचार मांडले. प्रा. मंगरूळकर यांनी त्यांचे जीवन व कार्य यांसंबंधी माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या वतीने श्री. वसंत शिंदे व श्री. केशव प्रथमवीर यांनी श्रद्धांजली वाहिली.

## भा वां ज ली

आपल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी नलिनी हुल्याळकर (प्राचार्य हुल्याळकर यांच्या सुकन्या) व पद्मजा गोडबोले या दोन बुद्धिमान व नवविवाहित विद्यार्थिनींचे अकाली झालेले मृत्यू म्हणजे त्यांच्या आप्तांवरील दुर्दैवाचा जबर आघात होय ! या मृत्यूमुळे महाविद्यालय-परंपरेतून काहीतरी मोलाचे निखळले आहे असेच सर्व परशुरामीयांस वाटते आहे. दिवंगत व्यक्तींच्या आप्तांच्या दुःखात सर्व परशुरामीय सहभागी आहेत.

दिवंगत व्यक्तींच्या निकटच्या स्नेह्यांनी वा परिचितांनी लिहिलेले श्रद्धांजलीपर साहित्य पुढे दिले आहे. सर्व परशुरामीयांच्या वतीने वाहण्यात आलेली ती भावांजली आहे.

परमेश्वर मृतांच्या आत्म्यांस चिरशांती देवो ही प्रार्थना !

# नलिनी हुल्याळकर (देशपांडे)

सन १९५९ मध्ये आपले माजी प्राचार्य प्रा. श्री. गो. हुल्याळकर हे अमेरिकेत 'भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञान' या विषयावर व्याख्याने देण्यासाठी गेले होते. याच वेळी त्यांना क्वीन्स कॉलेजातही एक आठवडाभर व्याख्याने देण्यासाठी निमंत्रण देण्यात आले. कॉलेजचे प्रेसिडेंट डॉ. वॉकर यांनी संभाषणाच्या ओघात "तुमच्या मुलीला आमच्या कॉलेजात पाठवता का?" असे सहज विचारले. त्या वेळी चि. नलिनी दहाव्या इयत्तेत शिकत असल्याने तो विषय तसाच राहिला.



१९६२ च्या फेब्रुवारीत प्रेसिडेंट वॉकर यांचे प्राचार्य हुल्याळकर यांना पत्र आले. त्यात त्यांनी त्यांच्या मुलीला कॉलेजमध्ये पाठवण्याच्या तीन वर्षांपूर्वीच्या सूचनेचा उल्लेख करून म्हटले होते की, या वर्षी तुम्ही मुलीला कॉलेजमध्ये पाठवल्यास मी तिला शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था करू शकेन.

चि. नलिनी ऑगस्ट १९६२ मध्ये, एस्. वाय्. ला असताना, क्वीन्स कॉलेजमध्ये शिकावयास गेली. तेथील दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून परत आल्यावर जून १९६५ मध्ये तिचा विवाह झाला. ३१ मार्च १९६६ रोजी तिला पुत्ररत्न झाले नि प्रसूतीनंतर अल्पावधीत ती अकस्मात स्वर्गवासी झाली.

तिच्या दुःखद निधनाची वार्ता क्वीन्स कॉलेजच्या प्रेसिडेंटनाही कळवण्यात आली. त्यांच्याकडून आलेल्या सांत्वनपर पत्रात लिहिले आहे.

"Queens College would like to express our affection for Nalini in a tangible way."

परदेशातल्या एका कॉलेजमध्ये दोन वर्षांच्या अवधीत नलिनीने एवढा जिव्हाळा निर्माण केला हे तिच्या व्यक्तिमत्त्वाचे सामर्थ्य. तिचे वैशिष्ट्य होते तिच्या स्वभावात. तिच्या एक प्राध्यापिका आपल्या सांत्वनपर पत्रात लिहितात—

"Nalini always made me happy, even perhaps when she was not happy herself. She smiled upon us all and perhaps cheerfulness seemed to her, as to the best philosophers, a responsibility. Her personal tranquility and sureness was a blessing on this campus. She showed interest in others, and was never too busy to listen to them, or be kind to them. She also had a great capacity for enjoyment."

व्यक्तीचा स्वभाव परदेशातही किती प्रभावी ठरतो याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. नलिनीच्या तेथील मैत्रिणींनीसुद्धा शेवटच्या निरोपात दिलेल्या संदेशामध्ये तिच्या आनंदी स्वभावाचा वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख केलेला आहे.

नलिनी खेळात प्रवीण होती. खेळात भाग घेताना यशापयशापेक्षा त्यातील सामाजिक मूल्यावर तिची विशेष श्रद्धा असे. क्रीडांगणावर निर्माण होणारा स्नेह तिला अधिक मोलाचा वाटे. तिचा स्वभाव जसा आनंदी होता, तसा तो करारी आणि निश्चयी होता. वृत्ती साहसी होती. नवा अनुभव जिज्ञासेने घेण्याची वृत्ती तिच्यात होती. स्वभावाच्या या विविध रूपाची परिणती तिच्या व्यक्तित्वात झाली होती. अशा नलिनीचा मृत्यू असा अकाली का व्हावा?

(डॉ. गं. श्री. कोशे यांच्या लेखावरून)

# पद्मजा गोडबोले (सुखात्मे)

एफ्.वाय्.च्या वर्षी पद्मा कॉलेजमध्ये आली.तिचाही ऐच्छिक विषय गणित असल्याने त्या तासाला प्रथम ती दिसली. तिचा तरतरीत चेहरा तिची हुषारी दाखवीत होता. हुषार, परंतु बोलकी व साधी पद्मा आमच्यांत सामावून गेली. गणित घेणाऱ्या आर्ट्सच्या मुली अगदी थोड्याच असल्याने आमची छान मैत्री जमून गेली.

कुठलाही विषय पद्मा चटकन आत्मसात करीत असे. तिचे वैशिष्ट्य असे की केवळ गणितावरच नव्हे तर मराठी-इंग्रजी अशा भाषांवरही तिचे तितकेच प्रभुत्व होते. संस्कृतचे तिचे पाठांतर वाखाणण्यासारखे होते. मराठी काव्याची तिला आवड होती. तिच्या एका कवितेला बक्षिसही मिळाले होते. खरे पाहता प्रमुख विषय कोणता निवडावा हा पद्मापुढे प्रश्नच होता. परंतु गणिताची आवड वरचढ ठरून तिने तोच विषय घेतला. आता जर हे सांगितले की मानसशास्त्र विषय प्रमुख घ्यावा असाही विचार तिच्या मनात होता, तर सर्वांना आश्चर्यच वाटेल.



अनेक प्रसंगीं प्राध्यापकांच्या अनवधानाने राहिलेल्या गोष्टी पद्मा दृष्टोत्पत्तीस आणून देत असे. पद्मा आम्हांला अडलेला एखादा प्रश्न तर सोडवायचीच; पण विशेष असे की जर एखादे उदाहरण तिला आले किंवा एखादे स्पष्टीकरण जास्ती कुठे आढळले तर ती आम्हांला सर्वांना सांगत असे. शेवटच्या वर्षी तर आम्ही सर्व गणित विषयाच्या मुली कॉलेजात एकत्र अभ्यास करीत होतो. पद्मा एखादी गोष्ट फार चांगली समजावून देत असे. आम्ही तिला म्हणत असू की "तू प्राध्यापक झालीस म्हणजे आम्ही नक्की तुझ्या तासाला येऊन बसू." त्यावर ती हसत आम्हांला दटावीत असे : "या तर खऱ्या, वर्गाबाहेर काढीन." कित्येक आकांक्षा आम्ही तिच्याबद्दल बोलून दाखवीत होतो व तिलाही उमेद होती की आपण प्राध्यापक होऊ, काही तरी आणखी करून दाखवू. पण ही सर्व स्वप्ने ठरतील असे त्या वेळी आम्हांला वाटले नाही.

गौरवर्णी, हसरी पद्मा आमच्यांत आली की आम्हांला सर्वांना ताबडतोब तोंडे फुटायची. मग वातावरण एकदम उजळून आनंदी होत असे. आता इतक्याजणी बरोबर असतो तरी अनेक क्षण अबोलच जातात. कुणाशीही पद्मा चटकन समरस होत असे. बोलकी व मोकळ्या स्वभावाची असल्याने तिच्याशी बोलावे की, नाही असा प्रश्न कधी कोणाला पडत नसे. तिच्या स्वभावात आढ्यता कधीच नव्हती. पद्मा बी. ए. ला पहिली येणार हे नक्की होते. परंतु मीही तिच्या बरोबर पहिली आल्यावर तिने माझे मोकळेपणाने अभिनंदन केले.

पद्मा बोलता बोलता म्हणायची की "मी शिक्षण झाल्याखेरीज लग्न करणार नाही व लग्न झाल्यावर परीक्षा देणार नाही." त्यामुळे पद्माचे लग्न ठरल्यावर आम्हांला गोड धक्का बसला. परंतु तिला मिळालेले, सरस्वतीचे उपासक असणारे, संपन्न सासर पाहून तिच्या गुणांचा परिपोष येथे होईल यात शंका राहिली नाही. आणि लग्नानंतर ती शैक्षणिक व सांसारिक आघाड्या इतक्या कुशलतेने सांभाळीत होती की पुढेही पद्मा या दोन्ही क्षेत्रांत तितकीच यशस्वी ठरणार याबद्दल आमच्या मनांत संदेह नव्हता. तसेच गेल्या वर्षीही पद्माने प्रथम येऊन, उत्तम सुयश मिळवून एम. ए. च्या यशाची नांदीच केली होती. आपल्या सांसारिक व शैक्षणिक जीवनाबद्दल किती आशा-आकांक्षा तिच्या मनात असतील !

१४ सप्टेंबर १९६६ चा मावळता सूर्य आपल्याबरोबर आमच्यांतून आमचे चैतन्य असणारी पद्माच घेऊन जाईल असे कुणी आम्हांला सांगितले असते तर ते आम्ही खरे मानले नसते...ईश्वराचे अस्तित्व, त्याची विश्वावरची सत्ता, आम्हांला कधीच नाकबूल नव्हती. पण त्याचा हा असा प्रत्यय का ?

**आशालता भट**

# कै. प्राचार्य ना. ग. नारळकर

जनन्या वात्सल्यं प्रियमधुरहास्यं हि कुमुदात् ।
लताभ्यो लालित्यं वचनममृताकीर्णसरसः ॥
अनन्तादुत्साहः कृतिकुशलता योगपुरुषात् ।
मनो नौ नानानां विविधगुणरागैरनुपमम् ॥ १ ॥
पयोदादौदार्य नयनसुषमा बालहरिणात् ।
रवेः कार्यज्योतिर्निरुपममुदश्चन्द्रकिरणात् ॥
पवित्रत्वं वह्नेर्जनहितरतिर्बालितिलकात् ।
मनो नो नानाना विविधगुणरागैः सुघटितम् ॥ २ ॥
विशालत्वं व्योम्नो निजविषयशिक्षा हि विबुधात् ।
प्रगल्भत्वं शैलात् कृतिपरिणतिर्युक्तविधितः ॥
प्रमाणत्वं सृष्टेर्निगमपटुता पूर्वमननात् ।
मनो नो नानानां विविधगुणरागैः सुरचितम् ॥ ३ ॥
प्रभुत्वं राजेन्द्रात् सरलतमता सूर्यकिरणात् ।
निगर्वत्वं बालादसिविमलशीलं स्वजनितम् ॥
गुणज्ञत्वं प्रोत्साहननिपुणता चात्मगुरुतः ।
मनो नो नानानां विविधगुणरागैः सुललितम् ॥ ४ ॥
'स्वदेशी'वृद्ध्यर्थं जनितमिह भाण्डारममुना ।
सुशिक्षार्थे नित्यं नवनवविचारा हि विहिताः ॥
स्वसौजन्याकृष्टं निखिलजनशिष्यादिहृदयम् ।
मनो नो नानानां विविधगुणरागैः सुललितम् ॥ ५ ॥
विश्वासः स्वजने तथा दृढमतिर्ध्येये तथा कर्मसु ।
निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु तथा कार्ये नियुक्ते क्षणे ॥
कौशल्यं नवयोजनासु मधुरा वाणी मनो निर्मलम् ।
चेतोनिर्भरभक्तिशान्तिसदनं नाना स नो भूषणम् ॥ ६ ॥
'नूमवीय'-यशादीपे । नाना-नारळकरे न्वयम् ।
भावाञ्जलिः प्रपन्नोऽस्तु । अपूर्णाः शब्दसिन्धवः ॥ ७ ॥
प्रदीपस्तव कार्यस्य । प्रचोदयतु नः सदा ।
सुविचारं नवोत्साहं । नवधैर्यं नवक्रियाम् ॥ ८ ॥
नारळकरगुरोरात्मा । चिरां शान्तिं हि प्राप्नुयात् ।
विभूतिः पुण्यकर्मात्मा । किं न याति पदं शिवम् ॥ ९ ॥

**वि. वा. काळे**

[ पृष्ठ १६-वरून चालू ]

केवळ गेल्या पंचवीस वर्षांचाच विचार केला, तर बी. ए. परीक्षेत आठ वेळा व बी. एस्सी. परीक्षेत सहा वेळा आमचे विद्यार्थी प्रथम श्रेणीत सर्वप्रथम आले आहेत. याच कालखंडात बी. ए. परीक्षेमध्ये संस्कृत विषयात बारा वेळा, गणितामध्ये पाच वेळा, मानसशास्त्र व संख्याशास्त्र यांमध्ये प्रत्येकी एकदा आमचे विद्यार्थी सर्वप्रथम आले आहेत. बी. एस्सी. परीक्षेत रसायन विषयात दोनदा व भौतिकी ( फिजिक्स ) विषयात एकदा आमचे विद्यार्थी सर्वप्रथम आले आहेत. एम ए. परीक्षेत संस्कृतामध्ये सहा वेळा, गणितामध्ये सहा वेळा, ' भारतीय संस्कृती ' विषयात दोनदा आमचे विद्यार्थी सर्वप्रथम येऊन त्या-त्या विषयात सर्व पारितोषिकांचे विजेते ठरले आहेत. प्रस्तुत सुवर्णमहोत्सवाच्या वर्षीचा स. प. म.-च्या विद्यार्थ्यांचा परीक्षानिर्णय तर आजवर कधी नव्हता इतका उज्ज्वल आहे. पदवीपूर्व परीक्षेत पहिल्या श्रेणीत स. प. म.-चे ९५ विद्यार्थी आहेत, आणि त्यांतले पहिल्या दहांतले आणि पहिला असे ६ विद्यार्थी स. प. म.-चे आहेत ! पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षेत लो. टिळक संस्कृत शिष्यवृत्ती आणि दुर्गा हरी परांजपे शिष्यवृत्ती स. प. म.-च्या विद्यार्थ्याने पटकावली आहे. व्यवसायपूर्व ( प्री-प्रोफेशनल ) परीक्षेत स. प. म.-चे ८६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आले आहेत. शास्त्रपदवी ( बी. एस्सी. ) परीक्षेत स. प. म.-चे २५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आले असून ( रसायन १४, गणित २, संख्याशास्त्र ५, भौतिकी ४ ) त्यांपैकी पाचांनी विशेष प्रावीण्य ( डिस्टिंक्शन ) मिळविले आहे; तसेच एकुणांत पहिला क्रमांक स. प. म.-च्या विद्यार्थिनीने, आणि गणितातील पहिला क्रमांक तसेच केरकर शिष्यवृत्ती स. प. म.-च्याच विद्यार्थ्याने मिळविली आहे. संख्याशास्त्र घेऊन परीक्षेला बसलेले सर्वच्या-सर्व (पाच) विद्यार्थी प्रथम श्रेणीत आले आहेत. साहित्यपदवी ( बी. ए. ) परीक्षेत स. प. म.-चे ८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले; त्यांपैकी ६ संस्कृत, १ गणित आणि १ मानसशास्त्र अशा विषयांचे आहेत. याशिवाय गणितात सर्वप्रथम येऊन गणिताची पारितोषिके मिळवणारी विद्यार्थिनी, मराठीची सर्व ( चार ) पारितोषिके मिळवणारा विद्यार्थी, आणि अर्थशास्त्राचे पारितोषिक मिळवणारा विद्यार्थी, हे स. प. म.-चेच आहेत. एम. ए.-ला प्रथम श्रेणीत पहिला क्रमांक आणि एल्एल. बी.-ला पहिला क्रमांक मिळविलेले विद्यार्थी स. प. म.-चे आहेत.

क्रीडाक्षेत्रातही आमच्या विद्यार्थ्यांची उज्ज्वल यशोधारा खळाळून वाहत आहे. आंतरविद्यापीठ, आंतरमहाविद्यालयीन व राज्य पातळयावरच्या विविध क्रीडास्पर्धांत आमचे विद्यार्थी चमकले आहेत. सुप्रसिद्ध क्रिकेटपटू पद्मश्री प्रा. दि. ब. देवधर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेट, हॉकी, भारतीय खेळ, मैदानी स्पर्धा यांच्या अभिमानास्पद परंपरा या महाविद्यालयात निर्माण झाल्या आहेत. भारतीय कीर्तीचे क्रिकेटपटू सर्वश्री. स्व. सदू शिंदे, नाना जोशी, बापू नाडकर्णी, बाळ दाणी, चंदू गडकरी, सदानंद मोहोळ व इतर अनेकजण या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. विविध नाट्यस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा, निबंधस्पर्धा यांतूनही आमचे विद्यार्थी प्रतिवर्षी प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकाचे मानकरी होत असतात.

## स. प. म.-मधील प्रस्थाने ( डिपार्टमेंट्स )

स. प. म.-चा अध्यापक-विश्राम म्हणजे विविध विषयांचे दैनंदिन संमेलनच होय. आज स. प. म.-मध्ये एकूण १४ प्रस्थाने ( डिपार्टमेंट्स ) चालू आहेत; आणि त्या सर्वांत मिळून ६५ प्राध्यापक आणि ६७ स्वाध्याय-शिक्षक-प्रयोगशिक्षक असे एकूण १३२ अध्यापक काम करीत आहेत. पर्शियन-उर्दू-अरबी ( १९३४–४६, प्रा. शेख अब्दुल अझीझ मोहमद जाफर ), फ्रेंच ( १९३१–४४, प्रा. एस. एच. लिमये, प्रा. व्ही. जी. हताळकर, प्रा. आर. सी. गोखले ), कन्नड ( १९३४–४६, प्रा. आर. व्ही. जहागीरदार, प्रा. एच. बी. कुलकर्णी ) या भाषांची प्रस्थाने महाविद्यालयात काही काळ चालू होती; पण कालांतराने या विषयाच्या विद्यार्थ्यांची संख्या फारच रोडावल्याने ती बंद करण्यात आली. फ्रेंच भाषेच्या जोडीला कालांतराने जर्मन भाषा शिकविण्याची सोय करण्यात आली. आज फ्रेंचचे अध्यापन बंद झाले असले, तरी जर्मन प्रस्थान चालू असून त्याची धुरा प्रा. र. ना. चापेकर वाहत आहेत. अर्धमागधी आणि पाली ( १९३१–४९ ) या भाषांचे एक स्वतंत्र प्रस्थान पूर्वी होते; आणि त्यांच्या अध्यापनाचे कार्य डॉ. सु. मं. कत्रे ( सध्या ' डेक्कन कॉलेज पोस्ट-ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे ' या विख्यात संशोधनसंस्थेचे संचालक ), डॉ. ए. एम. घाटगे ( सध्या वरील संस्थेतच भाषाशास्त्राचे प्राध्यापक ), डॉ. हर दत्त शर्मा, प्रा. आर. डी. लड्डू, प्रा. ना. अ. गोरे इत्यादी नामवंत विद्वान मंडळी करीत असत. कालांतराने हे प्रस्थान संस्कृत प्रस्थानाला जोडण्यात

आले; आणि पुरेशा विद्यार्थ्यांच्या अभावी अर्धमागधी हा विषय बंद करण्यात आला. इतिहास, अर्थशास्त्र, आणि राज्यशास्त्र या विषयांचे पूर्वी एकच प्रस्थान असे; आज त्यांची तीन स्वतंत्र प्रस्थाने आहेत.

### मराठी

भाषाविषयांच्या प्रस्थानांपैकी मराठीचे प्रस्थान हे या महाविद्यालयातील एक मोठे प्रस्थान आहे. या प्रस्थानाची वाढ होऊ लागली, ती १९२२ साली मुंबई विश्वविद्यालयाने मराठीला बी. ए.-साठी वैकल्पिक विषय म्हणून मान्यता दिली, तेव्हापासून. १९३५ साली हा विषय ऑनर्ससाठी मान्य झाला, तेव्हा या प्रस्थानाची विशेष वाढ झाली. या प्रस्थानाची धुरा आजवर प्रा. द. वा. पोतदार (१९१६–३५), प्रा. श्री. म. माटे, डॉ. के. ना. वाटवे, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे या नामवंत प्राध्यापकांनी वाहिली आहे. आज ती मराठीचे ख्यातनाम ग्रंथकार डॉ. रा. शं. वाळिंबे हे वाहत असून आणखी तीन प्राध्यापक त्यांना मराठीच्या अध्यापनात साहाय्य करीत आहेत. या प्रस्थानात पूर्वी काही काळ साहित्यसम्राट स्व. न. चिं. केळकर (त्या वेळी शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष) हे सन्माननीय प्राध्यापक म्हणून शिकवीत.

### संस्कृत आणि प्राकृत

संस्कृत आणि प्राकृत हे दुसरे महत्त्वाचे प्रस्थान होय. याचा प्रारंभ महाविद्यालयाच्या सुरवातीपासून (१९१६) झाला असून तेव्हापासून सेवानिवृत्तीपर्यंत (१९४८) प्राचार्य र. दा. करमरकरांनी या प्रस्थानाच्या प्रमुखत्वाची जबाबदारी संभाळली. त्यांच्या निवृत्तीनंतर आजच्या काळापर्यंत प्रा. अ. गं. मंगरूळकर ही जबाबदारी संभाळत आहेत. या महाविद्यालयातील संस्कृताची परंपरा विशेष उज्ज्वल असून तिची उभारणी करण्याचे फार मोठे काम प्राचार्य करमरकरांनी केले. स. प. म.-चा संस्कृताचा विद्यार्थी इंटरला, बी. ए.-ला., एम ए.-ला कोठेतरी, आणि काही वेळा अनेक ठिकाणी, संस्कृतात पहिला येऊन त्याने विनायक जगन्नाथ शंकरशेट पारितोषिक, वरजीवनदास माधवदास शिष्यवृत्ती, भाऊ दाजी पारितोषिक, झाला वेदान्त पारितोषिक, आणि पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पदवीपूर्व परीक्षेची संस्कृत शिष्यवृत्ती, एफ. वाय. बी. ए.-ची टिळक शिष्यवृत्ती, बी. ए.-चे करमरकर पारितोषिक हे मान मिळविले नाहीत, असे बहुधा एकही वर्ष गेले नाही. बी. ए.-ला प्रथम श्रेणी मिळविणाऱ्या स. प. म.-च्या विद्यार्थ्यांपैकी बहुसंख्य विद्यार्थी बहुधा संस्कृताचे असावे, अशी वहिवाट पडून गेली आहे.

या विद्यापीठक्षेत्रातल्या यशाव्यतिरिक्त या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अलीकडच्या काळात काशी, दरभंगा, उज्जयिनी इत्यादी अन्य प्रांतांतल्या विद्यानगरींत झालेल्या संस्कृत-वक्तृत्वस्पर्धांतही भाग घेऊन पहिली-दुसरी पारितोषिके मिळविली आहेत. उज्जयिनी येथे कालिदासजयंती-निमित्त होणाऱ्या आंतरविद्यापीठ संस्कृतवक्तृत्व-स्पर्धेत तर ही स्पर्धा तेथे सुरू झाल्यापासून आजपर्यंत सतत पाच वर्षे रजत-वैजयंती (अजिंक्य संघाला मिळणारी चांदीची ढाल) आणि पहिल्या-दुसऱ्या क्रमांकांची सुवर्ण-रजत-पदके पुणे विद्यापीठाच्या संघाला मिळत आली असून या संघात गेल्या वर्षाचा अपवाद केल्यास स. प. महाविद्यालयाचेच विद्यार्थी चमकले आहेत. संस्कृताच्या विद्यार्थ्यांची स. प. म.-मधील संख्या आज पुणे विद्यापीठाच्या कक्षेतल्या कोणत्याही महाविद्यालयाहून अधिक – म्हणजे, पदवीपूर्व साहित्य : १२५; पदवीपूर्व शास्त्र : ५०-६०; प्रथम वर्ष बी. ए. : ५०; द्वितीय वर्ष बी. ए. : ४०; तृतीय वर्ष बी. ए. : २०; अशी – आहे. ही स. प. म.-ची परंपरा लक्षात घेऊन पुणे विद्यापीठाने पदवी-शिक्षणाच्या केंद्रीकरणाच्या योजनेत स. प. म.-कडे संस्कृताचे केंद्र दिले होते. संस्कृत-प्रस्थानात आज दुय्यम विषय म्हणून 'पाली' भाषेच्या अध्यापनाची तरतूद असून या प्रस्थानाच्या कार्यात प्रा. मंगरूळकरांना त्यांचे तिघे प्राध्यापक सहकारी साहाय्य करितात.

### इंग्रजी

इंग्रजी प्रस्थान हेही स. प. म.-च्या प्रारंभापासून एक महत्त्वाचे प्रस्थान म्हणून चालू आहे. याची धुरा पूर्वी प्राचार्य विनायकराव आपटे (१९१६-२२), प्रा. ह. वि. तुळपुळे (१९२२-२७), प्रा. बिं. धों. सत्तीगिरी (१९२७-५९) यांनी वाहिली असून आज ती प्राचार्य रा. रा. मालेगावकर (१९५९–) वाहत आहेत. यांच्या व्यतिरिक्त या प्रस्थानात प्रा. रा. कृ. लागू, प्रा. के. व्ही. अय्यर, प्रा. रेव्ह. फादर लॅश, प्रा. कु. मार्गारेट मूर, प्रा. कु. लीला वागळे (सौ. घुमे), प्रा. एफ. एम. फर्नांडीस इत्यादी प्रथितयश शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य कमी-अधिक काळ केले आहे. यांनी तयार केलेले बहुसंख्य पदवीधर आज शिक्षणक्षेत्रात ठिकठिकाणी अध्यापनाचे कार्य करीत असून काही थोडे न्यायाधीश, राजकीय पुढारी म्हणून

व्यापृत आहेत. आज या प्रस्थानात प्राचार्य मालेगावकरांव्यतिरिक्त नऊ प्राध्यापक आणि एक स्वाध्याय-शिक्षक काम करीत आहेत.

### हिंदी

भाषाविषयांमध्ये हिंदी हे वयाने सर्वांत धाकटे प्रस्थान होय. मुंबई आणि सोलापूर ही शहरे सोडली, तर अवशिष्ट महाराष्ट्रात हिंदीचे अध्यापन सुरू करणारे स. प. म. हे पहिलेच महाविद्यालय होय. ( शाळांमध्ये हिंदीचे अध्यापन सुरू करणारी नू. म. वि. ही पहिलीच शाळा, हेही येथे मुद्दाम नमूद करावयास हवे. ) हे प्रस्थान १९४६ साली सुरू झाले, तेव्हापासून प्रा. (आता डॉ.) प्र. रा. भुपटकर या प्रस्थानाची काळजी घेत असून आज त्यांना आणखी दोघे प्राध्यापक साहाय्य करीत आहेत. हिंदीच्या प्राध्यापकांपैकी एक खुद्द हिंदी ही मातृभाषा असणारे असावे, अशी वैशिष्ट्यपूर्ण प्रथा १९६१-पासून स. प. म.-ने सुरू केली असून तदनुसार प्रा. दु. रा. भारद्वाज हे या प्रस्थानात १९६३-पासून कार्य करीत आहेत. त्यांच्यापूर्वी प्रा. कु. स्नेहलता श्रीवास्तव यांची नियुक्ती झाली होती. हिंदी प्रस्थान सुरू झाल्यापासून दोन वर्षे हिंदी हा विषय एफ. वाय. आणि इंटर या दोनच वर्षांपुरता नियुक्त होता. तो १९४९-पासून बी. ए.-ला वैकल्पिक ( जनरल ) विषय म्हणून आणि १९५७-पासून विशेष ( स्पेशल ) विषय म्हणून शिकवला जाऊ लागला. हा विषय विद्यापीठीय परीक्षांसाठी स. प. म.-मध्ये शिकविला जाऊ लागला, त्याच्या कितीतरी वर्षे आधी ' हिंदी-भाषाप्रेमी मंडळा 'तर्फे त्याचा प्रचार होत होता; आणि त्यात प्रा. बा मा. दबडघाव, प्रा. ज. नी. कर्वे आणि पहिले ग्रंथपाल श्री. कोल्हटकर यांनी आपुलकीने लक्ष घातले होते.

### तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र

स. प. म.-च्या तत्त्वज्ञान-प्रस्थानाचा आरंभ १९१७ साली इंटर आर्ट्सच्या तर्कशास्त्रापासून झाला; आणि पुढच्याच वर्षी हा विषय बी. ए.-ला शिकविण्याची अनुज्ञा मिळाली. प्रा. ना सी. फडक्यांनी १९२०-मध्ये असहकारितेच्या चळवळीत राजीनामा दिल्यावर या प्रस्थानाचा भार प्राचार्य शं. वा. दांडेकर यांनी प्रा. ना. ग. नारळकर यांच्या सहकार्याने समर्थपणे वाहिला ( १९२०–४० ). मध्यंतरी काही वर्षे या प्रस्थानाच्या प्रमुखपदी प्रा. वा. पु. पटवर्धन यांची नियुक्ती झाली. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर ( १९४२–६३ ), प्रा. कृ. ना. पिले ( १९६३–६५ ) आणि डॉ. श्री. र. कावळे ( १९६५– ) अशी या प्रस्थानाच्या प्रमुखांची परंपरा आहे. यांपैकी प्राचार्य दांडेकरांच्या प्रेरणेने १९२१ साली सुरू झालेले ' तत्त्वज्ञान अभ्यास मंडळ ' आजही पुण्यातील इतर महाविद्यालयांच्या सहकार्याने नमुनेदार कार्य करीत आहे. या मंडळात व्याख्यान देण्यासाठी निमंत्रिल्यावरून १९३४-मध्ये डॉ. सर सर्वपल्ली राधाकृष्णन आले होते. डॉ. कावळ्यांना आज सहा प्राध्यापक सहकारी साहाय्य करितात. १९४७ सालापासून या प्रस्थानात ' प्रायोगिक मानसशास्त्र ' या नव्या विषयाची भर पडली असून त्याची धुरा प्रथम डॉ. श्री. बा. काळे ( १९५३–५९ ) आणि नंतर प्रा. प्र. अ. भागवतवार यांनी उचलली. अर्थशास्त्राखालोखाल मानसशास्त्र हा विषय विद्यार्थ्यांना प्रिय असून आज पदवी द्वितीय वर्षाच्या कक्षेतील ४००-पैकी २७५ विद्यार्थी त्याचा अभ्यास करीत आहेत. १९६१-पासून हा विषय बी. ए.-ला मुख्य ( स्पेशल ) विषय म्हणून शिकविण्याची अनुज्ञा मिळाली आहे. या विषयाची प्रयोगशाळा ( हीत एका वेळी ३० विद्यार्थ्यांची सोय होते ) पुण्यातील महाविद्यालयांत फक्त स. प. म.-मध्येच असून तिची उभारणी करण्याचे महत्त्वाचे कार्य डॉ. श्री. बा. काळे यांनी केले. या प्रयोगशाळेत लवकरच बुद्धिमत्ता, विशिष्ट विषयातला कल इत्यादींची चाचणी घ्यावयाचा एक उपविभाग सुरू करण्याची योजना आहे.

### इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र

इतिहास आणि अर्थशास्त्र यांचे संयुक्त प्रस्थान स. प. म.-च्या प्रारंभापासूनचे असून राज्यशास्त्र या विषयाचा त्यातच समावेश होत होता. या संयुक्त प्रस्थानाचा प्रारंभ प्रा.-गो. प. पटवर्धन यांच्या प्रमुखत्वाने ( १९१७–२० ), प्रा. रा. प. सबनीस आणि प्रा. प्र. गो. पाध्ये यांच्या सहकार्याने झाला; आणि पुढे त्याची जबाबदारी प्रा. रा. वि. ओतूरकर आणि डॉ. गोपालाचारी यांनी सांभाळली. या प्रस्थानाला प्रा. सी. एस. बोस, प्रा. के. एस. वेंकटरामन, डॉ. भा. अ. सालेटोर, प्रा. वा. य. कोल्हटकर प्रा. ना अ. मावळंकर, अशा फार नामांकित शिक्षकांचा लाभ झाला. १९४९ साली अर्थशास्त्र, इतिहास आणि राज्यशास्त्र यांची स्वतंत्र प्रस्थाने होऊन त्यांच्या प्रमुखपदी अनुक्रमे प्रा. रा. म. गोखले, प्रा. रा. वि. ओतूरकर आणि प्रा. व. म. सिरसीकर यांची नियुक्ती झाली. कालांतराने प्रा. ओतूरकर सेवानिवृत्त झाले; प्रा. सिरसीकर पुणे विद्यापीठात गेले. तेव्हापासून ( १९६० )

अर्थशास्त्राची धुरा डॉ. दि. ब. केरूर, इतिहासाची प्रा. रं. ना. गायधनी, आणि राज्यशास्त्राची प्रा. रा. म. गोखले सांभाळीत आहेत; आणि त्यांना अनुक्रमे तीन, एक आणि एक असे प्राध्यापक सहकारी तसेच अर्थशास्त्रात दोन स्वाध्यायशिक्षक साहाय्य करीत आहेत. यांपैकी अर्थशास्त्र हा विषय देशाच्या आर्थिक-विकास योजनांच्या या काळात अतिशय जिव्हाळ्याचा, तसेच व्यापार, उद्योगधंदे इत्यादी क्षेत्रांत वाव मिळवून देणारा आणि म्हणूनच साहित्यशाखेकडील अत्यंत विद्यार्थिप्रिय असा विषय झाला आहे. बी. ए.-ला तो विषय घेतलेले विद्यार्थी साहित्यशाखेतील इतर कोणत्याही विषयाहून अधिक असतात. आज ते २०२ आहेत.

### ग णि त

गणित-प्रस्थानही स. प. म. इतकेच जुने आहे. या विभागाचा प्रारंभ प्रा. त्र्यं. भि. हर्डीकर यांच्या नेतृत्वाने आणि प्रा. द. रा. घारपुरे यांच्या सहकार्याने झाला. प्रा. रँग्लर न. मा. शहा १९२१ साली इंग्लंडहून परत आल्यावर या प्रस्थानाची सूत्रे त्यांनी हाती घेतली; ती त्यांनी १९३० साली राजिनामा देईपर्यंत त्यांच्या हाती होती. त्यांच्याच प्रयत्नाने आणि लौकिकाने गणित हा विषय बी. ए.-ला. ( १९२०-२१-पासून ) आणि बी. एस्सी.-ला ( १९३०-३१ पासून ) ऑनर्सचा विषय म्हणून शिकविण्यास विश्वविद्यालयाकडून अनुमती मिळाली. प्रा. शहांना प्रा. हर्डीकरांखेरीज प्रा. म. शं. गोडबोले आणि प्रा. ग. नी. चाफेकर यांचे सहकार्य मिळाले होते. १९३३ साली स. प. म.-ला सुदैवाने आणखी एक रँग्लर लाभले; ते म्हणजे प्रा. द. वा. केरकर. त्यांनी प्रा. न. द. गोडबोले, प्रा. ब. वें. बापट, डॉ. सौ. मधुमालती आपटे इत्यादिकांच्या सहकार्याने या प्रस्थानाची धुरा १९६०-मध्ये सेवानिवृत्त होईपर्यंत वाहिली. त्यांच्यानंतर सध्या प्रा. म. रा. राईलकर यांनी या प्रस्थानाची सूत्रे हाती घेतली असून त्यांना अन्य ९ प्राध्यापक सहकारी तसेच तीन स्वाध्यायशिक्षक आणि एक प्रयोगशिक्षक साहाय्य करीत आहेत. संस्कृताप्रमाणेच प्राय: प्रत्येक वर्षी गणिताचे विद्यार्थी उण्या-अधिक संख्येने पदवीपरीक्षेत प्रथम श्रेणीत आणि अनेकदा प्रथम क्रमांकाने यावयाचे, अशी गेल्या कित्येक वर्षांची परंपरा आहे. या प्रस्थानाचा एक भाग म्हणून १९५४-पासून ' संख्याशास्त्र ' हा विषय सुरू करण्यात आला असून या विषयाच्या अभ्यासासाठी १६ गणनयंत्रे घेण्यात आली आहेत.

### भू गो ल

भूगोल हा विषय साहित्यशाखेकडे प्रथमवर्षाला वैकल्पिक म्हणून १९३७ साली विश्वविद्यालयाने नेमला, तेव्हापासून अल्पशा प्रमाणात भूगोल प्रस्थानाचा प्रारंभ प्रा. जी. एम. मराठे यांच्या मार्गदर्शनाने झाला. तथापि या प्रस्थानाला आकार येण्यासाठी १९५६ साल उजाडावे लागले. या वर्षी प्रथमच हा विषय पुणे विद्यापीठाने पदवीपरीक्षेपर्यंत नियुक्त केला. १९६२ साली स. प. म.-च्या पाच विद्यार्थ्यांची तुकडी हा विषय घेऊन पदवीपरीक्षेला बसली. आज २४ विद्यार्थ्यांनी हा विषय पदवीपरीक्षे-साठी निवडला आहे. पदवीपरीक्षेपर्यंत हा विषय शिकविणारे पुणे विद्यापीठाच्या शासनक्षेत्रात स. प. म. हे एकमेव महाविद्यालय आहे. प्रतिवर्षी निरनिराळ्या ठिकाणी होणारी शैक्षणिक सहल हे या प्रस्थानाचे वैशिष्ट्य आहे. या प्रस्थानाचे कार्य डॉ. दि. मु. वाघ हे आपल्या दोघा प्राध्यापक-सहकाऱ्यांच्या आणि एका प्रयोगशिक्षकांच्या साहाय्याने चालवीत आहेत.

### भौ ति की ( फि जि क्स )

शास्त्रशाखेकडे स. प. म.-च्या प्रारंभापासून चालू झालेले प्रस्थान भौतिकी ( फिजिक्स ) हे एकच होय. हा विषय त्या वेळी महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षी सर्वांनाच – साहित्यशाखेच्याही विद्यार्थ्यांना – आवश्यक म्हणून नेमलेला होता; आणि तेवढ्यापुरतीच या प्रस्थानाची कक्षा १९२७ सालापर्यंत होती. खरे म्हणजे त्या काळी पहिल्या वर्षाच्या ( याला त्या काळी 'प्रीव्हियस' म्हणत ) अभ्यासक्रमात साहित्यशाखा आणि शास्त्रशाखा असे वेगवेगळे विभाग नव्हतेच. ते प्रथम सुरू झाले, ते १९३७ साली. भौतिकी-प्रस्थानाची सूत्रे प्रारंभीची चार वर्षे प्रा. द. रा. घारपुरे यांच्या हाती होती. १९२० साली असहकारितेच्या चळवळीत भाग घेण्यासाठी त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर हा विषय शिकविण्याची एकदोन सत्रांपुरती ( टर्म्स ) काही तात्पुरती व्यवस्था केल्यावर प्रा. शं. द. गोखले आणि पुढे काही महिन्यांनी प्रा. म. रा. परांजपे यांची या विषयासाठी नियुक्ती करण्यात आली. ही व्यवस्था १९२७-पर्यंत तशीच राहिली. मधल्या काळात शास्त्रशाखेकडे बी. एस्सी.-पर्यंतचे वर्ग काढण्याची गरज निकडीने भासू लागल्यावर या विकासाची तपशीलवार योजना प्रा. म. रा. परांजप्यांनी तयार केली; आणि १९२७-पासून भौतिकी विषयाचे बी. एस्सी.-पर्यंतचे वर्ग क्रमशः सुरू करण्यात आले. या विकसित प्रस्थानाचा भार नव्याने आलेले

प्रा. पाळधीकर यांच्यावर सोपवून प्रा. श्री. द. भावे यांना त्यांचे सहकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. १९३१ साली प्रा. पाळधीकर संस्था सोडून गेल्यापासून १९५९-पर्यंत प्रा. भाव्यांनी या प्रस्थानाची धुरा वाहिली. त्यांना प्रा. वा. मा. दबडघाव ( प्रसिद्ध शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रामन यांच्या मार्गदर्शनाने काही काळ काम करण्याची संधी यांना मिळाली होती ), प्रा. भा. बा. देशपांडे, प्रा. चंद्रशेखर अय्या, डॉ. मा. कृ. परांजपे, डॉ. वि. य. राजोपाध्ये, डॉ. मो. वा. चिपळूणकर यांचे कमी-अधिक काळ साहाय्य लाभले. प्रा. भावे सेवानिवृत्त झाल्यापासून डॉ. मा. कृ. परांजपे या प्रस्थानाची धुरा वाहत असून त्यांना ४ प्राध्यापक सहकारी आणि १९ प्रयोगशिक्षक साहाय्य करीत आहेत.

भौतिकी प्रस्थानाचे काम बरीच वर्षे स. प. म.-च्या मुख्य इमारतीतच चाले. १९६०-मध्ये या प्रस्थानाची स्वतंत्र प्रशस्त इमारत ( खर्च : रु. १,८८,७५० ) स. प. म.-च्या मुख्य इमारतीच्या नैर्ऋत्येस आणि मैदानाच्या वायव्येस बांधून तयार झाल्यावर हे प्रस्थान तिकडे हलले. या इमारतीत एकूण २५० विद्यार्थ्यांची सोय होईल अशा चार प्रयोगशाळा आणि दोन व्याख्यानगृहे आहेत.

### रसायन

भौतिकी विषयाचे बी. एस्सी.-पर्यंतचे वर्ग सुरू झाले, त्याच वेळी ( १९२७ ) रसायन या विषयाचेही स्वतंत्र प्रस्थान सुरू होऊन बी. एस्सी.-पर्यंतचे वर्ग क्रमशः सुरू झाले. या प्रस्थानाची धुरा पहिली दहा वर्षे (१९२७-३७ ) डॉ. वि. के. भागवतांनी, ते मुंबईला रुइया महाविद्यालयात बदलून गेल्यावर १९६०-पर्यंत प्राचार्य ब. वा. भिड्यांनी वाहिली. तेथून पुढे ती डॉ. रा. वि. घाटे वाहत असून त्यांना तिघे प्राध्यापक-सहकारी आणि २८ प्रयोगशिक्षक साहाय्य करीत आहेत. या प्रस्थानाची सोय प्रथम मुख्य इमारतीतच केलेली होती. पुढे त्याची स्वतंत्र इमारत ( खर्च : रु. ६३,५२९ ) भौतिकी-प्रस्थानाच्या इमारतीशेजारी तिच्या अलीकडे आणि तिच्याच मोजमापाची ( खरे म्हणजे, ती इमारत हिच्या मोजमापाची, असे कालानुक्रम पाहता म्हणावयास हवे ) अशी १९४१ साली, स. प. म.-च्या रौप्य-महोत्सवप्रसंगी बांधून तयार झाल्यावर हे प्रस्थान तिकडे हलले. या प्रस्थानात शिकून पदवीधर होऊन बाहेर पडलेल्या पदवीधरांचे परीक्षेतील यश आणि त्यांतील काहींचे पुढील कार्य देदीप्यमान आहे. या प्रस्थानात नेहमीच्या अध्यापनाव्यतिरिक्त झालेल्या संशोधनकार्याची माहिती देणारे लेख शंभराच्या घरात गेले आहेत. उद्योगधंद्यांना लागणारी काही रसायने, सौंदर्यप्रसाधने, सुगंधी द्रव्ये हीही काही काळ या प्रस्थानात तयार केली जात होती. १९४९-५२ या काळात या प्रस्थानात पदव्युत्तर शिक्षणही दिले जात असे. १९५२-पासून हे शिक्षण पुणे विद्यापीठाने इतर पदव्युत्तर शिक्षणाप्रमाणेच आपल्या हाती घेतल्यावर हे या प्रस्थानाचे कार्य बंद झाले. पण विद्यापीठातही रसायन हा विषय एम. एस्सी.-साठी घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी बहुसंख्य, म्हणजे ४० ते ५० टक्के, विद्यार्थी एकट्या स. प. म.-मधलेच असतात, हे लक्षणीय आहे.

### जीवशास्त्र

जीवशास्त्र या विषयाचे प्रस्थान शास्त्रशाखेच्या अन्य दोन विषयांच्या विकासयोजनांबरोबरच निश्चित होऊन वैद्यकीय शिक्षणाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता म्हणून इंटर सायन्स वर्गासाठी १९२८ साली सुरू करण्यात आले. या प्रस्थानाचा पाया घालण्याचे काम या विषयाचे पहिले अध्यापक प्रा. व्ही. एल. पवार यांनी केले; त्यांना श्री. बा. न. मुळे . यांनी साहाय्य केले. पुढच्या वर्षी हे दोघेही शिक्षक अन्यत्र गेल्यावर या प्रस्थानात प्रा. ज. नी. कर्वे यांची नियुक्ती झाली ( १९२९ ); आणि त्यांना वेळोवेळी प्रा. य. बा. राजे, प्रा. लीला मुल्हेरकर, प्रा. शं. रं. देशपांडे हे सहकारी येऊन मिळाले. तेथपासून १९४९-पर्यंत प्रा. कर्व्यांनी या प्रस्थानाचा सर्वांगीण विकास घडवून आणला. या प्रस्थानात आज दृष्टीस पडणारी सुंदर प्रदर्शनी ( म्यूझियम ) उभी करण्याचे श्रेय प्रा. कर्व्यांनाच आहे. १९४२-पासून हा विषय बी. एस्सी.-पर्यंत शिकविण्यात येऊ लागला. १९४९ साली प्रा. कर्वे पुणे विद्यापीठात गेल्यावर या प्रस्थानाचे प्रमुखपद १९५४-पर्यंत आणि पुढे १९५६–६० ( मध्यंतरी दोन वर्षे उच्च शिक्षणासाठी एडिंबरो येथे राहून प्रा. मुल्हेरकरांनी तेथल्या विद्यापीठाची डॉक्टरेट मिळविली ) प्रा. मुल्हेरकर यांनी सांभाळले. त्यानंतर मध्यंतरी १९५४–५६ प्रा. ( पुढे डॉ. ) शं. रं. देशपांडे यांनी आणि पुढे १९६०-पासून ६१-पर्यंत प्रा. मो. ते. चौहान यांनी ते सांभाळले. तेथपासून आजवर या प्रस्थानाची धुरा प्रा. राजे वाहत आहेत; आणि त्यांना तिघे प्राध्यापक-सहकारी आणि १२ प्रयोगशिक्षक साहाय्य करीत आहेत.

अशी ही स. प. म.-मधल्या प्रस्थानांची संक्षिप्त रूपरेखा आहे.

### आवारातील अन्य इमारती

मुख्य इमारतीच्या पूर्वेला प्रशस्त हवेशीर विद्यार्थि-शाला ( बांधणी : १९३५; खर्च : रु. १०,२०० )– स्टयुडंट्स् हॉल – आहे; आणि तिच्यामागे मध्ये रस्ता सोडल्यावर पलीकडे काही अंतरावर ईशान्य-नैर्ऋत्य अशा दिशेने बांधलेली विद्यार्थिनीशाला – लेडीज कॉमन रूम – आहे ( १९५७–५८ ). या दोन्ही इमारती अनुक्रमे विद्यार्थ्यांसाठी आणि विद्यार्थिनींसाठी मुद्दाम बांधलेल्या असून त्यांत पिंगपाँग, टेबल-टेनिस अशा खेळांच्या सोयी केलेल्या आहेत. या ठिकाणी प्रसंगानुसार विद्यार्थि-विद्यार्थिनींचे मेळावेही भरतात. विद्यार्थिनीशालेच्या जवळपास विद्यार्थिनींसाठी दोन भोजनशाला बांधलेल्या आहेत. विद्यार्थिनीशालेच्या नैर्ऋत्येस विद्यार्थिनींसाठी बांधलेली दोन तिमजली वसतिगृहे एकापलीकडे एक अशी उभी आहेत. विद्यार्थिनीशालेला जवळ असलेले वसतिगृह १९५४ साली बांधलेले असून ( खर्च : रु. १००,००० ), त्याच्या पलीकडचे वसतिगृह त्यापूर्वी म्हणजे १९३४ साली बांधलेले आहे ( खर्च : रु. ३४, ५०० ). या दोन्ही वसतिगृहांत मिळून एकूण ५४ खोल्या असून त्यांत एकूण ११० विद्यार्थिनींची सोय केलेली आहे. विद्यार्थिनींच्या वसतिगृहापलीकडे प्राचार्यांचा ( १९२७ ) आणि जवळच पश्चिमेकडे विद्यार्थिनींच्या वसतिगृहाधिकाऱ्यांचा बंगला ( १९३४ ) आहे. विद्यार्थ्यांचे वसतिगृह भौतिकी-प्रस्थानाच्या इमारतीच्या नैर्ऋत्येस आणि मैदानाच्या वायव्य सीमेवर रसायन-भौतिकी प्रस्थानांच्या इमारतींच्या रेषेतच ईशान्य-नैर्ऋत्य अशा दिशेने वायव्य दिशेकडे तोंड करून पसरले असून त्याला वायव्य बाजूला दोन टोकांना काटकोनात दोन फाटे आहेत. हे वसतिगृह तीन हप्त्यांत बांधले गेले आहे. आग्नेयीकडची सर्व पाख १९२८-मध्ये ( खर्च रु. ९०,००० ); नैर्ऋत्य पाख १९३४-मध्ये ( खर्च रु. २४,००० ); आणि ईशान्य पाख १९५४-मध्ये ( खर्च रु. ९०,००० ). विद्यार्थ्यांचे वसतिगृह तीन-मजली आणि एकूण १०५ खोल्यांचे असून त्यांत एकूण २१७ विद्यार्थ्यांची राहण्याची सोय केलेली आहे. मध्यंतरी १९६३ साली पानशेत पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 'बॉंबे मिल-ओनर्स असोसिएशन' या संस्थेने स. प. म.-च्या आवारात मैदानाच्या नैर्ऋत्य बाजूस सुमारे एक लक्ष रुपये खर्चून तीन एकमजली इमारती बांधल्या. ( प्रत्येक इमारतीत ८ ब्लॉक्स; प्रत्येक ब्लॉकमध्ये २ खोल्या. ) या इमारती ५ वर्षांनी वसतिगृहासाठी स. प. म.-ला मिळाव्या, अशी योजना आहे. ( यांतल्या आतापर्यंत ४ खोल्या वसतिगृहाला मिळाल्या आहेत. ) ही अशा स्वरूपाची पहिलीच योजना असून पूरग्रस्तांना साहाय्य करून शिक्षणसंस्थेलाही कायमची मदत देण्याचा हा उपक्रम अभिनंदनीय आणि अनुकरणीय आहे. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या नैर्ऋत्येस त्यांच्यासाठी तीन भोजनशाला बांधलेल्या आहेत. या वसतिगृहाच्या समोर, म्हणजे वायव्येला, प्रशस्त टेनिस कोर्ट असून त्याच्या ईशान्य आणि वायव्य सीमांवर प्राध्यापकांसाठी बांधलेले ( १९३४ ) एकूण पाच बंगले उभे आहेत. वसतिगृहासमोरच्या रस्त्याने स. प. म.-च्या मुख्य इमारतीकडे येऊ लागल्यावर उजव्या हाताला भौतिक-रसायन प्रस्थानांच्या इमारतींच्या मागच्या बाजूला, अर्थात वायव्येस, ईशान्य-नैर्ऋत्य असा लांब पसरलेला पोहण्याचा तलाव आहे ( खर्च : रु. १,१५,४६० ). ऑलिंपिक स्पर्धांत आवश्यक असलेल्या मोजमापाचा ( ५० × १२ मीटर्स ), आधुनिक सोयींनी युक्त असलेला हा तलाव १९५६-मध्ये बांधून पूर्ण झाला. या तलावाच्या कामात अनेक प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे श्रमदानही कारणी लागले आहे. हा पुण्यातल्या उत्तम तलावांपैकी एक असून यात पोहण्यासाठी जवळजवळ बाराही महिने विद्यार्थी आणि हौशी नागरिक येतात. पुण्यातील पुष्कळशा पोहण्याच्या स्पर्धा याच तलावात होतात. तलावाची सफाई वर्षातून चार वेळा केली जाते; आणि त्या वेळी त्यातले जुने पाणी काढून नवे भरले जाते. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासमोरच्या रस्त्याने स. प. म.–च्या मुख्य इमारतीकडे येत असताना उजवीकडे लागणारा हा तलाव सोडून आणखी पुढे आल्यावर डाव्या हाताला जी एकमजली इमारत लागते, तीत 'लोकमान्य टिळक स्मारक ग्रंथालय' आहे. ( याविषयी माहिती मागे येऊन गेली आहे. )

### मैदान आणि व्यायामशाळा : स. प. म.-चे क्रीडानैपुण्य

रसायन-प्रस्थानापासून विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या नैर्ऋत्येकडील टोकापर्यंत, – इतक्या रुंदीचे आणि जवळजवळ त्याच्या दुप्पट लांबीचे सुमारे आठ एकर क्षेत्रफळाचे स. प. म.-चे मैदान रसायन-भौतिकी प्रस्थाने आणि विद्यार्थि-वसतिगृह या इमारतींच्या आग्नेय दिशेला आग्नेय-वायव्य अशा दिशेने लांब पसरले असून त्यावर आग्नेयाभिमुख होऊन उभे राहिले, की पर्वतीचे मनोरम,

उत्साहवर्धक दर्शन घडते. मैदानाची जमीन मूळची शेती-बागायतीची असल्यामुळे ती खेळण्याजोगी करण्यासाठी मुरूम वगैरे टाकण्याचा प्राथमिक खर्चच सुमारे १५,००० रुपये आला. या मैदानावर सर्व देशी-विदेशी मैदानी खेळ खेळले जातात. आंतरमहाविद्यालयीन आणि आंतरविद्यापीठीय क्रीडास्पर्धांत, त्याचप्रमाणे अखिल भारतीय, किंबहुना आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांत स. प. म.-च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मिळविलेल्या यशाची फार उज्ज्वल परंपरा असून क्रिकेटचे विविध पातळ्यांवरील स्पर्धांतले अजिंक्यपद ही पुष्कळ वर्षे स. प. म.-ची जवळजवळ मक्तेदारीच झालेली होती. या खेळात विशेष नाव कमावलेल्या परशुरामीयांची नावे मागे येऊन गेली आहेत. खो खो, आट्यापाट्या, हुतूतू या देशी खेळांत तर आंतरमहाविद्यालयीन सामन्यात फारच थोड्या वेळा दुसऱ्या एखाद्या महाविद्यालयाने स. प. म.-च्या संघावर मात केलेली आहे. स. प. म.-च्या विद्यार्थ्यांनी क्रीडाक्षेत्रात संपादन केलेल्या या यशाचे पुरेसे दर्शन घडवावयास स्वतंत्रच लेख लिहिणे आवश्यक आहे; ते अशा धावत्या अवलोकनात घडविणे ही अशक्य गोष्ट आहे. या यशाचे शिल्पकार शिक्षक आणि मार्गदर्शक हा मान निःसंशयपणे प्रा. दि. ब. देवधर, श्री. बा. ज. मोहोनी, श्री. शंकरराव पाटणकर, डॉ. लागू, श्री. पी. पी. बापट, श्री. व्ही. जी. कानिटकर, श्री. राजाभाऊ वाकणकर, श्री. भालेराव, श्री. लेले, श्री. मारवाडी, श्री. लागवणकर, श्री पंडित., श्री. वैद्य, प्रा. प्र. र. करमरकर, कु. मालती धोपेश्वरकर, सौ. शकुंतला कटककर इत्यादिकांकडे जातो. या क्रीडाशिक्षकांपैकीच काहींनी मैदानी खेळांव्यतिरिक्त कुस्ती आणि तत्संबद्ध मल्लखांब, मुष्टियुद्ध, सिंगल बार, डबल बार इत्यादी मर्दानी क्रीडाकसबांमध्येही विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग दाखवून स. प. म.-च्या कीर्तीत भर टाकण्यास मदत केली. या कुस्ती, मल्लखांब इत्यादींच्या शिक्षण-सरावांसाठी एक प्रशस्त, साधनसामग्रीने सुसज्ज अशी व्यायामशाळा ( जिमखाना – १९२८ : खर्च रु. २४,००० ) मैदानाच्या पूर्व कोपऱ्यात बांधलेली आहे.

### पी. टी., यू. टी. सी., एन. सी. सी.

वर वर्णिलेल्या विविध खेळांव्यतिरिक्त शारीरिक शिक्षणाच्या कवायती, राष्ट्रीय छात्रसेनेची ( स्वातंत्र्यपूर्व कालात यू. टी. सी.-ची ) संचलने आणि शिक्षणवर्ग यांनीही हे मैदान सकाळ-संध्याकाळ गजबजलेले असते. यांपैकी शारीरिक शिक्षणाच्या – पी. टी.-च्या – उपक्रमाचे मूळ १९२७ सालापर्यंत मागे जाऊन पोचत असले, तरी हा विषय पदवीपूर्व वर्गातील – म्हणजे, महाविद्यालयातल्या पहिल्या-दुसऱ्या वर्षांतील – विद्यार्थि-विद्यार्थिनींना आवश्यक म्हणून सुरू झाला, तो १९३७ सालापासून. या विभागाचे काम प्रारंभी तीनचार वर्षे प्रा. देवधर आणि प्रा. कानिटकर यांच्याकडे सोपविण्यात आले होते. पुढे १९४१ सालापासून त्यासाठी शारीरिक-शिक्षण-संघटक ( पी. टी. ऑर्गनायझर ) असे एक स्वतंत्र अधिकारपद निर्माण करण्यात येऊन त्यावर श्री. झेड. पी. मारवाडी ( बा. प्रे. झंवर ) यांची नेमणूक केली गेली. १९५४-पासून हे पद श्री. म. रा. जोशी सांभाळीत आहेत.

यू. टी. सी.-ची अर्थात 'युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोअर '-ची स्थापना १९२१ साली झाली; आणि तिच्या द्वारा महाविद्यालयीन क्षेत्रात विद्यार्थ्यांना लष्करी कवायत, संचलने, नेमबाजी, शिबिरे इत्यादींचे शिक्षण देण्याची योजना झाली. या योजनेनुसार स. प. म.-मध्ये १९२२ साली प्रा. करमरकर आणि प्रा. देवधर यांच्या नेतृत्वाने दोन पथके ( प्लॅटून्स ) तयार होऊन या महाविद्यालयात यू. टी. सी. दृढमूल झाली; आणि ती पुढे वेळोवेळी अधिकारी शिक्षक म्हणून कार्य केलेल्या प्रा. नारळकर, प्रा. दबडघाव, प्रा. भागवत, प्रा. उ. के. कानिटकर, प्रा. शे. कृ. कुलकर्णी इत्यादींनी संवर्धित केली. यू. टी. सी.-च्या या शिक्षणातूनच श्री एस. पी. पाटील ( आजचे लेफ्टनंट-जनरल एस. पी. पी. थोरात ) या विद्यार्थिरत्नाची सँढर्स्ट येथील रॉयल मिलिटरी कॉलेजमध्ये शिक्षणासाठी निवड होऊन पुढे भारतीय सेनेत नेमणूक झाली. तेथे ते आपल्या कर्तबगारीने लेफ्टनंट-जनरलच्या हुद्द्यापर्यंत चढले; आणि भारतीय सेनेच्या पूर्वविभागाचे प्रमुख म्हणून नियुक्त झाले. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी मोठी कामगिरी बजावून विशिष्ट-सेवा-पदक ( डी. एस. ओ. ) मिळविले; आणि स्वातंत्र्योत्तर काळात कोरियामध्ये राष्ट्र-संघाच्या वतीने निरीक्षक म्हणून गेलेल्या भारतीयसेना-पथकांचे उत्कृष्ट नेतृत्व करून देशाची मान उंच केली. १९५८ साली शिक्षण प्रसारक मंडळीचा अमृतमहोत्सव झाला, तेव्हा मंडळीच्या विनंतीवरून त्यांनी महोत्सवाचे अध्यक्षपद भूषित केले. आज ते मंडळीचे एक आश्रयदाते असून त्यांच्या कर्तृत्वाचा स. प. म. -ला फार अभिमान वाटतो.

स्वातंत्र्योत्तर कालात यू. टी. सी.-चे एन. सी. सी.-मध्ये ( नॅशनल कॅडेट कोअर, – राष्ट्रीय छात्रसेना )

रूपांतर झाले असून आज स. प. म.-कडे सोपविलेल्या छात्रसेनेच्या सर्व विभागांत मिळून स. प. म.-चे एकूण १३८१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ('३६ महाराष्ट्र बटॅलियन'-मध्ये १०१६; '२ महाराष्ट्र गर्ल्स बटॅलियन'-मध्ये २८५ विद्यार्थिनी; चिलखती दलात ६४; अवशिष्ट दलात १६.) पूर्वीच्या यू. टी. सी.-तील विद्यार्थ्यांनी आणि आजच्या एन सी. सी.-तील विद्यार्थि-विद्यार्थिनींनी आपल्या क्षेत्रांतील स्पर्धात प्रशंसनीय नैपुण्य दाखवून विविध पारितोषिके मिळविली आहेत. आपल्या महाविद्यालयातील छात्रसेना-पथकांचे नेतृत्व प्रा. चापेकर, प्राचार्य हुल्याळकर इत्यादी नामवंत अधिकाऱ्यांनी केले असून आज त्याची जबाबदारी मेजर प्रा. गायधनी हे आपल्या सहा सहकारी प्राध्यापकांच्या साहाय्याने पार पाडीत आहेत.

## विद्यार्थ्यांसाठी विकास-क्षेम-योजना

येथपर्यंत स. प. म.-मधील विविध प्रस्थाने, अध्यापकवर्ग, साधनसामग्री इत्यादिकांचे संक्षेपाने दर्शन घडविले. पण स. प. म.-च्या कार्यकक्षेचे दर्शन एवढ्याने पूर्ण होत नाही. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि त्यांच्या मार्गातील अडचणींचे निवारण करण्याचे अन्य परोपरीचे प्रयत्न येथे नानाविध योजना, सोयी-सवलती, साहाय्य यांच्या द्वारा होत आहेत. वाङ्मय-मंडळे आहेत, अभ्यासमंडळे आहेत, वादसभा आहे, नाट्यमंडळ आहे,–या सगळ्या नित्याच्या गोष्टी झाल्या. शिवाय मोठ्या ग्रंथालयातील काही निवडक पुस्तके त्या-त्या प्रस्थानातील प्राध्यापकांच्या जबाबदारीवर विद्यार्थ्यांना – विशेषतः पदवी परीक्षेच्या विद्यार्थ्यांना – सुखाने उपलब्ध करून देणारी तत्त्वज्ञान, संस्कृत, इंग्रजी इत्यादी काही प्रस्थानांची छोटी ग्रंथालयेही आहेत. गरीब, गरजू विद्यार्थ्यांना वर्षभर वापरण्यासाठी पाठ्य-पुस्तके उपलब्ध करून देणारी ग्रंथपेढी आहे. या ग्रंथपेढीतली पुस्तके विद्यार्थ्यांनीच आपला अभ्यास संपल्यावर देणगीदाखल दिलेली असून आज तीतून २२५ पुस्तके २५ विद्यार्थ्यांना वापरण्यासाठी मिळाली आहेत. १९६४–६५ साली अशाच तऱ्हेने गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ-अनुदान-मंडळाने दिलेल्या १०,००० रुपये अनुदानातून खरेदी केलेली १३५० पाठ्यपुस्तके आज ५५० विद्यार्थी वापरीत आहेत. १९६०-पासून ब्रिटिश कौन्सिल लायब्ररीकडून अशीच काही भारी किमतीची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी अल्प वर्गणीत वापरण्यासाठी मिळत असतात. रोटरी क्लबानेही यासाठी काही देणगी दिली असून तीतून खरीदलेली पुस्तके वाचनासाठी अभ्यासशालेत ठेवण्यात आली आहेत. या सर्व योजनांमुळे, 'वाचतो' म्हणणाऱ्याला अभ्यासोपयोगी पुस्तक मिळू नये, अशी परिस्थिती आता स. प. म.-मध्ये तरी प्रायः इतिहास-जमा झाली आहे; कारण आता येथे 'पुस्तके जाहली उदंड' असे उलटे चित्र दिसू लागले असून या पुस्तकांसाठी नव्या वसाहती स्थापन करण्याची गरज निकडीने भासू लागली आहे.

ही सर्व व्यासंगाची तरतूद झाली. अभिव्यक्ती ही व्यासंगाची फलश्रुती होय. तिच्यासाठी 'परशुरामीय' आहे. 'न्यू पूना कॉलेज मॅगेझिन' (१९१६–२८) हा 'परशुरामीय' नियतकालिकाचा पूर्वावतार होय. १९२८ साली 'न्यू पूना कॉलेज'चे 'सर परशुरामभाऊ कॉलेज' होताच मॅगेझिनही 'सर परशुरामभाऊ कॉलेज मॅगेझिन' झाले (ऑगस्ट, १९२८). या भल्या मोठ्या नावाचा 'परशुरामियन' असा संक्षेप १९३० ऑगस्टच्या अंकापासून प्रचारात आला; आणि या आंग्ल रूपाला 'परशुरामीय' असे सुसंस्कृत रूप मिळण्यास आणखी पंचवीस वर्षे उलटावी लागली (जानेवारी, १९५६). या बदलाला तात्कालिक निमित्त घडले ते हे की, १९५६-च्या परीक्षांपासून पुणे विद्यापीठाने पदवीपरीक्षेपर्यंत इंग्रजीला वैकल्पिक माध्यम म्हणून मराठीला मान्यता देण्याचा निर्णय केला; आणि तो पुढे क्रमशः कार्यवाहीत आणला. त्याला सुसंवादी असा बदल स. प. म.-च्या नियतकालिकातही होऊन सप्टेंबर १९५५-च्या अंकापासून या नियतकालिकाचे संपादकीय माध्यम इंग्रजीऐवजी मराठी झाले, ते आज घडीपर्यंत तसे अव्याहत चालू आहे. 'परशुरामीय' हा नामसंस्कारही वस्तुतः त्याच अंकावर व्हावयाचा; तो अनवधानाने पुढच्या अंकावर घडला. 'परशुरामीय'च्या या सर्व रूपांतरांबरोबर आणखीही काही बदल होत राहिले. हे नियतकालिक सुरू झाल्यापासून वीस वर्षे त्याचे वर्षातून चार अंक निघत असत, – ऑगस्ट, ऑक्टोबर, जानेवारी, मार्च. १९३५–३६ या शैक्षणिक वर्षापासून त्याचे अधिक पृष्ठसंख्येचे दोन अंक वर्षातून निघू लागले. नियतकालिकाचा आकारही दोनदा बदलला. प्रारंभीची सात वर्षे (१९१६-२२) ते डिमाय (डेमी) आकारात (१२·५ × १९·५ सें. मी.) निघत असे; १९२३-पासून ते रॉयल आकारात (१६·५ × २४·५

सें. मी. ) निघू लागले; सप्टेंबर १९५८-पासून सध्याच्या डबल क्राऊन आकारात (१८·५ × २४·५) निघत आहे. या नियतकालिकात मध्यंतरी काही वर्षे गुजराती आणि बरीच वर्षे कानडी ( १९३४ मार्चच्या अंकात कानडी लेख देवनागरी लिपीत छापले आहेत ) हे साहित्य-विभाग आढळत असले, तरी आरंभापासून आजपर्यंत अविच्छिन्न चालू राहिलेले साहित्यविभाग मराठी, इंग्रजी आणि प्राय: संस्कृत हेच होत. हे सर्व साहित्य मिळून परशुरामीय नियतकालिकाची गेल्या ५० वर्षांत सुमारे १५ हजार पृष्ठे प्रकाशित झाली आहेत. आपले नाव, आपले छायाचित्र, आपले साहित्य, आपली कलाकृती छापून आलेली पाहिल्यावर विद्यार्थ्याला होणारा आनंद, मिळणारी प्रेरणा ' जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे ' अशीच असतात. हा आनंद, ही प्रेरणा स. प. म.-च्या बुद्धिमान, क्रीडापटू , कलावंत, साहित्यिक विद्यार्थ्यांना देऊन त्यांचे सुप्त गुण विकसित करण्याचे फार मोठे कार्य परशुरामीय नियतकालिकाने केले आहे. या कार्याचा स्वतंत्र, सविस्तर आढावा घेणारा लेख तयार होत असून तो यथावकाश प्रसिद्ध होईल. या कार्याचे श्रेय प्रामुख्याने पुढील मानकऱ्यांकडे – नियतकालिकाच्या संपादकांकडे – जाते :

१. प्रा. गो. कृ. गोखले ( १९११ )
२. प्रा. रा. प. सबनीस ( १९१७–२२ )
३. प्रा. र. दा. करमरकर ( १९२२–२६ )
४. प्रा. ना. ग. नारळकर ( १९२६–३० )
५. प्रा. म. शं. गोडबोले ( १९३०–३२ )
६. प्रा. ह. वि. तुळपुळे ( १९३२–३४ )
७. प्रा. बिं धों. सत्तीगिरी ( १९३४–३८; १९४०–१९४३ )
८. प्रा. शं. वा. दांडेकर ( १९३८, १९३९,१९४० )
९. प्रा. एफ. एम. फर्नांडीस ( १९४३ )
१०. प्रा. श्री. म. माटे ( १९४३–१९४४ )
११. प्रा. श्री. गो. हुल्याळकर ( १९४४–४७ )
१२. प्रा. द. बा. रानडे ( १९४८–५६ )
१३. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे ( १९५६–६० )
१४. प्रा. रा. म. गोखले ( १९६१–६३ )
१५. डॉ. श्री. र. कावळे ( १९६३-पासून )

परशुरामीय नियतकालिकाने आतापर्यंत सुमारे १५,००० पृष्ठे प्रकाशित केली असली, तरी स. प. म.-मधल्या विद्यार्थि-साहित्यिकांची संख्या उत्तरोत्तर वर्धिष्णू असल्याने हे एकुलते एक माध्यम अपुरे पडते. त्यामुळे परशुरामीय या मुद्रित नियतकालिकाचे ' एस. पी. रिव्ह्यू ' हे हस्तलिखित धाकटे भावंड उदयास येऊन गेली दोन वर्षे सुखाने पोसून बाळसेदार, देखणे झाले आहे. या पाक्षिक नियतकालिकाचे आतापर्यंत बरेच अंक प्रसिद्ध झाले असून याचे मार्गदर्शन प्रा. दाते आणि प्रा. सवदी करीत असतात.

आतापर्यंत निर्देशिलेल्या योजना प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाशी संबद्ध अशा आहेत. यांच्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या क्षेमकुशलाची ( वेल्फेअर ) चिंता वाहणाऱ्या अशाही अनेक योजना स. प. म.-मध्ये कार्यान्वित आहेत. शिष्यवृत्त्या आहेत, पारितोषिके आहेत, नादाऱ्या-अर्धनादाऱ्या आहेत, आर्थिक-मागास वर्गांसाठी सरकारने चालू केलेल्या निःशुल्कवृत्त्या आहेत, राष्ट्रीय आणि महाराष्ट्र राज्याच्या शिष्यवृत्त्या आहेत, गरीब-विद्यार्थि-निधी आहे. या सर्व योजनांतून प्रतिवर्षी सुमारे ५० टक्के विद्यार्थ्यांना या-ना-त्या स्वरूपात साहाय्य मिळते. गरीब-विद्यार्थि-निधी ही स. प. म.-ची एक वैशिष्ट्यपूर्ण योजना आहे. परीक्षेची फी भरण्यास ज्यांना गरिबीमुळे अडचण पडते, अशा विद्यार्थ्यांची गरज भागविण्याच्या हेतूने हा निधी १९५४ साली सुरू करण्यात आला. १९५७–५८ साली विद्यापीठ अनुदान-मंडळाची ' प्रत्येक विद्यार्थ्याकडून प्रतिवर्षी एक रुपया घेऊन जमलेली रक्कम आणि तितकीच अनुदान-मंडळाची रक्कम ' अशी योजना कार्यवाहीत घेऊन या निधीत अन्य भरीव्यतिरिक्त प्रतिवर्षी सुमारे ६,००० रुपयांची भर पडू लागली आहे. यातून प्रतिवर्षी मदतीदाखल दिलेली रक्कम वजा जाता आतापर्यंत हा निधी ३८,९१६ रुपये इतका झाला आहे. तो एक लक्ष रुपयांचा कायमनिधी करून त्याच्या व्याजाइतकी रक्कम प्रतिवर्षी गरीब विद्यार्थ्यांना द्यावी, अशी आकांक्षा आहे.

महाविद्यालयीन शिक्षणव्यवस्थेपुढील एक मोठा प्रश्न शिक्षक-विद्यार्थि-संबंध हा आहे. वर्ग जसे मोठे होऊ लागतात, तसतशी शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधली फट वाढू लागते. ती कमी करण्याचे उपाय शोधण्यात अनेक शिक्षणतज्ज्ञ बरीच वर्षे डोकी शिणवीत आहेत. या बाबतीत स. प. म.-ने आपल्या परीने काही योजना आखून विद्यार्थ्या-विद्यार्थ्यांमधले आणि शिक्षक-विद्यार्थ्यांमधले संबंध अधिक घनिष्ठ, जिव्हाळ्याचे होण्यास हातभार लाविला आहे. महाविद्यालयातले, विशेषतः पहिल्या-दुसऱ्या वर्षातले, विद्यार्थी ठरावीक, मर्यादित संख्येत एकेका शिक्षकाकडे नेमून देऊन,

त्यांच्या भेटीची वेळापत्रके आखून, त्यांना अभ्यासाल्यात आणि वैयक्तिक अडचणी सोडविण्यात साहाय्य आणि मार्गदर्शन करून एक प्रकारचे स्नेहाचे वातावरण निर्माण करण्यात स. प. म.-मधील 'विद्यार्थी संपर्क योजना' पुष्कळ अंशी यशस्वी झाली आहे. महाविद्यालयाच्या वरच्या दोन वर्षांतील विद्यार्थ्यांच्यासाठी त्या-त्या विषयानुसार वर्गसंघटनांची जी योजना आहे, तिच्या द्वाराही हेच कार्य साधले जाते. यांच्या भरीला वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी म्हणून 'गृहपेटी', 'विद्यार्थि-संसद' अशा काही योजना कार्यवाहीत आहेत; त्यांतून तेथील विद्यार्थ्यांचे आर्थिक आणि अन्य नित्य-नैमित्तिक व्यवहार सुरळीत चालण्यास मदत होते.

## स. प. म. आणि पुणे विद्यापीठ

वर स. प. म.-च्या आवाराचे धावते समालोचन केले, त्यात या आवारात उभ्या असलेल्या टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, विनयकुमार रामनिवास रुइया मूकबधिर विद्यालय, शारीरिक शिक्षण विद्यालय इत्यादी संस्थाभगिनींच्या आणि अन्य काही इमारतींचा निर्देश अप्रस्तुत किंवा गौण म्हणून केला नाही. तथापि विद्यार्थि-शालेच्या – 'स्टयूडंट्स हॉल'च्या – पूर्वेला बांधलेल्या एका इमारतीकडे आवर्जून लक्ष वेधावयास हवे. या इमारतीवर पाटी आहे : 'युनिव्हर्सिटी लेक्चर हॉल'. स. प. म. आणि पुणे विद्यापीठ यांच्या जिव्हाळ्याच्या संबंधांचे ही इमारत हे एक बोलके प्रतीक आहे. १९४८ साली पुणे विद्यापीठाची स्थापना झाली; शिक्षण प्रसारक मंडळीचे फारा वर्षांचे एक स्वप्न साकार झाले. या विद्यापीठाची स्थापना, जडण-घडण, वाढ इत्यादी कामांत शि. प्र. मंडळीने परिपूर्ण सहकार्य देऊ केले. येथपर्यंत की, आवश्यक तर पुणे विद्यापीठाने सबंध स. प. महाविद्यालय ताब्यात घेऊन त्याचा विद्यापीठाच्या कार्यासाठी इष्ट तो उपयोग करावा, – मग स्वतंत्र संस्था म्हणून स. प. म.-ची नावनिशीही उरली नाही, तरी चालेल. शि. प्र. मंडळीने देऊ केलेल्या या अपूर्व सहकार्याचा उल्लेख स. प. म.-च्या त्रैवार्षिक पाहणीसाठी पुणे विद्यापीठाने १९५१ साली नेमलेल्या पाहणी-समितीने आपल्या प्रतिवृत्तात आवर्जून केला आहे. 'In order to make Poona University take substantive form, the Shikshan Prasarak Mandali was prepared to contemplate with equanimity the ultimate disappearence of Sir Parashurambhau College as a separate unit.' पुणे विद्यापीठाने १९४९ साली पदवीपरीक्षेच्या शिक्षणाचे केंद्रीकरण केले; तेव्हा काही विषयांचे वर्ग स. प. म. -मध्ये ठेविले. या सर्व वर्गांना स. प. म.-ची उपलब्ध जागा प्रशस्त असूनही अपुरी पडू लागली, हे पाहून जागेची टंचाई दूर करण्यासाठी विद्यापीठाने स. प. म.-च्या आवारात हा व्याख्यानवर्ग १९५३ साली बांधला. स. प. म.-ने पुणे विद्यापीठाला दिलेल्या सहकार्याचे आणखी दोन साक्षीदार स. प. म.-च्या आवारात बांधकामाच्या स्वरूपात उभे आहेत. एक, केंद्रीकरणाच्या काळात ( १९४९-५७ ) जी स्वाध्याययोजना ( ट्युटोरियल स्कीम ) कार्यवाहीत आली होती, तिच्या व्यवस्थेसाठी अध्यापक-विश्रामाशेजारच्या गच्चीवर बांधलेली प्रशस्त स्वाध्यायशाला; दोन, आजच्या भूगोल-प्रस्थानावर ( मुख्य इमारतीच्या पूर्वेकडील फाट्याच्या मूळ गच्चीवर ) बांधलेली अभ्यासशाला. पुणे विद्यापीठाचे फ्रेंच, जर्मन आणि रशियन भाषांच्या 'सर्टिफिकेट' आणि 'डिप्लोमा' शिक्षणक्रमांचे वर्ग आज कित्येक वर्षे स. प. म.-च्याच इमारतीत संध्याकाळी भरतात. नुकत्याच सुरू झालेल्या वृत्तपत्रविद्येच्या शिक्षणक्रमाचा वर्गही गेली दोन वर्षे स. प. म.-मध्येच संध्याकाळी भरत असे. स. प. म. आणि पुणे विद्यापीठ यांच्यामध्ये असे हे घरोब्याचे नाते आहे.

स. प. म.-चे पुणे विद्यापीठाशी जे संबंध आहेत, त्यांचा इतिहास या विद्यापीठाच्या स्थापनेच्याही पूर्वीपासून सुरू झालेला आहे. पूर्वीच्या मुंबई इलाख्यात प्रत्येक भाषाविभागासाठी एक अशी पाच विद्यापीठे असावीत, अशी कल्पना संघटितरीत्या प्रथम मांडली गेली, ती १९१७-मध्ये मुंबईत सर नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या मुंबई इलाखा शैक्षणिक परिषदेत. नंतर १९२४-मध्ये सरकारने सर चिमनलाल सेटलवाड यांच्या धुरीणत्वाखाली नेमलेल्या विद्यापीठ-सुधारणा-समितीने ( कमिटी फॉर युनिव्हर्सिटी रिफॉर्म ) महाराष्ट्रासाठी पुण्यात विद्यापीठ स्थापण्याची प्रथमच शिफारस केली; आणि मुंबई विद्यापीठाने तिला पाठिंबा देऊन तीत अध्यापनाचीही व्यवस्था व्हावी, अशी सूचना केली. यानंतरच्या काळात 'मराठी साहित्य संमेलन' इत्यादी बिन-सरकारी संघटनांच्या आणि समित्यांच्या द्वारा महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेसाठी अनेक वर्षे प्रचारात्मक चळवळ होत राहिली; तीत 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन'चे चिटणीस या नात्याने प्रा. द. वा. पोतदार यांनी महाराष्ट्रात आणि बाहेर दौरे काढून याविषयी लोकमत संघटित करण्याचे

महत्त्वाचे कार्य केले. याच उद्देशाने १९३३-मध्ये 'महाराष्ट्र विद्यापीठ समिती' (महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कमिटी) डॉ. मु. रा. जयकर यांच्या अध्यक्षतेने स्थापन झाली; तीत श्री. न. चिं. केळकरांनी महत्त्वाचा भाग घेतला होता. या समितीच्या वतीने डॉ. जयकरांनी मुंबईच्या गव्हर्नरांशी केलेल्या वाटाघाटींच्या परिणाम होऊन पुढे सरकारने प्रादेशिक विद्यापीठांच्या स्थापनेच्या विचारासाठी एक परिषदही बोलाविली होती. अशा रितीने सरकारी आणि बिन-सरकारी पातळ्यांवरून होत राहिलेल्या चर्चा-विचार-प्रचारांचा परिपाक होऊन या प्रश्नाचा सांगोपांग विचार करून शिफारसी करण्यासाठी सरकारने १९४३ साली डॉ. जयकरांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कमिटी' ही समिती नेमली; आणि तिच्या शिफारसीनुसार १९४८ साली पुणे विद्यापीठ अस्तित्वात आले. या समिती-कडे शि. प्र. मंडळीने पाठविलेल्या निवेदनातील महत्त्वाचा भाग या समितीच्या प्रतिवृत्तात उद्धृत केलेला आहे. त्यात 'पुणे विद्यापीठ हे एकायन (युनिटरी) आणि अध्यापनप्रधान (टीचिंग) विद्यापीठ असावे, आणि पुण्यातील सर्व महाविद्यालये त्यात विलीन करावी,' अशी सूचना केली आहे. पुणे विद्यापीठाच्या कार्यात शि. प्र. मंडळीने परिपूर्ण सहकार्य करून आपल्या या भूमिकेवरील निष्ठा कशी प्रकट केली, हे मागे सांगितलेच आहे.

पुणे विद्यापीठाच्या स्थापनेनंतर स. प. म. आणि शि. प्र. मंडळी यांचे अनेक पदाधिकारी आणि सदस्य यांनी विद्यापीठाच्या महत्त्वाच्या अधिकारपदांवर आणि मंडळांवर काम केले आहे, —

१. म. म. द. वा. पोतदार : पुणे विद्यापीठाचे कुलगुरू; मानस-नैतिक-सामाजिक शास्त्रशाखेचे प्रमुख.

२. डॉ. वा. रा. ढमढेरे (शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे सदस्य) : पुणे विद्यापीठाच्या कार्य-कारिणीचे सदस्य.

३. प्राचार्य र. दा. करमरकर : हंगामी कुलगुरू; साहित्यशाखेचे प्रमुख; कार्यकारिणीचे सदस्य.

४. प्राचार्य शं. वा. दांडेकर : मानस-नैतिक-सामाजिक शास्त्रशाखेचे प्रमुख.

५. प्रा. ब. वा. भिडे : शास्त्रशाखेचे प्रमुख (डीन); कार्यकारिणीचे सदस्य.

६. प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर : कार्यकारिणीचे (एक्झिक्युटिव्ह कौन्सिल) सदस्य.

७. प्राचार्य रा. रा. मालेगावकर : कार्यकारिणीचे सदस्य.

याप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या जन्माआधीपासून स. प. म. आणि शि. प्र. मंडळी यांनी त्याची घडण आणि विकास यांसाठी महत्त्वाचे कार्य केले असून ती परंपरा आजपर्यंत चालू आहे.

पुणे विद्यापीठ स्थापन होऊन आता १८ वर्षे झाली. या काळात महाविद्यालयीन शिक्षणात काही महत्त्वाचे बदल घडून आले. मुळात पदव्युत्तर (एम. ए., एम. एस्सी.) शिक्षण विद्यापीठाने आपल्या हाती घेतले; आणि पदवीपर्यंतच्या शिक्षणव्यवस्थेप्रमाणे त्यातही नियमित व्याख्याने, स्वाध्यायवर्ग इत्यादी कार्यक्रम सुरू केला. पुण्यातील सर्व साहित्य-शास्त्र महाविद्यालयांपुरते पदवी-पूर्व शिक्षणक्रमाचे केंद्रीकरण १९४९ साली विद्यापीठाने केले. हा प्रयोग १९५७-पर्यंत चालला. त्यानंतर या व्यवस्थेत आलेल्या अनेकविध अडचणींचा विचार करून न्या. गजेंद्रगडकर-समितीने केलेल्या शिफारसीनुसार पुन्हा महाविद्यालयांना पूर्ववत स्वातंत्र्य मिळाले. पुणे विद्यापीठ हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे विद्यापीठ व्हावे, यासाठी साहित्यशाखेच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणक्रमात माध्यम म्हणून मराठीची रुजवात १९५५-पासून झाली. आणि आज पदव्युत्तर शिक्षणक्रमातही हे माध्यम स्वीकारण्याचा विचार होत आहे. मध्यंतरी १९५८ साली विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या (युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशन) शिफारसीनुसार 'त्रिवर्ष-पदवी योजना' (थ्री इयर डिग्री कोर्स) अस्तित्वात आली. तदनुसार महाविद्यालयाचे पहिले वर्ष पदवीपूर्व वर्ष म्हणून वेगळे काढण्यात येऊन पुढच्या तीन वर्षांचा संयुक्त (इंटिग्रे-टेड) अभ्यासक्रम सुरू झाला; आणि या चारही वर्षांच्या वार्षिक परीक्षा विद्यापीठाच्या अधिकारात समाविष्ट झाल्या. अलीकडे पदव्युत्तर दोन वर्षांच्या शिक्षणक्रमा-तही एकूण परीक्षा दोन भागांत, दोन वर्षांत विभागण्यात आली आहे. या आणि यांसारख्या योजनांतून महाविद्या-लयीन आणि पदव्युत्तर शिक्षणक्रमाचा हळूहळू एक प्रकारे कायाकल्पच होत आला असून, त्यामुळे एकीकडून विद्यार्थ्यांना अभ्यासात सुकरता मिळून दुसरीकडून त्यात दार्ढ्य उत्पन्न होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे; आणि ती यापूर्वी पहिली-दुसरी पदवी संपादन

केलेल्या पदवीधरांना असे वाटावयास लावीत आहे की, ' आमच्या वेळी असे असते तर — ! '

## आकांक्षा, संकल्प आणि साहाय्य

अशी ही सर परशुरामभाऊ महाविद्यालयाची गेल्या पन्नास वर्षांची वाटचाल आहे. ही ' साठां उत्तरांची कहाणी ' येथे ' पाचां उत्तरीं ' सांगितली आहे. सामान्यांनी उभारलेल्या असामान्य कार्याची ही गाथा आहे. सुखाची सरकारी नोकरी सोडून शाळेत दरमहा अडीच रुपये पगार घेऊन, तोही बुडेल तेव्हा मधुकरी मागून, ज्या प्राथमिक शिक्षकांनी स्वीकृत कार्य निर्धाराने पुढे चालविले, त्यांच्या वारसांनी तशाच प्रकारे मोठ्या हुद्द्यांच्या सरकारी नोकऱ्या सोडून बेताच्या पगारावर, वेळी-प्रसंगी त्यातूनही इतरांच्या अधिक पगाराची भरपाई करीत, दोन महापुरुषांच्या आशीर्वादाने ही संस्था जमिनीपासून कमरेपर्यंत वर आणली. त्यांचे सत्त्व, त्यांचे धैर्य, त्यांची निष्ठा पाहून आणखी एक महापुरुष त्यांच्या पाठीशी उभा राहिला; आणि संस्थेला वाढण्यास उदंड भूमी त्याने मिळवून दिली. त्या भूमीवर प्रासादतुल्य इमारत उभी राहिली. दातृत्वाचे काही लहानमोठे ओहोळ संस्थेकडे वाहिले. त्यांतून बळाची भरपाई आणि वाढ करीत पण प्रामुख्याने सत्त्वबळावर ही संस्था वाढत राहिली; आणि आज ती पन्नास वर्षांच्या भरीव कार्याच्या तारणावर, याहून भरीव कार्य करण्यास समर्थ होण्यासाठी नवी वाढ करण्याकरिता, विद्यार्थी-हितचिंतक-दाते-ठेविते या सर्वांना देवीं-ठेवींसाठी आवाहन करीत आहे. कार्य करणाऱ्या व्यक्तीचे काय किंवा संस्थेचे काय, क्षितिज नेहमी रुंदावणारे असते, असावेही लागते; आणि तिचे कार्य अखेर समाजाच्याच कारणी लागणारे असते. त्याला साहाय्य समाजानेच करावयास हवे. आज जुन्या काळातले दातृत्वाचे ओहोळ बदललेल्या परिस्थितीत प्रायः आटत आले आहेत; त्यांची जागा नव्या ओहोळांनी घ्यावयास हवी आहे.

सामान्यांनाही यात पुष्कळच करिता येण्यासारखे आहे. स. प. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी मनावर घेतले, तर केवळ त्यांनासुद्धा ही संस्था सुखाने चालण्या-वाढण्याइतके द्रव्यबळ उभे करिता येईल. अमेरिकेत विद्यापीठांचासुद्धा योगक्षेम त्यांच्या माजी विद्यार्थ्यांनी निधी उभे करून वाहिला आहे; आपणांला तसे महाविद्यालयाच्या बाबतीत तरी करिता येईल का, हे करून पाहण्यासारखे आहे. स. प. म.-मधून पदवीधर होऊन बाहेर पडलेले, आणि इंटर, प्री-प्रोफेशनल परीक्षेनंतर वैद्यकीय किंवा स्थापत्य यांत्रिकी महाविद्यालयांत जाऊन पदवीधर झालेले विद्यार्थी २० हजारांच्या घरात आहेत. केवळ एवढ्यांनी जरी दरमहा फक्त एक रुपया महाविद्यालयाला दिला ( या योजनेला विद्यमान विद्यार्थ्यांनीही हातभार लावणे शक्य आणि उचित होईल ), तरी प्रतिवर्षी लाख-दोन-लाख रुपये उभे राहतील. यांतून एखाद-दुसरे उद्योगालयही चालविता येईल; आणि त्यातला फायदा संस्थेला मिळेल. अशी जुन्या ' पैसा-फंड '-योजनेसारखी ' रुपया-फंड '-योजना उभारून कायमची चालविली — याला वाटल्यास ' परशुरामीय प्रतिष्ठान ( फाउंडेशन ) ' असे नाव देता येईल — तर स. प. म.-ला इतरांकडे कदाचित याचनाही करावी लागणार नाही. अधिक सामर्थ्य असणाऱ्यांनी याहून अधिकही करावयास हरकत नाही; इतकेही सामर्थ्य नसणाऱ्यांनी याहून कमी किंबहुना नुसत्या सदिच्छा दिल्या, तरी हरकत नाही. पण अशा रीतीने या महाविद्यालयाचा योगक्षेम त्याच्या माजी विद्यार्थ्यांनी वाहिला, तर त्यासारखी अभिमानाची गोष्ट दुसरी असणार नाही.

आज स. प. महाविद्यालयाच्या गरजा त्यांतील काहींच्या खर्चाच्या अंदाजासह अग्रक्रमानुरोधाने अशा आहेत :

१. जीवशास्त्र आणि संख्याशास्त्र या विषयांसाठी प्रयोगशाळा : रु. ९,००,०००.

२. साहित्यशाखेच्या प्राध्यापकांसाठी अभ्यासिका, स्वाध्यायवर्ग ( ट्युटोरियल रूम्स ) आणि चर्चागृहे : रु. २,५०,०००.

३. ग्रंथालय इमारतीचा विस्तार : रु. १,५०,०००.

४. भूगोल-विषयाच्या प्रयोगशाळेसाठी सध्याच्या भौतिकी-प्रयोगशाळेवर नवा मजला : रु. १,००,०००.

५. जीवशास्त्र प्रयोगशाळा बांधून झाल्यावर जीवशास्त्र प्रयोगशाळेच्या सध्याच्या जागेत प्रायोगिक मानसशास्त्राच्या प्रयोगशाळेचा विस्तार : रु. १,००,०००.

६. पुढच्या शैक्षणिक वर्षापासून बी. ए.-साठी समाजशास्त्र या विषयाची तरतूद.

७. स. प. म.-चे प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे सहकारी-भांडार आणि सहकारी उपाहारगृह.

८. व्यायामशाळेसाठी आधुनिक सोयींनी युक्त अशी इमारत.

९. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात नव्या तिमजली फाट्याची बांधणी : रु. ३,७५,०००.

१०. जुन्या प्रयोगशाळांतील सामग्रीचे नूतनीकरण.

११. विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तरांत ( रेशो ) सुधारणा.

१२. विद्यार्थ्यांसाठी छंदशाळा ( हॉबी वर्कशॉप ).

वर दिलेल्या योजनांचे लक्षपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येईल की, त्यांपैकी काही योजना ( समाजशास्त्र-प्रस्थान, विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तरात सुधारणा ) निखळ शैक्षणिक स्वरूपाच्या आहेत. काही ( सहकारी भांडार इ. ) विद्यार्थी-हितसंवर्धनाच्या कक्षेतल्या आहेत; अवशिष्ट योजना बांधकामाच्या आहेत. म्हणजेच, या सर्व योजना काही व्यापक भूमिकेवरून आखलेल्या आहेत. बांधकामाच्या योजनाही अखेर शिक्षणाची उंची वाढविण्याच्या आणि गैरसोय निवारण्याच्या कारणी लागणार आहेत. उच्च शिक्षण ही एक अनेकांगी आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे, हे ध्यानात घेतल्यास वरील सर्व योजनांची उपयुक्तता पटेल.

यांपैकी ज्यांचे अंदाज काढलेले आहेत, अशा योजनांचा खर्च १८ लाखांच्या घरात जातो. यांपैकी जीवशास्त्र-प्रयोगशाळेसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने तीन लाख रुपये दिले असून, लहान-मोठ्या खासगी देणग्यांतून वगैरे जमलेली, आश्वासने मिळालेली आणि अपेक्षित असलेली रक्कम सुमारे तीन-चार लाखांच्या घरात जाईल. यात नाट्य-नृत्य-संगीतक्षेत्रांतल्या अनेक संस्थांनी आणि व्यक्तींनी मदतीसाठी आपुलकीने दिलेल्या कार्यक्रमांतून राहणारा निव्वळ लाभांश आणि सुवर्णमहोत्सवानिमित्त निघणाऱ्या स्मरणिकेत – ‘ सुवर्णमुद्रे ’त – महाराष्ट्र-शासनाने ( रु. ३५०० ) आणि पुणे जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ, लि. पुणे ( रु. ३००० ), किर्लोस्कर उद्योग-समूह ( रु. २८०० ) इत्यादी विविध उद्योगसंस्थांनी औदार्याने दिलेल्या जाहिरातींचे उत्पन्न यांचा समावेश आहे. सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत मिळालेल्या खासगी देणग्यांमध्ये सर्वात मोठी ५०,००० रुपयांची देणगी ‘ किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि., खडकी, पुणे ३’ या संस्थेकडून मिळालेली असून तिच्यासाठी ही संस्था पद्मभूषण श्री. शंतनुराव किर्लोस्कर आणि ‘ किर्लोस्कर ऑईल एंजिन्स ’ यांची अतीव ऋणी राहील. या देणगीव्यतिरिक्त आजवर जमलेल्या इतर ठळक देणग्या अशा :

( १ ) श्रीमान शेठ अरविंद मफतलाल, मुंबई : रु. १५,०००

( २ ) श्रीमती राजमाता लयलाबाई पटवर्धन, जमखंडी : रु. १०,०००

( ३ ) अनामक दाता : रु. १०,०००

( ४ ) बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि , पुणे : रु. १०,०००

( ५ ) सर दोराबजी टाटा ट्रस्ट, मुंबई : रु. १०,०००

या आणि अन्य देणगीदारांचे आणि जाहिरातदारांचे स. प. म. सदैव ऋणी राहील.

हे सर्व मिळालेले साहाय्य गृहीत धरल्यावरही संकल्पित योजनांच्या सिद्धीसाठी अपेक्षित असलेल्या रकमेपैकी निम्म्याहून अधिक रक्कम जमवावयाची राहते· ती जमविण्यासाठी संस्थेचे प्रयत्न चालू राहतीलच. या प्रयत्नांना स. प. म.-च्या भूतपूर्व आणि विद्यमान विद्यार्थ्यांनीही मागे सुचविलेल्या ‘ रुपया-फंड ’-योजनेसारख्या अल्पायाससाध्य योजनेच्या द्वारा, किंबहुना लहानमोठ्या ठेवी शि. प्र. मंडळीकडे अल्प व्याजाने ठेवण्याच्याही द्वारा, हातभार लाविल्यास या योजनांची सिद्धी आणखी जवळ येणार आहे. हे श्रेय स. प. म.-चे विद्यार्थी घेतील, आणि अशा रितीने विद्याऋणाची फेड करिता-करिता आपल्या आणि स्वबांधवांच्या उगवत्या आणि भावी पिढ्यांना अधिक चांगले उच्च शिक्षण उपलब्ध करून देण्याचे पुण्यही जोडतील, अशी आशा आणि विश्वास, त्यांनी अध्ययनकालात अभिमानाने मिरविलेले ‘ निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु ’ अर्थात ‘ हातीं घ्याल तें तडीस न्या ’ हे ब्रीद लक्षात घेता, मुळीच अस्थानी होणार नाहीत.

## ‘ आतां विश्वात्मकें देवें.... ’

‘ बुलंद धैर्य-विश्वास हीच ज्यांची दौलत, अशा लोकांनी पुण्यभूमीत जे अणुमात्र बीज पेरले, त्यातून त्यागाच्या पाण्यावर पोसलेला हा विशाल वटवृक्ष उभा राहिला आहे. तो हा, ज्ञानवंताचे ज्ञान जिज्ञासूंना तळहातीच्या आवळ्याप्रमाणे लाहवीत असलेला बोधिवृक्ष, जोवर आकाशात चंद्रसूर्य आहेत तोवर प्रेमळ सावली धरीत राहो ! ’

बीजं दभ्रमदभ्रसत्त्वविभवैराधायि पुण्यावनौ
सिक्तस्त्यागजलैस्ततोऽद्य सुमहान् न्यग्रोध एष स्थितः ।
बोधिं बोधिमतां करामलकवद् बोध्येषु संक्रामयन्
यावच्चन्द्रदिवाकरौ वितनुतां छायामसौ वत्सलाम् ॥

Biology Laboratory 1 second floor
Boys' Hostel 11
Canteen 7
Chemistry Laboratory 9
College Office 1 ground floor
Cycle Stand 21
Experimental Psychology Laboratory 1 ground floor
Gymkhana 15
Ground 14
L. T. M. and Students' Library 3 basement
Ladies' Common Room 19
Ladies' Hostel 18
Lady Ramabai Hall 4
Lawns 20
Library 5
Main Building 1
N. C. C. Office 6
P. T. Director's office 15
Parshuramiya Editor's Office 5
Physics Laboratory 10
Post Office 22
Principal's Bungalow 16
Principal's Office 1 first floor
Professors' Common Room 1 first floor
Professors' Quarters 13
Rector's Bungalow (Boys' Hostel) 12
Rector's Bungalow (Ladies' Hostel) 17
Statistics Laboratory 1 ground floor
Students' Hall 2
Students' Welfare Committee Office 1 first floor
Study Room 5 first floor
Swimming Pool 8
University Lecture Hall 3




## S. P. COLLEGE CAMPUS

**परशुरामीय**

**सु व र्णां क**

वर्ष एकावन्नावे

अंक पहिला

डिसेंबर १९६६

संपादक, प्रकाशक

डॉ. श्री. र. कावळे

स. प. महाविद्यालय

पुणे ९

मुद्रक

य. गो. जोशी

आनंद मुद्रणालय

१५२३ सदाशिव

पुणे २